# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ११/ २०१३** **दिनांक २१.०६.२०१३**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शुक्रवार दि.२१.०६.२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/ १३५२/ २०१३, दिनांक २० जुन, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दि.२१.०६.२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१ दि.०२.०६.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.४३४ दिनांक ०२.०६.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) माहे एप्रिल व मे -२०१३ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने, चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या अनुक्रमे माहे एप्रिल व मे- २०१३ मधील जमा रु.१३,६३,३१,८०५/- व रु.१२,९०,४८,९६८/- मात्र तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३५ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**(ब) माहे एप्रिल व मे- २०१३ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा अनुक्रमे माहे एप्रिल व मे- २०१३ मधील रु.२,८२,९२१/- व रु.१,७७,१८०/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३५ (B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल व मे - २०१३ मध्ये गरीब रुग्णांना वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

साईनाथ रुग्णालयात अनुक्रमे माहे एप्रिल व मे- २०१३ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये २,२७,१४१/- व रु.२,१५,३११/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३५ (C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे एप्रिल व मे- २०१३ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये अनुक्रमे माहे एप्रिल व मे- २०१३ मधील रु.३५,२०,५४१/- व रु.४५,६२,४५०/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३५ (D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईबाबा रुग्णालयात माहे मार्च- २०१३ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात माहे मार्च- २०१३ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.१,०८,४६,४३२/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३५ (E) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. श्री साईबाबा रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात जानेवारी व फेब्रुवारी -२०१३ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे जानेवारी व फेब्रुवारी -२०१३ मध्ये रुपये १०,८२,५०१/- व रु.९,४१,०६१/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.४३५ (F) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. श्री साईनाथ रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात जानेवारी व फेब्रुवारी- २०१३ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे जानेवारी व फेब्रुवारी -२०१३ मध्ये रु.१,०१,६९४/- व रु.६७,२२४/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.४३५ (G) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०७. माहे एप्रिल - २०१३ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

माहे एप्रिल- २०१३ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ५३,४५६ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.४३५ (H) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.०३ साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत लाडूप्रसाद देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच २१ (१ ग) नूसार भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावनाः-** उपरोक्त विषयान्वये संदर्भियनूसार मा.अध्यक्ष साहेब यांचे आवक नं.११८९ दि.२२/०४/२०१३ रोजी इकडील विभागास पत्र प्राप्त झालेले आहे. पत्रामधील मुद्दा क्रं.५ अन्वये नुकतेच मा.उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीच्या वेळी भक्तांना दर्शन रांगेत मोफत नाष्टा देता येईल काय ? या विषयी विचारणा करण्यात आल्याचे आपल्या वकीलांचे म्हणणे आहे. याविषयी सविस्तर अहवाल सादर करावा. तसेच मुद्दा क्रं. ६ अन्वये कुठल्याही प्रकारच्या तेलकट पदार्थांचा नाष्टा देण्याऐवजी प्रत्येक भक्तास एक बुंदीचा लाडू (वजन अंदाजे १०० ते १५० ग्रॅम) प्रसाद म्हणून देता येईल काय, त्याचा उपयोग भक्त भुक लागल्यास नाष्टा म्हणूनही करु शकतील व त्याकरीता संस्थानवर किती आर्थिक बोजा पडेल ? याचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानूसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहोत.

**१) <u>मा.अधक्ष साहेब यांचे पत्रामधील मुद्दा क्रं.५ नूसार अहवाल खालीलप्रमाणे</u> :-**

श्री साईंचे दर्शनासाठी राज्यातून, देशातून , परदेशातून भक्त येत असतात. साईंचे काकड आरती दर्शनासाठी भक्त पहाटे ३-४ वाजताच दर्शनरांगेत रांग लावतात. गर्दीचे काळात सदर दर्शन रांग ही बऱ्याचदा मंदिर परिसरातून गावाचे बाहेर जाते. सकाळी ४.३० वा. काकड आरती नंतर स्नान होवून ५.४० वाजता दर्शनरांग सुरु होते. दर्शनरांग सुरु झालेनंतर भक्तांना दर्शन घेवून बाहेर येणेसाठी साधारणतः दोन तासांचा कालावधी लागतो. गर्दीचे काळात साईभक्तांना दर्शन रांगेमध्ये तीन तास उभे रहावे लागते. त्यामुळे दर्शन रांगेतून दर्शन कालावधीमध्ये साईभक्तांना अल्पोपहार देणे गरजेचे आहे. परंतू श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची गर्दी ही मोठया प्रमाणात असल्याने एवढया मोठयाप्रमाणात भक्तांना उपरोक्तप्रमाणे नाष्टा देणे शक्य होणार नाही त्याऐवजी दर्शन झाल्यानंतर अल्पोपहारची व्यवस्था असावी म्हणून श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव यांचेप्रमाणे संस्थान परिसरात जागोजागी उदा.मंदीर परिसर, व्दारावती निवासस्थान, नविन भक्त निवासस्थान, साईआश्रम, इत्यादी ठिकाणी साईभक्तांना अल्पदरात नाष्टा सेंटर सुरु करता येईल. नाष्टयामध्ये शिरा,बटाटा वडा, उपमा,पोहे, इडली चटणी इत्यादी पदार्थ देता येतील. मात्र सदर पदार्थ बनविणेसाठी लागणारे आचारी, कर्मचारी वर्ग, किचनसाठी आवश्यक

जागा, भांडी, यंत्र-सामुग्री इत्यांदी बाबींमध्ये वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे. **याऐवजी दर्शनरांगेमधून साईभक्तांना शुध्द तुपाचे मोतीचूर लाडु प्रसाद म्हणून मोफत देण्यातबाबत विचार करता येईल.**

**२) मा. अध्यक्ष साहेब यांचे पत्रामधील मुद्या क्रं.६ नूसार अहवाल खालीलप्रमाणे :-**

श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना शिरडीतून घरी परत जातांना देवस्थानमध्ये बनविलेला काही तरी प्रसाद असावा म्हणून श्री तिरुमला देवस्थान प्रमाणे सन १९९३-१९९४ पासून मोतीचूर लाडू बनवून अल्प दरात विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आहे.

माहे एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर विक्री झालेल्या लाडूचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **महीना** | **मोतीचूर लाडू विक्री नग संख्या** | **महीना** | **मोतीचूर लाडू विक्री नग संख्या** |
|---|---|---|---|
| | | **मागील लाडू नग =** | **२,९५,९९,१६१** |
| एप्रिल-२०१२ | ४२,९९,२७० | ऑक्टोबर-२०१२ | ४०,४६,६८८ |
| मे-२०१२ | ५३,८१,५९५ | नोव्हेंबर-२०१२ | ३९,९४,७१० |
| जुन-२०१२ | ५०,६५,८०० | डिसेंबर-२०१२ | ५३,६८,२२७ |
| जुलै-२०१२ | ५५,६५,१९८ | जानेवारी-२०१३ | ५१,९१,९७४ |
| ऑगस्ट-२०१२ | ५४,१९,३०८ | फेब्रुवारी-२०१२ | ३९,९८,९१६ |
| सप्टेंबर-२०१२ | ३८,६७,९९० | मार्च-२०१३ | ४७,५६,५९० |
| **एकूण लाडू नग=** | **२,९५,९९,१६१** | **एकूण लाडू नग =** | **५,६९,५६,२६६** |

वरील तक्त्यानूसार माहे एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर एकूण ५,६९,५६,२६६ नग लाडूंची विक्री झालेली आहे. त्यानूसार दैनंदीन सरासरी १,५६,०४५ लाडूंची बनवून विक्री करण्यात येत आहे.

वरील अ.नं.१ मध्ये दर्शविलेनूसार साईभक्तांना साईंचे दर्शनासाठी पहाटे ३-४ वाजेपासून दर्शनरांगेत दर्शनासाठी उभे रहावे लागते. सकाळी ५.४० वाजता दर्शन रांग सुरु झाल्यानंतर भक्तांना दर्शनासाठी कमी गर्दीचे कालावधीमध्ये साधारणतः २ तास लागतात. व गर्दीचे काळात साधारणतः २ ते ३ तासांचा कालावधी लागतो त्यामुळे या दरम्यान साईभक्तांना " कुठल्याही प्रकारच्या तेलकट पदार्थांचा नाष्टा देण्याऐवजी प्रत्येक भक्तास एक बुंदीचा लाडू (वजन अंदाजे १०० ते १५० ग्रॅम) प्रसाद म्हणून देता येईल काय ? याबाबत मा.अध्यक्ष साहेब यांनी संदर्भिय पत्रान्वये विचारणा केलेली आहे.

त्यानूसार साईभक्तांना दर्शन रांगेत मोतीचूर लाडू प्रसाद मोफत देता येइल, मात्र सदर लाडू हे १०० ते १५० गॅम वजना ऐवजी ५० ग्रॅम वजनाचेच दोन लाडू देणे योग्य होईल. कारण- मा.व्यवस्थापन समिती दिनांक ०६/०८/२००५ मधील निर्णयानूसार साईभक्तांना संस्थानने तयार केलेला प्रसाद असावा म्हणून ५० ग्रॅम लाडू ऐवजी ७५ व १५० ग्रॅम वजनाचा लाडू विक्रीसाठी ठेवण्यात आलेला होता.

परंतू मा.व्यवस्थापन समिती दि.१८/१२/२००५ मधील निर्णय क्रं. ७६१ नूसार १५० ग्रॅम वजनाचे लाडू विक्रीसाठी ठेवले असता सदर लाडू लवकर सुकत नाही, आतमध्ये ओले राहतात, त्याची मागणी नाही त्यामुळे ५० ग्रॅमचे लाडूचे मानाने १५० ग्रॅमचे लाडू लवकर खराब होतात. खराब लाडूचे प्रसाद म्हणून वाटप झाल्यास भक्तांना त्रास होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे साईभक्तांना दर्शन रांगेमध्ये १०० ग्रॅम वजनाचे लाडू ऐवजी ५० ग्रॅम वजनाचेच २ नग प्रसादलाडू मोफत देता येईल किंवा कसे ? याबाबत विचार व्हावा.

माहे एप्रिल-२०१२ ते मार्च २०१३ अखेर दर्शन रांगेमधून दर्शन घेणाऱ्या साईभक्तांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ. नं.** | **महिना** | **दर्शन रांगेतून दर्शन घेणाऱ्या भक्तांची संख्या** | **अ. नं.** | **महिना** | **दर्शन रांगेतून दर्शन घेणाऱ्या भक्तांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|
| | | | **मागील बेरीज =** | | **१,१०,६७,४३८** |
| १ | एप्रिल-२०१२ | १६,५९,८१४ | ७ | ऑक्टोबर-२०१२ | १२,८४,००० |
| २ | मे-२०१२ | २१,०६,१३६ | ८ | नोव्हेंबर-२०१२ | १४,००,९४४ |
| ३ | जुन-२०१२ | १८,४८,७५१ | ९ | डिसेंबर-२०१२ | १८,३१,१०३ |
| ४ | जुलै-२०१२ | २०,१५,८३८ | १० | जानेवारी-२०१३ | १६,६५,७२७ |
| ५ | ऑगस्ट-२०१२ | १९,४०,६७७ | ११ | फेब्रुवारी-२०१३ | १२,७१,५३३ |
| ६ | सप्टेंबर-२०१२ | १४,९६,२२२ | १२ | मार्च -२०१३ | १४,२०,१९३ |
| | **एकूण =** | **१,१०,६७,४३८** | **एकूण भक्तांची संख्या =** | | **१,९९,४०,९३८** |

वरील तक्त्यानूसार माहे एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर १,९९,४०,९३८ साईभक्तांनी दर्शनाचा लाभ घेतलेला आहे. त्यानूसार दरमहा सरासरी १६,६१,७४५ व दर्रोज सरासरी ५४,६३३ साईभक्त दर्शन रांगेतून दर्शनाचा लाभ घेत आहेत.

सध्या साईभक्तांना प्रसाद म्हणून विक्री करण्यात येत असलेल्या मोतीचूर लाडूचे प्रति नगासाठी व माहे मार्च-२०१३ मध्ये प्रती नगास येणाऱ्या खर्चाचा सविस्तर तपशिल अवलोकनार्थ सोबत जोडलेला आहे.

माहे एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर दर्शनरांगेतून दर्शन घेणाऱ्या साईभक्तांचे संख्येचा विचार करता दर वर्षाकाठी संस्थानला अंदाजे येणाऱ्या खर्चाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

**अ)** दर्शन रांगेमधून प्रति भक्तास ५० ग्रॅम वजनाचे दोन लाडूचे एक पाकीट मोफत दिल्यास एक वर्षासाठी अंदाजे खालीलप्रमाणे प्रत्यक्ष खर्च येईल.

| | |
|---|---|
| माहे एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर दर्शन घेणाऱ्या भक्तांचे संख्येनूसार | १,९९,४०,९३८ |
| प्रति भक्तास दोन लाडू प्रमाणे | x २ |
| एक वर्षासाठी अंदाजे लागणारे लाडू नग संख्या = | ३,९८,८१,८७६ नग |
| प्रति लाडूस येणारा अंदाजे खर्च = | x रु.५.९५ |
| वर्षाकाठी येणारा अंदाजे एकूण खर्च = | रु.२३,७२,९७,१६२/- |
| (*) सध्याचे विक्री दरानूसार संस्थान सध्या सहन करीत असलेली चारीटीची रक्कम (एका लाडूसाठी अंदाजे रु.२.६१६पैसे ) रुपये = | १०,४३,५७,५७६/- |
| दर्शन रांगेत प्रत्येक भक्तांस दोन लाडू नग मोफत दिल्यास सध्या देण्यात येत असलेल्या वरील (*) चारीटीचे रक्कमे व्यतिरिक्त संस्थानला वाढीव सहन करावी लागणारी (चारीटीची) रक्कम रुपये = | १३,२९,३९,५८६/- |

वरीलप्रमाणे लाडूकरीता वर्षाकाठी कच्चा माल, मजुरी इत्यादीसह अंदाजे एकूण रु.२३,७२,९७,१६२/- इतका खर्च येईल.

**ब)** दर्शन रांगेमधून प्रति भक्तास ५० ग्रॅम वजनाचे दोन लाडूचे एक पाकीट मोफत दिल्यास सध्या लाडू विक्री पाकीटाचे प्रचलीत दरानूसार एक वर्षासाठी खालीलप्रमाणे खर्च येईल.

| | |
|---|---|
| माहे एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ अखेर दर्शन घेणाऱ्या भक्तांचे संख्येनूसार | **१,९९,४०,९३८** |
| प्रति भक्तास दोन लाडू प्रमाणे | **x २** |
| एक वर्षासाठी अंदाजे लागणारे लाडू नग संख्या = | ३,९८,८१,८७६ नग |
| तीन लाडूचे एका पाकीटास रु.१०/- त्याप्रमाणे प्रति लाडूचा विक्री दर रु. = | x रु.३.३३३३३ |
| **वर्षाकाठी येणारा अंदाजे एकूण खर्च =** | **रु.१३,२९,३९,५८६/-** |

सध्या तीन लाडूचे एका पाकीटासाठी विक्री दर रु.१०/- असून सदर पाकीटासाठी अंदाजे प्रत्यक्ष खर्च रु.१७.८५ पैसे इतका येत आहे. सध्या भक्तांना विक्री करण्यात येत असलेल्या तीन लाडूचे एका पाकीटासाठी अंदाजे रु.७.८५ पैसे इतकी रक्कम चारीटी करण्यात येत आहे.

आता दर्शन रांगेमधून प्रति भक्तास ५० ग्रॅम वजनाचे दोन लाडूचे एक पाकीट मोफत द्यावयाचे झाल्यास अंदाजे वर्षाकाठी १,९९,४०,९३८ इतक्या भक्तांचे संख्येनूसार प्रचलीत दराअन्वये ब तक्त्यानूसार रक्कम रु. १३,२९,३९,५८६/- (अक्षरी रक्कम रु. तेरा कोटी एकोणतीस लाख एकोणचाळीस हजार पाचशे शहाऐंशी मात्र) इतकी वाढीव चारिटी संस्थानला सहन करावी लागणार आहे.

**मागणी :-** प्रस्तावित केलेप्रमाणे साईभक्तांना दर्शनरांगेतून मोफत प्रसाद लाडू देणे ही बाब आर्थिक दृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर करता येईल.

१) साईभक्तांना दर्शन रांगेतून विनामुल्य प्रसाद लाडूचे वितरण केल्यास अन्नदान फंडातील अखर्चीत उत्पन्नाचा विनीयोग होईल तसेच संस्थान व साईभक्तांचे दृष्टीने ऐतिहासिक निर्णय म्हणून गणना होईल.

२) दर्शन रांगेमधून साईभक्तांना प्रसाद लाडूचे मोफत वितरण केल्यास साईभक्तांना त्याचा अल्पोपहार व प्रसाद म्हणूनही उपयोग करता येईल.

३) दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना प्रसाद लाडूचे मोफत वितरण केल्यास सशुल्क लाडू विक्री काऊंटर पुर्णतः बंद करुन लाडू विक्री काऊंटरवरील कर्मचारी दर्शन रांगेमध्ये मोफत प्रसादलाडूचे वाटप करणेसाठी वापरता येतील

४) साईभक्तांना प्रसाद म्हणून देण्यात येत असलेले लाडूचा वापर जे साईभक्त दर्शन रांगेतून दर्शन घेतील त्यांनाच लाडू प्रसादाचा लाभ होईल.

५) माहे सन २०१२-१३ मधील दर्रोज सरासरीनूसार ५५,३९२ साईभक्त दर्शनाचा लाभ घेतात, त्यानूसार सध्या प्रति भक्तास दोन लाडूप्रमाणे १,१०,७८४ नग लाडू दर्रोज लागतील.

६) सदरचा विषय हा महत्वपुर्ण व मोठा आर्थिक असलेमुळे व श्री साईबाबा संस्थानचा कारभार मुंबई हायकोर्ट औरंगाबाद खंडपीठ यांच्या अधिपत्याखाली सुरु असल्याने पायाभूत/धोरणात्मक निर्णय घेणेपूर्वी त्यास व त्यावरील खर्चास औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागेल असे वाटते.

तरी साईभक्तांना दर्शन रांगेतून मोफत प्रसादलाडूचे वितरण करणे झाल्यास वरीलप्रमाणे अंदाजे अ) नूसार संस्थानवर आर्थिक बोजा पडणार आहे. त्यामुळे सदर बाब ही आर्थिक, धोरणात्मक व खर्चीक असल्याने सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.०४ साईभक्तांसाठी विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२-घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच २१ (१-घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:-** मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४२६.

**प्रस्ताविकः-** संदर्भिय अ.नं.१ अन्वये मा.अध्यक्ष साहेब यांचे दि.२२/०४/२०१३ रोजी आवक विभागाकडील पत्र क्रं.११८९ अन्वये सदरील विषयाची टिपणी मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेत सादर करण्यात येऊन, उपरोक्त विषयान्वये मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.१२/०६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४४६ नूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना झालेल्या आहेत.

"साईबाबा संस्थानचे अन्नदान निधीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अन्नदान निधीमध्ये जमा होणारा निधी त्याच कारणासाठी खर्च होणे आवश्यक आहे. हा खर्च न केल्यास व ही रक्कम वाढीव प्रमाणात शिल्लक राहील्यास त्यावर टॅक्सेस लागण्याची शक्यता आहे. संस्थानने सुरु केलेल्या अन्नदान योजनेतून सद्य परिस्थितीत १२५ ते १५० दिवस मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे. व या योजनेला भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्यामुळे साईभक्तांतर्फे भविष्यात जास्त दिवस मोफत प्रसादभोजन प्रसादालयामध्ये दिले जाईल, असे वाटते. एका दिवशी प्रसादालयामध्ये ३०,००० साईभक्त प्रसादभोजन घेतात, यावरु उर्वरीत २०० ते २४० दिवसही मोफत प्रसादभोजन दिल्यास प्रती साईभक्तांकडून रु.१०/- या प्रमाणे वार्षिक अंदाजे रु.६ ते ७ कोटी मात्र येणारा निधी बंद होईल. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयामध्ये येणारा संस्थानचा निधी बंद होईल. सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयामध्ये साईभक्तांनी रु.१०/- प्रती व्यक्ती याप्रमाणे सशुल्क प्रसादभोजन घेऊन रु.९.९६ कोटी मात्र जमा झालेले आहेत. हा निधी बंद होईल परंतु, या बंद होणाऱ्या निधीची भरपाई मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यास संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत देण्यात येणारे व्ही.आय.पी.दर्शन पास ऑनलाईन दर्शन सुविधेसारखे विनाशिफारस सर्वांसाठी देणगी आकारुन सुरु केल्यास येणाऱ्या अपेक्षीत रु.११ कोटी मात्र रक्कमेमधून करता येईल.

मोफत प्रसादभोजन योजना सुरु केल्यास भक्तांची सोय केल्यास अधिनियमातील तरतुदींची अधिकाधिक उदिष्ठ पुर्ती होईल. प्रसादालयामध्ये दक्षिणा पेटयाची संख्या वाढविल्यास संस्थानच्या उत्पादनात भर पडेल. सध्याच्या मोफत प्रसादभोजन योजने ऐवजी ठराविक दिवशी मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या दानशूर भक्तांची नांवे त्या ठराविक दिवशी प्रसादालयामध्ये दर्शविता येईल. यामधून अनेक साईभक्तांना प्रेरणा मिळेल व व्ही.आय.पी भोजनाचा दर आहे तोच ठेवण्यात येऊन यामधूनही काही प्रमाणात निधी संस्थानला मिळणार आहे. सर्व दिवस मोफत प्रसादभोजन दिल्यास भक्तांना समाधान मिळेल व भारतातच नाही तर संपुर्ण जगामध्ये साईबाबा संस्थानचा नावलौकीक होईल.

साईभक्तांना विनामुल्य लाडूप्रसाद दिल्यास अंदाजे रु.१८ कोटी मात्र व विनामुल्य प्रसादभोजन दिल्यास अंदाजे रु.९.९६ कोटी मात्र ही संस्थानला प्राप्त होणारी रक्कम बंद होऊन तो भार संस्थानला सहन करावा लागणार आहे. सदरहु बाब मेजर फायनान्शीयल असल्याने याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेणेसाठी, विनामुल्य प्रसादभोजन व विनामुल्य लाडूप्रसाद पाकीट दिल्यास संस्थानला वार्षिक किती खर्च होईल याच्या आकडेवारीसह सविस्तर प्रस्ताव करावा, असे ठरले.

संदर्भिय अ.नं.२ मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्रं.१३ वरील निर्णय क्रमांक ४२८ नूसार सविस्तर प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.

सन २०१२-२०१३ (एप्रिल २०१२ ते मार्च २०१३) मध्ये श्री साई प्रसादालयात १,३९,२५,३४१ साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला आहे. त्यामध्ये श्रींचे दर्शनासाठी आलेले भक्त, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्ण, ज्या गरीब व्यक्तींकडे प्रसादभोजनासाठी पैसे नाहीत असे गरीब गरजू

व्यक्ती, परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर मतीमंद शाळेतील मुले, वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, वृध्दाश्रम यांचा समावेश आहे.

| साईभक्त | व्ही.आय.पी कक्ष | रुग्णालयातील रुग्ण | मुकबधीर, मतिमंद, अंध, अपंग, वारकरी, व इतर | गरीब गरजू व्यक्ती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १,२२,१८,५१७ | ८,९८,९८२ | ३,१३,४९३ | ३,००,८९६ | १,९३,४५३ | १,३९,२५,३४१ |

सन २०१२-२०१३ मध्ये वार्षिक सरासरी नूसार प्रती ताटास रु.२०.२५ खर्च आलेला आहे. यामध्ये किराणा साहित्य खर्च, भाजीपाला, एल.पी.गॅस, कायम व कंत्राटी कर्मचारी वेतन खर्च, लाईट, पाणी इत्यादींच्या खर्चाचा समावेश केलेला आहे. त्यानूसार एकूण प्रसादभोजन घेणाऱ्या १,३९,२५,३४१ व्यक्तींसाठी सरासरी ताटाचे खर्चानूसार रु.२०.२५ = रु.२८,१९,८८,१५५/- इतका खर्च झालेला आहे. यामध्ये १,३९,२५,३४१ पैकी- ८,०७,८४२ (रुग्ण,मुकबधीर,अपंग,वारकरी,अन्नदान) इत्यादी व्यक्तींना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानूसार १००% चारीटी रक्कम करण्यात येऊन मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे.

सध्या प्रति व्यक्तीस प्रसादभोजन तिकीट विक्री दर रु.१०/- आहे. सदर प्रति ताटासाठी अंदाजे प्रत्यक्ष खर्च रु.२०.२५ पैसे इतका येत आहे. म्हणजेच भक्तांना प्रति ताटासाठी सध्या अंदाजे रु.१०.२५ पैसे इतकी रक्कम चारीटी करण्यात येत आहे. त्यानूसार लेखाशाखा विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

**अ)** साईभक्तांना कायमस्वरुपी मोफत प्रसादभोजन सुरु केल्यास वर्षासाठी अंदाजे खालील प्रमाणे प्रत्यक्ष खर्च येईल.

| **अ.नं.** | **तपशील** | **संख्या** | **प्रति ताट खर्च रु.** | **एकूण खर्च** |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य भक्त | १२,२१८,५१७ | २०.२५ | २४७,४२४,९६९/- |
| २. | VIP भक्त | ८९८,९८२ | २०.२५ | १८,२०४,३८६/- |
| ३. | रुग्णालयातील रुग्ण | ३१३,४९३ | २०.२५ | ६,३४८,२३३/- |
| ४. | मुकबधीर,मतिमंद,अंध,वारकर | ३००,८९६ | २०.२५ | ६,०९३,१४४/- |
| ५. | गरीब व गरजु व्यक्ती | १९३,४५३ | २०.२५ | ३,९१७,४२३/- |
| | **एकूण भक्तांची संख्या** | **१३,९२५,३४१** | | **२८,१९,८८,१५५/-** |

| **अ. नं.** | **तपशील** | **भक्तांकडून प्रति ताट रक्कम रु** | **एकूण मिळणारी रक्कम रुपये** | **चारीटी रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य भक्त | १०/- | १२२,१८५,१७०/- | १२५,२३९,७९९/- |
| २. | VIP भक्त | ४०/- | ३५,९५९,२८०/- | -(१७,७५४,८९५) |
| ३. | रुग्णालयातील रुग्ण | ०/- | -- | ६,३४८,२३३/- |
| ४. | मुकबधीर,मतिमंद,अंध, वारकरी | ०/- | -- | ६,०९३,१४४/- |
| ५. | गरीब व गरजु व्यक्ती | ०/- | -- | ३,९१७,४२३/- |
| | | एकूण | १५८,१४४,४५०/- | १२३,८४३,७०५/- |

| | |
|---|---|
| एकूण चारीटी रक्कम सन २०१२-२०१३ साठी रु. | १२३,८४३,७०५/- |
| वजा मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा रक्कम रु. | ४,३३,६१,३४४/- |
| मोफत प्रसादभोजन दिल्यास पडणारा वाढीव आर्थिक भार रु. | ८०,४८२,३६१/- |

| | | |
|---|---|---|
| देणगी स्वरुपात अन्नदान फंडात जमा रक्कम रु. अ) ३१९,१७२,२५१/- | | |
| यामधून लेखापरिक्षणाच्या वेळी चॅरीटी रक्कम रु. | | |
| १ | भोजन प्रसाद | ८०,४८२,३६१ |
| २ | मोतीचूर लाडू | १४९,०३५,५६३ |
| ३ | अन्नपाकीटे, चहा, कॉफी व दुध | ३८,९८३,९११ |
| | वजा एकूण चारीटी रक्कम रु. (ब) | २६८,५०१,८३५ |
| | चारीटी वजा जाता फंडात शिल्लक रक्कम (अ) - (ब) | ५,०६,७०,४१६ |

अक्षरी रु.पाच कोटी सहा लाख सत्तर हजार चारशे सोळा मात्र

वरीलप्रमाणे साईभक्तांना मोफत प्रसादभोजन सुरु केल्यास वर्षाकाठी किराणा माल, भाजीपाला, कामगार खर्च, लाईटबील, मजुरी इत्यादीसह अंदाजे एकूण रु.२८,१९,८८,१५५/- इतका खर्च येईल.

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या मान्यतेने सन २००७-२००८ पासून देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु झालेली आहे. सदर योजनेमध्ये सन २००७-२००८ पासून खालीलप्रमाणे रक्कम जमा झालेली आहे.

| | |
|---|---|
| सन २००७-२००८ | रु.२०,२९,६००/- |
| सन २००८-२००९ | रु.३१,९३,५१५/- |
| सन २००९-२०१० | रु.१,०२,३१,००४/- |
| सन २०१०-२०११ | रु.१,६०,४४,१९१/- |
| सन २०११-२०१२ | रु.३,२२,२०,१३५/- |
| सन २०१२-२०१३ | रु.४,३३,६१,३४४/- |

सन २०१२-२०१३ मध्ये १,३९,२५,३४१ साईभक्तांनी प्रसादभोजन घेतलेले असून दैनंदिन सरासरी अंदाजे ३८,१५१ साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला आहे. मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये २८६ देणगीदार साईभक्तांनी १८६ दिवसांसाठी रक्कम रु.४,३३,६१,३४४/- इतकी रक्कम झ ाालेली असून सदर रकमेमध्ये ४०,१८,१७५ साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला आहे. त्यानूसार वर्षातील ३६५ दिवसापैकी अंदाजे १०५ दिवस मोफत प्रसादभोजन साईभक्तांना देण्यात आलेले आहे.

तसेच अन्नदान निधीमध्ये मागील ५ वर्षात खालीलप्रमाणे रक्कम देणगी म्हणून जमा झालेली आहे. तसेच दरवर्षी अन्नदान फंडात खर्ची पडलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. खर्ची पडलेल्या रकमेमध्ये साईभक्तांना देण्यात येणारे प्रसादभोजन, अन्नपाकीटे, मोतीचूर लाडू, चहा, कॉफी, दुध, वगैरेसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च व भक्ताकडून घेत असलेली रक्कम यातील तफावतीची रक्कम खर्ची दाखविणेत येऊन राहिलेली रक्कम शिल्लक दाखविणेत येते. (उदा. प्रसादभोजनासाठी प्रत्यक्ष खर्च येतो रु.२०.२५ - भक्तांकडून घेतली जाते रु.१०/- तफावत रु.१०.२५/-)

| सन | जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|
| सन २००७-२००८ | रु.१४,६०,२६,१५६.८७ | रु. ३,४६,१३,२५२.२४ |
| सन २००८-२००९ | रु.१८,८७,२५,५७९.१८ | रु.६,७७,१९,५४८.०५ |
| सन २००९-२०१० | रु. २२,०९,०२,८०१.९२ | रु.१०,५५,३६,३७५.९३ |
| सन २०१०-२०११ | रु. २८,१२,६५,५४०.३३ | रु.११,८८,१९,७७४.५० |
| सन २०११-२०१२ | रु. ३२,०१,८०,३०७.६६ | रु.२०,५७,८०,०३८.३० |
| सन २०१२-२०१३ अंदाजे | रु. ३१,९१,७२,२५१.०० | रु. २४,०३,१३,०७४.०० |

सन २०१२-२०१३ मध्ये अन्नदान फंडात रक्कम रु.३१,९१,७२,२५१/- इतकी रक्कम जमा झालेली असून मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये रु.४,३३,६१,३४४/- जमा झालेली आहे. दोन्ही मिळून रु. ३६,२५,३३,५९५/- जमा झालेले आहेत.

| वर्ष | प्राप्त देणगी रु. पै. | वार्षिक खर्च रु. पै. | शिल्लक रक्कम रु. पै. |
|---|---|---|---|
| २००६-२००७ | १०,२७,४६८९१.७० | १,००,३४,७५५.२४ | ४३,१३,०६,७९३.१५ |
| २००७-२००८ | १४,६०,२६,१५६.८७ | ३,४६,१३,२५२.२४ | ५४,२७,१९,६९७.७८ |
| २००८-२००९ | १८,८७,२५,५७९.१८ | ६,७७,१९,५४८.०५ | ६६,३७,२५,७२८.९१ |
| २००९-२०१० | २२,०९,०२,८०१.९२ | १०,५५,३६,३७५.९३ | ७७,९०,९२,१५४.९० |
| २०१०-२०११ | २८,१२,६५,५४०.०३ | ११,८८,१९,७७४.५९ | ९४,१५,३७,९२०.३४ |
| २०११-२०१२ | ३२,०१,८०,३६०.६६ | २०,५७,८०,०३८.३२ | ११३,९७,०८,३६२.३१ |
| २०१२-२०१३ | ३१,९१,७२,२५१.०० | २४,०३,१३,०७४.०० | १२१,८५,६७,५३९.३१ |

३१ मार्च २०१३ अखेर अन्नदान फंडामध्ये एकूण रक्कम **रु.१२१,८५,६७,५३९.३१** इतकी रक्कम शिल्लक आहे. अशाच प्रकारे अखर्चीत रकमेत वाढ होत राहील्यास भविष्यात आयकर भरावा लागणार आहे. साईभक्तांकडून अन्नदानकरीता जमा होणा-या देणगी रकमेवर आयकर भरण्या ऐवजी साईभक्तांना प्रसादभोजन मोफत देणे सुरु केल्यास धार्मिक तीर्थक्षेत्रात विनामुल्य प्रसादभोजन मिळाल्याचे साईभक्तांना समाधान मिळेल. परंतू सदर बाब महत्वपुर्ण व आर्थिक असल्यामुळे साईभक्तांना मोफत प्रसादभोजन सुरु करणे किंवा कसे याबाबत विचार व्हावा ही विनंती.

सध्या साईभक्तांचे प्रसादभोजनात खालील पदार्थ देण्यात येतात.

१) चपाती/पुरी
२) भात
३) वरण (आमटी)
४) कडधान्याची ऊसळ
५) फळभाजी/पालेभाजी
६) चटणी
७) बर्फी (गोड पदार्थ)

मोतीचूर लाडू, अन्नपाकीटे व चहा, कॉफी, दुध यांचा उत्पादन खर्च व भक्तांकडून घेण्यात येत असलेल्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | उत्पादन खर्च सुमारे रक्कम रुपये | भक्तांकडून घेण्यात येणारी रक्कम रुपये | चॅरीटी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | मोतीचूर लाडू पाकीट (सुमारे ५० ग्रॅम वजनाचे ३ लाडू नग) | रु.१७.८५ पै. | १०/- | रु.७.८५ पै. |
| २) | अन्नपाकीटे (५ पुरी,ऊसळ,बर्फी वडी/शिरा | रु.९.१८ पैसे | ०४/- | रु.५.१८ पैसे |
| ३) | चहा | रु.०३.१० पैसे | ०१/- | रु.२.१० पैसे |
| ४) | कॉफी | रु.०४.२४ पैसे. | रु.०१.५० पैसे | रु.२.७४ पैसे |
| ५) | दुध | रु.०३.३३ पैसे | रु.०१.५० पैसे | रु.१.८३ पैसे |

भविष्यात अन्नदान निधीमध्ये कमतरता भासल्यास मोतीचूर लाडू, अन्नपाकीटे व चहा, कॉफी, दुध यांची चॅरीटीची रक्कम कमी करण्याबाबत विचार करता येईल.

**मागणी:-** प्रस्तावित केलेप्रमाणे सदर बाब आर्थिक दृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-**

१) साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणे सुरु केल्यास अखर्चीत उत्पान्नाचा विनीयोग होईल तसेच संस्थान व साईभक्तांचे दृष्टीने ऐतिहासिक निर्णय म्हणून गणना होईल.

२) श्री साईबाबा संस्थानचा कारभार मुंबई हायकोर्ट औरंगाबाद खंडपीठ यांच्या अधिपत्याखाली सुरु असल्याने पायाभूत/धोरणात्मक निर्णय घेणेपूर्वी त्यास व त्यावरील खर्चास औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागेल असे वाटते.

३) मोफत प्रसादभोजन योजना सुरु केल्यास अधिनियमातील तरतुदींची अधिकाधिक उदिष्ठ पुर्ती होईल. प्रसादालयामध्ये दक्षिणा पेटयांची संख्या वाढविल्यास संस्थानच्या उत्पादनात भर पडेल.

४) दर्‌रोज प्रसादभोजन मोफत केल्यास, सध्या सुरु असलेली मोफत प्रसादभोजन योजना सुरु ठेवावी व प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या दानशूर भक्तांची नांवे त्या ठराविक दिवशी प्रसादालयामध्ये दर्शविता येतील. यामध्ये अनेक साईभक्तांना प्रेरणा मिळेल.

५) व्ही.आय.पी. प्रसादभोजनाचा दर आहे तोच ठेवण्यात येऊन यामधूनही काही प्रमाणात निधी संस्थानला मिळणार आहे.

मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ मधील सुधारीत कलम २१ (१) घ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे.

१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल :-

घ) भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालवणे.

२) संस्थानचा प्रसादालय विभागावर सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात एकूण खर्च रु.५६.०० कोटी एवढा झालेला आहे. या खर्चा व्यतिरिक्त कायम कर्मचारी वेतनावर होणारा खर्च रु.५.०० कोटी एवढा आहे. तसेच मोफत अन्नदान म्हणून रु.१.१० कोटी एवढा खर्च झालेला असून, साधारणपणे प्रसादालयावर होणारा एकूण खर्च रु.६२.१७ कोटी एवढा आहे. त्यामुळे अन्नदान फंडात शिल्लक असलेल्या रु.११३ कोटी रुपयांमधून प्रायोगिक तत्वावर मोफत प्रसादभोजन व्यवस्था सुरुवात करता येईल.

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० चे सभेतील निर्णय क्रं.३५८(२५) अन्वये शनिवार व रविवार या दिवशी दर्शन आरती पासेसवर जनसंपर्क कार्यालयामार्फत निर्णय झालेला आहे. दि.१३/०३/२०१० ते दि.१६/०४/२०१३ या तीन वर्षाच्या कालावधीत आठवडयातील फक्त शनिवार व रविवार या एकूण ३२२ दिवसासाठी एकूण रक्कम रुपये १३,०३,१०,३००/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा कोटी तीन लाख दहा हजार सहाशे मात्र) इतके उत्पन्न संस्थानला मिळालेले आहे. प्रतिदिवसाकरीता ४,०४,६९१/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख चार हजार सहाशे ऐक्यान्नव मात्र) इतके उत्पन्न फक्त शनिवार व रविवार गर्दीच्या काळात मिळालेले आहे. परंतू आठवडयातील सर्व दिवस सशुल्क दर्शन/आरती पासेस चालू केले तर अंदाजे प्रति दिवसाला रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) तर वर्षाकाठी अंदाजे रुपये ११,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये आकरा कोटी मात्र) इतके उत्पन्न मिळू शकेल. हे पासेस विनाशिफारस सर्वांसाठी खुले केल्यास उत्पन्न वाढू शकते.

४) प्रसादालयात दक्षिणा हुंडीची संख्या वाढविल्यास संस्थानच्या उत्पन्नात भर पडेल.

५) सोबत श्री साईभक्तांसाठी विनामुल्य प्रसादभोजनव्यवस्था सुरु करण्याचा प्रस्ताव तक्ता जोडलेला आहे.

तरी मोफत प्रसादभोजन सुरु करणे ही धोरणात्मक व खर्चीक बाब असल्याने सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.०५ इम्पोरटेड मशिन्सकरीता स्पेअरपार्ट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रस्तावना :-** श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन बनविणेकामी सुलभता येणेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने सन २००८_मध्ये मे. राईट इक्विपमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडुन हॉबर्ट-जर्मनी, निलमा-इटली या कंपनीचे इम्पोरटेड मशिन्स खरेदी करणेत आलेले आहे. हॉबर्ट कंपनीचे डिश वॉशर मशिन्स - ०२ नग व्हेज प्रोसेसर- ०२ नग खरेदी करणेत आलेले आहे. सदरचे मशिन्सचा वापर दैनंदिन प्रसाद भोजन बनविण्याच्या प्रक्रियामध्ये अत्यंत उपयोग होत असुन कमी मनुष्यबळाकडुन जास्त काम होत आहे. डिश वॉशिंग मशिन्स व व्हेज प्रोसेसर मशिन्सचे दैनंदिन वापराने काही स्पेअरपार्ट खराब झालेले आहे. त्यामुळे दैनंदिन प्रसाद भोजन बनविणेच्या प्रक्रियेस अडचण निर्माण झालेली आहे.

सदरचे इम्पोरटेड मशिनचे स्पेअरपार्ट मार्केटमध्ये सर्व्हिस डिलर व्यतीरिक्त मिळत नसल्याने मशिनचे पुरवठादार व सर्व्हिस डिलर मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून खरेदी करावे लागणार आहे. त्यांचेकडून खालील स्पेअरपार्ट खरेदी करावे लागणार असून त्यांचा अंदाजे खालीलप्रमाणे खर्चाचा तपशिल आहे.

| अ.न. | मशिनचे नाव | पार्टचा तपशिल | नग | अंदाजे किमंत प्रती नग | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|---|
| १. | डिश वॉशर | Drain Valve | ०२ | ३०,०००.०० | ६०,०००.०० |
| २. | | Cooling Fan | ०२ | १२,५००.०० | २५,०००.०० |
| ३. | | Door Gasket | ०२ | ५,०००.०० | १०,०००.०० |
| ४ | | Solenoid Coil | ०२ | १५,०००.०० | ३०,०००.०० |
| ५. | व्हेज प्रोसेसर | Disc | ०२ | ७,५००.०० | १५,०००.०० |
| | | | | **एकुण किमंत** | **१,४०,०००.००** |

यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दिनांक २४.९.२०११ चे सभेतील निर्णय क्रं.७२८ नुसार राईट इक्युपमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून रक्कम रु. १,८०,४५९/- चे दिनांक ८.१२.२०११ रोजी स्पेअरपार्ट घेणेत आलेले आहे. तसेच दिनांक जा. नं. एसएसएस/वशि/प्रसादा/४३२/२०१२ दिनांक ४.४.२०१२ चे कार्यादेशानुसार डिश वॉशिंग मशिनचे वायरींग दुरुस्तीचे काम रक्कम रु. २४,७३०/- राईट इक्युपमेंट प्रा.लि. मुंबई यांचेकडुन करुन घेणेत आलेले आहे.

प्रसादालयातील इम्पोर्टेड मशिनची AMC/ CMC देण्यात आलेली नाही. प्रसादालयातील इम्पोर्टेड मशिनचे AMC/ CMC देणेकामी राईट इक्युपमेंट प्रा. लि. मुंबई हे महाराष्ट्र एकमेव डिलर आहे. व त्यांचे AMC/ CMC चे चार्जेस जास्त आहे. त्यामुळे आपण आवश्यक स्पेअरपार्ट खरेदी करुन प्रसादालयातील मशिनरी मेन्टेनंन्स टेक्नीशियन यांचेकडुन बसवून घेतो.

मागणी :- प्रस्तावित केलेप्रमाणे इम्पोरटेड मशिनचे स्पेअरपार्ट मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडुन खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु. १,४०,०००/- खर्च अपेक्षित असुन मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समितीची मान्यता घेता येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार नुसार अनुमान :- तांत्रिक.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः- इर्म्पोटेड मशिनरीचे प्रस्तावित केलेले स्पेअरपार्ट मशिनचे पुरवठादार मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून खरेदीकरणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.१,४०,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये आवश्यक असलेल्या इम्पोर्टेड मशिन्सचे स्पेअरपार्ट सदरहू मशिनचे पुरवठादार मे. राईट इक्विमेंट प्रा. लि. मुंबई यांचेकडून खरेदीकरणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.०६ सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामधील श्री साई प्रसादालयातील धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयामध्ये दर्‍रोज ३५,००० ते ४५,००० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून दर्‍रोज सुमारे सरासरी ८००० अन्नपाकीटे व १ ते १.५ लाख मोतीचूर लाडूंची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल धान्य व कडधान्य, डाळी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येते. सदर माल मशिनद्वारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो निवडला जातो. गहु व हरबराडाळ दळण्यात येत असून दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळणकांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा,

खडे, मातेरे निघते. वातावरणातील बदलामुळे ही वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते.

मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.५६० अन्वये सन २००७-२००८ या वर्षात आलेली प्रत्यक्ष घट-तुट खर्ची टाकणेत आलेली होती . मात्र सदरील घट-तुटीस मान्यता देतांना मा.श्री अभय शास्त्री, मा.श्री ए.जी.लोंगाणी, अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्रं.५६० नूसार मान्यता मिळालेली आहे.

१) सन २००७-२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिण्यानंतर प्रस्तावित प्रमाणानूसार घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिस्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनूसार दरवर्षी प्रसादालयातील आर्थिक वर्षामध्ये एकूण खर्ची पडलेल्या किराणामालात प्रत्यक्ष आलेल्या घट-तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती. खालील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्रं.३ नूसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.त्रीसदस्य समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

**सन २०१२-२०१३ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घटतुटीचा तपशील.**

| अ.नं. | मालाचा तपशील | दि.१/४/१२ ते दि.३१/३/१३ अखेर | | घट-तुटीचे प्रमाण | मान्य घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष झालेला खर्च | प्रत्यक्ष आलेली घट-तुट | | |
| | | किग्रॅ.मध्ये | किग्रॅ.मध्ये | किग्रॅ.मध्ये | किग्रॅ.मध्ये |
| १ | गहू | ९२८८५७.००० | २६७१९.००० | २.८७६ | **३.०००** |
| २ | तांदूळ | ९४८१६१.७०० | ६७४७.००० | ०.७११ | **१.०००** |
| ३ | तुरडाळ | २०३३१३.२५० | १६३८.००० | ०.८०५ | **१.०००** |
| ४ | हरबराडाळ | ७४०५७३.७४० | ८७६३.००० | १.१८३ | **२.०००** |
| ५ | मुगडाळ | ३०८९७.००० | २८१.००० | ०.९०९ | **१.०००** |
| ६ | गुळ | २७६५१.८०० | २१९.००० | ०.७९२ | **१.०००** |
| ७ | रवा | २९१६२.२५० | २४४.००० | ०.८३६ | **१.०००** |
| ८ | शेंगदाणे | ३९४२४.३०० | ३६४.००० | ०.९२३ | **१.०००** |
| ९ | मिरची | १७३१३.०० | ६४२.००० | ३.७०८ | **४.०००** |
| १० | हळद | १०११०.६५० | ३९३.२५० | ३.८८९ | **४.०००** |
| ११ | मोहरी | ५३०६.५०० | ७८.००० | १.४७० | **२.०००** |
| १२ | जिरे | ५८३०.२५० | १०८.७५० | १.८६५ | **२.०००** |
| १३ | मसाला | २९४३.५४० | ५५.८०० | १.८९५ | **२.२५०** |
| १४ | धोपावडर | १५८३१.६०० | ३७४.७५० | २.३६७ | **२.५००** |
| १५ | खोबरेवाटी | १६०८८.५०० | १०८.००० | ०.६७१ | **१.०००** |
| १६ | हिरवी विलायची | ४९१९.३०० | ४५.०५० | ०.९१५ | **१.०००** |
| १७ | हरबरा | ८९३१०.००० | ८०४.००० | ०.९०० | **१.०००** |
| १८ | वाटाणा | ६०८५१.७०० | ५४६.००० | ०.८९७ | **१.०००** |
| १९ | मुग | ७७०३७.००० | ६६२.००० | ०.८५९ | **१.०००** |
| २० | मठ | ७३८६०.७५० | ६५३.००० | ०.८८४ | **१.०००** |
| २१ | मेथी | १७०.५०० | ३.२५० | १.९०६ | **२.२५०** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | सुंठ | २३१.००० | ११.६०० | ५.०२१ | **५.२५०** |
| २३ | मैदा | ५८९३६.००० | २९०.००० | ०.४९२ | **०.५००** |
| २४ | भगर | ४२६.००० | ८.००० | १.५२० | **२.०००** |
| २५ | शाबुदाणा | २४६२१.००० | ३०१.००० | १.२२२ | **१.२५०** |
| २६ | कच्चे पोहे | ५१४.००० | ४.००० | ०.७७८ | **१.०००** |
| २७ | भाजके पोहे | ११५०.००० | ४०.००० | ३.४७८ | **४.०००** |
| २८ | डाळया | २३२.२०० | २.८०० | १.२०५ | **१.२५०** |

सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयातील खर्च पडलेल्या किराणा मालात वरीलप्रमाणे प्रत्यक्ष घट-तुट आलेली आहे. सदर घट-तुटीचे अवलोकन करता सदर प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे उपरोक्त घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्रं.३ नूसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.४३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत येऊन मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.०७ सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे IBR नुसार बदल करणेकामी मान्यता प्राप्त एजन्सीची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ ( भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व ३२ नूसार राज्य शासनाने, समितीनने किंवा समितीच्या कोणत्याही सदस्याने अधिकाऱ्याने किवा कर्मचाऱ्याने या अधिनियमानुसार किवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार आणि विनियमानुसार सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल त्याच्या विरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती दिनांक ८.११.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं ८६८.

प्रस्तावना - श्री साईप्रसादालयात दिनांक ३० जुलै २००९ रोजी मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा. लि. उर्फ फ्लेरीअम टेक्नोलॉजी प्रा.लि. वलसाड यांचेमार्फत दररोज १७००० लोकांचे अन्न शिजविणे क्षमतेचा सोलर स्टीम कुकींग प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. बॉयलर इन्स्पेक्टर, महाराष्ट्र शासन, अहमदनगर कार्यालयाकडुन दि. १९.१.२०११ रोजीचे पत्राद्वारे श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाची IBR टेस्टींग करुन घेणेत यावी असे कळविलेले आहे. बॉयलर इन्स्पेक्टर, अहमदनगर यांचे दि. १९.१.२०११ चे पत्र व प्रकल्प पुरवठादार यांची निविदा / करारनाम्यातील अटी/शर्ती नुसार प्रकल्पाचे पुरवठादार गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा.लि. वलसाड यांना वेळोवेळी पत्राद्वारे IBR टेस्टींग कामी पुर्तता करणेबाबत कळविलेले आहे. परंतु त्यांचेकडून कार्यवाही झालेली नाही.

दिनांक ०८.०३.२०१३ रोजी सोलर स्टीम प्रकल्प IBR कार्यवाही बाबत शिर्डी येथे मा. कार्यकारी अधिकारी साो. यांचेसमावेत मिटींग आयोजीत करणेत आलेली होती. सदर मिटींगला १).डॉ.ए. के. सिंघल- नॅशनल प्रोजक्ट मॅनेजर, अपारंपारीक उर्जा मंत्रालय, नवि दिल्ली २). डॉ. आर. के. गोस्वीमी, डायरेक्टर, अपारंपारीक उर्जा मंत्रालय, नवि दिल्ली व ३) अपारंपारीक उर्जा मंत्रालय, नवि दिल्ली येथील इतर पाच अधिकारी उपस्थित होते. मिटींगमध्ये गढीया सोलर उर्फ फ्लेरियम टेक्नोलॉजी, वलसाड चे प्रतिनिधी यांनी IBR नुसार करावयाच्या बदलाची पुर्तता दिनांक ३०.६.२०१३ पर्यंत करुन देणार असल्याचे मान्य केलेले होते. तथापी गढीया उर्फ फ्लेरीयम टेक्नोलॉजी यांना इकडील विभागामार्फत वेळोवेळी कार्यपुर्ती बाबत दुरध्वनी, लेखी पत्राद्वारे कळविण्यात येऊनही त्यांचेकडून बॉयलर इन्स्पेक्टर मुंबई कार्यालयात प्रकल्पाचे सुधारीत ड्राईंग जमा करणे व्यतीरीक्त पुढील कार्यवाही झालेली नाही. त्याबाबतचा पाठपुरावा त्यांचेकडून होतांना दिसत नाही. सध्या फ्लेरीअम टेक्नोलॉजी प्रा.लि. वलसाड यांचे बरेचसे अधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याचे समजते. कंपनीत वेळोवेळी प्रस्तुत विषयासंदर्भात दुरध्वनी केलेनंतर कंपनीचे गेटवरील सुरक्षा गार्ड व्यतिरीक्त कोणीही अधिकारी उपलब्ध नसतात.

प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी संस्थानला पत्र क्रं. SD-६/ BNW/ २०१२/ ३३२९६ दि.१२.१०.२०१२ रोजी अन्वये IBR तपासणी होत नाही तो पर्यंत प्रकल्प बंद ठेवणेबाबत नोटीस दिलेली आहे. परंतु मा. वाकचौरे प्रभारी संचालक यांनी दिनांक २०.१०.२०१२ रोजी प्रत्यक्ष प्रकल्पास भेट दिली व येथील प्रसादालयातील भक्तांना देणेत येणारी सुविधांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी श्री साईप्रसादालयात भक्तांना प्रसाद भोजन बनविणेचे कामात अडचण येऊ नये म्हणून प्रकल्प कार्यन्वित ठेवणेबाबत तोंडी सुचना केलेली आहे. मात्र IBR तपासणीची कार्यवाही तातडीने करणेस सांगितले होते.

दि. १०.६.२०१३ रोजी संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे कार्यालयात मिटींग आयोजीत करण्यात आलेली होती. सदर मिटींला खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थीत होते.

१. श्री भा. ना. वाकचौरे, प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन

२. श्री जी. डी. चौगुले, सह संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन

३. डॉ. एम. जी. ताकवले, सल्लागार सोलर प्रकल्प, श्री साईबाबा संस्थान

४. श्री ए. जी. जगताप, सहाय्यक अभियंता, श्री साईप्रसादालय

५. श्री अतुल चौगुले, आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई, बीड

सदर मिटींगमध्ये मध्ये प्रस्तुत काम संस्थान मार्फत तातडीने करण्याचे आदेश मा. श्री वाकचौरे, प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी दिलेले आहे. मा. श्री वाकचौरे साहेब यांनी प्रस्तुत काम साईबाबांची सेवा म्हणून ना नफा ना तोटा या तत्वावर मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई या IBR मान्यता प्राप्त एजन्सीकडून चांगले पद्धतीने निगराणीखाली करुन घेणेची इच्छा व्यक्त केलेली आहे. त्याच बरोबर प्रकल्प सल्लागार श्री एम. जी. ताकवले यांनीही प्रस्तुत काम बॉयलर कार्यालयाने सुचित केलेल्या एजन्सी मार्फत करणे संस्थान हिताचे राहील असे सांगितले आहे. श्री साईप्रसादालयातील एकुण १९ सोलर बॉयलरचे प्रस्तुत एजन्सीकडून IBR नुसार करावयाच्या बदलाचे ड्रॉईंग फायनल करुन तातडीने पुढील कार्यवाही करता येईल.

श्री गढीया सोलर उर्फ फ्लेरीयम टेक्नोलॉजी प्रा.लि. वलसाड यांचे सुरक्षा अनामत रक्कम रु. १३,३०,०००/- संस्थानकडे जमा आहे. त्यांची सुरक्षा अनामत रक्कम संस्थानखाती जमा करुन सदर रक्कमेतून IBR नुसार करावयाच्या बदलाची कार्यवाही करता येईल. तसेच अपारंपारीक उर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवि दिल्ली यांनी दिनांक २९.५.२०१३ रोजीचे पत्राने प्रकल्पास IBR नुसार बदल करणेकामी व युनिक मॉडेल प्रोजेक्ट बनविणेकामी रक्कम रु. १३,३०,०००/- अनुदान देणेचे कळविलेले आहे. त्यामुळे संस्थानला सदर कामासाठी वेगळी रक्कम खर्च करावी लागणार नाही.

मागणीः- श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाची IBR नुसार करावयाच्या बदलासाठी अंदाजे रक्कम रु. १५ लाख पर्यंत खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार प्रकल्प पुरवठादार गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा. लि. उर्फ फ्लेरीअम टेक्नोलॉजी प्रा.लि. वलसाड यांचे सुरक्षा अनामत रक्कम व अपारंपारीक उर्जा मंत्रालय, भारत सरकार यांचे अनुदान रक्कमेतून खर्च करता येईल. परंतु संस्थान मार्फत IBR चे काम करणारी मान्यता प्राप्त एजन्सीची नियुक्ती करावी लागणार आहे. मा. बाष्पके संलालक, महाराष्ट्र शासन यांचे शिफारशीनुसार मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई, बीड यांचेकडून सदर कामाची कार्यवाही करता येईल. त्यानुसार त्यांचेकडून कामाचे व खर्चाचे सिलबंद प्रस्तावासह दिनांक १५.६.२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समितीच्या सभेस चर्चा व वाटाघाटीसाठी बोलविता येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार नुसार अनुमान :- तांत्रिक / कायदेशीर

विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मतः- मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई, बीड यांचेकडून श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम प्रकल्पाची IBR नुसार करावयाच्या बदलाच्या कामाचा व खर्चाच्या प्रस्तावासह त्यांचेशी चर्चा व वाटाघाटीद्वारे निर्णय होणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये उभारण्यात आलेल्या सोलर स्टीम प्रकल्पाची IBR टेस्टींग करणेकामी मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम्स प्रा. लि. उर्फ फ्लेरीअम टेक्नोलॉजी प्रा.लि. वलसाड यांना वेळोवेळी पत्राद्वारे कळविणेत येऊनही ते पत्राची दखल घेत नाही, त्यांना संस्थान वकीलामार्फत पत्र देऊन तुमची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन कामाचा कार्यादेश रद्द करणेत येत आहे, असे कळविणेत यावे व त्यांचे अनामत रकमेतुन सदरचे काम करुन घेण्यात यावे.**

**तसेच, श्री.भा.ना. वाकचौरे, प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन व श्री साईबाबा संस्थानचे सोलर प्रकल्प सल्लागार डॉ.एम.जी. ताकवले यांनी मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई, बीड हे रु.११,५८,८१०/- + टॅक्स मात्र या दरात ना नफा ना तोटा या तत्वावर सदरचे काम करण्यास तयार आहेत, असे कळविलेले होते. त्यामुळे त्यांना उपरोक्त कामाचा कार्यादेश देण्यात यावा व सदर प्रकल्पाचे काम पुर्ण होईपर्यंत त्यांच्या कर्मचाऱ्यांची निवास/ भोजनव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.०८ श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा अंतर्गत स्वच्छतागृह उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२५ (नगरपंचायत मिळकत नंबर १६६६) क्षेत्र ४० आर मधील खाली नमूद केलेल्या इमारती अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांचे श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांचे वापरासाठी देण्यांत आलेल्या आहेत.:

| अ. नं. | इमारतीचे नांव | बांधकामाचा प्रकार | वर्ग खोल्या | बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | जुनी यु टाईप इमारत | पत्रा छत | ११ वर्ग खोल्या | ०७२०.०८ |
| ०२ | न्यु स्कुल इमारत (तळ + १ला मजला ) | आरसीसी | ०६ वर्ग खोल्या | ०३७५.१४ |
| ०३ | साईसरस्वती इमारत (तळ + १ ला मजला ) | आरसीसी | १७ हॉल / खोल्या व ०३ स्वच्छतागृहे | १४४१.७८ |
| | | | **एकुण.** | **२५३७.००** |

वरिल तीन ही इमारती मिळून, २९ वर्ग खोल्या व ०४ हॉल्सचे मिळून एकुण बांधकाम क्षेत्रफळ २५३७ चौ. मी. आहे. सदरची जागा व इमारत रुग्णालय विस्तारीकरणासाठी संस्थानला आवश्यक असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८ मे,२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१७ अन्वये संस्थानमार्फत नविन इमारतींचे बांधकाम करून सदरहू शाळेचे अन्यत्र स्थलांतरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

आता, प्र.मुख्याध्यापक, श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२१/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये, "..महाराष्ट्र शासनाकडील शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ दि. २४/०२/२०१२ अन्वये शाळेतील १२० मुला /मुर्लीमागे एक संडास व तीन मुताऱ्यांचे बांधकाम करणे आवश्यक असुन विद्यालयामध्ये १२८३ मुले व ६९० मुर्लीची संख्या विचारात घेता खालील तपशिलानुसार वाढीव संडास व तीन मुताऱ्यांचे बांधकाम करणेबाबत कळविले आहे. "

| अ.क्र. | तपशिल | मुले | | मुली | |
|---|---|---|---|---|---|
| | | संडास | मुतारी | संडास | मुतारी |
| ०१ | विद्यार्थी संख्येनुसार आवश्यक स्वच्छतागृह संख्या | ११ | ३३ | ०६ | १८ |
| ०२ | उपलब्ध स्वच्छतागृह संख्या | ०२ | १९ | ०२ | १६ |
| ०३ | कमी पडणाऱ्या स्वच्छतागृह संख्या | **०९** | **१४** | **०४** | **०२** |

तसेच दि. १८/०३/२०१३ रोजीचे पत्रान्वये "..सदरचे स्वच्छतागृह बांधकामास बराचसा कालावधी लागणार असल्याने साईनगर मैदानात साईभक्तांसाठी बांधण्यात आलेल्या शौचालय व मुताऱ्या विद्यालयातील विद्यार्थी वापरत असल्याबाबतचे पत्र द्यावे परंतु विद्यालय प्रत्यक्षात शौचालय व मुताऱ्यांचा वापर करणार नाही." असे कळविले आहे.

इकडील विभागामार्फत पाहणी केली असता, इमारतीत असलेल्या सध्याचे मुताऱ्यांचे जागेवर संडास बांधल्यास स्वच्छता राखण्याचे दृष्टीने सोयीचे होईल व बाहेर असलेल्या मुताऱ्यांचे जवळ नवीन मुताऱ्यांसाठी बांधकाम करता येईल. त्यासाठी ढोबळ मानाने रू. ३,५०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त इमारतीत असलेल्या सध्याचे मुताऱ्यांचे जागेवर संडास बांधणे व बाहेर असलेल्या मुताऱ्यांचे जवळ नवीन मुताऱ्यांसाठी बांधकाम करणेकामी रु. ३,५०,०००/- खर्चास व सदरचे काम विहीत पदधतीने कोटेशन मागवून करून घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा अंतर्गत स्वच्छतागृह उपलब्ध करुन देणेचे काम विहीत पदधतीने कोटेशन मागवून करून घेणेस व याकामी येणाऱ्या रु. ३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ समाधी मंदिर परिसरात आवश्यक ठिकाणी एम.एस. स्ट्रक्चर वापरुन पी.व्ही.सी. फॅब्रिकचे मंडप उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ मधील तरतूद:-

अधिनियम कलम २१ (२) मधील पोटकलम १ च्या खंड (क) अन्वये विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता विकसीत करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी जंगम किंवा स्थावर मालमत्ताचे संपादन करण्याचे प्रयोजनांसाठी समितीकडून निधीची विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ रोजीचे सभेत नि.क्र.१४४ अन्वये समाधी मंदिराचे उत्तरेकडील बाजूस देणगी दाखल पी.व्ही.सी फॅब्रीक वापरुन छत उभारणी चे काम श्री. राजीव मेहता, दिल्ली यांचेकडून करुन घेण्यात यावे असे ठरले.

**प्रस्तावना:-**

संस्थानतर्फे साईभक्तांचे उन, वारा, पाऊस यापासून रक्षण होणेचे दृष्टीकोनातून दर्शनरांगेकरीता जुना पिंपळवाडी रस्त्यावर तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पूर्व बाजुचे पदपथावर एम.एस.स्ट्रक्चर उभारणीकरुन त्यावर पॉलीकार्बोनेट शिटस असलेल्या कायमस्वरुपी छताची उभारणी केलेली आहे.

**अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३१ अन्वये, समाधी मंदिर परिसरात विविध ठिकाणी, विविध १२ आकाराचे एम.एस.स्ट्रक्चर वापरुन पॉलीकार्बोनेटचे मागे-पुढे घेता येईल असे छत उभारणेबाबत निर्णय घेणेत आलेला होता. परंतू मंदिर परिसराचे आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांच्या प्रतिनिधी श्रीमती सोनिया काप्रे यांनी अशा प्रकारे मंडप उभारणी केल्यास मंदिराच्या पुरातन वास्तूच्या देखणेपणास बाधा येईल, अशा मंडपाच्या दैनंदिन साफ-सफाई व देखभालीचे काम मोठे राहील, मोठया प्रमाणात गर्दी झाल्यास कोंदटपणा निर्माण होऊन भाविकांना त्रास होईल व या प्रकल्पाचा खर्चही मोठा म्हणजेच अंदाजे रुपये ८ कोटी मात्र असल्याने अशा प्रकारची मंडप उभारणी करु नये. त्याऐवजी कमी खर्चाचे व लावता-काढता येतील अशा प्रकारच्या इतर पर्यायांचा विचार व्हावा, असे कळविले. त्यामुळे सदर प्रस्तावावरील कार्यवाही प्रलंबित ठेवणेत आली होती.

**ब)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/११/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७४ अन्वये संस्थानने नुकतीच जुन्या पिंपळवाडी रस्त्यावर तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पूर्व बाजूचे पदपथावर एम.एस. स्ट्रक्चर उभारणी करुन त्यावर पॉलिकार्बोनेट शीटस् असलेल्या कायमस्वरुपी छताची उभारणी केलेली आहे. त्याच धर्तीवर, समाधी मंदिराचे उत्तर बाजूस व गुरुस्थान मंदिरासमोरील मोकळया जागेत आवश्यक त्या ठिकाणी एम. एस. स्ट्रक्चर असलेले पॉलीकार्बोनेट शीटस् वापरुन छत उभारणी करणेस अथवा पी.व्ही.सी. फॅब्रिक वापरुन ही छत उभारणी करण्यात यावी. यासाठी मंदिर परिसराचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांचेकडून प्राथमिक आराखडे तयार करुन घेण्यास व याकामी येणार सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली होती.

**क)** समाधी मंदिराचे उत्तर बाजूस व गुरुस्थान मंदिरासमोरील मोकळया जागेत आवश्यक त्या ठिकाणी एम. एस. स्ट्रक्चर असलेले पॉलीकार्बोनेट शीटस् अथवा पी.व्ही.सी. फॅब्रिक वापरुन छत उभारणीचे काम बँकांमार्फत देणगी स्वरुपात करुन घेणेस व त्यांचे योग्य आकाराची नांवाची प्लेट शेडवर बसविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१.०५.२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र. २८२ अन्वये मान्यता देणेत आली होती.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार सदरचे काम देणगी दाखल करुन देणेकामी खालील प्रमाणे दोन प्रस्ताव प्राप्त झाले होते.

१ व्हिस्तास् मिडीया प्रा. लि., मालाड, मुंबई

२. श्री. राजीव मेहता, नवी दिल्ली

**i.** वरिल प्रमाणे प्रस्तावापैकी अ. नं. ०१ चे प्रस्ताव सादरकर्ते व्हिस्तास् मिडीया प्रा. लि., मुंबई यांनी दि. ११ नोव्हेंबर, २०११ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, देणगीदाखल शेड उभारणीकामी येणारा खर्च संबंधीत कंपन्यांचे जाहिरतीचे ३'x३' आकाराचे बोर्ड शेडचे पोलवर बसवून सदर जाहिरातीव्दारे उपलब्ध होणारे रकमेव्दारे शेड उभारणी करणार असल्याचे कळविले होते.

**ii.** अ. नं. ०२ चे प्रस्ताव सादरकर्ते श्री. राजीव मेहता यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०११ रोजीचे इ-मेलव्दारे देणगी दाखल करावयाचे शेड जाहिरातीची अट न घालता संस्थानने परवानगी दिल्यास ते स्वखर्चाने शेडची उभारणी करणेस तयार असल्याचे कळविले होते.

त्यानुसार श्री.राजीव मेहता, नवी दिल्ली यांना जा.नं.५७४९ दि.१४/०२/२०१२ चे पत्राने देणगीदाखल शेड करणेबाबत त्यांनी सादर केलेला प्रस्ताव स्विकारणेत आल्याचे त्यांना कळविणेत आले. त्यानंतर त्यांचे प्रतिनिधी दोन तिन वेळेस समक्ष येऊन मोजमापे घेऊन गेले व सविस्तर प्लॅन तयार करुन पुढील कार्यवाही करणेबाबत त्यांचेशी चर्चा झाली. परंतू अद्याप पर्यंत त्यांनी प्लॅनही सादर केलेले नाही. तसेच संपर्क केलेला नाही.

**प्रस्ताव :-**

सध्या साईभक्तांचे सोयीसाठी सोयींसाठी मंदिर परिसरात तसेच इतर आवश्यक ठिकाणी श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळी मंडप, पुण्यतिथी उत्सव, गुरुपौर्णीमा उत्सव पावसाठी मंडप तसेच दिपावली व नाताळ सुट्टीच्या काळात तात्पुरते स्वरुपात कापडी मंडपाची उभारणी केली जाते. यासाठी प्रत्येक वेळेस प्रशासकीय मान्यता घेणे, कोटेशन मागविणे, कार्यादेश देणे, मंडप उभारणी करुन घेणे इत्यादी कार्यवाही करावी लागते. तसेच यासाठी वार्षीक खर्चही मोठ्या प्रमाणात येतो.

करिता प्रामुख्याने भक्तांची सोयीसाठी मंदिर परिसरात खालील ठिकाणी एम.एस.स्ट्रक्चर तयार करुन पी.व्ही.सी. फॅब्रिक वापरुन कायमस्वरुपी छताची उभारणी करता येईल.

| अ.नं. | तपशिल | साईज व चौ.फुट |
|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजू | २८४'x१९' - ५३९६ चौ.फुट |
| ०२ | समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग ते गुरुस्थान समोरील बेसमेंट चे मागील बाजुपर्यंत | २००'x१०' - २००० चौ.फुट |
| ०३ | गुरुस्थान समोर | ५०'x३०' -१५०० चौ.फुट |
| ०४ | सभाकुंड | ६०'x६०' - ३६०० चौ.फुट |
| ०५ | लेंडीबागेत श्री दत्त मंदिर समोर | १००'x३०' - ३००० चौ. फुट |
| ०६ | उदी काउंटर समोर | ४०'x३०' - १२०० चौ.फुट |
| | **एकूण चौ.फुट** | **१६६९६ चौ.फुट** |

**विभागाचा अभिप्राय :-**

उपरोक्त ठिकाणी एम.एस. स्ट्रक्चर उभारणी करुन पी.व्ही. सी. फॅब्रिक वापरुन कायमस्वरुपी छताची उभारणीकरीता अंदाजे रु.७०,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तपैकी अ.क्र.१ चे "समाधी मंदिर उत्तर बाजूकडील" छत उभारणीचे काम श्री.राजीव मेहता नवी दिल्ली हे देणगी दाखल करणार होते. करिता त्यांना सदरचे काम करणार किंवा कसे? याबाबत पुन्हा विचारणा करता येईल. त्यांनी सदरचे काम करणेस सहमती दर्शविल्यास सदरचे काम त्यांचेकडून करुन घेता येईल व उर्वरीत अ.क्र.२ ते ६ चे व श्री.राजीव मेहता यांनी अ.क्र.१ चे काम न केल्यास उपरोक्त सर्व मंडपाचे काम संस्थानमार्फत करुन घेता येईल. याकामी स्ट्रक्चरल डिझाईनर्स कडून स्ट्रक्चरल डिझाईन घेऊन विहित पध्दतीने निविदा मागवून सदरचे काम करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.क्र.१ चे " समाधी मंदिर उत्तर बाजूकडील" छत उभारणीचे काम श्री.राजीव मेहता नवी दिल्ली हे देणगी दाखल करणार होते याबाबत त्यांना विचारणा केली, तथापि, त्यांचेकडून प्रतिसाद नसल्याने समाधी मंदिर परिसरात प्रस्तावात नमुद केलेल्या ठिकाणी एम.एस. स्ट्रक्चर वापरुन, रिमुव्हेबल करुन ते नंतर इतर ठिकाणी वापरता येईल अशा प्रकारचे तयार करणेत यावे. यासाठी पी.व्ही.सी. फॅब्रिकचे मंडप उभारणेकामी साईआश्रम प्रकल्पासाठी स्ट्रक्चरल डिझाईन सेवा दिलेले कन्सल्टंट श्री.आर.आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून स्ट्रक्चरल डिझाईन घेऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० साईआश्रम भाग ०१ व ०२ (R-Block) येथील बुकींग काऊंटर ड्रॉवर्स व डेस्क टेबल तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**प्रस्तावनाः** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊन दि.११/०४/२०१३ पासून सदरहू प्रकल्प साई भक्तांकरीता खुला करणेत आलेला आहे. साई आश्रम भाग-०१ व ०२ मधील R- Block इमारतीमध्ये संगणकीकृत बुकींग काउंटर तयार करण्यात आले आहे. सदरचे बुकींग काउंटरकरीता खात्यामार्फत ड्रॉवर्स तयार करावयाचे होते. याकामासाठी आवश्यक मटेरीअल व खर्चास इकडील विभागाचे दि.२३/०३/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये रु.१,०७,७९३/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार विहीत पध्दतीने स्थानीक पुरवठादार यांना दरपत्रक मागणी पत्र देऊन त्यांचेकडून दरपत्रके मागविणेत येऊन, निम्नतम दरधारक पुरवठादार यांना पुरवठाआदेश देऊन त्यांचेकडून मटेरीअल खरेदी करणेत आलेले आहे. त्यानुसार संबंधीत पुरवठादार यांची बीले अदा करणेत आलेली आहेत.

काउंटर ड्रॉवर्स व डेस्क टेबलचे मटेरीअल खरेदीकरीता एकूण रक्कम रु.९३,९७७/- मात्र इतका खर्च झालेला आहे. सदरचे काम हे खात्यामार्फत पूर्ण करुन देण्यात आलेले आहे.

**प्रस्तावः-** उपरोक्त विषयांकीत कामी मटेरीअल खरेदीसाठी रु.९३,९७७/- मात्र इतका खर्च झालेला आहे.त्यास मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मतः** साई आश्रम प्रकल्पाचे उद्घाटन दि.११.०४.२०१३ रोजी सन्मा. मुख्यमंत्री महोदय यांचे शुभहस्ते संपन्न झाले. तत्पुर्वी वरील काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक होते. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे कार्योत्तर मान्यतेचे अपेक्षेवर सदर काम पूर्ण करुन घेणेत आले आहे.

तरी याकामासाठी मटेरीअल खरेदीकामी झालेल्या रु.९३,९७७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.११ साईआश्रम भाग ०१ व ०२ प्रकल्पाचे थर्ड पार्टी इन्सपेक्शन सर्व्हीसेस पोटी फी आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद :-**

"२१. (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहुन, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल :-

**(छ)** कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पुर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रक्कमांचे प्रदान;"

**मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :-**

मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक ३०/११/२०१२ रोजीचे सभेत विषयांकीत कामाबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ९५२ संमत करण्यात आलेला आहे.

"... मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सिव्हील ॲप्लीकेशन नंबर १२६९४/२०१२ व १२६९५/२०१२ पी. आय. एल. नं. १८/२०११ मध्ये दिनांक २१/११/२०१२ रोजी केलेल्या हुकुमानुसार साई आश्रम भाग-१ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावयाची आहेत. मा. खंडपीठाचे हुकुमानुसार एक्सपर्टची नेमणूक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे मा. अध्यक्ष यांनी करावी. असे सदरचे केसमध्ये संस्थानचे वतीने मा. खंडपीठात काम पहाणारे ॲड. चौकीदार यांनी सांगीतले आहे.

मा. खंडपीठाचे हुकुमानुसार सदर कारणासाठी टेक्नीकल एक्सपर्ट व फायनान्शियल एक्सपर्ट यांची नेमणूक करावयाची असल्याने सदर नेमणूक करण्याचे अधिकार मा. श्री. जयंत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देणेत आले."

**प्रस्तावना :-**

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सिव्हील ॲप्लीकेशन नंबर १२६९४/२०१२ व १२६९५/२०१२ पी. आय. एल. नं. १८/२०११ मध्ये दिनांक २१/११/२०१२ रोजी केलेल्या हुकुमानुसार साई आश्रम भाग-१ व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घेणेकामी सुचना केल्या. त्यानुसार मा. त्रीसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने मा. अध्यक्ष सो यांनी श्री. अविनाश डी. कुलकर्णी, Chartered Engineer & Govt. Approved Valuer, अहमदनगर यांचेकडून Third Party Inspection Services घेणेकामी सूचना दिली. त्यानुसार संस्थानचे जा.क्र. एसएसएसटी/ बांधकाम / ४३१० /२०१२, दिनांक १२/१२/२०१२ रोजीचे पत्राने श्री. अविनाश डी. कुलकर्णी, अहमदनगर यांना सदरहू कामी Third Party Inspection Services देणेसाठी पत्र देणेत आले.

श्री. अविनाश डी. कुलकर्णी, अहमदनगर यांनी दि.१८/१२/२०१२ रोजी संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नं. १०७,१०८ व १०९ पैकी मधिल साई आश्रम भाग-१ प्रकल्पाची पाहणी केली व त्यांचे जा.क्र. १०३१६/ SS/ D/ २०१२, दि.१९/१२/२०१२ रोजीचे पत्राने Third Party Inspection चा अहवाल सादर केलेला आहे.

श्री. अविनाश डी. कुलकर्णी, अहमदनगर यांचे कडून साई आश्रम प्रकल्पासाठी प्राप्त झालेला Third Party Inspection Reort संस्थानचे ॲड. श्री संजय चौकीदार यांचेमार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सादर करणेत आला व त्या अनुषंगाने कार्यवाही पूर्ण झालेली आहे. उपरोक्त सिव्हील ॲप्लिकेशन वरील उच्च न्यायालयाचे निकालानंतर साईआश्रम प्रकल्पातील भक्तनिवास इमारती दि.११/०४/२०१३ पासून साईभक्तांचे निवासाकरीता उपलब्ध करुन देणेत आल्या आहेत.

**प्रस्ताव :-**

श्री.अविनाश डी.कुलकर्णी,यांनी सदरहू कामी खालील प्रमाणे रु.४७५००/- मात्र रक्कमेचे बिल सादर केले आहे.

**Bill For Third Party Inspection Report.**

| Sr.No. | Description | Amount |
|---|---|---|
| **01.** | Building Area | |
| a. | A to G (7 Nos) = 31657.08 Sqm | |
| b. | H to L (5 Nos) = 22418.20 Sqm | |
| c. | R (GF & FF) = 2470.02 Sqm | |
| d. | Open Air theatre = 11.00 Sqm | |
| e. | DG Room = 320.75 Sqm | |
| | Total = 59277.05 Sqm @ Rs. 1 / Sqm | 59277.05 |

| | | |
|---|---|---|
| **02.** | Domestic ESR, Domestic GSR, Flushing, ESR, STP Plant, Paving, Security Cabin, Parking etc .(Lump Sump) | 5000.00 |
| | Amount Rs. | 64277.05 |
| | Discount 25% | 16692.62 |
| | Total Amount Rs. | 47584.43 |
| | **Say Rs** | **47500.00** |
| | Total Rs: Forty Seven Thousand Five Hundred Only | |

**विभागाचा अभिप्राय / मत :-**

श्री. अविनाश डी. कुलकर्णी, अहमदनगर यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या Third Party Inspection Services चे फी चे बिल पोटी उपरोक्त तपशिलाप्रमाणे रक्कम रु.४७,५००/- (रुपये सत्तेचाळीस हजार पाचशे) मात्र (सर्व्हीस टॅक्ससह) अदा करणेस, मा. त्रीसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२ मा.ना.श्री.राधाकृष्ण ए.विखे पाटील, मंत्री कृषि व पणन, महाराष्ट्र राज्य यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना संस्थानने निमगांव-निघोज, सावळीविहीर बु, व सावळीविहीर खु, येथील ५०० ते ६०० एकर जमिनीची मागणी केलेबाबत दिलेल्या पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मा. राधाकृष्ण ए.विखे पाटील, मंत्री कृषि व पणन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक १७ एप्रिल २०१३ रोजी पत्र पाठविले आहे.

त्यात खालील मुद्दे आहेत -

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी संस्थानमार्फत साईभक्तांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यासाठी शेती महामंडळाकडील सुमारे ५०० ते ६०० एकर जमिनीची यापुर्वी मागणी केलेली आहे.

२. तथापि निमगांव-निघोज, सावळीविहीर बु।।, सावळीविहीर खु।। या गावाजवळील खंडकरी शेतकऱ्यांच्या मुळ जमिन वाटपाचे प्रक्रीयेमध्ये नकाशे प्रसिध्द केल्याने त्यावर शेतकऱ्यांनी हरकती घेतलेल्या असून त्यांची मागणी पुर्ण केल्याशिवाय संस्थानला जमीन देणे उचित ठरणार नाही.

३. खंडकरी शेतकऱ्यांना मुळ जमीन देण्याऐवजी इतरत्र जमीन देण्याचा शेती महामंडळाचा आग्रह आहे.

४. शहरालगतच्या जमीनी वाटप करु नये हे धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे नाही.

५. या मागचा शेती महामंडळाचा हेतु व धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे नाही.

६. खंडकरी शेतकऱ्यांना मुळ जमीनीचे वाटप झाल्यानंतरच उरलेल्या क्षेत्रातुन संस्थानला जमीन देण्यास माझी हरकत राहणार नाही.

७. संस्थानला अगोदर जमीन वाटप करण्याचे धोरणच मुळात आक्षेपार्ह आहे.

८. शहरालगतच्या जमीनीच्या बाजारभावात प्रचंड वाढ झालेली आहे. यामध्ये शेतकऱ्यांचा कुठल्याही प्रकारचा दोष नाही.

९. या खंडकरी शेतकऱ्यांना इतरत्र जमीन देऊन त्यांची गैरसोय होऊ न देता त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करुन त्यांच्या भावनांचा आदर करावा.

१०. कृपया निमगांव- निघोज सावळीविहीर खु।। , सावळीविहीर बु।। या गावाजवळील खंडकरी शेतकऱ्यांना प्राधान्याने जमिनीचे वाटप करणेबाबत संबंधितांना सूचना द्यावी.

**ब) पुर्वपिठीका -**

मा.मंत्री (महसुल) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली शेती महामंडळाच्या जमीनीची विक्री करणेबाबत दिनांक ०५ फेब्रुवारी २००९ रोजी मुंबई येथे बैठक आयोजित करण्यांत आली असे शासनाचे दिनांक २ फेब्रुवारी २००९ रोजीचे पत्र होते. त्यात श्री.जयंत ससाणे, विधानसभा सदस्य व अध्यक्ष साई संस्थान, शिर्डी तसेच श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, साई संस्थान, शिर्डी यांना आमंत्रित करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ८ फेब्रुवारी २००९ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक १६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

खालील बाबींवर निर्णय होणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

१) शेती महामंडळाची सावळी विहीर बु।।, तालुका राहाता येथील २९१ एकर ३४ गुंठे जमीन व सावळीविहीर खु।। ता.राहाता येथील १४८ एकर ०९ गुंठे जमीन विकत घेणे अथवा इतर गावांपैकी ज्या जमिनी योग्य व सोईस्कर वाटेल त्या गावची जमीन विकत घेणेकामी तत्वता मान्यता देणे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन शासनाकडून शेती महामंडळाची सलग पटटयातील जास्तीत जास्त जमीन उपलब्ध करुन घेणेसाठी प्रयत्न करणेत यावेत. याकामी महामंडळ, शासन यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करणेस मान्यता देण्यात आली. याकामी शेतीमहामंडळाकडून अथवा सरकारी-निमसरकारी संस्थेकडून कागदपत्रे, नकाशे इतर कागदपत्र उपलब्ध करुन घेणे व इतर अनुषंगिक कामासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली."

याबाबत मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांना पत्र क्रमांक एसएसएसटी/ बांधकाम/ २१२६/२००९ दिनांक २० फेब्रुवारी २००९चे पत्रान्वये खालील गावांच्या जमिनी संस्थानला कायम खरेदी द्याव्यात, असे कळविण्यात आले.

| अ. नं. | गावाचे नांव | क्षेत्र हेक्टर -आर |
|---|---|---|
| १ | निमगांव कोऱ्हाळे | ६३-०९ |
| २ | कनकुरी | ०६-६५ |
| ३ | शिर्डी | ११-८२ |
| ४ | निमगांव कोऱ्हाळे (जी.आर.बी.वाडी ) | ०५-९५ |
| ५ | साकुरी | १३-८२ |
| ६ | सावळीविहीर बु.।। | ७५-७० |
| ७ | सावळीविहीर खुर्द | ३३-६७ |
| ८ | चांदे कसारे/सोनेवाडी | १५३-७३ |
| | **एकुण क्षेत्र** | **३६४-४३** |

प्रस्तुत जमीनी खालील बाबींसाठी संस्थानला आवश्यक आहेत.

१. साईभक्तांना जास्तीत जास्त निवासस्थाने उपलब्ध करुन देणे.

२. विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी सोयी उपलब्ध करुन देणे व त्यासाठी संकुलाची उभारणी करणे.

३. खेळाची मैदाने व संकुलाची उभारणी करणे.

४. साईभक्तांच्या वाहनासाठी वाहनतळ करणे.

५. साईभक्तांच्या मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे.

६. साईभक्तांसाठी उद्यानाची उभारणी करणे.

७. साईभक्तांसाठी स्वच्छता गृह उभारणे.

८. पिण्याच्या पाण्यासाठी साठवण तलाव उभारणी करणे.

९. संस्थानच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांचे बांधकाम करणे.

१०. संस्थानचे भविष्यातील विविध विकास प्रकल्पांचे बांधकाम करणे.

याबाबत गट नंबर/सर्व्हे नंबर निहाय माहिती सोबतच्या तक्त्यात आहे.

२. मा.प्र.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांनी त्यांचे पत्र क्रमांक व्य.स./ म.रा.शे.म./ कामगार मागण्या/२००९ -१३४४ दिनांक ४.३.२००९ ने सहसंचालक, नगर रचना (मुल्यांकन) पुणे यांना जे पत्र दिले त्यात कलम ३ नंतर खालीलप्रमाणे सुचना दिलेली आहे.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, श्री साई संस्थान शिर्डी देवस्थान यांचे दिनांक २० फेब्रुवारी २००९ चे फेर प्रस्तावानुसार त्यांनी मागणी केलेल्या व सोबतच्या सर्व्हे नंबर निहाय यादीतील सुमारे ९११ एकर (३६४-४३ हेक्टर) जमिनींचे मुल्यांकन सध्याचे सिध्दशिघ्र गणक तसेच सदर जमिनींचे बिनशेती बाजारमुल्य विचारात घेवून लवकरात लवकर करण्यात यावे.

३. त्यानंतर दिनांक १६/७/२००९ रोजी मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचे अध्यक्षेतखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात खालीलप्रमाणे विषय (सारांश ) झाला.

वरील बैठकीत मा.सहाय्यक संचालक, नगर रचना (मुल्यांकन) नाशिक यांनी सविस्तर मुल्यांकन अहवाल सादर केला.

सदरचे मुल्यांकन कमी असल्याने मा.व्यवस्थापक, शेती महामंडळ,पुणे यांनी नमुद केले यावर सह संचालक, नगर रचना (मुल्यांकन) पुणे यांनी अहवाल सोबत व्यवहाराच्या प्रती (इंडेक्स) व तत्सम कागदपत्र सादर करण्याचे सुचित केले. त्यानंतर अंतिम मुल्यांकन अभिप्रायसह संचालक, नगर रचना (मुल्यांकन) पुणे दिनांक ३०/७/२२००९ चे शिर्डी येथील नियोजित बैठकीत सादर करतील तदनंतर जिल्हाधिकारी त्यावर अंतिम निर्णय घेतील" यानंतर दिनांक २८/९/२०१० रोजी सकाळी ११ वाजता मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली बैठक झाली त्याचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

"सह संचालक, नगर रचना मुल्यांकन, पुणे यांनी तो पुनश्च फेर तपासून घेवून समितीपुढे सादर करावे .."

याप्रमाणे महाराष्ट्र शेती महामंडळाचे जमिनीबाबत कार्यवाही झालेली आहे.

मा.नामदार राधाकृष्ण ए.विखे पाटील, मंत्री कृषि व पणन यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना पत्र दिलेले आहे व त्याची प्रत संस्थानला दिलेली आहे त्यांत त्यांनी संस्थानकडून कोणतीही माहिती अपेक्षित केलेली नाही. त्यामुळे त्यांचे फक्त अवलोकन होणे उचित राहील.

शासनाच्या मर्जीप्रमाणे महाराष्ट्र शेती महामंडळाची जमीन मिळणार आहे. संस्थानने मागणी केलेली जमीन शासन संस्थानला देईल ही निश्चित बाब नाही त्यामुळे भविष्यात शासनाने याबाबत संस्थानकडे अभिप्रायाची मागणी केली तर शासन शेती महामंडळाचे जे क्षेत्र देईल ते घेण्यास संस्थान तयार आहे असे कळविणे उचित राहील.

**वर नमुद केलेल्या बाबी लक्षात घेता खालील बाबींवर निर्णय होणे उचित राहील.**

१. मा.नामदार श्री.राधाकृष्ण ए.विखे पाटील यांचे पत्राचे अवलोकन होऊन ते संचिकेत दाखल करणे.

२. महाराष्ट्र शेती महामंडळाची मौजे सावळीविहीर बु।। व खु।।, निमगांव- कोऱ्हाळे, कनकुरी निमगांव कोऱ्हाळे (जी.आर.बी.वाडी ) साकुरी, चांदेकसारे, सोनवाडी अथवा अन्य ठिकाणची जमीन यापैकी जी जमीन महाराष्ट्र शासन खरेदी देईल ती स्विकारणे.

**निर्णय क्र.४४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत साईभक्तांना विविध सोयी-सुविधा निर्माण करुन देणेसाठी प्रस्तावित जमीनींची संस्थानला आवश्यकता असल्यामुळे यापुर्वी केलेली जमीनीची मागणी कायम ठेवण्यात यावी व या आशयाचे मा.नामदार श्री.राधाकृष्ण ए.विखे पाटील, मंत्री, कृषि व पणन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना मा.अध्यक्ष महोदय यांचे स्वाक्षरीने विनंती पत्र पाठविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३ श्रीमती कामाक्षी सुकुमारन, रा.अरुमबक्कम, चेन्नई यांनी कांचीपुरम जिल्ह्यातील कराई गावातील प्लॉट क्रमांक ९४ व ९५ मधील जागा श्री साईबाबांचे मंदिर बांधून धार्मिक कार्य करण्याकरीता देऊ केलेली जागा/ जमीन संस्थानने स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती कामाक्षी सुकुमारन, रा.अरुमबक्कम, चेन्नई यांची कांचीपुरम जिल्हयातील मौजे कराई येथील प्लॉट नं.९४ व ९५ मधील जागा संस्थानने स्विकारावी म्हणून ११ एप्रिल २०१३ रोजी दिलेले पत्ररुपी प्रस्ताव संस्थानला दिनांक २६ मार्च २०१३ रोजी प्राप्त झाला.

त्यांच्या अर्जावरुन खालील बाबी स्पष्ट होतात.

१. अर्जदाराने देऊ केलेली जागा कराई गावातील असून तिचा प्लॉट क्रमांक ९४ व ९५ आहे.

२. त्यांना बहिणी व मुलगा आहे. त्यांचीही प्रस्तुत जागा देणेबाबत हरकत नाही .

३. सदरची मालमत्ता स्वकष्टार्जित आहे.

याशिवाय संस्थानने या जागेवर श्री साईबाबांचे मंदीर बांधून त्याठिकाणी धार्मिक कार्यक्रम करीत जावे या अटीवरच त्या सदरची जागा देणार आहेत

**संस्थानचे शिर्डी गाव सोडून अन्यत्र श्री साईबाबांचे मंदीर बांधण्याचे धोरण नाही.**

अशा परिस्थितीत अर्जदाराची जागा घेऊन त्याठिकाणी मंदीर बांधून पुजा अर्चा व इतर धार्मिक कार्यक्रम करणे उचित होणार नाही.

तरी खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती आहे.

श्रीमती कामाक्षी सुकुमारन यांची मौजे कराई जिल्हा कांचीपुरम येथील प्लॉट क्रमांक ९४ व ९५ मधील २६४० चौरस फुट जागा संस्थानला देऊ केलेली स्विकारणे अथवा न स्विकारणे.

**निर्णय क्र.४४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती कामाक्षी सुकुमारन, रा.अरुमबक्कम, चेन्नई यांनी कांचीपुरम जिल्ह्यातील कराई गावातील प्लॉट क्रमांक ९४ व ९५ मधील जागा/ जमीन संस्थानने स्विकारणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४ श्रीमती हन्सा बखरु यांनी मौजे शिर्डी येथील पिंपळवाडी रस्त्यावरील कंधारी हॉटेल जवळील साईधाम इमारतीमधील खोली (Apartment) दान म्हणून देणेबाबत दिलेल्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्रीमती हन्सा बखरु रा. बी-६ लॅण्डमार्क कॉलनी, एस.बी.मार्ग माहीम (पश्चिम) मुंबई- १६ मोबाईल नंबर ९८२१६७८३४९ यांनी दिलेल्या वरील विषयाबाबत दिलेले पत्र दिनांक ३० एप्रिल २०१३ रोजी संस्थानला प्राप्त झाले. त्यात त्यांनी खालील बाबी नमुद केलेल्या आहेत.

१. त्या मौजे शिर्डी येथील पिंपळवाडी रोडवर असलेल्या कंधारी हॉटेलजवळ साईधाम या नावाने प्रसिध्द असलेल्या इमारतीमधील खोली (Apartment) संस्थानला दान म्हणून देऊ इच्छितात.

२. सदर जागेत एक शयनगृह, एक हॉल असून किचन आहे सदरची जागा तिसऱ्या मजल्यावर आहे.

३. सदरची जागा त्यांची मयत बहीण कमला बिडीचंदानी व बहीण सावित्री हसराजनी यांची आहे.

४. त्यांचे अर्जदार श्रीमती हंसा बखरु यांचेकडे मुखत्यार पत्र आहे.

अर्जदार यांनी जागेचा उतारा, घराचा उतारा,सिटी सर्व्हेचा उतारा अथवा ७/१२ चा उतारा दिलेला नाही. तसेच सदर जागेबाबत मालमत्ता कर,जमीन बाब, पाणीपटटी, विजेचे बील वगैरे बाबत आजपर्यंत देय असलेल्या रकमेची माहिती दिलेली नाही.

अर्जदार यांनी अर्जात कोणतीही अट घातलेली नाही. त्यामुळे सदरची दान म्हणून जागा स्विकारणे उचित राहील.

**ब)** प्रस्तुत जागा दान म्हणून स्विकारणेबाबत तत्वतः निर्णय झाल्यानंतर अर्जदार यांचेकडून खालील माहिती घेणेत येईल.

१. जागेचा सिटी सर्व्हे नंबर, जागेचा ७/१२ चा उतारा, तसेच घराचा उतारा इत्यादी कागदपत्र घेणेत येतील.

२. अर्जदार यांचेकडून मुखत्यार पत्राची साक्षांकित प्रत घेणेत येईल .

३. वारस नोंद झाली असल्यास त्याबाबत महसुल दप्तरी झालेली नोंदीची तसेच सिटी सर्व्हे व नगरपंचायत, शिर्डी यांचेकडे झालेल्या नोंदीची साक्षांकित प्रत घेणेत येईल.

**कार्यालयामार्फत खालील माहिती संकलीत करणेत येईल.**

१. शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांचेकडून मालमत्ता कराची, पाणीपटटी व अन्य कराबाबतची माहिती घेणेत येईल.

२. कामगार तलाठी यांचेकडून सदर इमारतीबाबत देय असलेल्या महसूल रकमेची माहिती घेणेत येईल.

३. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून विजेच्या बीलाची माहिती घेणेत येईल

ही सर्व माहिती व अर्जदार यांचेकडे असलेल्या मुखत्यार पत्र इत्यादी कागदपत्र संस्थानचे वकीलाकडे सादर करणेत येवून त्यांनी सदर दान स्विकारणे योग्य असलेबाबत अभिप्राय दिल्यानंतर संस्थानच्या वकीलाकडून बक्षीस पत्राचा मसुदा तयार करणेत येऊन अर्जदार यांनी सदर बक्षीस पत्राचा मसुदा मान्य केल्यानंतर बक्षीस पत्र करणे उचित राहील.

**खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती आहे.**

१. श्रीमती हंसा बखरु यांनी मौजे शिर्डी येथील पिंपळवाडी रोडवर कंधारी हॉटेल जवळील साईधाम इमारतीतील घर (Apartment) दान म्हणून देऊ केलेली जागा स्विकारणे बाबत तत्वतः मान्यता देणे.

२. वर नमूद केलेली माहिती व कागदपत्र संकलीत केलेनंतर संस्थान वकीलांचा अभिप्राय घेऊन नंतर होणाऱ्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे होणाऱ्या सभेत निर्णयासाठी सदर विषय मांडणे.

**निर्णय क्र.४४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहिती/ कागदपत्रे संकलीत करुन संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणेत यावा व त्यानंतर सविस्तर प्रस्ताव तयार करुन सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५ साईबाबा भक्तनिवास इमारतीमधील दुसऱ्या टप्प्यामध्ये २०० खोल्यांचे नुतनीकरण करणेकामी नेमलेल्या आर्किटेक्ट डहाणूकर असोसिएटस, मुंबई यांचे फीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतूद :अधिनियम कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णयः मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेत नि.क्र.७९७ अन्वये खालीलप्रमाणे पारीत करणेत आलेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील दुसऱ्या टप्प्यामध्ये २०० खोल्यांचे नूतनीकरण करणेचे कामासाठी आर्किटेक्ट डहाणुकर असोसिएटस्, मुंबई यांनी सेवा देणेची तयारी दर्शविलेली असल्याने, त्यांची याकामी नियुक्ती करुन, त्यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक, निविदा फॉर्म व बिले प्रमाणित करुन घेणेस तसेच सदरकामी येणाऱ्या रक्कम रु.४,१०,३२,६४७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना :**

आर्किटेक्ट अविनाश डहाणुकर यांची यापुर्वी दि.२४/०७/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५८४ अन्वये सर्व्हे क्र.१२५ मधिल बहूमजली वहानतळ उभारणेकामी आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरहू वाहनतळासाठी आर्किटेक्ट, डहाणूकर यांची दि. ११/०२/२०१२ रोजीचे पत्राने नियुक्ती करणेत आलेली आहे. तथापि, याकामाची आर्किटेक्ट फी अद्याप निश्चित करण्यात आलेली नाही.

आता, उपरोक्त विषयांकीत कामी आर्किटेक्ट डहाणुकर असो., मुंबई यांना इकडील जा.नं. एसएसएसटी/ बांधकाम/५६४१/२०१३, दि.१२/०३/२०१३ अन्वये याकामाचा कार्यादेश देणेत आला. त्यानुसार आर्किटेक्ट डहाणुकर, मुंबई यांनी दि.०९/०४/२०१३ रोजी समक्ष साईटवर विझिट देऊन सदरहू रुमसची पहाणी केली. आर्किटेक्ट यांनी दि.१६/०४/२०१३ रोजीचे पत्रान्वये त्यांचा पाहणी अहवाल, साईटवर त्यांनी केलेले निरिक्षण व त्यासंबंधी उपाययोजना सादर केलेल्या आहेत. तसेच सदरचे पत्रामध्ये त्यांनी त्यांचा कामाचा स्कोप व फी नमूद केलेली आहे.

Scope of Professional Services as a Architect :-

1. Survey of Rooms
2. Evaluating

3. Planning/ Designing
4. Presentation / View/ With material selection
5. Working Drawings
6. Co- ordination / meetings between consultants

Scale of Fees / Professional consultancy charges :-

1. Fees for Architectural Services @ 1.5% on total project cost
2. Car Travelling expenses Mumbai to Shirdi to Mumbai per visit on actual basis
3. All applicable taxes chargable as per Govt. Rules and Regulations to be paid over &

above professional fees, including service tax as chargable & applicable.

**प्रस्ताव :** उपरोक्त विषयांकित कामी आर्किटेक्ट डहाणुकर असो. मुंबई यांनी सादर केलेल्या फी चे प्रस्तावावर तसेच कामाचे स्कोपवर चर्चा करुन निर्णय घेणे गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय / मत :-**

संस्थानतर्फे सध्या चालू असलेल्या बस स्थानक इमारत बांधकामासाठी आर्किटेक्ट काबरे-चौधरी, नाशिक यांना २% फी अधिक सर्व्हीस टॅक्स तसेच प्रत्यक्ष येणारा प्रवास खर्च याप्रमाणे फी ठरविण्यात आलेली आहे. त्यांचे स्कोपमध्ये आर्किटेक्चरल, स्ट्रक्चरल, सर्व्हीसेस, डीझाईन व ड्रॉईंग देणे, एस्टीमेट, निविदा, बिले तपासणी या कामांचा समावेश आहे.

उपरोक्त साईबाबा भक्तनिवास येथिल काम हे फक्त नूतनीकरण स्वरुपाचे आहे. त्यामुळे बिल्डींग आर्किटेक्चर व स्ट्रक्चरल डिझाईन कामाचा त्यात समावेश नाही. त्यामुळे सदर कामासाठी अंतर्गत फिनिशिंगचे बाबींचे रंगसंगती, स्पेशिफीकेशन्स, सॅम्पल्स ठरविणे, एस्टीमेट, निविदा, बिले तपासणी, वेळोवेळी कामाची पहाणी करणे या कामांसह आर्किटेक्ट अविनाश डहाणुकर यांचा स्कोप ठरविणेत यावा असे मत आहे. तसेच त्यासाठी त्यांना १.५% फी अधिक सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे ठरविण्यात यावी असे मत आहे.

**निर्णय क्र.४४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवास इमारतीमधील दुसऱ्या टप्यामध्ये २०० खोल्यांचे नुतनीकरण करणेकामी नेमलेल्या आर्किटेक्ट डहाणूकर असोसिएटस, मुंबई यांना मंजुर निविदा दरावर १.५% फी + सर्व्हीस टॅक्स देणेत येऊन संस्थानमार्फत विनामुल्य निवास व भोजनव्यवस्था करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६ बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद :- अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (त्र) अन्वये "भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे" करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतदू आहे.

**प्रस्तावना :-** बांधकाम विभागामार्फत संस्थान परिसरासह इमारतींचे दैनंदिन देखभाल दुरुस्ती केली जाते. या दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामासाठी आवश्यक असणारे सिमेंट सध्या बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्याटप्याने खरेदी केले जाते.

सन २०१२-१३ मध्ये, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार ४३ ग्रेड सिमेंट अल्ट्राटेक, ए.सी.सी.राजश्री बिर्ला, बिर्ला अे-१, बिर्ला गोल्ड व अंबुजा या कंपन्याचे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून एकुण १२५२ गोण्या सिमेंट बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार टप्याटप्याने खरेदी करणेत आले असून याकामी रक्कम रु.२,७७,९२५/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदर सिमेंट देखभाल दुरस्तीसह, विभागांतर्गत करणेत येणाऱ्या कामांसाठी वापरणेत आलेले आहे.

**प्रस्ताव :-** आता, सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षासाठी, मागील वर्षाप्रमाणे अंदाजे १७२० गोणी सिमेंट विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून आवश्यकतेनुसार टप्याटप्याने खरेदी करणेस व अंदाजे रुपये ३२०/- प्रती गोणी या दराने रक्कम रुपये ५,५२,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा अभिप्राय/ मत :

तरी बांधकाम विभागामार्फत करणेत येणाऱ्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी व विभागांतर्गत कामांसाठी, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी अंदाजे १७२० गोण्या सिमेंट वर नमूद केलेल्या कंपन्यांकडून थेट अथवा त्यांचे अधिकृत विक्रेत्यांकडून दरपत्रके मागवून आवश्यकतेनुसार टप्याटप्याने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजित रक्कम रु.५,५२,०००/- मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७ श्रीं चे समाधी मंदिर इमारतीचे आतील बाजूस सिलींगला रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम,२००४ मधील तरतूद :-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**

दि.२४/०९/२०११ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत समाधी मंदिर परिसरातील पुरातन इमारतीचे सुदृढीकरण करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ७०२ संमत करणेत आलेला आहे.

"प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे इमारतींचे सुदृढीकरणाकरीता पॉलिमर कोटींग करणेकामी सल्लागार नेमून त्यांचे सल्ल्याने विहीत पध्दतीने निविदा मागवून काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-**

उपरोक्त व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार समाधी मंदिराचे भिंतींना पॉलीमर कोटींग करणे अगोदर तेथील सिलींगला व्हाईट लस्टर पेंटव्दारे रंगकाम करणे आवश्यक आहे. अन्यथा भिंतींवर सिलिंगला मारण्यात येणाऱ्या पांढऱ्या रंगाचे डाग पडतात.

**प्रस्ताव:-**

याकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व मजुरी खर्च अपेक्षीत आहे.

**अ) रंगकामाकरीता आवश्यक मटेरीअल खरेदीसाठी अपेक्षित खर्चाचा तपशिल :-**

| **अ.नं.** | **मटेरीअल तपशिल** | **परिणाम/एकक** | **दर अंदाजे** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | व्हाईट लस्टर पेंट | ८० लिटर | २००/- प्रती लि. | १६,०००/- |
| ०२ | प्रायमर एस.टी | ४० लिटर | १३०/- प्रती लि. | ५,२००/- |
| ०३ | टरपेन | २० लिटर | ८०/- प्रती लि. | १,६००/- |
| ०४ | वॉल पुट्टी | ०४ बॅग | ५००/- प्रती बॅग | २,०००/- |
| | | | **एकूण रुपये (अ)** | **२४,८००/-** |

**ब) मजुरीकरीता अपेक्षित खर्चाचा तपशिल :-**

| **अ.नं.** | **मटेरीअल तपशिल** | **परिणाम/एकक** | **दर अंदाजे** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | सिलींग व भिंतीचा रंग घासून फुल टच-अप पुट्टी करणे, सिंगल कोट फुल प्रायमर मारुन डबल कोट रोलरच्या साहाय्याने लस्टर पेन्ट रंगकाम करणे. तसेच आवश्यक पहाडाचे मटेरीअल ठेकेदार यांचे राहील | ६२८५.०० चौ.फुट | १०/- प्रती चौ.फुट | ६२,८५०/- |
| | | | एकूण रुपये (ब) | **६२,८५०/-** |
| | | | अ + ब पूर्णांकीत रुपये | **८७,६५०/-** |
| | | | अधिक ५% कंटीन्जंसीज | **४,३८३/-** |
| | | | **एकूण रुपये** | **९२,०३३/-** |

उपरोक्त तपशिल अ व ब प्रमाणे सदरकामी एकूण रु.९२,०३३/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामी मटेरीअल व मजुरीकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेता येईल. तरी याकामी येणारे रक्कम रुपये ९२,०३३/- मात्रचे अंदाजे खर्चास मा.त्रीसदस्य समितीची मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय / मत :-**

श्रींचे समाधी मंदिर इमारतीस पॉलिमर कोटींग करण्याअगोदर आतिल भागातील सिलींगला वरीलप्रमाणे लस्टर पेंट देणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात येऊन, श्रीं चे समाधी मंदिर इमारतीचे आतील संपुर्ण छतास रंगकाम करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, दरवर्षी किंवा आवश्यकतेनुसार दर्शन रांगांचे हॉल व समाधी मंदिराच्या आतील, बाहेरील बाजुने रंगकाम करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८ श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ तसेच पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद :**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतदू आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या

दर्शसाठी व मंदिरात प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना :-**

संस्थानतर्फे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी रविवार दि. २१ जूलै, २०१३ ते दि. २३ जूलै, २०१३ अखेर "श्रीं " चा गुरुपौर्णीमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्याचे दिवसांत साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरामध्ये मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

**अ) श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१३ निमीत्त करावयाची व्यवस्था : (कालावधी दि. २१.०७.२०१३ ते दि. २३.०७.२०१३ अखेर ०३दिवस)**

**०१. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले )**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीं चे चावडी समोरील जागेत १८' उंचीचा | ६०'x३०' | १८००.०० |
| ०२ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरा समोर | ६०'x४०' | २४००.०० |
| ०३ | व्दारकामाई ते रथ पालखी गेट पर्यंन्त. | १६०'x१७' | २७२०.०० |
| ०४ | मंगल कार्यालय येथे कनात व बिछायतीसह | ९०'x१५' | १३५०.०० |
| ०५ | साईउद्यान समोर कनात व बिछायतीसह | ३०'x७५' | २२५०.०० |
| ०६ | समाधि मंदिर गेट नं. ३ ते मारुती मंदिरापर्यन्त १५' उंचीचा | ७५'x२०' | १५००.०० |
| ०७ | श्री मारुती मंदिर ते शामसुंदर हॉलपर्यन्त दक्षिणोत्तर १५' उंचीचा | ६०'x२५'<br>३०'x२०' | १५००.००<br>६००.०० |
| ०८ | गेट नं. ४ करीता बाहेरील बाजूस | ४०'x२०' | ८००.०० |
| ०९ | पालखीसाठी निर्मळ पिंप्री येथे व शिंगवे नाईक येथे कनात व बिछायतीसह | ४०'x६०'<br>४०'x६०' | २४००.००<br>२४००.०० |
| १० | पालखीसाठी गुहा येथे कनात व बिछायतीसह | ४०'x६०' | २४००.०० |
| ११ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता कनात व बिछायतीसह | १५'x१५' | २२५.०० |
| १२ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह | १५'x१५' | २२५.०० |
| १३ | पालखी स्वागता करीता स्वागत कक्ष येथे माहिती केंद्रासाठी कनात व बिछायतीसह | १५'x१५' | २२५.०० |
| १४ | जुने प्रसादालय प्रवेशव्दार (नगर-मनमाड फुटपाथ व आतिल बाजूने मोबाईल लॉकर पर्यन्त) | ३०'x१०'<br>४५'x२५' | ३००.००<br>११२५.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **२४२२०.००** |
| | **अंदाजे रु.३.५० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च - अ (I)** | | **२,५४,३१०.००** |

**०२. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले )**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त १८' उंचीचा | २८४'x१९'.५" | ५५१५.२८ |
| ०३ | गेट नं. ३ समोरील मोकळ्या जागेत (१६ आर जागेत) | २१०'x८०' | १६८००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **२२३१५/-** |
| | **अंदाजे रु.६.२५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च - अ (०२)** | | **४,१८,४०६/-** |

**०३. मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था :**

**कालावधी :- २१.०७.२०१३ ते दि.२३.०७.२०१२ अखेर - ३ दिवस**

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण/ एकक | अंदाज दर रु. प्रति चौ.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | **मंदीर परिसरामध्ये कलाकारांचे स्टेज व्यवस्था :-**<br>मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था :- ३' उंचीचे स्टेज, स्टेजवर सिंथेटीक मॅटींग, स्टेजचे मागील बाजूस आकर्षक रंगाचा पडदा, व कलाकारांचे मेकअपसाठी १६'x१०' साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे तसेच सदरहू कार्यक्रमासाठी फायबर खुर्च्या ३०० नग इ. सह स्टेज व्यवस्था | १६'x२४' = ३८४ चौ.फुट | २०.०० | २३,०४०.०० |
| | **एकूण अ (३)** | | | **२३,०४०.००** |

**०४. बॅरीकेडींग कालावधी दि. २१.०७.२०१३ ते २३.०७.२०१३ अखेर ०३ दिवस**

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण रनिंग फुट | अंदाज दर रु. प्रति र.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेकेटींग करणे | ९०० रनिंग फुट | ६.०० | १६२००.०० |
| | **एकूण - अ(४)** | | | १६२००.०० |
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ साठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ)** | | | | ७,११,९५६.०० |

**ब) पावसाळयाकरीता ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप व्यवस्था दि.०१/०७/२०१३ ते दि.३०/०९/२०१३ अखेर एकूण ९२ दिवस :-**

**ब (१) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | **चौरसफुट** |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग ते श्री गुरुस्थान मंदिराचे समोरील बेसमेंटचे पश्चिम बाजू पर्यन्त (पूर्व-पश्चिम) | १५०'X१०' | १५००.०० |
| ०२ | बेसमेंटचे पश्चिम बाजूस (दक्षिण -उत्तर) | ५०'X१०' | ५००.०० |
| ०३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजुस, दक्षिणोत्तर असा | ४५'X५०' | २२५०.०० |
| ०४ | व्हि. आय. पी. दर्शन रांगेसाठी (शनि गेट) | ११५'X१०' | ११५०.०० |
| ०५ | गेट नं. ०३ समोर | १५'X१०'<br>४०'X१०' | १५०.००<br>४००.०० |
| ०६ | जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम प्रवेशव्दारा समोर | ३०'X४५'<br>२०'X१५' | १३५०.००<br>३००.०० |
| ०७ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ नंदादिप समोर | ११५'X३५' | ४०२५.०० |
| ०८ | साईप्रसाद नं.०२ / चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत | १५'X६०'<br>१५'X२०' | ९००.००<br>३००.०० |
| ०९ | लाडू विक्री काउंटर समोर | ६०'X३०' | १८००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **१४६२५.००** |
| | **अंदाजे रु.०.२५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च ब (१)** | | **३,३६,३७५.००** |

**ब (०२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले)**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण** | **मंडपाची साईज** | चौरसफुट |
|---|---|---|---|
| **०१** | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह) | ६०'X६५' | ३९००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **३९००.००** |
| | **अंदाजे रु.०.३० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च ब (१)** | | **रु. १,०७,६४०/-** |

| | |
|---|---|
| **सन २०१२ पावसाळयाचे कालावधीत करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (ब)** | **४,४४,०१५/-** |
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१३ व पावसाळयासाठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ + ब )** | **११,५५,९७१/-** |

वरिल तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ व पावसाळ्या करीता रु.११.५६ लक्ष मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगी दाखल बांधकाम करण्यात आलेल्या साई आश्रम १ व २ मधील इमारती दि.११/०४/२०१३ रोजी साईभक्तांकरीता निवासव्यवस्थेसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे जुने प्रसादालय परिसर, साईनगर परिसर व भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) येथील तात्पुरते निवासव्यवस्थेसाठी दरवर्षी टाकण्यात येणाऱ्या मंडपाची आवश्यकता भासणार नसल्याने सदर ठिकाणचे मंडपाचा समावेश केलेला नाही.

**प्रस्ताव :-**

उपरोक्तप्रमाणे 'अ' नुसार श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१३ निमित्ताने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.७,११,९५६/- मात्र व 'ब' नुसार पावसाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.४,४४,०१५/- मात्र असे एकूण रुपये ११.५६ लक्ष मात्रचे खर्चास तसेच उपरोक्तप्रमाणे साईभक्तांचे सोयीसुविधेसाठी मंडप उभारणीसह इतर अनुषंगिक सुविधा पुरविणेकामी सिलबंद निविदा मागविणेकामी निविदा सुचनेची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रातून तसेच संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावरुन प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय / मत :-**

गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ निमित्त साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणे अपेक्षीत आहे. तसेच पावसाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे पावसापासून संरक्षण होणेकामी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९ साईआश्रम भाग ०१ R-Block मध्ये रुमच्या चाव्या ठेवणेसाठी ड्रावर टेबल तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद :-**
अधिनियमांच्या कलम -२१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगह बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना :-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साईआश्रम प्रकल्पाचे काम पुर्ण झालेले आहे.साई आश्रम भाग- ०१ हा प्रकल्प दि.११/०४/२०१३ पासुन साईभक्तांकरीत खुला करण्यात आलेला आहे. साईआश्रम भाग- ०१ व ०२ मधील R-Block इमारतीमध्ये बुकींग काऊंटर तयार करण्यात आलेले आहेत. सदरहु काऊंटर्सकरीता इकडील विभागामार्फत ड्रॉवर्स तयार करण्यात आले आहेत. आता साईआश्रम विभागाने दि.०८/०४/२०१३ रोजीचे पत्रान्वये साईआश्रम भाग- ०१ येथे १२ इमारतींचे चाव्या ठेवणेसाठी रुम बुकींग काउंटरचे मागील बाजुस १८ ड्रावरचे एक युनिट लॉकसह तयार करुन देण्याची विनंती केलेली आहे.सदरहु कामासाठी स्थानीक पुरवठादार यांचेकडुन मटेरीयल खरेदी करता येईल. तसेच सदरहु काम हे खात्यामार्फत पुर्ण करता येईल.

**प्रस्ताव:-** उपरोक्त कामाचे आवश्यक मटेरीयलसाठी एकुण रक्कम रु.३७,६००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदरहु मटेरीयल स्थानीक पुरवठादार यांचेकडुन दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ मत:-** तरी याकामी येणारे रु.३७,६००/- मात्रचे खर्चास व मटेरीयल स्थानीक पुरवठादार यांचेकडुन दरपत्रके मागवुन खरेदी करणेस व त्यानुसार काम पूर्ण करणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग ०१ (R-Block) मध्ये रुमच्या चाव्या ठेवणेसाठी ड्रावर टेबल तयार करणेसाठी स्थानिक मटेरीयल पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.३७,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२० मौजे निमगांव- कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसीत करणेकामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे (UPMPL) यांचे वाढीव कालावधीतील फीबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद :-**
"२१. (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल :-
(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे : असे प्रयोजन नमूद केले आहे.
"(झ) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे": असे प्रयोजन आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६९ अन्वये मौजे निमगांव-_कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कलवा चारी क्र. ११ वरुन रस्ता विकसीत करणे याविषयांचे सदंर्भाने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

१."... ... उपरोक्त परिच्छेदांत नमूद केल्यानुसार, मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्रमांक ११ (अहमदनगर-मनमाड राज्यमार्ग ते कालवा हेडपर्यन्त अंदाजे २ किमी) पाईप टाकून बंदीस्त करणेस व त्यावरुन १२ मीटर रुंदीचा अथवा जास्तीत जास्त उपलब्ध रुंदीचा रस्ता संस्थान निधीतून विकसित करणेस व त्याकामी विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली."

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/११/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र.८६४ अन्वये मौजे निमगांव-कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कलवा चारी क्र. ११ वरुन रस्ता विकसीत करणेकामी सल्लागार यांचे वाढीव कालावधीचे फी बाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"... ... यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसीत करणे कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे (UPMPL) यांना मार्च-२०१२ ते जानेवारी २०१३ अखेरपर्यंत ११ महीन्यांचे कालावधीसाठी प्रती महीना रु.७५,०००/- मात्र प्रमाणे एकूण रु.८,२५,०००/- मात्र इतकी (यापुर्वी ठरलेल्या प्रकल्पाच्या किंमतीचे २.५०% फी व्यतिरिक्त) फी अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स अदा करणेस मान्यता देण्यात आली. "

**प्रस्तावना :-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेतील नि.क्र.७६९ नुसार मौजे निमागांव-कोऱ्हाळे शिवरातील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ (अहमदनगर- मनमाड राज्यमार्ग क्र. १० ते कालवा हेडपर्यंत अंदाजे २ कि.मी. ) पाईप टाकून बंदिस्त करणेस व त्यावरुन १२ मी रंदीचा रस्ता संस्थान निधीतून विकसीत करणेस मान्यता मिळालेली आहे. तसेच याकामी जा.क्र.१५५६ दि.२३/०१/२०१० अन्वये शासनाकडे मान्यतेस्त्व प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तसेच याबाबत इकडील विभागाने पाठपुरवा करणेकामी वेळोवेळी पत्र पाठविले आहे. सदरहू प्रस्ताव अद्याप शासनस्तरावर विचाराधीन आहे.

विषयांकीत चारी क्र. ११ वरुन रस्ता विकसीत करणेसाठी बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन करणेकामी मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.ली., पुणे (UPMPL) यांची नियुक्ती करणेत आली आहे. याकामी त्यांना संस्थानमार्फत विकसीत करावयाचे ०६ रस्त्यांसाठी देणेत येणारे सल्लागार शुल्काप्रमाणे प्रकल्पाचे किंमतीच्या २.५% रक्कम (अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स) या शुल्कावर जा.क्र.७८१६ दि.१५/०६/२०१० रोजीचे आदेशा अन्वये नेमणूक करणेत आलेली आहे. व याकामी त्यांचेशी दि.२३/१०/२०१० रोजी केलेल्या करारनाम्यानुसार त्यांना खालील टप्प्यांप्रमाणे फी अदा करावयाची आहे. तसेच त्यापैकी आजपावेतो अदा करण्यात आलेल्या फीचा तपशिलही खालिल तक्त्यात दर्शविला आहे.

1. Helipad link Road Civil work Contract Amount = 6,60,81,150/- (A)
2. Total Fees payable to Consultant @ 2.5% of (A) = 16,52,029/- (B)

| Sr. No | Stage | % of fees payable | Total Fees Payable | Paid amount up to date |
|---|---|---|---|---|
| 1 | **Stage-1** (15% of total fees payable) On completion services mentioned under clause 1.1 and 1.2 of agreement i.e. Pre tender stage, Tendering process & award of Contract | 15% | 247,804.00 | 247,804.00 |
| 2 | **Stage-2a** (50% of total fees payable) during progress of work-Rs.-91,779/- per month for 09 months | 50% | 826,011.00 | 826,011.00 |
| | Additional Fees for Stage -2a Rs 75,000/- per month for March to December 2012 (11 months) | Additional Fee | 825,000.00 | 825,000.00 |
| 3 | **Stage-2b** (25% of total fees payable) progressively pro-rata with contractors running bills. (Work done / contract amount) X total fees payable X25% | 25% | 413,007.00 | 262,497.00 |
| | | Total amount of fees: | 2,311,822.00 | 2,161,312.00 |
| | | Retention Amount @10% of (A): | 165,203.00 | 0.00 |
| | | **Amount of Fees payable:** | **2,477,025.00** | **2,161,312.00** |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे सल्लागार यांना Stage २ a नुसार कामाचे मूदतीत जुन २०११ ते फेब्रुवारी २०१२ या ०९ महिन्यांचे कालावधीसाठी रु.९१,७७९/- प्रती महिना अधिक सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे फी अदा करणेत आलेली आहे. तसेच मा. व्यवस्थापन त्रीसदस्य समितीचे दि.०८/११/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र.८६४ अन्वये वाढीव कालावधी मार्च, २०१२ ते जानेवारी, २०१३ अखेर ११ महिन्यांचे कालावधीमध्ये रु.७५,०००/- प्रती महिना अधिक सर्व्हीस टॅक्ससह सल्लागार फी अदा करणेस मान्यता देणेत आली होती.

साईभक्तांचे निवासाकरीता सर्व्हे नं.१०७,१०८ व १०९ पै. शिर्डी येथे साई आश्रम प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचा उद्‌घाटन समारंभ मा. राष्ट्रपती, भारतीय गणराज्य यांचे शुभहस्ते

दि.१६/११/२०१२ रोजी आयाजीत करणेत आला होता. यावेळी मा. राष्ट्रपती व इतर मान्यवरांचे हेली कॉप्टर मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे हेलीपोर्टवर उतरवण्यात येणार होते. याकरीता सदर हेली पॅडचे विस्तारीकरण करणेस व सदरचे काम ठेकेदार मे.एस.के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांचेकडून करुन घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि.०८/११/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र.८६३ अन्वये निर्णय घेणेत आला. ठेकेदार यांनी हेलीपॅड विस्तारीकरणाचे काम त्यांचेकडील सर्व मशिनरी व लेबर वापरुन वेळेत पूर्ण केले.

ठेकेदार यांनी हेलीपॅडचे काम तातडीचे असल्याने त्यासाठी चारी नं.११ वरील रस्त्याचे कामावरील लेबर व मशिनरीचा वापर केला. त्यामुळे चारी नं.११ वरील रस्त्याचे कामास विलंब झाला आहे. करीता त्यांनी सदरहू काम पूर्ण करण्यासाठी दि.३१/०३/२०१३ अखेर मूदतवाढ मिळणेची विनंती दि.१४/०१/२०१३ रोजीचे पत्रान्वये केली आहे.

ठेकेदार यांना सदरहू काम पूर्ण करणेसाठी २० एप्रिल,२०१३ पर्यंत मूदतवाढ देणेसाठी मा. त्रीसदस्य समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेत मान्यता मिळाली आहे. सदरहू निर्णयाची प्रत इकडील विभागास अद्याप प्राप्त झालेली नाही.

**प्रस्ताव :-**

सदर वाढीव कालावधी करीता कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर अनुषंगिक खर्च भागविणेसाठी माहे फेब्रुवारी व मार्च २०१३ या दोन महिन्यांचे रु.७५,०००/- प्रती महिना (अधिक सर्व्हीस टॅक्स) प्रमाणे मे. युनीसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि.,पुणे यांनी दि.१६/०४/२०१३ व दि.०५/०३/२०१३ अन्वये बिल सादर केले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| Sr. No | Invoice No | Invoice Date | Month | Net Amount | Service Tax | Gross Bill Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | P130206 | 05/03/2013 | Feb-2013 | 75,000/- | 9,270/- | 84,270/- |
| 02 | P130405 | 16/04/2013 | March-2013 | 75,000/- | 9,270/- | 84,270/- |
| | | | | | **Total Amount** | **1,68,540/-** |

**विभागाचा अभिप्राय / मत :-**

तरी वरील विषयांकित प्रकल्पासाठी वाढीव कालावधीत प्रकल्प व्यवस्थापन सेवा पुरविणेकरीता तसेच ठेकेदार यांचे अंतिम बिलाची मोजमापे तपासणेकरीता सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांना फेब्रुवारी २०१३ ते मे २०१३ अखेरपर्यंत ०४ महिन्यांचे कालावधीसाठी प्रती महिना रु.७५,०००/- मात्र प्रमाणे एकुण रु.३,००,०००/- मात्र इतकी (यापूर्वी ठरलेल्या प्रकल्पाच्या किंमतीचे २.५०% फी व्यतिरिक्त) फी अधिक प्रचलीत दराने सर्व्हीस टॅक्स अदा करणेस मान्यता मिळणेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव- कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र.११ वरुन रस्ता विकसीत करणेचे कामातील स्ट्रीट लाईटस् व रोड फर्निचरची काही किरकोळ कामे अद्याप बाकी आहेत. तसेच, या कामाचे बांधकाम ठेकेदार मे.एस.के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांनी अद्याप सदर कामाचे अंतिम बिल सादर केलेले नाही. त्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे (UPMPL) यांना जुन- २०१३ अखेर मुदतवाढ देणेत येऊन या वाढीव कालावधीची रु.३,७५,०००/- + प्रचलीत दराने सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे फी अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१ शिर्डी येथे नेमणुकीस असलेल्या पोलिस अधिकारी/ कर्मचारी यांचेकरीता संस्थानमार्फत निवासस्थाने बांधणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मध्ये दि.०४/०६/२०११ रोजी अंमलात आलेल्या अध्यादेशान्वये कलम २१ मध्ये (क) पोट- कलम (१) नंतर, पुढील पोट- कलम नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे.

"(१ क) पोट - कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयींसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल."

**प्रस्तावना :-**

पोलीस अधिक्षक, अहमदनगर श्री. रा. द. शिंदे यांनी त्यांचे वरील संदर्भिय पत्राव्दारे कळविले आहे की, पोलीस विभागाचे शिर्डी पोलीस ठाणे, शिर्डी साई मंदिर सुरक्षा, वाहतुक नियंत्रण शाखा, शिर्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी शिर्डी, उपविभाग शिर्डी व शिर्डी बी.डी.डी.एस. पथक इ. कार्यालये कार्यरत आहेत. या सर्व कार्यालयात मिळून एकूण १६ अधिकारी व ३६३ कर्मचारी आहेत. शिर्डी येथे पोलीस मुख्यालयाशेजारी फारच थोडे कर्मचारी राहतात. त्यामुळे बरेच पोलीस अधिकारी व कर्मचारी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्यांचेकरिता निवासस्थाने बांधणे अत्यंत गरजेचे आहे.

**प्रस्ताव:-** पोलीस अधिक्षक, अहमदनगर श्री. रा. द. शिंदे यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भिय पत्रात नमूद केले आहे की, मौजे नांदुर्खी येथे गट नं. ३३१ व ४४६ मध्ये शासकीय ३५ एकर जागे पैकी ५ एकर जागा पोलीस विभागासाठी वर्ग करणेबाबत त्यांनी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना विनंती केली आहे. तरी सदर जागेत १६ पोलीस अधिकारी व ३३१ पोलीस कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थाने त्यांचे दर्जाप्रमाणे संस्थान मार्फत बांधूण देणेस विनंती केली आहे.

**विभागाचा अभिप्राय / मत :-**

१) मा. पोलिस अधिक्षक यांनी त्यांचे वरील संदर्भिय पत्रात शिर्डी पोलीस स्टेशनजवळ सस्थान मार्फत फक्त ३२ कर्मचारी निवासस्थाने बांधण्यात आल्याचे नमूद केले आहे. तथापी सदर कर्मचारी निवासस्थाने ही संस्थान मार्फत बांधण्यात आलेली नाहीत. संस्थानचे कर्मचारी निवासस्थानांमध्ये सध्या पोलीस विभागाच्या काही अधिकारी व कर्मचारी यांना निवासस्थाने देण्यात आलेली आहेत.

२) मौजे नांदुर्खी बु. येथिल गट नं. ३३१ व ४४६ मधिल शासकीय जागेपैकी ५ एकर जागा पोलिस विभागासाठी वर्ग करणेबाबत त्यांचेमार्फत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना विनंती करण्यात आली असल्याचे उपरोक्त मागणीत नमूद केले आहे. परंतू या ठिकाणी संस्थानलाही सुमारे ३७ एकर क्षेत्र देण्याचे यापुर्वी प्रस्तावित करण्यात आलेले आहे. त्यामुळे पोलीस विभागाने वरीलप्रमाणे मागणी केलेली जागा ही संस्थानला मिळणाऱ्या क्षेत्रातून कमी करण्यात येणार काय, याचा बोध होत नाही.

३) सदरहु बांधकाम शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात यावे असे मत आहे.

४) अधिनियमातील उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संस्थानतर्फे अनुदान उपलब्ध करावयाचे झाल्यास प्रथम मा. त्रीसदस्य समिती सभेत तसा निर्णय संमत करुन राज्य शासनाचे पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५४ सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२ साई आश्रम भाग- ०१ व ०२ येथील खोल्या / हॉलमध्ये एस.एस. पाईप बसविणे कामाचे ठेकेदार मे.पवार इलेक्ट्रो सिस्टीम्स प्रा.लि. नाशिक यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियम कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय समंत करणेत आलेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम प्रकल्पाचे भाग-०१ व ०२ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविणेसाठी एस.एस.पाईप बसविणेकामी मे. पवार इलेक्ट्रो सिस्टीम्स् प्रा. लि ; नाशिक यांचे रु.२१,९०,०००/- मात्रचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. "

**प्रस्तावना:-**

साई आश्रम प्रकल्प भाग -०१ व ०२ येथील खोल्या/ हॉलमध्ये कपडे वाळविणेकरीता एस.एस. पाईप बसविणेचे काम ठेकेदार मे. पवार इलेक्ट्रो सिस्टीमस् प्रा.लि., नाशिक यांना इकडील जा.क्र.एसएसएसटी/ बांध/५८९९/२०१३, दि.२५/०३/२०१३ अन्वये बहाल करणेत आलेले आहे. याकामी ठेकेदार यांचे समवेत दि.२५/०३/२०१३ रोजी सदर कामाचा करारनामाही करणेत आला आहे.

त्यानुसार ठेकेदार यांना साईटवर प्रत्यक्ष मोजमापे घेऊन तसेच सॅम्पल प्रमाणीत करुन घेतेलेला आहे. करारनाम्यानुसार तसेच कार्यादेशानुसार सदर कामाचा कालावधी दि.२६/०३/२०१३ ते दि.२५/०५/२०१३ असा दोन महिने (६० दिवस) इतका होता. सदरहू कामाची मूदत दि.२५/०५/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे.

आता ठेकेदार मे. पावार इलेक्ट्रोसिस्टीम्स, प्रा.लि., नाशिक यांनी दि.१८/०५/२०१३ रोजीचे पत्रान्वये याकामासाठी अधिक ३० दिवांची मूदतवाढ मिळण्याची विनंती केलेली आहे. त्यासाठी त्यांनी खालील कारण नमूद केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील मोठ्या शहरातील पुरवठादार व्यवसायिकांनी LBT विरोधात बंद पुकारल्याने कच्चा माल/ स्टील मिळण्यास अडचणी निर्माण झाल्या व त्यामुळे वेळेत काम पूर्ण करणे शक्य झाले नाही, असे ठेकेदार यांनी कळविले आहे. त्यामुळे याकामासाठी ३० दिवसांची मूदतवाढ मिळण्याची विनंती ठेकेदार यांनी केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-**

साई आश्रम येथे साईभक्तांचे सोयीचे दृष्टीने सदरहू काम करणेचे गरजेचे आहे. ठेकेदार यांनी त्यांचे नाशिक कार्यशाळेत एस.एस.पाईपस संपूर्ण फिटींगसह तयार करण्यास सुरुवात केलेली आहे. LBT विरोधातील बंदमुळे मटेरीअल मिळणेस ठेकेदार यांना अडचणी निर्माण झाल्या आहेत.

तरी ठेकेदार मे. पवार इलेक्ट्रो सिस्टिमस् प्रा. ली ; नाशिक यांना सदरहू कामामध्ये आलेल्या अडचणींचा विचार होऊन, त्यांनी मागणी केलेप्रमाणे ३० दिवस (दि.२५/०६/२०१३ अखेर) मूदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

तरी मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३ जलसंपदा विभागाच्या मौजे शिर्डी येथील स.नं.११४/९ व १२५/३ मधील ३२ आर जागेच्या बदल्यात मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर ८७ पै व ८८ पै मधील संस्थान मालकीची ४० आर जागा जलसंपदा विभागास कार्यालय, गोडाऊन, विश्रामगृह व कर्मचारी निवासस्थाने इमारतीचे बांधकाम करुन हस्तांतरीत करणे.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील समितीची कर्तव्ये व अधिकार या शिर्षक खालील कलम १७(२) (ट) मध्ये असे नमूद केले आहे की,

"... (ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमिनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील" अशी तरतूद आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय :-**

०१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२ जून २०११ रोजीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्रमांक ४०१ संमत झालेला आहे. "शिर्डी येथिल जलसंपदा विभागाची जागा संस्थानला हस्तांतरीत करुन त्याबदल्यात जलसंपदा विभागास मौजे निमगांव को-हाळे गट नं. ८७ (पै.), ८८ (पै.) मधील संस्थानचे जागेवर आवश्यक ती बांधकामे करुन देणेकामी आर्किटेक्ट सुरेश बाबु ॲण्ड पार्टनर्स, मुंबई यांचे नियुक्तीस तसेच त्यांना सध्या संस्थानला सेवा पुरविण्याच्या इतर आर्किटेक्ट प्रमाणे कामाचे किंमतीची २% दराने फी अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स अदा करणेस व सदर बांधकामासाठी निविदा मागविणेस मान्यता देणेत आली. "

**प्रस्तावना :-**

**(१)** जलसंपदा (पाटबंधारे) विभाग, महाराष्ट्र शासन यांची मौजे शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर येथे सर्व्हे नंबर ११४/९ मध्ये २० आर व सर्व्हे नंबर १२५/३ मध्ये १२ आर अशी एकूण ३२ आर जमीन असून, सध्या या जागेत शाखाधिकारी, सिंचन विभाग, शिर्डी यांचे कार्यालय व कर्मचारी निवासस्थाने आहेत.

विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, जलसंपदा विभागाशी वेळोवेळी करण्यात आलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी सादर केलेली माहिती व मागणी विचारात घेतां,जलसंपदा विभागास त्यांचे शिर्डी येथील ३२ आर जागेच्या मोबदल्यात संस्थान मालकीची मोजे निमगांव-को-हाळे शिवारातील गट नंबर ८७ पै.व ८८ पै.मधील ४० आर जागेत सिंचन विभागासाठी आवश्यक असणारे कार्यालय, निवासस्थाने, अतिथीगृह, वाहनतळ आदिं आवश्यक बांधकाम करुन देऊन हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२ मे,२०१० रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला, त्यावर निर्णय क्रमांक ५१५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"... .. यावर सविस्तर चर्चा होऊन, जलसंपदा विभागास त्यांचे शिर्डी येथील ३२ आर जागेच्या मोबदल्यात संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नं.८७ पै व ८८ पै मधील ४० आर जागा कार्यालय, कर्मचारी निवासस्थाने आदि आवश्यक बांधकाम करुन देऊन हस्तांतरीत करण्यात

यावी. याकामी करण्यात आलेल्या प्राथमिक कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. तसेच शासनाच्या मान्यतेसाठी जलसंपदा विभागाचे मान्यतेसह विहीत पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले."

**(२)** तसेच, सदर प्रस्तावाबाबत मा. मंत्री, जलसंपदा, महाराष्ट्र राज्य तथा मा. अध्यक्ष, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांचे अध्यक्षतेखाली नियामक मंडळाचे दिनांक २२ जून, २०१० रोजी झालेल्या बैठकीत आयत्या वेळेचा ठराव क्रमांक ४३/१ खालीलप्रमाणे झालेला आहे :

". .. जलसंपदा विभागाच्या मालकीच्या शिर्डी येथील सर्व्हे नंबर ११४/९ क्षेत्र २० आर व सर्व्हे नंबर १२५/३ क्षेत्र १२ आर असे एकूण ३२ आर क्षेत्र त्यावरील बांधकामासह श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना सदर क्षेत्राच्या बदली संस्थानच्या मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे सर्व्हे नंबर ८७ व ८८ मधील ४० आर जागा शाखा कार्यालय, विश्रामगृह, अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने (रस्ते, वीज, पाणी इ. सोयीयुक्त) तसेच उद्यान व खेळाच्या मैदानासह श्री साईबाबा संस्थान, शिर्डीच्या खर्चाने तयार करुन देण्याच्या अटीवर हस्तांतर करण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तथापि सदर हस्तांतरण संबंधी जिल्हाधिकारी यांच्या सहमतीने व्हावे व संस्थानने प्रथम त्यांचे जागेवर बांधावयाचे शाखा कार्यालय, विश्रामगृह, अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने (रस्ते, वीज, पाणी इ. सोयीयुक्त) बांधून पूर्ण करावे. ते जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना हस्तांतर करावे व नंतरच अस्तीत्वातील शाखा कार्यालय, त्यातील इमारती व जागेचा ताबा घ्यावा असे नियामक मंडळाने सुचित केले. "

**(३)** मा. व्यवस्थापन समितीचे व जलसंपदा विभागाचे उपरोक्त निर्णयांनुसार, मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१० रोजीचे पत्राव्दारे विषयांकित प्रकल्पास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. तसेच आर्किटेक्ट सुरेश बाबु ॲण्ड पार्टनर्स यांचेकडून जलसंपदा विभागासाठी करावयाच्या अंदाजे रक्कम रुपये ६.०१ कोटी मात्र खर्चाचे अंदाजपत्रकांसह बांधकाम आराखडे तयार करुन जलसंपदा विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आले होते.

जलसंपदा विभागाने मान्यता दिलेल्या बांधकाम आराखडयानुसार, विहीत पध्दतीने बांधकामांच्या निविदा मागवून जलसंपदा विभागासाठी करावयाचे इमारतींसह इतर अनुषंगिक बांधकामांचे विद्युत विषयक भाग व लॅण्डस्केपिंग वगळता रु.४,०४,००,४५८/- रकमेच्या कामासाठी निविदा मागविणेत येवून प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०७/२०११ रोजीचे सभेत उघडून निविदा सादरकर्त्यांशी चर्चा / वाटाघाटी करुन निम्नतम दराचे (५.४७% कमी) ठेकेदार मे. के.आर.आर. इन्फ्रा.प्रोजेक्ट (प्रा.) लि., हैद्राबाद यांची निविदा निर्णय क्र.४९८ अन्वये स्विकारणेत येवून त्यांना कार्यादेश देणेत यावा असे ठरले. त्यानुसार रुपये ४,००,८६,९७७/- मात्र इतक्या मंजुर रकमेचा कार्यादेश (विद्युत व लॅण्डस्केपिंग वगळून) बांधकाम ठेकेदार के.आर.आर. इन्फ्रा प्रोजेक्टस (प्रा.) लि., हैद्राबाद यांना इकडील जा.नं.२१७९/२०११ दि.०१/०८/२०१२ अन्वये देणेत आला होता.

ठेकेदार यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार सदरहु कामाची मूदत दि.१५/०८/२०११ ते दि.१४/११/२०१२ अखेर (१५ महिने) होती. विहीत कालावधीत ठेकेदार यांनी साईटवर स्टॉफ क्वार्टर, गोडावून कार्यालय व विश्रामगृह इमारतीचे आर.सी.सी. फुटींग करीता खोदाई तसेच विश्रामगृह इमारती व्यतिरिक्त इतर इमारतींचे आर.सी.सी. फुटींग करीता पी.सी.सी. चे काम केले असून दि.१२/०१/२०१२ पासून काम बंद ठेवले आहे. ठेकेदार यांना काम सुरु करणेबाबत वेळोवेळी समक्ष तसेच पत्राव्दारे पाठपुरावा करुनही ठेकेदार यांनी काम सुरु केले नाही. करीता आर्किटेक्ट सुरेश बाबु ॲण्ड पार्टनर्स, मुंबई यांनी दि.१४ जून,२०१२ अन्वये ठेकेदार यांना Final Notice of Termination दिली आहे.

तद्नंतर दि.१८ जून, २०१२ रोजी ठेकेदार यांचे प्रतिनिधी श्री. अनिल रेड्डी, कार्यकारी संचालक व श्री.जी.एस.राव, जनरल मॅनेजर यांनी मा.कार्यकारी अधिकारी सो। व वरिष्ठ मुख्य अभियंता यांची भेट घेवून सदरचे काम पुनःश्च सुरु करणेसाठी एक शेवटची संधी मिळावी म्हणून विनंती केली. परंतू पुन्हा संधी देवूनही त्यांनी काम सुरु केले नाही. करीता ठेकेदार यांना दि.२३ जुलै २०१२ चे पत्राने मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचेकडे बैठकीसाठी बोलविणेत आले. त्यानंतर ठेकेदार यांचे प्रतिनिधी श्री.जी.एस.राव यांनी २४ जुलै २०१२ रोजीचे पत्राने त्यांना काम करतेवेळी आलेल्या अडचणींचा उहापोह करुन पुढे काम करणेसाठी ११ महिन्यांची मूदतवाढ मिळणेस विनंती केली.

तथापी ठेकेदार हे काम सुरु करणेस असमर्थ ठरल्याने ठेकेदार यांना इकडील जा.नं.२०१० दि.०४/०८/२०१२ अन्वये त्यांनी केलेल्या कामाची संयुक्त मोजमापे घेणेकामी प्रतिनिधी पाठविणेबाबत कळविणेत आले. परंतू ठेकेदार यांनी कुठलाही प्रतिसाद न दिल्याने इकडील विभागामार्फत त्यांनी केलेल्या कामाची मोजमापे घेण्यात आली. त्यानुसार त्यांनी केलेल्या कामाची किमंत रु.६,६९,१४३/- मात्र इतकी येत आहे.

ठेकेदार यांनी दि.०१/०९/२०१२ रोजीचे e-mail व्दारे सदरहू कामाचे त्यांचे Termination रद्द करुन येथून पुढे ११ महिने मूदतवाढ (ऑगस्ट २०१३ अखेर) देणेस तसेच निविदा शर्तीनुसार Price

Variation clause प्रमाणे दरवाढ मिळणेस विनंती केली होती. याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१२ रोजीचे सभेत नि.क्र.८०० (२) अन्वये चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आला.

"...सदर बांधकामासाठी आता नव्याने निविदा मागविल्यास प्रकल्पाचे खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच त्यासाठी किमान दोन महिन्यांचा कालावधी लागेल. या बाबी विचारात घेता, ठेकेदार यांचे Termination रद्द करुन बांधकाम पूर्ण करणेसाठी त्यांना तुर्त डिसेंबर २०१२ अखेर पर्यंत मूदतवाढ देणेत यावी व त्यासाठी ठेकेदार यांचेकडून ते पुर्वीचेच निविदा दरात तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार वाढीव मुदतीत काम करुन देणार असलेबाबत हमीपत्र घेणेत यावे. डिसेंबर २०१२ पर्यंतचे वाढीव मूदतीत त्यांच्या कामाची प्रगती पाहुन पुढील योग्य तो निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सभेपुढे सादर करावा", असे ठरले.

परंतू याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१२ रोजीचे सभेत नि.क्र.८८४ अन्वये उपरोक्त निर्णयात खालीलप्रमाणे बदल करणेत आला आहे.

"......... यावर सविस्तर चर्चा होवून, साई गार्डन व या प्रकल्पासारखे सध्या चालू अथवा प्रलंबित असलेले इतर सर्व प्रकल्प व त्यासाठीचा खर्च इ. कामांसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मंजुरी घ्यावयाची असल्याने सदरचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा व मा. खंडपीठाचे मान्यतेनंतर उपरोक्त प्रस्ताबाबत कार्यवाही करणेत यावी", असे ठरले.

**प्रस्ताव :-**

मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार मा. विधी व न्याय विभागाकडे जलसंपदा विभागाचे मौजे शिर्डी येथील जागा संस्थानकडे घेवून त्याबदल्यात संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.८७,८८ मधिल ४० आर जागा आवश्यक त्या बांधकामासहीत हस्तांतरीत करण्यास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. मा. विधी व न्याय विभागाने दि.०५ फेब्रवारी २०११ चे पत्रान्वये सदर कामाबाबतची जलसंपदा विभागाच्या मान्यतेसह आवश्यक ती अंदाजपत्रके चालू डि.एस.आर. प्रमाणे तयार करुन आवश्यक नकाशासह शासनास प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार मा. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे इकडील दि.३०/०९/२०११ अन्वये प्लॅन व एस्टीमेट सादर केलेले असून अद्याप त्यांचेकडून सदर प्लॅन व एस्टीमेटला मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे विधी व न्याय विभागाकडे वरील प्रस्तावाबाबत पुर्तता करता आलेली नाही. तसेच सदरहु प्रकल्पाचे रेखांकन व बांधकाम नकाशे मंजुरीसाठी मा.उपविभागिय अधिकारी, श्रीरामपुर यांचेकडे नकाशे सादर करण्यात आले होते. त्याबाबत मा.उपविभागिय अधिकारी ,श्रीरामपुर यांनी दि. २५/१०/२०१२ चे पत्राव्दारे प्रकरणी काही पुर्तता करणेबाबत कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-**

तरी सदरहु प्रकल्पाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे असे मत आहे.

१) ठेकेदार KRR Infra Project Pvt.Ltd, Hyderabad यांना Final Notice of Termination दिलेली असल्याने त्यांचे संस्थानकडे जमा असलेले सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम रु.१०,०२,१८०/- मात्र जप्त करणे.

२) कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे सदर प्रकल्पाचे चालु डिएसआर दराने सुधारीत एस्टीमेट सादर करुन त्यास मान्यता घेणे.

३) सुधारीत एस्टीमेंटला जलसंपदा विभागाची मान्यता प्राप्त झालेनंतर ते विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी सादर करणे.

४) सदर प्रकल्पाचे रेखांकन व बांधकाम नकाशे मंजुरीसाठी मा. उपविभागिय अधिकारी, श्रीरामपुर यांनी कळविल्यानुसार आवश्यक ती पुर्तता करणे.

५) वरीलप्रमाणे जलसंपदा विभागाकडून सुधारित एस्टीमेटला मान्यता व त्यानंतर विधी व न्याय विभागाची प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेनंतर, तसेच रेखांकन व बांधकाम नकाशे मंजुरीनंतरच सदर प्रकल्पासाठी नव्याने निविदा मागविणेची कार्यवाही सुरु करणे उचित होईल असे मत आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करणेसाठी सदर प्रस्तावास मा. त्रीसदस्य समितीचे सभेत मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी सदरहु प्रस्तावावर मा.त्रीसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहु प्रकल्पाचे ठेकेदार KRR Infra Project Pvt.Ltd, Hyderabad यांची संस्थानकडे जमा असलेली रु.१०,०२,१८०/- मात्र सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम जप्त करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, जलसंपदा विभागासंबंधीत सुधारीत एस्टीमेट विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले आहे. त्यास विधी व न्याय विभागाची मान्यता येईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना- प्रथम प्राधान्यगटातील रस्ते रुंदीकरणातील एच.टी. व एल.टी. लाईन तसेच ट्रान्सफॉर्मर शिफ्टींग करणेकामी शिर्डी नगरपंचायतीस निधी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद** : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय**: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था निधीतून शिर्डी शहरातील रस्ते विकसित करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेले आहेत :-

i) मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.२६३ दि.२४/०४/२००६ - शिर्डी नगरपंचायत हददीतील रस्त्यांची कामे संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळामार्फत विकसीत करणेबाबत..

ii) मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.१६ (ब) दि.१०/०१/२०१० - शिर्डी नगरपंचायत हददीतील प्रथम प्राधान्यगटातील अकरा रस्त्यांपैकी ०५ रस्त्यांची कामे संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळामार्फत व उवरीत ०६ रस्त्यांची कामे थेट संस्थानमार्फत विकसीत करणेबाबत..

iii) मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.४९७ दि.१७/०५/२००९- प्रथम प्राधान्यगटातील ११ रस्त्यांवरील विद्यूतवाहिन्या, त्यांचे खांब, विद्यूत रोहित्रे स्थलांतरीत करणे व त्या अनुषंगाने करावयाचे कामांसाठी रक्कम रू. ८० लक्ष मात्रचा निधी शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देणेबाबत.

**प्रस्तावना:** शिर्डी शहरातील रहदारीचे नियंत्रण व दळणवळणाचे दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या रस्त्यांपैकी प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांची कामे संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत विकसीत करणेस संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०४/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६३ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. याकामी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व शिर्डी नगरपंचायत यांचे दरम्यान त्रिपक्षीय करारनामा दि.१५/१०/२००६ रोजी करण्यात आलेला असून त्यानुसार रस्त्यांचे कामांसाठी, भूसंपादन, विद्यूतवाहिन्या, जलवाहिन्या स्थलांतरीत करणे व इतर अनुषंगिक कामासाठी खर्च संस्थानने करणेबाबत ठरले आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार सदरचे रस्ते विकसित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास विधी व न्याय विभागाची मान्यता मिळणेकामी इकडील जा. क्र. ८९१३/ २००६ दि.०७/०७/२००६ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. दिनांक १९/०९/२००८ रोजीचे शासन आदेशान्वये रुपये २८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाचे वाढीव खर्चासह एकूण रुपये ८८ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचा सुधारीत प्रस्ताव इकडील पत्र क्र.७४९३/२०१० दि. २६/०५/२०१० अन्वये सादर करणेत आलेला असून मान्यता मिळणेकामी इकडील दि.०३/०८/२०१०, दि.१८/०४/२०११, दि.१०/०९/२०११, दि.०३/०१/२०१२, दि.०२/०६/२०१२ रोजीचे पत्रान्वये पाठपुरावा करण्यात आला आहे. याकामी मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई याचे मागणीवरून इकडील पत्र क्र. ५५९५/२०१३ दि.०९/०३/२०१३ अन्वये या प्रस्तावाबाबत खुलासेवजा सविस्तर तपशिल सादर करण्यात आला आहे. अद्याप उर्वरीत रु.६० कोटी इतक्या वाढीव खर्चास मान्यता प्राप्त झालेली नाही. दरम्यान मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र. ६४० दि. ०७/०८/२०१० अन्वये ठरल्यानुसार काम सुरु ठेवण्यात आले असून आजअखेर सदरहु प्रकल्पावर रु. ५६,९१,५०,८९९/- खर्च करणेत आला आहे.

सदर प्रकल्पाचे काम सुरु करणेस महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळाकडुन उशीर होत असल्याने या प्रकल्पातील ११ रस्त्यांपैकी फक्त ०५ रस्ते विकसीत करणेचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचेमार्फतचे (२.५६ कि. मी. लांबीचे) पूर्ण करून घेण्यात आले आहे व मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.१६(ब) दि.१०/०१/२०१०अन्वये ठरल्यानुसार उर्वरीत ७.१७ कि.मी. लांबीचे ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणेत येत आहेत. सदर प्रकल्पाचे काम ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवि मुंबई यांना देणेत आलेले आहे. ठेकेदार यांना देण्यात आलेल्या सहा रस्त्यांपैकी रस्ता क्र.०३, ०६, ०७ व ०८ या चार ३.३३ कि. मी. लांबीचे रस्त्यांची कामे चालू असुन रस्ता क्र.०५ व ०९ या २.३४ कि.मी. लांबीचे वळण रस्त्यांचे कामातील खोदाई व काही भागातील मुरुम भराई व रिटेनिंग वॉलचे कामास ठेकेदार यांनी ऑक्टोबर २०१२ मध्ये सुरुवात केलेली असुन काम प्रगतीपथावर आहे. रस्ता क्र. ९ अ हा १.५० कि.मी. वळणरस्ता नगरपंचायतीने काम करणेसाठी हस्तांतरीत केलेला नाही.

सदरहू कामी ठेकेदार यांचेशी झालेले करारनाम्यानुसार सदरचे कामाची १५ महिने मुदत दि. ०५/११/२०११ रोजी संपुष्टात आली होती. ठेकेदार यांना दोन वेळेस दि. ३१ मे २०१३ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदरहु कामातील विविध भूसंपादनविषयक अडचणी तसेच रस्ता रुंदीकरण कामामध्ये येत असलेल्या लाईन, ट्रान्सफॉर्मर शिफ्टींग करणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांना इकडील जा.क्र. ८७२/२०१३ दि. २१/०५/२०१३ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव:** मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी यांचेकडील पत्र क्र.न.पं./विद्युत/का.वि.-१६/९/२०१३ दि.१५.०५.२०१३ अन्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

" .. सदर रस्ता रुंदीमध्ये एच टी व एल टी तसेच ट्रान्सफॉर्मर आहेत.सदर रस्त्याचे काम करतांना पोलचा अडथळा निर्माण होत आहे. याकामी सदर रस्त्यातील पोल शिफ्टींग करण्यासाठीचे अंदाजपत्रकास मा. कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी नाशिक यांनी खालीलप्रमाणे तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक किंमत | १.३% सुपरविजन फी |
|---|---|---|---|
| १ | शिर्डी नगरपंचायत रस्ते विकास योजने अंतर्गत रस्ते रुदीकरणअंतर्गत एच टी व एल टी तसेच ट्रान्सफॉर्मर शिफ्टींग कामाचे अंदाजपत्रक | ४५,४७,४००/- | ५८,३६०/- |

तरी सदर कामाची निविदा प्रक्रीया सुरु करून विद्युत पोल शिफ्टींगची कामे मुदतीत पूर्ण करणेकरिता मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम रू.४५,४७,४००/- नगरपंचायतीकडे जमा करावी ही विनंती "

सदर कामात शिर्डी नगरपंचायतीने खालील रस्त्यांवरील विद्युत पोल शिफ्टींगची कामे विचारात घेतली असल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | लांबी | रुंदी |
|---|---|---|---|
| १ | शिर्डी मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ३१ च्या पश्चिम कोपऱ्यापासून ते सर्व्हे नं.९ मधील नियोजीत १८.०० मीटर रस्त्यापर्यंत १८.०० मीटर रुंदीच्या रस्ता. | १५००मी. | १८ मी. |
| २ | आरक्षण क्र. ३१ ते नाला रस्ता १८.०० मीटर रुंदीचा रस्ता. | १३८० मी. | १८ मी. |
| ३ | विकास योजनेतील १८ मीटर रुंदीचा रस्ता (नगरमनमाड रस्ता ते १८ मीटर वळण रस्ता पर्यन्त पुर्व - पश्चिम रस्ता) | ८४० मी. | १८ मी. |
| ४ | व्दारकामाई ते ताजीमखान बाबा चौकापर्यन्त रस्त्यास भुमिगत केबल टाकुन पोल शिफ्टींग करणे | ९० मी. | ०९ मी. |

याबाबत दिनांक २८.०५.२०१३ रोजीचे संस्थानचे विद्यूत विभागाने पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

".. शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी चे मा.कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त झालेले लाईन ट्रान्सफॉर्मर शिफ्टींगचे रु.४५,४७,४००/- मात्रचे खर्चास मान्यता घेतली आहे.

शिर्डी शहरातील रस्ते विकास प्रकल्पाच्या कामामधील अर्थिक बाबींची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत केली जात असल्याने रस्ता रुंदीकरण कामामध्ये येत असलेल्या लाईन ट्रान्सफॉर्मर शिफ्टींग कामाचे निधीबाबतची योग्य ती कार्यवाही आपले विभागाकडून करण्यात यावी "

**विभागाचा अभिप्राय / मत :** प्रथम प्राधान्यगटातील ११ रस्त्यांचे कामाबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे दरम्यान विद्यूतवाहिन्या,त्यांचे खांब, विद्यूत रोहित्रे स्थलांतरीत करणे व त्या अनुषंगाने करावयाचे कामांसाठी निधी शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देणेबाबत करार झालेला आहे. मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.४९७ दि.१७/०५/२००९ अन्वये रु.८० लक्ष निधी शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देणेबाबत निर्णय झालेला आहे. ११ रस्त्यांचे एकूण रुपये ८८ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चाचा सुधारीत प्रस्ताव इकडील पत्र क्र.७४९३/२०१० दि. २६/०५/२०१० अन्वये शासनाचे विधी व न्याय विभागास सादर करणेत आलेला आहे. यामध्ये विद्यूतवाहिन्या,त्यांचे खांब, विद्यूत रोहित्रे स्थलांतरीत करणे व त्या अनुषंगाने करावयाचे कामांसाठीचा खर्चाचा समावेश आहे. याकामी मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई याचे मागणीवरून इकडील पत्र क्र. ५५९५/२०१३ दि.०९/०३/२०१३ अन्वये या प्रस्तावाबाबत सविस्तर तपशिल सादर करण्यात आला असून मान्यता मिळणेकामी पाठपुरावा करण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे रु. ८० लक्ष रकमेपैकी दि.०८/११/२०१० रोजी रु. १०,००,०००/- व दि. २८/१२/२०१० रोजी रु.२६,२९,००८/- अशी एकूण रु. ३६,२९,००८/- रक्कम शिर्डी नगरपंचायतीला अदा करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम शिर्डी नगरपंचायतीकडे जमा करणे आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे राहीलेल्या रस्त्यांचे रुंदीतील विद्यूतवाहिन्या, त्यांचे खांब, विद्यूत रोहित्रे स्थलांतरीत करणे व त्या अनुषंगाने करावयाचे कामांसाठी उर्वरीत रक्कम रू.४३,७०,९९२/- नगरपंचायतीकडे जमा करणेकामी प्रस्तावावर निर्णय होणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस द्यावयाच्या निधीबाबतचा सुधारित प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविलेला असून त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून मान्यता मिळाल्यानंतर, प्रथम प्राधान्यगटातील रस्ते रुंदीकरणातील एच.टी. व एल.टी. लाईन तसेच ट्रान्सफॉर्मर शिफ्टींग करणेकामी शिर्डी नगरपंचायतीस प्रस्तावित केलेला निधी देण्यात यावा, असे ठरले.**(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५ श्री साईबाबा रुग्णालयांचे जावक विभागाकरिता रिमोटंली ऑपरेटींग फ्रँकींग मशिन खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** रुग्णालयांकडील टपाल, वैद्यकिय आर्थिक अनुदान चेक/डीडी, औषध पुरवठादाराचे आदेश, बीले वगैरे टपाल प्रशासन शाखेकडील टपाल विभागामार्फत पाठविणे ऐवजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दोन्ही रूग्णालयासाठी स्वतंत्र जावक विभाग तयार करण्यात आलेला असून सदर कामकाजासाठी इलेट्रॉनिक फ्रकिंग मशीन मॉडेल-निओपोस्ट ५४०० पुरविण्यात आलेले आहे. सदर फ्रकिंग मशीनची पोस्टाकडील परवाना मुदत दि ३१.१२.२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

श्रीरामपूर पोस्ट ऑफिस कडून दि. २१.०१.२०१३ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे की, सदर फ्रकिंग मशीनची परवाना मुदत दि.३१.१२.२०१४ अखेर आहे. तरी कोणतेही जूने इलेक्ट्रॉनिक फ्रकिंग मशीन दि. ३०.०६.२०१३ नंतर सुरु राहणार नाहीत अशा मशिनव्दारे फ्रकिंग केलेले पत्र दि. ३०.०६.२०१३ नंतर स्विकारले जाणार नाहीत त्याकरिता तुम्हाला विनंती करणेत येते की रिमोटंली मॅनेज होणारे फ्रकिंग मशीन विकत घ्यावे असे कळविले आहे.

संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलचे कार्यालयातून दैनंदिन पत्रव्यवहार (अनुदान विभागातील चेक/ डी.डी, औषध पुरवठादाराचे आदेश, वित्त विभागतील चेक/ डी.डी) व इतर कार्यालयीन टपाल फ्रॅक करुन पाठविले जाते. याकामी सध्या हॉस्पिटलचे जावक विभागात कार्यरत असलेले इलेट्रॉनिक फ्रकिंग मशीन निओपोस्ट या कंपनीचे आहे. उपरोक्त पोस्ट कार्यालयाकडील पत्रानुसार सध्या हॉस्पिटलचे जावक विभागात वापरत असलेले फ्रॅकिंग मशिन दि. ३०.०६.२०१३ अखेर वापरता येणार आहे. पर्यायाने रुग्णालयांचे जावक विभागाकरिता एक नवीन रिमोटंली मॅनेज फ्रॅकिंग मशिन घेणे गरजेचे आहे.

मुंबई कार्यालयात सध्या IJ-४० मॉडेलचे फ्रँकींग मशीन वापरात आहे. IJ-४० मॉडेलचे फ्रँकींग मशीन कोरस इंडिया लि. या कंपनीचे असून सदर कंपनीचे अधिकृत विक्रेते श्री पुराणीक हे दि. १९.०२.२०१३ रोजी हॉस्पिटलचे कार्यालयात प्रत्यक्ष येऊन त्यांनी कोरस या कंपनीचे IJ-४० मॉडलचे फ्रॅकिंग मशीन उपलब्ध होऊ शकेल अशी माहिती दिली व त्यांनी सदर फ्रॅकिंग मशीनची अंदाजे किमंत रू.१,१९,५७९/- (सर्व करांसहित) सांगितली आहे सध्या कोरस इंडिया या कंपनीच्या सर्व मशीन्स (coin sorting, loose नोट मशीन, बंडल मशीन इ.) संस्थानमध्ये दक्षिणा मोजणीकामी वापरल्या जातात. प्रत्येक दक्षिणा मोजणीच्यावेळी कोरस कंपनीचे प्रतिनिधी मशिनची देखभाल करण्यासाठी उपस्थित असतात. कोरस इंडिया या कंपनीचे संस्थानकडे सेवा देत असल्याने त्यांच्याकडून उपरोक्त फ्रॅकिंग मशीन घेतल्यास देखभाल दुरुस्तीसाठी उपयोग होईल. IJ-४० हे कोरस कंपनीकडे असलेले फ्रकिंग मशीन दोन्ही हॉस्पिटलचे दैनंदिन होणारे पोस्टींग व इतर कार्यालयीन ( चेक/ डी.डी., अनुदान चेक / फॉर्म रजिस्टर ए.डी इ.) टपालाचे कामासाठी घेण्यात यावे, असे मत आहे.

तरी पोस्ट कार्यालय श्रीरामपूर, यांचेकडील पत्रानुसार रुग्णालयांचे जावक विभागाकरिता कोरस कंपनीचे IJ-४० या मॉडलचे फ्रॅकिंग मशीन देणगी स्वरुपात मिळाल्यास अथवा कोरस इंडिया लि. पुणे या कंपनीचे पूणे येथील अधिकृत वितरक श्री पुराणिक, पुणे यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,१९,५७९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करावा लागेल त्यास मान्यता असावी असा प्रस्ताव दि.२७/०४/२०१३ चे सभेत सादर करण्यात आला होता.

दि. २७/०४/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत उपरोक्त फ्रकिंग मशीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,१९,५७९ /- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ७५६ दि.१४/०५/२०१३ अन्वये एकुण ०४ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन दि. २०/०५/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. सदर कोटेशन मागणी पत्रास अनुसरुन आणखी ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

१) M/s. Kores (India) Ltd., Pune (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२८/०५/२०१३)
२) M/s. Yash Enterprises, Nashik (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. २८/०५/२०१३)
३) M/s. Sulabh Enterprises, Pune (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. २८/०५/२०१३)

तरी वरीलप्रमाणे ०३ कोटेशन हे आजचे सभेपुढे समक्ष उघडुन प्राप्त कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले असून उपरोक्त प्रस्तावावर चर्चा / वाटाघाटी होऊन निर्णय होण्यास मान्यता असावी

**निर्णय क्र.४५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयांचे जावक विभागाकरिता रिमोटंली ऑपरेटींग फ्रँकींग मशिन खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडण्याचा अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आला. मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष प्राप्त कोटेशन उघडणेत येऊन निम्नतम दरधारकास सदरचा कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६ डॉ.ए.एम.केसरकर, डॉ.आर.बी.कुलकर्णी व डॉ.ईरा भारव्दाज यांचा दि.०५.०४.२०१३ व दि.०६.०४.२०१३ रोजीचा एन.पी. फरकाची रक्कम मिळणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय म.वै.अ-१००९/२३३/प्र.क्र.४५५/०९/सेवा ३ मंत्रालय मुं.३२ दि.०१ एप्रिल, २०१०. व मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५८ अन्वये श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूकीस असलेले वेतनश्रेणीवरील सर्व वैद्यकीय अधिकारी /आर.एम.ओ. यांना परंतु, खाजगी प्रॅक्टीस करीत नसलेल्या वैद्यकिय अधिकारी/ आर.एम.ओ. यांना जा. नं.एससएसएस/एसएसबीएच/एचआर/२१९/२०१० दि.०३/११/२०१० अन्वयें दि. ०१/०४/२०१० पासून ६ व्या वेतन आयोगातील मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन यांच्या २५ टक्के प्रमाणे परंतु, त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसाय रोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा र. ८५,०००/- पेक्षा जास्त होणार नाही याप्रमाणे व्यवसाय रोध भत्ता देण्यात येत होता.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय मवैअ-२०११/ प्र.क्र.६२६/११/सेवा ३ मंत्रालय मुं.३२ दि.०७ ऑगस्ट, २०१२ चे शासन निर्णयानुसार मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयास अनुसरुन जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/एचआर/१५९९/२०१३ दि.२८/०३/२०१३ अन्वये रुग्णालयांतील वेतनश्रेणी/ वेतनबॅन्ड लागू करण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकारी यांना दि. ०१/०७/२०१२ पासून मुळ वेतन अधिक ग्रेड वेतन यांच्या ३५ टक्के प्रमाणे परंतु, त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसाय रोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु.८५,०००/- पेक्षा जास्त होणार नाही याप्रमाणे व्यवसाय रोध भत्ता लागू करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन शुध्दीपत्र क्र.मवैअ-२०११/ प्र.क्र.६२६/११/ सेवा ३ मंत्रालय मुं. ४०० ०३२ दि.२०/१०/२०१२ चे आदेशानुसार खालीलप्रमाणे शुध्दीपत्र प्रसिध्द केले आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय मवैअ-२०११/ प्र.क्र.६२६/११/सेवा ३ मंत्रालय मुं.३२ दि.०७ ऑगस्ट, २०१२ मधील प्रथम परिच्छेदातील अंतीम वाक्य परंतू त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसाय रोध भत्ता यांची एकत्रीत रक्कम दरमहा ८५०००/- पेक्षा जास्त नसावीछ याऐवजी परंतू त्यांना मिळणारे मुळ वेतन (मुळ वेतन म्हणजे संबंधीत पदाचे विहित वेतनबँड मध्ये आहरीत करीत असलेले वेतन+अनुज्ञेय ग्रेड पे असे एकूण वेतन) अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु. ८५०००/- पेक्षा जास्त नसावी, असे शासन शुध्दीपत्र प्रसिध्द केले आहे.

डॉ. अे. एम. केसरकर, डॉ. आर.बी. कुलकर्णी, डॉ. ईरा भारव्दाज यांनी अर्ज सादर करुन त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. चआपण ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता लागू करतांना असणाऱ्या आदेशात एकत्रित वेतन रु. ८५,०००/- पेक्षा जास्त नसावेत याचा उल्लेख केलेला आहे. परंतु, शासन शुध्दीपत्र क्र.मवैअ-२०११/प्र.क्र. ६२६/११ /सेवा ३ मंत्रालय मुं. ४०० ०३२ दि.२०/१०/२०१२ नुसार मुळ वेतन (मुळ वेतन म्हणजे संबंधीत पदाचे विहित वेतनबॅन्डमध्ये आहरीत करीत असलेले वेतन+अनुज्ञेय ग्रेड पे असे एकूण वेतन)+ व्यवसायरोध भत्ता याची एकत्रीत रक्कम दरमहा रु. ८५,०००/- पेक्षा जास्त नसावी असा उल्लेख आहे. एकत्रीत वेतनात मुळ वेतन, ग्रेड वेतन व व्यवसायरोध भत्ता व इतर भत्ते त्यात मिळवून एकत्रीत वेतन रु. ८५,०००/- पेक्षा जास्त होऊ शकते.

उपरोक्त संदर्भानुसार (शासन शुध्दीपत्र) वेतन ८५,०००/- पेक्षा जास्त होणाऱ्या डॉक्टरांना याचा लाभ मिळावा अशी विनंती केली आहे.

तरी, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन शुध्दीपत्र क्र.मवैअ-२०११/ प्र.क्र.६२६/ ११/ सेवा ३ मंत्रालय मुं. ४०० ०३२ दि.२०/१०/२०१२ चे आदेशान्वये प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रानुसार परंतू त्यांना मिळणारे मुळ वेतन (मुळ वेतन म्हणजे संबंधीत पदाचे विहित वेतनबँड मध्ये आहरीत करीत असलेले वेतन+अनुज्ञेय ग्रेड पे असे एकूण वेतन) अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु. ८५०००/- पेक्षा जास्त नसावी या शुध्दीपत्रानुसार कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२७** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी वैद्यकीय अधिकारी व इतर पदांवर कर्मचारी भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ११८ मा. विश्वस्तांनी सभेत मांडलेल्या सुचनेतील अ.नं.०३) संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधानुसार रिक्त असलेली पदे पदोन्नतीव्दारे/ एकत्रित मानधनावर/ठेकेदारामार्फमत कंत्राटी पध्दतीने भरणेकामीचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो सभेसमोर सादर करावा व त्यास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन प्र. वैद्यकिय अधिक्षक, प्र. वैद्यकिय संचालक यांनी श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलमधील पदांचा आढावा घेतला असून खालील स्थायी पदे भरणे आवश्यक असलेबाबत संगितले आहे.

रुग्णालयांचे आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या, वेतनश्रेणी, भरलेली पदे, रिक्त पदे व भरावयाचे स्थायी पदे यांबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

**अे) By Nomination-**

| अ. नं. | पद , पे -बँड व ग्रेड -पे | शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | | भरलेली पदे | | आवश्यक पदे | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | ९ |
| १ | Medical Director<br>वैद्यकिय संचालक<br>PB 15600-39100 GP 7600 | **By Nomination**<br>1) Age not more than 50 years;<br>2) MBBS / MD / MS from any Government recognized University;<br>3) DHA / MHA / M Phil in Hospital Management from recognized university;<br>4) Experience minimum 10 years in similar capacity. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| २ | Resident Dy.Medical Director<br>उपवैद्यकीय संचालक<br>PB 15600-39100 GP 7600 | **By Nomination**<br>1) Age not more than 50 years;<br>2) MBBS / MD / MS from any Government recognized University;<br>3) DHA / MHA / M Phil in Hospital Management from recognized university;<br>4) Experience minimum 7 years in Hospital Administration. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| ३ | Medical Superintendent<br>वैद्यकीय अधिक्षक<br>PB 15600-39100 GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MBBS from any Government recognized University;<br>3) DHA / MHA / M Phil in Hospital Management from recognized university;<br>4) Experience minimum 5 years in similar capacity. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| ४ | Neurologists<br>मेंदू विकार उपचार तज्ञ<br>PB 15600-39100 GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) DM or DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | Neurosurgeons मेंदू शल्य विशारद PB 15600-39100 GP 6600 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) MCH / DNB from any Government recognized University 3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०० | ०१ | ०० | ०२ डॉ. मोदगी यांनी राजीनामा दिला. | ०० | **०२** |
| ६ | Medical Officer (Physician) मेडीकल ऑफिसर (फिजिशियन) PB 15600-39100 GP 6600 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) MD / DNB from any Government recognized University; 3) Experience minimum 2 years similar capacity. | ०४ | ०२ | ०३ | ०१ | ०० | ०१ | **०१** |
| ७ | Medical Officer (Orthopaedic Surgeon) मेडीकल ऑफिसर (ऑर्थोपेडीक सर्जन) PB 15600-39100 GP 6600 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) MS / DNB from any Government recognized University; 3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०३ | ०२ | ०२ | ०१ | ०० | ०१ | **०१** |
| ८ | Medical Officer (Sonologist) मेडीकल आफिसर (सोाोलॉजिस्ट) PB 15600-39100 GP 5400 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) M.B.B.S. Degree / Diploma in Radiology / Sonography from any Government recognized University ; 3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| ९ | Medical Officer (Pathology) मेडिकल ऑफिसर (पॅथॉलॉजी) PB 15600-39100 GP 5400 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) MD / DNB from any Government recognized University; 3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ डॉ. भारव्दाज यांनी राजीनामा दिला आहे. | **०१** |
| १० | Junior Anaesthesio-logists कनिष्ठ भुलतज्ञ PB 15600-39100 GP 5400 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) Degree of MD / DNB / DA from any Government recognized University ; 3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०९ | ०३ | ०२ | ०३ | ०१ | ०० | **०१** |
| ११ | Senior Intensivist वरिष्ठ अतिदक्षता तज्ञ PB 15600-39100 GP 6600 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) MD / DNB in Medicine or Anesthesia from any Government recognized University; 3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०३ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | **०२** |
| १२ | Junior Intensivist कनिष्ठ अतिदक्षता तज्ञ PB 15600-39100 GP 5400 | **By Nomination** 1) Age not more than 45 years; 2) Degree of MD (Anes / medi) / DA from any Government recognized University ; | ०६ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | **०२** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 3) Experience minimum 2 years in similar capacity. | | | | | | | |
| १३ | Senior Radiologists<br>वरिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | **०१** |
| १४ | Junior Radiologists<br>कनिष्ठ क्ष-किरण शास्त्रज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) Degree of MD / Diploma in Radiology from any Government recognized University ;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | **०१** |
| १५ | Senior Microbiologist<br>सिनियर मायक्रोबायोलॉजीस्ट<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB in Microbiology from any Government recognized University ;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| १६ | Paedatricians<br>बालरोग तज्ञ<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०३ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | **०१** |
| १७ | Medical Officer (General Surgery)<br>मेडिकल ऑफिसर (जनरल सर्जरी)<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MS / DNB from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०४ | ०२ | ०२ | ०२<br>डॉ. बिजवे यांचा राजी-नामा | ०० | ०१ | **०१** |
| १८ | Clinical Assistants<br>तपासणी सहाय्यक | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MD / MS / DNB / MCH / DM from any Government recognized University. | १० | ०० | ०१ | ०० | ०४ | ०० | **०४** |
| १९ | Casualty MedicalOfficer<br>अपघात कक्ष अधिकारी<br>PB 15600-39100<br>GP 6600 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MBBS from any Government recognized University;<br>3) Experience minimum 2 years in similar capacity. | ०६ | ०६ | ०३ | ०४ | ०३ | ०२ | **०५** |
| २० | R.M.O<br>निवासी वैद्यकीय अधिकारी<br>PB 15600-39100<br>GP 5400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) MBBS from any Government recognized University. | ४० | १६ | २८ | ११ | १० | ०५ | **१५** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | Matron<br>अधिसेविका<br>PB 9300-34800<br>GP 4400 | **By Nomination**<br>1) Age not more than 45 years;<br>2) B.Sc.Nursing recognized by the Indian Nursing Council **OR** G.N.M. registered with Maharashtra Nursing Council;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course;<br>4) Experience of 10 years as Assistant Matron. | ०१ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ | **०२** |
| २२ | Perfusionists<br>परफ्युजिनिस्ट<br>PB 9300-34800<br>GP 4400 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Sc. and Diploma / Certificate Course in related subject from any Government recognized University / Institute;<br>3) Experience minimum 5 years in similar capacity. | ०३ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०० | **०२** |
| २३ | CSSD Technician<br>मध्यवर्ती निर्जंतुकीकरण तंत्रज्ञ<br>PB 5200-20200<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Higher Secondary Certificate Examination passed and Diploma **OR** Certificate Course in CSSD from any Government recognized University / Institute;<br>3) Similar experience minimum 3 years. | १० स्थायी ४ मानधन ६ | ०० | ०० | ०० | ०२ | ०० | **०२** |
| २४ | Jr.Stress / ECHO Technician<br>कनिष्ठ स्ट्रेस / एको तंत्रज्ञ<br>PB 9300-34800<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Higher Secondary Certificate Examination passed and Diploma **OR** Certificate Course in relevent Subject from any recognized University / Institute;<br>3) Similar experience minimum 3 years. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| २५ | Histopath Technicians<br>उतीविक्रुती तंत्रज्ञ<br>PB 9300-34800<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Sc.and DMLT / Diploma in relevent Subject from any Government recognized University / Institute;<br>3) Similar experience minimum 3 years. | ०२ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | **०१** |
| २६ | Audiologist<br>ऑडिओलॉजिस्ट<br>PB 9300-34800<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Degree / Diploma in Audiology from any Government recognized University / Institute;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course; 4) Experience minimum 5 years in similar capacity. | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०१ श्री बेडके सतत गैरहजर असल्याने | **०१** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | X-ray Technician<br>एक्स-रे टेक्निशियन<br>PB 9300-34800<br>GP 4200 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Sc. + Diploma / Certificate Course in X-Ray from Government recognized Institute;<br>4) MS-CIT or Government prescribed equivalant computer operating course; 5) Experience minimum 5 years in similar capacity. | ०१ | ०४ | ०० | ०३ | ०० | ०१ | **०१** |
| २८ | Purchase Manager<br>खरेदी व्यवस्थापक<br>PB 9300-34800<br>GP 4400 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) B.Pharm and MBA (Materials & Logistics) / Diploma in Materials Management from any recognized University;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalant computer operating course.<br>4) Similar experience of minimum 5 years. | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | **०१** |
| २९ | Store Keeper<br>भांडारपाल<br>PB 5200-20200<br>GP 2800 | **By Nomination**<br>1) Age not more than 33 years;<br>2) Graduate from any recognized University with 2nd Class **OR** Diploma in Material Management;<br>3) MS-CIT **OR** Government prescribed equivalant computer operating course;<br>4) Government Commercial certificate of Typing English 40 w.p.m.and Marathi 30 w.p.m. speed;<br>5) Experience minimum 3 years in Store Keeping. | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |
| | | | | | | | | **एकूण (अ)** | **५६** |

**ब) By Promotion-**

| **अ. नं.** | **पद, पे -बँड व ग्रेड -पे** | **शैक्षणिक पात्रता** | **मंजुर पदे** | | **भरलेली पदे** | | **आवश्यक पदे** | | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | साईबाबा | साईनाथ | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | ९ |
| ३० | Clerk - Typist<br>लिपीक - टंकलेखक<br>PB 5200-20200<br>GP 1900 | **By Promotion**<br>1) Age not more than 33 years ;<br>2) Graduate from any recognized University ;<br>3) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course;<br>4) Government Commercial certificate of Typing - English 40 w.p.m. and Marathi 30 w.p.m. speed. | २७<br>स्थायी २०<br>आ. सोर्स ०७ | २७<br>स्थायी २० आ. सोर्स ०७ | - | ०९ | - | ११ | **११** |
| ३१ | Sr. Clerk (Medical Aid Section)<br>वरिष्ठ लिपीक<br>PB 5200-20200<br>GP 2400 | **By Promotion**<br>1) Graduate from any recognized University.<br>2) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course.<br>3) Government Commercial certificate of Typing with English 40 w.p.m.and Marathi 30 w.p.m. speed<br>4) Experience of 3 years as Junior Clerk | - | ०१ | - | ०० | ०० | ०१ | **०१** |
| ३२ | Medical Record Keeper<br>मेडीकल रेकॉर्ड किपर | **By Promotion**<br>1) Graduate from any recognized University; | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | **०१** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | PB 5200-20200 GP 1900 | 2) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course;<br>3) Government Commercial certificate of Typing with English 40 w.p.m.and Marathi 30 w.p.m. speed;<br>4) Similar Experience of minimum 3 years. | | | | | | | |
| | | | | | | | | एकूण (ब) | १३ |
| | | | | | | | **एकूण अ + ब** | **५६ +१३** | **६९** |

उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमूद केलेप्रमाणे अ.नं. १ ते २९ वरील एकूण ५६ वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची पदे वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन भरावे लागतील. तसेच परिच्छेद ब मधील अ.नं. ३० ते ३२ वरील एकूण १३ कर्मचारी हे आस्थापना विभागामार्फत आश्यकतेनुसार बदलीने घेता येतील.

तरी, उपरोक्त परिच्छेद अ मधील वैद्यकिय अधिकारी/ कर्मचारी पदे भरणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांमध्ये वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी ही पदे भरण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येऊन पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८** **श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अंदाजे ५२ कंपन्यांचे अंदाजे रु. १०६६५२७०६.१०/- इतक्या रकमेचे अंदाजे ३३५ मेडीकल इक्विपमेंटस खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी ६२ मशिन्सचे २६ संबंधीत कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन सध्या व्यवस्थित काम देत आहेत. सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च २०१३ अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षीक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते ३४ अन्वये एकुण २५ कंपन्यांच्या ९५ नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. सदरकामी दरवर्षीप्रमाणे तसेच मा. व्य. समितीच्या दि. १२/०६/२०१२ चे सभेतील निर्णय क्र.४१५ प्रमाणे कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा/ वाटाघाटी करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील वरीलप्रमाणे एकुण ९५ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या अंदाजे एकुण रू. १७,८८,०६४/- इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.४६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील एकुण ९५ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत वैद्यकिय संचालक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय अधिक्षक यांनी कंपनी प्रतिनीधींशी समक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रू. १७,८८,०६४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२९** **श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Plastic Chair खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात बाह्य रुग्ण विभागात डॉक्टरांचे कॅबीनमध्ये रुग्ण / नातेवाईकांना बसणेकामी तसेच दोन्ही रुग्णालयात वेळोवेळी होणाऱ्या विविध शिबीर, उद्घाटन, विविध अधिकाऱ्यांच्या सभा इत्यादींसाठी वरील Plastic Chair ची आवश्यकता आहे. सध्या दोन्ही रुग्णालयात अशा खुर्च्यांची संख्या कमी पडत आहे. त्यामुळे १०० नग Plastic Chair खरेदी करणे गरजेचे आहे.

याकामी सदर खुर्च्या बनवणारी नामांकित कंपनी मे. निलकमल प्रायव्हेट लिमीटेड, नाशिक यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन कोटेशन मागवण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दि.११/०३/२०१३ चे ई-मेल पत्राद्वारे कोटेशन पाठविले असून त्यामध्ये त्यांनी दोन प्रकारचे मॉडेल दिलेले आहे. त्यापैकी दोन्ही रुग्णालयात वापरवयाचे दृष्टीने त्यांनी दिलेले मॉडेल - २१३५ हे योग्य असून त्यासाठी प्रती नग रु.७६५/- या प्रमाणे एकुण १०० नगाकरिता रु.७६५०० /- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरील प्रमाणे एकुण १०० नग Plastic Chair विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रु. ७६५००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकरीता आवश्यक असलेल्या १०० नग प्लॅस्टीक खुर्च्या विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रु. ७६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३० श्री साईनाथ रुग्णालयातील डायबेटीक केअर सेंटर व राजीव गांधी योजना या विभागाकरीता ऑफिस टेबल खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात डायबेटीक केअर सेंटर हा विभाग नव्यानेच सुरु करण्यात आलेला असून सदर विभागासाठी लागणाऱ्या विविध साहित्याची त्यांनी दि.१९/०३/२०१३ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली होती. सदर साहित्यापैकी जे साहित्य औषध भांडार विभागात उपलब्ध होते ते त्यांना देण्यात आलेले आहे, त्यापैकी दोन नग ऑफीस टेबल हे औषध भांडारात शिल्लक नाहीत, त्यामुळे त्यांना ते खरेदी करुन दयावे लागणार आहे.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयातच राजीव गांधी योजना सुरु होत असुन सदर नविन विभाग कार्यान्वित करावयाचा आहे, त्यासाठी सध्या त्यांनी ५ नग ऑफीस टेबलची दि.१४/०३/२०१३ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली आहे. असे दोन्ही मिळून एकुण ७ नग ऑफीस टेबल खरेदी करावे लागणार आहे.

सदरचे टेबल खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे. जलाराम स्टिल फर्नीचर प्रा. लि., सुरत यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी ई-मेल पत्र क्र. JSFPL/ QTN/VP/ १३४२५ दि.०४/०४/२०१३ अन्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Office Table Square tubular frame, 3 drawer unit in onr side and box type locker with one shelf on<br>Table Top Size :<br>152 x 76 (cm) {60” x 30”} | 07 | 11487.00 | 80409.00 |
| | | | **Total Amt.in Rs.** | **80409.00** |

वरीलप्रमाणे ०७ नग ऑफीस टेबल खरेदीसाठी अंदाजे रु.८०,४०९/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे ऑफीस टेबल विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.८०,४०९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील डायबेटीक केअर सेंटर व राजीव गांधी योजना या विभागाकरीता आवश्यक असलेले ०७ नग ऑफिस टेबल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या एकुण रक्कम रु. ८०,४०९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता डस्टबीन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे विविध वॉर्ड व परिसरामध्ये ठेवण्यासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या डस्टबीनसाठी त्यांनी डि.पी. नं २३६६ दि.१३/०७/२०१२ अन्वये मागणी केली होती. त्यावर विहीत पध्दतीने कार्यवाही होऊन मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०२/२०१३ रोजीचे सभेत चर्चा वाटाघाटी होऊन खरेदीबाबत Sintex कंपनीचे M/s. Bhingarwala Enterprises, Ahmednagar यांचे कडून खरेदी करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यांची सदरील मागणी ही माहे जुलै महिन्यातील होती परंतु दरम्यानच्या काळात त्यांचेकडे वापरात असलेल्या डस्टबीन देखील काही वापरुन खराब झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी पुन्हा खालील प्रमाणे डस्टबीनची दि.०८/०२/२०१३ पत्रान्वये मागणी केलेली आहे.

| अ.नं. | तपशील | नग |
|---|---|---|
| १. | डस्टबीन ५० लीटर | १० |
| २. | डस्टबीन १०० लीटर | ०५ |
| ३. | व्हील डस्टबीन १२० लीटर | १० |

वरील प्रमाणे डस्टबीन खरेदीकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेत झालेल्या दि.२६/०२/२०१३ रोजीचे मंजुर दराने खरेदी करता येतील व त्यासाठी रु. ५१७२७.५० इतका खर्च येईल. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Make / Model | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| **1** | Dustbin 50 Ltr.- Top x OD- 312X312X868 mm | 10 | Sintex 60 Ltr | 1282.50 | 12825.00 |
| **2** | Dustbin 100 Ltr. OD- 500 X 500X700 mm | 05 | Sintex | 1890.50 | 9452.50 |
| **3** | Dustbin 120 Ltr- with wheel | 10 | Sintex | 2945.00 | 29450.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | | 51727.50 |

तरी M/s. Bhingarwala Enterprises, Ahmednagar यांचेकडून मागील मंजूर दराने २५ नग डस्टबीन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.५१७२७.५० चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असलेल्या २५ नग डस्टबीन M/s. Bhingarwala Enterprises, Ahmednagar यांचेकडून मागील मंजूर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.५१,७२७.५० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता रजिष्टर, बुके, फॉर्म तसेच आयपी रुग्णांकरीता फाईल छपाई करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाकरीता विविध रजिस्टर, फॉर्म व बुके तसेच कॅज्युलिटी विभाग व वॉर्डमधील सिरीयस पेशंट विविध हॉस्पीटलला (Higher Center) रेफर केले जातात त्याची नोंद ठेवणेकामी पेशंट रेफर रजिस्टर याशिवाय रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांचे केसपेपर व इतर तपासण्यांचे कागदपत्रे ठेवणेकामी फाईल्स नसल्याने, दाखल रुग्णांचे केसपेपर व इतर कागदपत्र ५ ते १० दिवस हाताळावे लागल्याने फाटतात, खराब होतात किंवा प्रसंगी काही रिपोर्ट misplace ही होतात. त्यासाठी सदर रुग्णांचे केसपेपर, विविध नोटस, तपासण्यांचे रिपोर्टस, नर्सिंग चार्टस, कंटीन्युशन शीटस् इ. कागदपत्रे व्यवस्थीत ठेवणेसाठी श्री साईबाबा हॉस्पीटल चे नमुन्याप्रमाणे आयपी रुग्णांकरिता फाईल्स छपाई करुन घेणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | रंग / कागदाचा प्रकार | साईज | पाने | नग |
|---|---|---|---|---|---|
| १ | ओटी मंथली, मेजर, मायनर ऑपरेशन टोटल रजिस्टर | लेजर पेपर | ३४x२१ | २०० पेजेस | ०५ नग |
| २ | ॲनेस्थेटिक रजिस्टर | लेजर पेपर | ३४x२१ | १०० पाने | १० नग |
| ३ | ओटी फ्युमिगेशन रजिस्टर | लेजर पेपर | ३४x२१ | १०० पाने | ०२ नग |
| ४ | ओटी इंजेक्शन फॅन्टनील कन्झमशन रजि. | लेजर पेपर | ३४x२१ | १०० पाने | ०२ नग |
| ५ | लॅप्रास्कॉपी चेकलिस्ट रजि. | लेजर पेपर | ३४x२१ | १०० पाने | ०५ नग |
| ६ | कॅज्युअल्टी रेफर रजि. | लेजर पेपर | ३४x२१ | १०० पाने | ०३ नग |
| ७ | डेथ स्लिप फॉर्म (डुप्लीकेटमध्ये) | ७० जी.एस.एम. | १८x१४ | १ ते १०० | १० पॅड |
| ८ | डामा डिसचार्ज फॉर्म | ७० जी.एस.एम. | २८x२१ | १ ते १०० | १५ पॅड |
| ९ | संमती पत्रक | ७०जी.एस.एम. | ३४x२१ | १ ते १०० | १० पॅड |
| १० | आयपी फाईल (इतर रुग्णांकरिता) | हिरवा | ३६x२४ | - | १८००० नग |
| ११ | आयपी फाईल (संस्थान कर्मचारी) | फिकट गुलाबी | ३६x२४ | - | २००० नग |

वरील प्रमाणे छपाई मध्ये सर्वच छपाई नवीन असून, रुग्णालयीन दैनंदिन वापरासाठी ती करुन घेणे आवश्यक आहे. त्याकरिता अंदाजे रु.१,१५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचा खर्च रुग्णालय छपाई व स्टेशनरी अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करता येईल.

तरी वरील प्रमाणे छपाई खरेदी विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेमार्फत विहीत पध्दतीने करुन घेणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. १,१५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३ श्री.अरविंद रामचंद्र बोकील, ठाणे यांचा वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री. अरविंद रामचंद्र बोकील, ठाणे यांनी त्यांचा मुलगा चि. सिंध्दांत अरविंद बोकील याचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणी अर्ज केलेला आहे.

चि. सिध्दांत यास Growth Harmone Deficiency हि शारिरीक कमतरता असुन के. ई. एम. हॉस्पिटल, मुबंई या रुग्णालयात उपचार घेत आहे. त्याचे उपचाराकरीता वार्षिक खर्च रू. ३,७०,०००/- इतका अपेक्षीत असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार खालील शस्त्रक्रिया / उपचारासाठी अनुदान देण्यात येत

१) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार. २) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार.
३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार. ४) कर्करोगासंबधी उपचार,शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
५) रक्तासंबधींचे आजार ६) जी.बी.एस. (Guillain Barre Syndrome)
७) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार ८) कॉक्लीअर इम्प्लांट.

वरील आजारामध्ये Growth Harmon Deficiency या आजाराचा समावेश नसल्याने चि. सिध्दांत याचेकरीता आर्थिक अनुदान देता येत नाही.

सदरचे प्रकरण मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत मा. अध्यक्ष साहेब यांनी नमुद केलेले आहे.

तरी याबाबत पुढील निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अरविंद रामचंद्र बोकील, ठाणे यांची वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणीबाबतची विनंती अमान्य करणेत आली.**

**तसेच, तज्ञ समितीची नेमणूक करणेत येऊन उपरोक्त आजाराचा समावेश संस्थान वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीमधील आजारांमध्ये करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४ संस्थानमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान देय असलेल्या रुग्णालयांपैकी काही रुग्णालये यादीतून वगळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकीय उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नांवे आर्थिक अनुदान देण्यात येते. अनुदान देणेकामी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०९/२००४ रोजी झालेल्या सभेत विषय नं.०३ निर्णय क्रं.०३ नुसार प्रचलित कार्यपध्दती, योजना व विकासकामे पुढील नियम / निर्देश होईपर्यंत सुरू ठेवणेस मान्यता दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचेकडील सासंवि-२००५/३७६/(७६)-का.सोळा, दि.०५ मे २००६ रोजीचे पत्रान्वये अनुदान नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे.

**अ)** संस्थान नियमावलीनुसार संस्थानमार्फत आर्थिक अनुदान देय असलेली माहे मे, २०१३ अखेर एकुण ८५ रुग्णालयांची नावे आहेत. परंतु यातील २१ रुग्णालयांनी गेल्या ३ वर्षात एकही अनुदान मागणी अर्ज सादर केलेला नाही किंवा एकही अर्ज संस्थानकडून मंजुर झालेला नाही. तरी असे रुग्णालये संस्थानच्या अनुदान देय यादीतुन वगळण्यात यावी, असे नम्र मत आहे. रुग्णालयाचे नांव व गांव पुढील प्रमाणे

| अ. नं. | रूग्णालयाचे नांव | शहर | गेल्या ३ वर्षातील अनुदान मागणी अर्ज / मंजुर संख्या |
|---|---|---|---|
| १ | आचार्य विनोबा भावे ग्रामीण रूग्णालय | सावंगी मेघे | ० |
| २ | भक्ती वेदांत हॉस्पिटल | ठाणे | ० |
| ३ | ब्रीच कॅन्डी हॉस्पिटल | मुंबई | ० |
| ४ | कार्डीनल ग्रिसिस मेमो. हॉस्पिटल | वसई | ० |
| ५ | कॉन्वेस्ट जैन क्लिनिक ग्रुप ऑफ हॉस्पिटल | मुबंई | ० |
| ६ | कम्बाला हिल हॉस्पिटल & हर्ट इन्सिटुट | मुंबई | ० |
| ७ | गर्व्हमेंट मेडी. कॉलेज & सुपर स्पेशा. हॉस्पिटल | नागपुर | ० |
| ८ | गर्व्हमेंट मेडीकल कॉलेज हॉस्पिटल | औरंगाबाद | ० |
| ९ | इन्सिटुट ऑफ कीडनी डिसेस & रिसर्च सेंटर | अहमदाबाद | ० |
| १० | कालबांडे हर्ट & चेस्ट सर्जरी हॉस्पिटल | औरंगाबाद | ० |
| ११ | लायन ताराचंद बापा हॉस्पिटल & रिसर्च सेंटर | मुंबई | ० |
| १२ | लोकमान्य मेडीकल फाउंडेशन हर्ट इन्सिटुट | पुणे | ० |
| १३ | महात्मा गांधी मिशन न्यु बॉम्बे हॉस्पिटल | वाशी | ० |
| १४ | मिलिटरी हॉस्पिटल | पुणे | ० |
| १५ | राष्ट्र संत तुकडोजी रिजिनल कॅन्सर हॉस्पिटल | नागपुर | ० |
| १६ | रिजिनल रेफेरेल हॉस्पिटल | नासिक | ० |
| १७ | साखर कामगार हॉस्पिटल | श्रीरामपुर | ० |
| १८ | श्री संत अच्चुत महाराज हार्ट हॉस्पि. & रिसर्च इन्सि. | अमरावती | ० |
| १९ | सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल | मुंबई | ० |
| २० | सुशांत मेडी. केअर & रिसर्च सोसा. हर्डीकर हॉस्पिटल | पुणे | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | अॅपोलो हॉस्पिटल | हैद्राबाद | २०१२-१३ या आर्थिक वर्षात अनुदान मागणी प्रकरणे नाही |

**ब)** अनुदान मागणी प्रस्तावासोबत बऱ्याच प्रमाणात मा. मंत्री महोदय, मा. खासदार, मा. आमदार यांचे **शिफारस पत्रे** संस्थानच्या नांवे जोडलेली असतात, यातील जी प्रकरणे मंजुर होतात त्यावेळी संबंधित मान्यवरांनाही माहिस्तव पत्रे द्यावी लागतात. याकामी सदरचे पत्र तयार करुन ते पोष्टाद्वारे पाठविली जातात. या सर्व कार्यवाहीत बराच कालावधी जातो.

तथापि, सदरचे काम जलदगतीने होणे, तात्काळ पत्रास उत्तरे देणेकामी मान्यवरांना देण्यात येणारी सदरची पत्रे पोष्टाने न पाठविता E-mail द्वारे पाठविता येतील, तसेच याकामी लागणारे E-mail ID संबंधिताशी दुरध्वनी किंवा पत्राद्वारे मागविता येतील.

तरी संस्थानमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान देय रुग्णालयांच्या यादीतुन सदरची २१ रूग्णालये वगळणेबाबत व मान्यवरांच्या पत्रास E-mail द्वारे पत्रव्यवहार होणेबाबत सदर विषय निर्णयास्तव मा. त्रिसदस्य समिती समोर सादर करणेस मान्यता असावी.

तरी, वरील उल्लेखित अ व ब प्रमाणे पुढील निर्णय होणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत.**

१. वरील उल्लेखित यादीतील रूग्णालयाकडून गेल्या ०३ आर्थिक वर्षात अनुदान मागणी प्रस्ताव सादर किंवा संस्थानकडून मंजुर न झालेले कारणाने सदर २१ रुग्णालये संस्थानकडून वैद्यकीय आर्थिक अनुदान देय असलेल्या रूग्णालयाच्या यादीतुन कमी करावीत.

२. जर या रुग्णालयांनी वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणीसाठी पुन्हा अर्ज केल्यास संस्थान नियमावलीनुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता करून घेऊन नव्याने अनुदान देणे सुरू करावे, असे नम्र मत आहे.

मान्यवरांचा पत्र व्यवहार हा जर E-mail द्वारे केला गेला तर पत्रव्यहार जलदगतीने होतील व इतर कामासाठी अधिकवेळ मिळेल.

**निर्णय क्र.४६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील अ अमान्य करणेत आला व ब प्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५ सन २०१२-१३ या वर्षातील मुदतबाह्य औषधे नष्ट करणेस व संगणकातून नोंदी निर्लिखीत करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दि.०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१३ या कालावधीमध्ये एकुण रु.६६,६०६.३९ ची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. परंतु सदर औषधांची खरेदी ही मागील तीन वर्षात टप्प्याटप्प्याने खरेदी केलेली होती. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

अ) मुख्य औषधे भांडारातील एकुण औषधे -

| Sr.No. | Name of Wards / Section | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | Main Store - expired medicines / surgicals | 41004.84 |
| | **Total Amt.in Rs.--** | **41004.84** |

ब) दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्डमधून जमा झालेले एकुण औषधे -

| Sr.No. | Name of Wards / Section | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| 1 | All Wards - Saibaba Hospital | 22933.37 |
| 2 | Sub-Store & Wards - Sainath Hospital | 2668.18 |
| | **Total Amt.in Rs.--** | **25601.55** |

**अ + ब = पुर्णांकित रक्कम रु.६६,६०६.३९**

उपरोक्तप्रमाणे दोन्ही रुग्णालयाचे मुख्य औषध भांडार व विविध वॉर्डमधील औषधे दि.०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१३ या कालावधीत रु.६६,६०६.३९ इतक्या रुपयांची मुदतबाह्य झालेली आहे. सदर कालावधीमध्ये जी औषधे/ सर्जिकल साहित्य मुदतबाहय होतील असा अंदाज होता किंवा होणार आहे. यासाठी संबंधित कंपन्या/ अधिकृत विक्रेते यांना तीन तर काही ठिकाणी सहा महिने अगोदर पत्रव्यवहार करुन परत घेण्याबाबत विनंती करणेत आलेली होती, त्यानुसार एकुण रु.६,६१,७६६/- इतक्या रुपयांची औषधे कंपन्याना परत करुन त्याबदली क्रेडीट नोट घेऊन उपयोगी औषधे घेतलेली आहेत. उपरोक्त औषधांची संख्या एकदम कमी प्रमाणात आहे. याकामी संबंधित कंपनी / विक्रेते यांना परत देणेकामी तगादा करण्यात आलेला होता, परंतु कंपनीच्या धोरणामुळे तसेच औषधांची संख्या खुपच कमी व Loose Strips असल्यामुळे परत घेतलेले नाही.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये रु.२०,८८,८९,९५७/- ची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुदतबाह्य औषधांची टक्केवारी ०.०००३१ इतकी आहे. सदरची यादी अंतर्गत लेखा परिक्षक (Auditors) यांचेकडून तपासून घेतलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधसाठा भांडारातील संगणकामधून कमी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३६ श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine (Buyback) करुन नविन मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव- संदर्भ प्रयोगशाळा विभाग यांचे दि.१९/०२/२०१३ रोजीचे मागणीपत्रक.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात Fully Automatic Blood Gas Analyser Machine हे रक्ताच्या वेगवेगळया तपासण्या करणेसाठी आवश्यकता असत त्यांच्याकडे असलेले Fully Automatic Blood Gas Analyser Machine हे सन २००५ साली रु.६७५०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून सदर मशिन हे वारंवार बंद पडत आहे त्यामुळे बायोमेडीकल विभागाने दि.२२/१२/२०१२ चे पत्रान्वये सदर मशिन बायबॅक करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदरचे Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदीकामी ५ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांचेकडुन इकडील पत्र क्र. ९५७२ दि.२३/०३/२०१३ अन्वये अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai & Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी दर कळविलेले आहे. M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai यांचे दरानुसार सदर Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदीकामी रु.६०२७००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा ०१ नग Fully Automatic Blood Gas Analyser Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.६०२७००/- चे खर्चास तसेच जुने मशिन बायबॅक करता येईल. सदर मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१२ अखेर रु.१०५११९/- इतकी आहे.

**मागणी-** सध्या असलेले मशिन व्यवस्थित काम देत नसल्यामुळे त्यांनी ०१ नगाची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीरतसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.त्यासाठी संस्थानतर्फे ०२ रुग्णालय चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता मशिन खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

२) सदर मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१२ अखेर रु.१०५११९/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५००००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम नं. १७(४) अन्वये खरेदीपुर्वी शासनाची पुर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

३) सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन शासनास प्रस्ताव सादर करता येईल.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत-** प्रयोगशाळा विभागाती दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये म्हणून वरील मागणी केल्याप्रमाणे ०१ नग विहीत पध्दतीने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३७ मे.एल.ॲण्ड टी. कंपनीचे विविध मल्टीपॅरा मॉनिटर्स करीता SPO२ Probe खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या जी.आय.सी.यु.,आय.सी.यु.,सी.आर.यू.,ओ.टी विभागाकरीता तसेच श्री साईनाथ रुग्णालयाच्या आय.सी.यु. आणि ओ.टी इत्यादी विभागाकरीता मे.एल. ॲन्ड टी.लि, पुणे (सध्याची मे.स्कॅनरे हेल्थकेअर प्रा.लि.मैसूर) यांचेकडुन विविध प्रकारचे एकुण ५८ नग मॉनीटर्स व सेंट्रल मॉनीटरींग सिस्टीम ४ नग विविध पुरवठा आदेशान्वये एकुण रु.१,३९,३१,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहेत. सदरचे सर्व मॉनीटर्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदरच्या कालावधीत दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे. परंतु मॉनीटर्सला जोडण्यात आलेल्या कझ्युमेबल ॲक्सेसरीज मात्र संस्थानला वेगळया खरेदी कराव्या लागतील.

सध्या विविध विभागातील काही मॉनीटर्सचे $SPO_2$ Probe सततच्या वापरामुळे खराब झाल्याचे सदर विभागांनी कळविले आहे. अशा प्रकारच्या विविध मशिनरीजचे कन्झ्युमेबल अक्सेसरीजचे वार्षिक खरेदी मेडीकल स्टोअर विभागामार्फत करणेबाबत मान्यता घेणेस्तव स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत येत आहे. सदर निवीदा ई- टेंडर पध्दतीने करण्यात येणार आहे. परंतु सदर कार्यवाही पुर्ण होणेस अंदाजे पाच ते सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सध्या उपरोक्त $SPO_2$ Probe चा साठा संपलेला असल्यामुळे तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यासाठी मे. स्कॅनरे हेल्थकेअर, मैसुर (पुर्वीची मे. एल. ॲन्ड टी.) यांचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे. एक्सेल कार्पोरेशन, नाशिक यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी पत्र क्र. EXC/SH/०२१३/१९, दि. ०५/०२/२०१३ अन्वये $SPO_2$ Probe प्रति नग ६,७००/- याप्रमाणे दर कळविले असून त्याप्रमाणे एकूण ५० नगांकरीता सर्व करांसहीत एकुण रू. ३,३५०००/- (अक्षरी रू. तीन लाख पस्तीस हजार मात्र) इतका खर्च येणार आहे. सदर रक्कम कंपनीस उपरोक्त $SPO_2$ Probe श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा करावयाची आहे. सदर प्रोब करीता कंपनी सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे.

यापूर्वी अशाप्रकारचे इतर समतुल्य प्रोब वापरण्यात आले असून ते सहा महिन्यांपेक्षा कमी काळ काम देतात. तसेच किंमतीतही समतुल्य असून जास्त फरक नाही. परंतू मॉनीटर्सच्या मूळ पुरवठाधारकाकडून खरेदी केलेले प्रोब कमीत कमी एक वर्ष वापरता येतात. सदर मल्टीपॅरा मॉनीटर्स करीता मे.एल. ॲन्ड टी.लि, यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे. एक्सेल कार्पोरेशन नाशिक हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर मल्टीपॅरा मॉनीटर्सचे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात.

सदर प्रोब सध्या खरेदी केल्यास वार्षीक कन्झ्युमेबल अक्सेसरीजचे टेंडर मधुन खरेदी करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच सदर पुरवठाधारकांबरोबर मा. त्रिसदस्यीय समिती सभेपुढे प्रत्यक्ष वाटाघाटी करून सदर दर आणखी कमी करता येतील.

तरी मे. एक्सेल कार्पोरेशन, नाशिक यांचेकडुन विविध मल्टीपॅरा मॉनीटर्सकरीता $SPO_2$ Probe- ५० नग मा. त्रिसदस्यीय समिती सभेपुढे प्रत्यक्ष वाटाघाटी करून खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. ३,३५,०००/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७० मे.एल.ॲण्ड टी. कंपनीचे विविध मल्टीपॅरा मॉनिटर्स करीता SPO२ Probe खरेदीबाबत चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी मे.एक्सेल कार्पोरेशन, नाशिक या पुरवठाधारक कंपनीचे प्रतिनीधी उपस्थित होते. त्यांनी चर्चेअंती प्रति नग रु.६,३००/- (सहा महिने वॉरंटीसह) मात्र दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एल.ॲण्ड टी. कंपनीचे विविध मल्टीपॅरा मॉनिटर्स करीता आवश्यक असलेले ५० नग SPO२ Probe प्रति नग रु.६,३००/- मात्र (सहा महिने वॉरंटीसह) या दराने मे.एक्सेल कार्पोरेशन, नाशिक यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३८ Elisa Washer मशिनचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पॅथोलॉजी लॅब विभागाकरीता पुरवठा आदेश पत्र क्र. १७५६ दि.२९/०१/२००८ आदेशान्वये Elisa Washer (Model- ERBA Smart Wash III) मशिन मे. ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन एकुण रु.४,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन दि. २६/०३/२००८ रोजी कार्यान्वीत करण्यात आले असून कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. २५/०३/२००९ रोजी संपला आहे. सदर मशिनचे नियमीत दुरुस्ती व देखभाल करणेसाठी दि. ०१/०४/२०१२ ते दि. ३१/०३/२०१३ या कालावधीकरीता एकुण रू १८,०००/- इतक्या रकमेत वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले होते. सदर AMC कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्टस् व कंझ्युमेबल किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

उपरोक्त मशिन व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले होते. सदर मशिन तातडीने दुरूस्त करणे आवश्यक असल्यामुळे कंपनी इंजिनीअरनी मशिनची तपासणी करून त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट क्र. ४४०७९८, दि. ०८/११/१२ अन्वये Manifold हा पार्ट खराब झाल्यामुळे बदलला आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र.२२३११९१९,दि. २७/१०/२०१२ अन्वये (रुग्णालये प्राप्त दि.०२/११/१२) सर्वकरांसहीत एकूण रू. ४०,२७५/- इतक्या रकमेचे बील पाठविले आहे. त्यानंतर मशिन पुन्हा नादुरूस्त झाले होते. कंपनी इंजिनीअरने दि. २५/०१/१३ रोजी भेट देउन दुरूस्त केले आहे. त्यानंतर पुन्हा एकदा मशिन तीन महिने निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते. सध्या आजपावेतो चार महिन्यांपासून मशिन व्यवस्थित काम देत आहे. त्यामुळे वरील दुरूस्तीचे एकूण रू. ४०,२७५/- इतक्या रकमेचे बील कंपनीस अदा करण्यास हरकत नाही असे मत आहे. सदर Elisa Washer चे स्पेअर पार्ट करीता मे. ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर मशिनचे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात.

तरी मे. ट्रान्सासिया बायोमेडीकल्स लि.मुंबई यांचेकडुन Elisa Washer मशिन दुरुस्त करुन घेणेस व त्यासाठी आलेल्या एकुण रु. ४०,२७५/- चे खर्चास व सदर दुरूस्तीचे कंपनीचे बील अदा करण्यास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९ लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये लॅप्रोस्कोपी सर्जरी करणेकरीता मा.व्य.समिती दि.०५/११/२००५ च्या सभेतील निर्णयानुसार लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट सेट मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं.मुंबई यांचेकडुन एकुण रू.२०,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आला आहे सदरचा लॅप्रोस्कोप जनरल ऑपरेशन थिएटर विभागात दैनंदीन लॅप्रोस्कोपीक शस्त्रक्रीयांकरीता नियमीत वापरात असून त्यांची दुरुस्ती व देखभाल श्री साईबाबा हॉस्पिटलचे बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते.

सदर लॅप्रोस्कापी सेटमधील एक Telecam Camera शस्त्रक्रीया करताना खराब झाल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र क्र. २५४, दि. ०१/०४/२०१३ अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर Camera ची तपासणी केली असता दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअर्स बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागात उपलब्ध नसल्यामुळे दुरुस्तीकरीता इकडील पत्र क्र. ९९७, दि. ०९/०४/२०१३ अन्वये इन्स्ट्रुमेंट सेटचे मुळ उत्पादक मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांचेकडे पाठविणेत आले आहे. कंपनीने सदर Telecam Camera ची तपासणी करुन दुरुस्तीच्या खर्चाचे त्यांचे पत्र क्र. KSMH १५०४१३०१६९०, दि. १७/०४/२०१३ अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ६९,२२८/- (अक्षरी रु. एकोणसत्तर हजार दोनशे अठ्ठावीस मात्र) इतका खर्च कळविला असुन सदर रक्कमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. सदर Telecam Camera दुरूस्ती करीता कंपनी सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे. सदर लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट सेटचे स्पेअर पार्ट करीता मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, हे एकमेव पुरवठाधारक आहेत.

तरी मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांचेकडुन Telecam Camera दुरुस्त करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ६९,२२८/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली हे लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट सेटच्या स्पेअरपार्टचे एकमेव पुरवठाधारक असल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील टेलेकॅम कॅमेरा मे.कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडून दुरुस्त करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रु.६९,२२८/- मात्रचे खर्चास व सदरहू रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४० मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीरास व खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री शिवाजी अमृतराव गोंदकर, विश्वस्त, लहानूबाई अमृतराव गोंदकर चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी यांनी दि.२५/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये त्यांच्या स्वर्गीय मातोश्री लहानुबाई अमृतराव गोंदकर, यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त श्री साईनाथ रुग्णालयात अंदाजे १०० गरजू रुग्णांसाठी मोतीबिंदु शिबीर आयोजित करणेस संधी द्यावी, तसेच यासाठी येणारा सर्व (ऑपरेशन चार्ज, औषधे, जेवण व चहा इ.) खर्च ते स्वतः करणार असल्याचे कळविलेले होते.

सदरचे मोतीबिंदु शिबीर हे श्री शिवाजी अमृतराव गोंदकर यांच्या विनंती वरुन संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात दिनांक ०१ एप्रिल २०१३ ते दिनांक ४ एप्रिल २०१३ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरात करण्यात आलेल्या गरजू रुग्णांवरील मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रियेकरिता कराव्या लागणा-या विविध प्राथमिक तपासण्या व ऑपरेशन इत्यादीवर प्रत्येक रुग्णांवर खालील प्रमाणे खर्च विचारात घेणेत आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. Lab Investgation | Rs. | 202.00 |
| 2. ECG | Rs. | 30.00 |
| 3. Cataract knives (2) | Rs. | 120.00 |
| 4. Goggal Cost | Rs. | 20.00 |
| 5 Operation Cost | Rs. | 550.00 |
| 6. Hospital Accommodation Charges etc. | Rs. | 06.00 |
| 7. Other (Tea, Lunch,Dinner) | Rs. | 22.00 |
| **Per Pts.Expenditure -** | **Rs.** | **950.00** |

उपरोक्त प्रमाणे प्रति रुग्ण अंदाजे रु.१,०००/- इतका खर्च आलेला असून, सदर शिबीरातील रुग्णांची तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया श्री साईनाथ रुग्णालयातील नेत्ररोगतज्ञ डॉ. सुलि सोनटक्के व इतर सहकारी यांनी केलेल्या आहे.

सदर शिबीरात रुग्णांवर झालेल्या खर्चाच्या बिलापेटी श्री अमृतराव मुरलीधर गोंदकर यांनी रु. १,००,०००/- इतक्या रकमेचा चेक मा. कार्यकारी अधिकारी यांचे नावे दिलेला असून, सदर रकमेचा चेक दिनांक ०५/०४/२०१३ अन्वये संस्थान खाती (वित्त विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेकडे) जमा करणेत आलेला आहे.

तसेच उदघाटन व समारोप समारंभ कार्यक्रमाचे फ्लेक्स बोर्ड बनविणे, कनात इ. व इतर अनुशंगीक खर्चासाठी संस्थानला अंदाजे रु.१०,०००/- इतका प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष खर्च आलेला आहे.

तरी वरील प्रमाणे मोफत मोतीबिंदु शिबीर आयोजनास व याकामी श्री शिवाजी अमृतराव गोंदकर, शिर्डी यांच्या विनंतीनुसार येणारा सर्व खर्च त्यांचेकडून देणगी स्वरुपात स्विकारणेस, तसेच याकामी संस्थानला आलेल्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४१ श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधुन निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झाले आहेत. सदरचे लिनन हे २००८ पासुन २०११ पर्यंत मध्ये जसे जसे लागेल तसे तसे खरेदी करण्यात आलेले आहे पैकी बाकी लिनन वापरुन खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/०४/२०१२ ते ३०/०९/२०१२ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०८/०१/२०१३ निर्णय क्रमांक २५ अन्वये रु. १,५५,४५८/- रकमेचे लिनन नष्ट केलेले असुन, त्यानंतर दिनांक ०१/१०/२०१३ ते ३१/०३/२०१३ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन जे निकामी लिनन जमा झालेले आहे.

सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.३,६०,९६३,/- इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्य परिस्थितीत त्याची किंमत निरंक आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत केलेले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४२ श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. व कॅथलॅब विभागाकरीता Lead Gown खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-**

**प्रस्ताविक** :- श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडीक ओ.टी व कॅथलॅब विभागात सध्या दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी सध्या त्यांचेकडे असलेले Light Weight Lead Gown सन २००६ पासून वापरत आहे. परंतु ते वापरुन खराब झालेले आहे. त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहे. याकामी अंदाजे खर्चासाठी मे. अनिता मेडीकल सिस्टीमस प्रायव्हेट लिमीटेड, मुंबई यांचे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दराप्रमाणे एकुण रु. ४१४५१०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी :-**

| **Sr. No.** | **Descript-ion** | **Size/ Type** | **LE, mm pb** | | **Dimensi-ons cm** | | **Qty** | | | **Rate per in Rs.** | **Total Amt. in Rs.** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Front | Back | W/G | L | Cath-lab | Ortho O.T | Total | | |
| 01 | Vest - Maxima | M | 0.5 | 0.25 | 55 | 57 | 03 | 07 | 10 | 22430.00 | 224300.00 |
| 02 | Skirt for Maxima | M | 0.5 | 0.25 | 183 | 53 | 03 | 07 | 10 | 19021.00 | 190210.00 |
| | | | | | | | **Total Amt. in Rs.** | | | | **414510.00** |

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक,कायदेशीरतसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** :- १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

२) सदरचे खरेदीकामी रु.२५०००/- पेक्षा जास्तीचा खर्च येणार असल्याने विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ४१४५१०/- चे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेऊन खरेदी करता येतील.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी दोन्ही ओ.टीमध्ये सर्जन व इतर कर्मचाऱ्यांना C-Arm व Cathlab मशिन मुळे Radiations होऊ नये म्हणून खरेदी करणे गरजेचे आहे.

तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडीक ओ.टी व कॅथलॅब विभागामध्ये दैनंदिन शस्त्रक्रिया करतेवेळी सर्जन व इतर कर्मचाऱ्यांना C-Arm, Cathlab मशिन मुळे Radiations होऊ नये म्हणून विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Lead Gown खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ४,१४,५१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४३ वार्षिक औषधे खरेदीतील औषधांच्या तपासणी अहवालाबाबत. (Drug Analysis report).**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारे विविध प्रकारचे गोळया, इंजेक्शन, सिरप, मलम इत्यादी औषधे ही दर वर्षी विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करण्यात येतात. त्यामध्ये खरेदी करण्यात येणारी जनरीक औषधे ज्याबद्दल तक्रारी येतात, अशा औषधांपैकी Ingredient ची percentage purity कमी असते किंवा कसे? याबाबत शासन मान्य Drugs Testing Laboratories मध्ये इंजेक्शन पाठवून त्यांचेकडून खात्री करुन घेण्यात यावी, असे तत्कालीन मा. विश्वस्त डॉ. ए. भा. गोंदकर साहेब यांनी सुचना केल्या होत्या.

त्यास अनुसरुन सन २०१२-१३ या वर्षी खरेदी केलेल्या औषधांपैकी ५० औषधांचा Analysis (Percentage Purity) करुन घेणेकामी दि.२७/०४/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. ३७७ अन्वये एकुण अंदाजे रक्कम रु.६७४१६/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार खालील एकुण ५० औषधे इकडील पत्र क्र.३४९ दि. १९/०४/२०१३ अन्वये M/s. Ana Laboratories, Mumbai यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आलेली होती. एकुण ५० औषधांपैकी २६ औषधांचा अहवाल औषध भांडार विभागात प्राप्त झालेला आहे.

सदर ५० औषधांपैकी १२ औषधांचा वापर करतांनी वापरणाऱ्या डॉक्टरांना अडचणी आल्या होत्या त्यापैकी ०१ औषधाचा अहवाल प्राप्त झालेला आहे. तो Table B मध्ये दाखविण्यात आलेले आहे.

| Sr. No. | Name of Medicines | Qty. | Manufactured by | Marketed by | Batch No. | Expiry Date | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **A** | | | | |
| 1. | Tab. Maxispas ( Mefenamic Acid & Dicyclomine Hel) | 20 | Biogenetic Drugs | Unichem | 2031 | 02-2014 | Is of Standard quality |
| 2. | Tab. Fortafen (Aceclofenac 100 mg) | 50 | Crescent Therapeutics | Alembic Ltd. | F1206 | 07-2014 | Is of Standard quality |
| 3. | Tab. Procet (Cetrizine Dihydrochloride) | 50 | Chemosyn Ltd. | Themis Pharma | 72012 | 09-2015 | Is of Standard quality |
| 4. | Tab. Carbaz – 200 (Carbamazepin) | 50 | Psycoremedies | Orison drugs | 403 | 03-2015 | Is of Standard quality |
| 5. | Tab. Pyremol – IB (Ibuprofen + Paracetamol) | 50 | Alembic | | 1100-A | 10-2016 | Is of Standard quality |
| 6. | Tab. Losatan – 50 (Losartan Potassium) | 50 | Rainbow | Biochem | 2154 | 02-2015 | Is of Standard quality |
| 7. | Tab. Erythrocin – 250 (Erythromycin) | 50 | Pfizer | | 30175 | 09-2014 | Is of Standard quality |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 8. | Tab. Eopril 2.5 (Enalapril maleate) | 50 | Rainbow | Biochem Pharma | 12579 | 09-2014 | Is of Standard quality |
| 9. | Tab. Flucolab (Fluconazole | 10 | Laborate | | 005 | 10-2013 | Is of Standard quality |
| 10. | Cap. Nicodoxy 100 (Doxycycline HCI) | 50 | Abbott Healthcare | Hindustan Lab. | 0004 | 06-2014 | Is of Standard quality |
| 11. | Tab. Spasmizol (Paracetamol + Dicyclomine HCI) | 50 | Indian Drugs & Pharma | | 1012 | 06-2015 | Is of Standard quality |
| 12. | Inj. Biocetamol (Paracetamol) | 02 | E.G.Pharma | Biochem Pharma | 674 | 09-2014 | Is of Standard quality |
| 13. | Inj. Amoxyclav 1.2 gm (Amoxycillin & Potassium clavulanate) | 02 | Scott –Edil Pharmacia | Abbott | 2084 | 08-2014 | Is of Standard quality |
| 14. | Inj. Piracillin 500 mg (Ampicillin Sodium) | 02 | Visa Drugs | Abbott | 19 | 10-2014 | Is of Standard quality |
| 15. | Inj. Cefstar Forte (Cefoperazone & sulbactam) | 02 | Brooks Lab | Essentra | 2059 | 01-2014 | Is of Standard quality |
| 16. | Inj. Nitrocin 25 mg 5 ml (Nitroglycerin) | 02 | Samarth pharma | Samarth pharma | 840 | 09-2014 | Is of Standard quality |
| 17. | Inj. Isolin (Isoprenaline) | 05 | Samarth Life | Samarth Life | 23 | 04-2014 | Is of Standard quality |
| 18. | Inj. Lignocaine 30 ml (Lignocaine Hydrochloride 30 ml | 02 | APJ Lab | Cadila | 2015 | 08-2014 | Is of Standard quality |
| 19. | Inj. Adrenaline | 02 | Magna Lab | Xion | 1208 | 05-2013 | Is of Standard quality |
| 20. | Inj. Diclofam 3ml (Diclofenac Sodium) | 05 | Visa drugs and pharma | Abbott | 1011 | 09-2014 | Is of Standard quality |
| 21. | Inj. Ulcirid (Ranitidine) | 05 | Nitin Life Science | Unichem | 1203 | 09-2014 | Is of Standard quality |
| 22. | Inj. Neutrahep (Protamine sulphate) | 02 | Gland pharma | Gland pharma | 201 | 06-2013 | Is of Standard quality |
| 23. | Inj Ondatop (Ondansetron) | 05 | Unichem | Unichem | 2017 | 08-2014 | Is of Standard quality |
| 24. | Inj. C-one (Ceftriaxone) | 02 | Scott Edil pharma | Abbott | 2075 | 10-2014 | Is of Standard quality |
| 25. | Inj. Napronjl (Succinyl Choline) | 02 | Naprod life scie Pvt. Ltd., | Aesmira Miraclllus | 2183B | 8-14 | Is of Standard quality |
| **B** | | | | | | | |
| 26. | Inj. Bupitroy (Bup Vacine ) | 02 | Troikka | Troikka | 4507 | 11-2013 | Is of Standard quality |

आपले माहितीसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४४ सन २०१३-१४ (माहे मे, २०१३ ते मार्च, २०१४ अखेर) प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी किराणामाल खरेदीबाबत स्वामी समर्थ डिस्ट्रीब्यूटर्स, तिसगाव यांचे पत्र.**

**प्रस्ताव-** मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव (प्रवरा) यांनी दि.०३.०६.२०१३ रोजी दिलेल्या पत्रामध्ये आम्ही दि.२२.०५.२०१३ रोजी ई-टेंडर भरले आहे. या मध्ये आमचे राजहंस दुधाचे दर सर्वात कमी रु.२४/- होता. आपण काही कारणास्तव सर्व निविदाधारकाकडून पुन्हा एकदा दर लिहुन घेतले. आम्ही L१

असतांना अशाप्रकारचे पुन्हा दर लिहुन घेणे हे नियमबाह्य आहे. याबद्दलचे नियम त्या वेळेस आम्हांस माहित नसल्याने आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवून तुमच्या मागणीनुसार सर्व निविदाधारकांनी दर परत लिहुन दिले.

आम्ही निविदाप्रक्रियेची माहिती घेतली असता फक्त L१ कंपनी अथवा संस्था म्हणजेच या प्रक्रियेत आपण फक्त आमच्याशी राजहंस दुधाच्या दराबाबत आपण चर्चा करु शकता. याबाबतची शासकीय नियमावली आपल्याला हवी असल्यास आम्ही उपलब्ध करुन देऊ शकतो. तसेच ज्या दिवशी निविदाप्रक्रिया पुर्ण झाली त्याच दिवशी राज्य शासनाने गायीच्या दुधाकरिता रु.२/-प्रति लिटर वाढ केलेली आहे. यावाढी प्रमाणे आमच्या दरामध्ये रु.२/- प्रति लिटर वाढ करावी लागेल, असे केल्यास तरी सुद्धा आमचे दर सर्वात कमीच आहेत. वरील सर्व बाबी लक्षात घेता आपण इतर कोणाचेही ई-टेन्डर मध्ये दिलेल्या दराशिवाय नंतर लिहुन दिलेले दर विचारात घेऊ नयेत व आमचे उत्कृष्ठ प्रतिचे राजहंस दुधाचे दर मान्य करुन शिर्डी साई संस्थानास वर्षभर दुध उपलब्ध करुन देण्याची संधी द्यावी., अशी नम्र विनंती केलेली आहे.

दि.०२.०६.२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सर्व पुरवठाधारकांना मिटींग कक्षामध्ये बोलावून, प्रत्येक निविदाधारकाचे कोणत्या मालासाठी नमुने निवडले गेले आहेत, याची माहिती दिली. त्यानंतर प्रत्येक मालासाठी असलेल्या L१ निविदाधारकाचे दर सर्वांना सांगण्यात आले होते, त्यानंतर सर्व निविदाधारकांना L१ पेक्षा कोणास कमी दर द्यावयाचे असल्यास त्यांना स्वतंत्र कागदावर दर देण्यास सांगण्यात आले होते. तसेच सदरबाबत कोणास काही आक्षेप असल्यास बोलण्यास सांगितले होते. मात्र उपस्थित सर्व २१ निविदाधारकांनी सदर प्रक्रियेचे स्वागत करुन, L१ पेक्षा कमी दर देण्याचा प्रस्ताव मान्य केला. सदर वेळी मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव (प्रवरा) यांचे प्रतिनिधी श्री.संजय नालकर हे देखील उपस्थित होते, त्यांनी देखील त्यावेळेस कोणताही आक्षेप घेतलेला नाही. तसेच होमानाईज्ड पाश्चराईज्ड टोन्ड गाय दुधाकरिता मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचे निविदेतील दर रु.२४/- मात्र L१ होते. त्यानंतर मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी त्यापेक्षा कमी दर देण्याऐवजी सदरचे दर हे रु.२५.९०पै. इतका केलेला आहे. टोन्ड गाय दुधाखरेदीबाबत खालीलप्रमाणे परिस्थिती झालेली आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | ब्रॅण्ड | निविदेतील दर व्हॅटसह | चर्चा वाटाघाटीचे दर व्हॅटसह |
|---|---|---|---|---|
| १ | मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | २४.०० | २५.९० |
| २ | मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध. उत्पा.संघ. लि. कोपरगांव | गोदावरी | २८.०० | **२५.००** |

चर्चा वाटाघाटीमध्ये मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा.ता.सह.दुध उत्पा.संघ लि., कोपरगावं यांचे दर न्युनतम आलेले आहेत. सदरची चर्चा वाटाघाटी ही मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेली असल्यामुळे मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचे दि.०३.०६.२०१३ रोजीचे पत्राबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४७७ आजचे सभेत प्रस्तावित दोन्ही दुध पुरवठाधारकांना दुरध्वनीवरुन दुधाच्या अंतीम दराबाबत विचारणा करण्यात आली असता, दोघांनीही रु.२४.९० मात्र प्रति लिटर या दराने दुध पुरवठा करण्यास तयार असलेचे व तसे लेखी पत्राद्वारे कळविणार असल्याचे सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असलेले दुध खरेदीसाठी मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव व मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध. उत्पा.संघ. लि. कोपरगांव या दोघांनी दिलेले रु.२४.९० मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, दोघांनाही दुध पुरवठयाचा समप्रमाणात विभागुन कार्यादेश देण्यात यावा. तसेच दोन्ही दुध पुरवठाधारकांनी दुरध्वनीवरुन देऊ केलेले दर त्यांचेकडून लेखी पत्राद्वारे घेण्यात यावेत, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.४५ सन २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी कोचर अॅण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटट, मुंबई यांची नियुक्ती महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी, महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग,जा.क्र.सासंवि-२०१२/प्र.क्र.४०/ १२ ।.सोळा. दि.०८ ऑगस्ट,२०१२ अन्वये करण्यात आली होती. त्यास अनुसरून त्यांनी सदर कामकाज पूर्ण केले असून, त्या संदर्भातील लेखापरिक्षणाचा अहवाल संस्थानकडे दि.२३/०९/२०१२ रोजी सादर केला आहे. अधिनियम २००४ मधिल तरतुद १७ (२) कआणि २९(२) अन्वये सदर अहवालाची एक प्रत मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना व एक प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई. यांना सादर करण्यात आलेली

आहे. तसेच सदरचा वार्षिक अहवाल माहे डिसेंबर-२०१२ मध्ये झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर सादर झालेला आहे.

सदर लेखापरिक्षण अहवालातील मुद्या संदर्भातील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात येणा-या वैधानिक लेखापरिक्षक यांना उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. त्या अनुशंगाने उपरोक्त लेखापरिक्षण अहवालातील मुद्दांचा दोष दुरूस्ती अहवाल तयार करणे कामी, सदर अहवालाच्या प्रती संस्थानचे सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात आलेले अंतर्गत लेखापरिक्षक मे.अभय शास्त्री ॲण्ड असो.पुणे व पूर्व लेखापरिक्षक श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटटस्, कोपरगाव तसेच पुर्व लेखापरिक्षक रुग्णालये श्री. व्ही.व्ही.कोठारी, चार्टर्ड अकौटंटस श्रीरामपुर व अंतर्गत लेखापरिक्षक रुग्णालये श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस राहुरी यांना पाठविण्यात आल्या होत्या.

त्यास अनुसरून सदर अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल, उपरोक्त चारही सस्थांच्या मार्गदर्शनानुसार तयार करण्यात आलेला असून, अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे. तरी सदर दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेवून त्यास मान्यता मिळणेकामी, मा.त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू दोष दुरुस्ती अहवाल विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.४६ जुन- २०१३ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे जुन, २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे: -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ७/६/२०१३ | ८,८१,२६,३६०/- |
| २) | बँक ऑफ बरोडा, नासिक | ९/६/२०१३ | ९,९३,३३,४६८/- |
| ३) | बँक ऑफ बरोडा, नासिक | ११/६/२०१३ | २०,९७,०३,९८८/- |
| ४) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २६/६/२०१३ | ८,८१,२६,३६०/- |
| ५) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २७/६/२०१३ | ६,६१,१२,५४६/- |
| ६) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २९/६/२०१३ | ३,३०,५६,२७३/- |
| ७) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुन २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | **एकूण रक्कम** | | ६८,४४,५८,९९५/- |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ६८.४४ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) इंडीयन बँक, शिर्डी
१३) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१४) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १४ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.६८.४४ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १४ या स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ६८.४४ मात्र कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४७ संस्थान मालमत्ता विमा पॉलिसी व श्री साईभक्तांचा विमा पॉलिसीचे नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचे मालमत्तेचे संरक्षण होणेसाठी व श्री साई भक्तांना विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानने मे.युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शिरडी यांचेकडून दिनांक १० जुलै, २०१२ ते दिनांक ०९ जुलै २०१३ या एक वर्षासाठी न्युनत्तम दराने निविदा स्विकारण्यात येऊन विमा पॉलीसी काढलेली आहे. यापैकी मालमत्ता पॉलीसीची व कर्मचारी फिडीलिटी गॅरंटीची मुदत दिनांक ०९ जुलै, २०१३ अखेर संपत आहे. तसेच श्री साईभक्त विमा पॉलिसीची मुदत दि.११ ऑगष्ट २०१३ अखेर संपत असल्याने सदर विमा पॉलीसीची पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी नुतनीकरण करणे आवश्यक आहे. मालमत्ता विमा पॉलीसीकामी रूपये-१०,२४,२३८/- व श्री साईभक्त विमा पॉलिसी रक्कम रु.११,११,१११/- एवढी एक वर्षाच्या कालावधी साठी होती.

वरील विमा पॉलीसी नुतनीकरण करणेसाठी विविध राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागविण्यास व त्या मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे समोर उघडून न्युनतम दराची निविदा स्विकारून त्या प्रमाणे मालमत्ता विमा व कर्मचारी फिडीलिटी गॅरंटी तसेच श्री साईभक्तांच्या विमा पॉलीसी पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करून घेण्यास व त्यावर येणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेस आपली मान्यता असावी ही विनंती.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी रु.२५,००,०००/- एवढया रक्कमेची एकत्रीत विमा खाती अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आलेली आहे.

**निर्णय क्र.४८० यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालमत्ता विमा पॉलिसी व श्री साईभक्तांचा विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणेसाठीचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत आले.**

**याकामी विविध राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागविण्यात येऊन प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे समोर उघडणेत याव्यात व निम्नतम दरधारक विमा कंपनीस कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच, यासाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४८ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता पूर्व लेखा परिक्षण (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit) कामकाजासाठी सक्षम संस्थेची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे.तसेच त्या अनुशंगाने आर्थिक व्यवहारातही मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारांवर योग्य नियंत्रण रहावे यासाठी लेखाशाखेकडून अदा करण्यात येणारे प्रत्येक देयक आदा करणे पूर्वी पूर्वलेखापरीक्षक (Pre Auditor) यांचे मार्फत परीक्षण झाल्यास नजर चुकीने होणाऱ्या चुका व काही संभाव्य त्रुटी टाळणे शक्य होतील. तसेच संस्थानचे व्यवहार हे महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार होतात की नाही हे पाहण्याची २००५-०६ सालापासुन नेमणुकाकरुन लेखापरीक्षकांवर सर्वस्वी जबाबदारी देण्यात आलेली आहे.

**(अ)** सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता श्री. मे.अभय शास्त्री ॲण्ड असो.पुणे यांची पूर्व लेखा परिक्षक म्हणून वार्षिक रू.२,२०,०००/- (अक्षरी दोन लाख वीस हजार मात्र) एवढया एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. सन २०१२-१३ या वर्षातील त्यांचे काम समाधानकारक आहे. तसेच वैधानिक लेखा परिक्षण दोष-दुरुस्ती अहवाल तयार करणे कामी त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.

**(ब)** संस्थान मधिल सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण, डेडस्टॉक, कंझुमेबल स्टॉक, अचानक रोख रक्कम तपासणी अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासनाअंतर्गत पुरेशा तज्ञ व कुशल मनुष्यबळा अभावी सन २००५-०६ पासून सक्षम संस्थेची नेमणूक करण्यात येते. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता श्री श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस राहुरी यांची एकूण मानधन वार्षिक रू.२,४०,०००/- (अक्षरी दोन लाख चाळीस हजार मात्र) या एकत्रीत मानधानावर नेमणूक करण्यात आली असून त्यांचे काम समाधानकारक आहे. तसेच वैधानिक लेखा परिक्षण दोष-दुरुस्ती अहवाल तयार करणे कामी त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.

**(क)** सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी करविषयक सर्व कामकाजाचे लेखापरिक्षणकरणेकामी श्री. शंकर अनदानी यांची वार्षिक १,७५,०००/- अक्षरी रुपये (एक लाख पंच्याहत्तर हजार) नेमणुक करण्यात

आलेली होती. श्री साईबाबा संस्थान मधील कायम कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागु केल्याने बहुतांशी कायम कर्मचारी हे आयकर (Income Tax) कक्षेमध्ये आलेले आहेत. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी श्री. शंकर अनदानी यांनी एक प्रतिनिधी पुर्ण वेळासाठी शिर्डी येथे संस्थान कामकाजासाठी उपलब्ध करुन दिला आहे. तसेच त्यांनी संस्थानच्या करविषयक कामकाजात सर्वतो परीने मदत केलेली आहे.

**(ड)** संस्थानच्या मुंबई कार्यालयामध्ये चालणा-या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणेकामी उपरोक्त दोन्हीही संस्थेकडून लेखा परिक्षणाचे कामकाज केले जाते. परंतू वाढत्या कामकाजाचा व्याप लक्षात घेवून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता मुंबई कार्यालयासाठी तसेच संस्थानचे परकिय चलनाचे व्यवहार, या कामी गेल्या नऊ वर्षापासून परकिय चलनाच्या लेखापरिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेले श्री.एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अटीवर नेमणुक करण्यात आलेली आहे.यासाठी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती म्हणुन अंदाजे रू.२५,०००/- (अक्षरी रूपये पंचवीस हजार ) पर्यत खर्च अपेक्षित आहे.

**(इ)** सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता श्री.एस.एल.कुलकर्णी यांची अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून वार्षिक रू.२,१०,०००/- (अक्षरी दोन लाख दहा हजार मात्र) एवढया एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. तसेच सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता श्री.व्ही.व्ही.कोठारी यांची पूर्व लेखा परिक्षक म्हणून वार्षिक रू.१,९५,०००/- (अक्षरी एक लाख पंच्यान्नव हजार मात्र) एवढया एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती.

**(ई)** सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठीच्या संस्थानचे विविध माहिती व सुविधा केंद्रांचे लेखापरिक्षक म्हणुन श्री अमोल दातार यांची दि.१४जूलै,२०१२ रोजीचे त्रिसदस्यीय समितीचे सभेतील विषय क्र.४ निर्णय क्र.५६२ नुसार रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) इतक्या मानधनावर नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी त्यानुसार संस्थानचे विविध माहिती व सुविधा केंद्रांचे लेखापरिक्षण पुर्ण केले असुन, त्याबाबतचा लेखापरक्षिण अहवाल वेळोवेळी सादर करण्यात आलेला आहे.

दि०६.०३.२०१० रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय क्र.१४ निर्णय क्र. २८७ मधील निर्णयानुसार आयकरासाठी व विक्री करासाठी श्री.ए.एल. कुलकर्णी, कोपरगाव यांचेकडून व आयकरासाठी श्री. राहूल केळकर असो. यांची दि. २७.०४.२०१३ चे मा. त्रिसदस्सीय समितीच्या सभेतील निर्णय क्र. ४१६ अन्वये योग्य त्या फी / मानधनावर सेवा घेण्यात येत आहे.

दि.१४ जूलै,२०१२ रोजीचे त्रिसदस्यीय समितीचे सभेतील विषय क्र.४ निर्णय क्र.५६२ नुसार वरीलप्रमाणे पुर्व लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांची दि.०१ ऑगस्ट २०१२ ते ३१ जुलै २०१३ या कालावधीकरिता नेमणुक करण्यात आली होती.

आता दि.०१ ऑगस्ट २०१३ ते ३१ जुलै २०१४ चा कालावधीकरिता वरीलप्रमाणेच पूर्व लेखापरिक्षक (Pre-Audit) अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Audit), यांची नियुक्ती होणेसाठी तसेच मुंबई येथील कामकाजासाठी मागिल आर्थिक वर्षाप्रमाणे अथवा योग्य त्या वार्षिक लेखापरिक्षण फीसह बाहेरील सक्षम संस्थेची नियुक्ती होणेसाठी, तसेच परकिय चलनाच्या लेखा परिक्षणासाठी श्री. एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची नियुक्ती होणेसाठी तसेच लेखापरिक्षण कालावधीत संस्थानचे साईनुसार राहण्याची व जेवण्याची मोफत व्यवस्था करण्यास मान्यता मिळणेसाठी मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**दि.०१ ऑगस्ट २०१३ ते ३१ जुलै २०१४ या कालावधीकरिता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पूर्व लेखापरिक्षक (Pre-Audit) अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Audit), यांची नियुक्ती करणेत यावी व त्यांना मागील वर्षाप्रमाणे मानधन + शासकीय नियमानुसार सेवाकर आदा करणेत यावा. तसेच, संस्थान आवश्यकतेनुसार वरील सर्व लेखापरिक्षकांची संस्थानमार्फत संस्थानचे सोईने राहण्याची व भोजनाची विनामुल्य व्यवस्था करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४९ इंडिया गव्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडे वितळुन जमा असलेले शुध्द सोने व नॅशनल रिफायनरी प्रा.लि.,मुंबई यांचेकडे वितळुन जमा असलेली शुध्द चांदी शिर्डी येथे आणणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, मा.व्यवस्थापन सभा दि.१८.७.२०१२ विषय नं.०२ निर्णय क्र.५७४ नुसार इंडिया गव्हमेटं मिंट,मुंबई यांचेकडे सोने वस्तू व नॅशनल रिफायनरी प्रा.लि.मुंबई यांचेकडे चांदी वस्तू अलंकार वितळण्यात आलेले आहेत.वितळविण्यातआलेल्या शुध्द सोने-चांदी पांसून साईभक्तांच्या सेवेशी नाणी पेंडन्ट तयार करविण्याचे ठरविण्यात आले होते. तथापी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे औरंगाबाद खंडपिठाने CIVIL APPLICATION NO.१२०५६/२०१२ IN PIL NO.१८/२०११ दिनांक १६ ऑक्टोंबर, २०१२ अन्वये पुढील प्रमाणे आदेश दिलेले आहेत. ६) (e) shall

not convert precious metals in any form nor melt it any form त्यानुसार सदर याबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,मंत्रालय मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/ ५०११/ २०१३ दिनांक २९ जानेवारी २०१३ नुसार कळविण्यात आलेले आहेत त्यामुळे नाणी पेंडट तयार करता येत नाही.इंडिया गव्हमेंट मिंट,मुंबई यांचेकडे शुध्द सोने ३२,४४२.५१४ ग्रॅम व नॅशनल रिफायनरी प्रा.लि.मुंबई यांचेकडे शुध्द चांदी ३९,२४१९.०७० ग्रॅम एवढी शिल्लक आहे.सदर दोन्ही मिंट यांनी जमा सोने-चांदी स्टॉक वरती इन्शुअरन्स साठी रक्कमेची मागणी केलेली आहे. परंतु संस्थानचे सोने-चांदी मिंटच्या ताब्यात असल्याने त्यांना इन्शुअरन्स साठी रक्कम आदा करणे योग्य ठरणार नाही.

तरी इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई व नॅशनल रिफानयरी प्रा.लि.मुंबई यांचेकडील जमा असलेले शुध्द सोने-चांदी परत शिरडी येथे आणणेकामी त्यावर इन्शुअरन्स इनटॅन्झीट व इतर अनुषंगिक येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती समोर सदरचा विषय निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.४८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई यांचेकडे वितळुन जमा असलेले शुध्द सोने व नॅशनल रिफायनरी प्रा.लि.,मुंबई यांचेकडे वितळुन जमा असलेली शुध्द चांदी शिर्डी येथे आणणेकामी त्यावर इन्शुअरन्स इनटॅन्झीट व इतर अनुषंगिक खर्च येणार आहे व आपण भक्तांना साईबाबांची सोने-चांदीची नाणी, पेडन्ट विक्रीसाठी ठेवतो ती नाणी, पेडन्ट वरील इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई व नॅशनल रिफायनरी प्रा.लि.,मुंबई यांचेकडूनच बनवितो. सदर नाणी, पेडन्ट बनविणेसाठी शुध्द सोने, चांदी मुंबईला परत घेऊन जाणेसाठी त्यावर पुन्हा इन्शुअरन्स इनटॅन्झीट व इतर अनुषंगिक खर्च येणार आहे. त्यामुळे इंडिया गव्हर्मेंट मिंट, मुंबई व नॅशनल रिफायनरी प्रा.लि.,मुंबई यांचेकडे असलेले शुध्द सोने व चांदी शिर्डीस आणणेऐवजी/ सदरचा खर्च टाळणेसाठी व साईभक्तांची वाढती मागणी लक्षात घेता त्यांचेकडून सोने, चांदीची नाणी, पेडन्ट बनवून घेण्यात यावी. याकरिता संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे अर्ज करण्यात येऊन त्यास मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट सन २०१३-१४ साठी देणेबाबत मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. चा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या पर्यायी वीजपुरवठयासाठी डिझेल जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. हे जनसेट नेहमी कार्यदक्ष असावेत म्हणून त्यांचे रेग्युलर मेन्टेनन्स करणे गरजेचे आहे. यासाठी वार्षिक कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे गरजेचे आहे. वार्षिक कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केल्यास आपणाला वेळोवेळी येणा-या अडी-अडचणींबाबत मार्गदर्शन व मदत मिळू शकते. त्यामुळे जनरेटरसेट कायम कार्यक्षम ठेवणे शक्य होते.

कॉंप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केल्यानंतर, (१) कंपनीची आपणाला २४ X ७ सर्व्हिस मिळते. (२) शिरडीत कायम स्वरूपी एक रेसिडेण्ट इंजिनिअर उपलब्ध राहणार असतो. (३) वर्षभरात सर्व्हिसिंगसाठी कोणतेही मटेरीअल लागले तर त्याचा वेगळा खर्च देण्याची (आदा करण्याची) गरज नसते. (४) सर्व्हिसिंगसाठी लागणारे मटेरीअलच्या ट्रान्स्पोर्टसाठी कोणतेही वेगळे चार्जेस द्यावे लागत नाहीत. (५) जनसेट चालल्याच्या कालावधीत दर ३०० तासानी बी चेक कंपनी मार्फत केला जातो व यात लागणारे नविन फिल्टर्स, नविन ऑईल, नविन ओ रिंग वगैरे कंपनीमार्फत पुरविले जातात व यासाठी याचे वेगळे चार्जेस देण्याची गरज राहत नाही. (६) जनसेट सुस्थितीत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी सर्व्हिस एजन्सीवर राहते.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील विषय नं.२९ निर्णय क्र.४७५ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१३-२०१४ साठी (दि.०१-०७-२०१२ ते दि.३०-०६-२०१३) करीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यामध्ये निम्नतम दर दिलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना संस्थान जा.क्र.एसएसएस/ विद्युत/ १८५१/ २०१२ दि.२५-०७-२००२ अन्वये रक्कम रुपये २४,०८,२३६/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्हयाकरीता एकमेव कंपनी मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हिस डिलर आहेत. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३०-०६-२०१३ रोजी संपत आहे.

आता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिडीच्या (०१) मंदिर परीसर, (०२) नविन भक्तनिवासस्थान, (०३) श्री साईबाबा हॉस्पिटल + साईनगर, (४) नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय (०५) नविन प्रसादालय (०६) साई आश्रम भाग-०१ (०७) साई आश्रम भाग-०२ (०८) पाणीपुरवठा साठवण तलाव (०९) शांतिनिकेतन इमारत (१०) कनिष्ठ महाविद्यालय (११) रथपालखी

जनरेटर या वेगवेगळ्या परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता दिनांक ०१-०७-२०१३ ते दिनांक ३०-०६-२०१४ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी जनरेटरसेट तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटरसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. |
| ०३) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०४) | नविन भक्तनिवास (५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | ०१ नग. |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| ०७) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी | ०१ नग. |
| ०८) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी | ०१ नग. |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ११) | साईआश्रम भाग-०१ | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १२) | साईआश्रम भाग-०१ | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १३) | साईआश्रम भाग-०२ | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १४) | साईआश्रम भाग-०२ | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १५) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए८.३-६४ | ०१ नग. |
| १६) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटी -४९५-जी. | ०१ नग. |
| १७) | कनिष्ठ महाविद्यालय | १० केव्हीए | SC२१३००६४५ | X१३G२ | ०१ नग. |
| १८) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F१-७G१ | ०१ नग. |
| १९) | शांतीनिकेतन इमारत | १५ केव्हीए | D२ १०२२-०३०००२२ | DM२० | ०१ नग. |
| २०) | साईआश्रम भाग-०१ ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५७ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| २१) | साईआश्रम भाग-०१ ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५८ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे सर्व ठिकाणचे पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१३-२०१४ साठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये २५,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१३-२०१४ साठी (दि. ०१-०७-२०१३ ते दि. ३०-०६-२०१४) या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१ साईआश्रम भाग-०१ कडे बसविण्यात आलेल्या R.O.Plant व Water Cooler करीता विद्युतीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग-०१ प्रकल्पाचे उद्‌घाटन दि.११-०४-२०१३ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते करण्यात आले असून या प्रकल्पाच्या इमारतींमधील खोल्या साईभक्तांना निवासाकरीता देण्याचे काम चालू झले आहे. साईभक्तांना जास्तीत जास्त सोयी सुविधा पुरविणे संस्थानचे प्रयत्न असल्याने भक्तांना शुद्ध व थंड पाणी पिण्याकरीता उपलब्ध व्हावे म्हणून सर्व १२ इमारतींच्या गच्चीवर नविन खरेदी करण्यात आलेले एकुण ४८ नग आर.ओ.प्लॅन्ट व ४८ नग वॉटरकुलर बसविण्यात आलेले आहेत. पाईप लाईनचे कनेक्शन करुन प्रत्येक माळयावर आर.ओ.प्लॅन्ट व वॉटरकुलरचे पाणी उपलब्ध होणार आहे.

इमारतीच्या गच्चीवर विद्युतपुरवठा उपलब्ध नसल्याने सध्या तात्पुरते वायरींग काम करुन Water Cooler व R.O. Plant करीता वीजपुरवठा जोडून दिलेला आहे. परंतू कायमस्वरुपी वीजपुरवठयाची सोय करणेकामी इमारतीच्या तळमाळयाच्या पॅनेल रुम पासून गच्चीपर्यंत केबल टाकावी लागणार आहे. तसेच गच्चीवर वायरींग काम करुन प्लग पॉईंट काढून द्यावे लागणार आहेत.

सदरील विद्युतीकरणाचे काम हे विद्युत ठेकेदार यांचेकडून कामाचे दरपत्रक मागवून करुन घ्यावे लागणार आहे. त्याकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामाचा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणेः-

| Sr. No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. (Rs.) | Amount. |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-3-5 | Supplying & erecting mains with 2x4 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 800 | 73.50 | Rs. 0,58,800.00 |
| 02) | 1-3-3 | Supplying & erecting mains with 1x2.5 sq.mm F.R stranded/solid copper PVC insulated wire laid in | 800 | 51.45 | Rs. 0,41,160.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | | | |
| 03) | 7-1-23 | Supplying & erecting PVC armoured cable 4 core 35 sq mm aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 400 | 357.00 | Rs. 1,42,800.00 |
| 04) | 5-1-7 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad switch and fuse 415/500V 63A on angle iron frame as per specification No. SW-SWR / MTP | 25 | 2705.85 | Rs. 0,67,646.25 |
| 05) | 5-6-5 | Providing, erecting & commissioning RCCB only of electro magnetic type with 20 KA breaking capacity of 40A. 4 pole complete as per specification No. SW-RCCB/RCCB | 20 | 3644.55 | Rs. 0,72,891.00 |
| 06) | 5-6-16 | Supplying & fixing CRCA sheet Box with earthing terminals for housing 4 Pole RCCB/RCCB+MCB complete on iron frame/ laminated board. | 20 | 237.30 | Rs. 0,04,746.00 |
| 07) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32 mm. with accessories on wall/ceiling as per specification No: WG-MA/CON, para no. 1.1.2 | 200 | 46.20 | Rs. 0,09,240.00 |
| 08) | 9-2-4 | Supplying and erecting Annealed bare copper wire of high purity of different sizes used for earthing on wall with necessary copper clamps fixed on wall/ cable/conduit with screws in an approved manner. | 150 | 632.10 | Rs. 0,94,815.00 |
| 09) | 7-7-4 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 4 core 35 Sq.mm./3 core 50 Sq.mm. for PVC armoured cable as per specification no. CB-GL | 025 | 126.00 | Rs. 0,03,150.00 |
| 10) | 7-10-3 | Supplying & erecting crimping type aluminium lugs for cable 35 sq mm complete as per specification No. CB-CL/AL | 176 | 12.60 | Rs. 0,02,217.60 |
| | | | **Total :-** | | **Rs. 4,97,465.85** |
| | | | **Round up :-** | | **Rs. 4,97,466.00** |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भाग-०१ कडे बसविण्यात आलेल्या R.O.Plant व Water Cooler करीता विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून दरपत्रक मागविणेस तसेच संस्थानच्या वेबसाईटवर पुर्ण कोटेशन फॉर्म प्रसिध्द करणेस व येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४,९७,४६६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार विनिमिय होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग-०१ कडे बसविण्यात आलेल्या R.O.Plant व Water Cooler करीता विद्युतीकरणाचे काम बाहेरील विद्युत ठेकेदारांकडून करुन घेणेसाठी दरपत्रके मागविणेस व संस्थानच्या वेबसाईटवर पुर्ण कोटेशन फॉर्म प्रसिध्द करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ४,९७,४६६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५२ मंदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेबाबत मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीं चे मंदिर व परीसर, व्दारावती, साईबाबा भक्तनिवासस्थान व परिसर इ.ठिकाणी भक्तांच्या सोयीकरीता ए.सी. व फ्रिज बसवून कार्यरत आहेत. सदरचे ए.सी.व फ्रिज (१) दोन टन वॉल माऊंटेड स्प्लिट ए.सी.१२३ नग (२) दिड टन स्प्लिट ए.सी.१२ नग (३) एक टन स्प्लिट ए.सी.९१ नग (४) विन्डो ए.सी.दिड टन ०९ नग (५) ५ टन डक्टेबल ए.सी.प्लांट ०७ नग (६) डोमेस्टीक फ्रिज १४ नग (७) मोठे डिफ्रीज ०५ नग भक्तांच्या सोईकरीता कार्यरत आहेत.

काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने ए.सी.यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी.यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखादया वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. तसेच सदर यंत्रणा बंद राहिल्यास भक्तांना देण्यात येणा-या सेवासुविधांमध्ये व्यत्यय निर्माण होतो.

विद्युत विभागात ए.सी.मेन्टेनन्सकरीता संस्थानचे ०२ कायम कर्मचारी आहे. त्यांचेकडून दैनंदिन कामाचे नियोजन, स्टॉक नोंदी, नविन कामे तसेच CAMC दिलेल्या मशिनरींचे दुरुस्ती देखभालीचे कामे

करुन घेणे इ. कामे करण्यात येतात. तसेच सदर कामी ०६ कंत्राटी कर्मचारी आहेत. त्यापैकी श्री साईबाबा हॉस्पीटल सेंट्रल ए.सी.प्लांटचे ऑपरेटींग कामी तीन शिफ्टसाठी तीन कर्मचारी व एक कर्मचारी सुट्टया सोडविणेकामी लावण्यात येतात. उर्वरीत दोन कर्मचा-यांकडून दर्शनरांगेतील एअर कुलरला पाणी भरणे व सदर कुलरचे मेन्टेनन्स तसेच अनुषंगिक कामे करुन घेण्यात येतात. संस्थानमधील सर्व ठिकाणचे ए.सी.व अनुषंगिक मशिनरींचे मेन्टेनन्ससाठी संबंधीत तांत्रिक कर्मचा-यांची संख्या पुरेसी नसल्याने कामात अडचणी येतात. मशिनरींची देखभाल वेळेवर न झाल्याने परिणामी अतिरिक्त मेन्टेनन्स खर्च होत आहे. म्हणून या सर्व मशिनरींची वाढती व्याप्ती लक्षात घेता सर्वच मशिनरींचे देखभालीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणे गरजेचे आहे.

मंदिर व परीसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दि.०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी यंत्रणेच्या वार्षिक सर्व्हिसिंगच्या अंदाजे खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Description | Qty. | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Annual Compressive Maintenance Contract of Temple And Campus, 500 Room And Dwarawati (as per attached the list.) | 1 Job. | Rs. 14,75,000/- | **Rs. 14,75,000/-** |

उपरोक्तप्रमाणे मंदिर व परीसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दि.०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १४,७५,०००/- (अक्षरी रक्कम रु.चौदा लाख पंच्याहत्तर हजार) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी मंदिर व परीसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थानच्या संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दि.०१-०८-२०१३ ते दि. ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५३ भांडार विभागात गोडाऊनमध्ये खाद्यतेल साठविणेकरीता स्टेनलेस स्टील ट्रे तयार करुन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईबाबा संस्थानचे साईनिवास अतिथीगृहाचे तळमाळयामध्ये असलेल्या भांडार विभागाचे गोडाऊनमध्ये इतर साहित्यांबरोबरच खाद्यतेल साठविले जाते. खाद्यतेलाचे डबे वहातुकीमध्ये किंवा हाताळतांना किरकोळ लिकेज असल्यास साठवणूकीचे दरम्यान खाद्यतेल खाली सांडून फ्लोरिंग खराब होऊ नये म्हणून स्टेनलेस स्टीलचे ट्रे बनवून देण्यात आलेले आहे. साईभक्तांचे वाढत्या गर्दीमुळे श्री साई प्रसादालयाकरीता खरेदी करण्यात येणारे मालाचे क्वांटीटीमध्ये वाढ झाली आहे. सध्या भांडारकडे असलेले ट्रे खाद्यतेलाचे साठवणूकीमध्ये कमी पडत असल्याने स्टेनलेस स्टीलचे नविन २० नग ट्रे बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील शीट, साईज :- ५` x ५` x १६ गेज | ५०० स्क्वेअर फूट | रु. ३६०/- (प्रति स्क्वे.फूट) | रु. १,८०,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील राऊंड बार, साईज :- १२ एम.एम. | ३६० फूट | रु. १००/- (प्रति फूट) | रु. ०,३६,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील हॅन्डल | ८० नग | रु. ३००/- (प्रति नग) | रु. ०,२४,०००/- |
| ०४) | इतर खर्च | | | रु. ०,३२,०००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. २,७२,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे भांडार विभागात गोडाऊनमध्ये खाद्यतेल साठविणेकरीता स्टेनलेस स्टील ट्रे तयार करुन देण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु. २,७२,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागात गोडाऊनमध्ये खाद्यतेल साठविणेकरीता स्टेनलेस स्टील ट्रे बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. २,७२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५४ भक्तनिवासस्थान (५०० रुम) कडील चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काऊंटर वायरिंगचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) कडील चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काउंटरचे नुतनीकरणाचे काम चालू असून सदर कामासंदर्भात शनिवार दिनांक ०४-०५-२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी राऊंड घेतला. या राऊंडच्यावेळी बांधकाम विभागामार्फ़त सुरू असलेल्या चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काउंटर नुतनीकरणासोबतच वायरिंग कामाचे तसेच टेलिफ़ोन वायरिंग कामाचेही नुतनीकरण करणेसंदर्भात मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सुचना केलेल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी केलेल्या सुचनांची अंमलबजावणी करणेसाठी विद्युत विभागामार्फत करावयाच्या कामाचा खर्च शासनमान्य CSR प्रमाणे तयार केलेला असून सदरील काम हे विद्युत ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून करुन घ्यावे लागणार आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-2-8 | Supplying and laying PVC conduit 25mm. dia | 50 Mtr | 75.60 | 0,03,780.00 |
| 02) | 1-2-12 | Supplying and laying PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. | 200 Mtr | 46.20 | 0,09,240.00 |
| 03) | P.N.3 NoteNo .4 | Supplying and erecting mains with 1x2.5 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire | 500 Mtr | 25.72 | 0,12,860.00 |
| 04) | 1-3-5 | Supplying and erecting mains with 2x4.0 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire | 250 Mtr | 73.50 | 0,18,375.00 |
| 05) | 1-3-7 | Supplying and erecting mains with 2x6.0 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire | 250 Mtr | 106.05 | 0,26,512.50 |
| 06) | 1-3-11 | Supplying and erecting mains with 3x2.5 sq.mm. F.R. stranded/solid copper PVC insulated wire | 200 Mtr | 77.70 | 0,15,540.00 |
| 07) | 1-8-1 | Supplying and erecting modular type 6A one way switch. | 10 Nos | 100.80 | 0,01,008.00 |
| 08) | 1-8-7 | Supplying and erecting modular type 16/20A one way switch. | 20 Nos. | 181.65 | 0,03,633.00 |
| 09) | 1-8-10 | Supplying and Erecting modular type 3 pin 6A multi socket. | 10 Nos. | 118.65 | 0,01,186.50 |
| 10) | 1-8-11 | Supplying and Erecting modular type 3 pin 6A/16A multi socket. | 20 Nos. | 226.80 | 0,04,536.00 |
| 11) | 1-8-15 | Supplying and erecting modular type telephone socket. | 10 nos. | 103.95 | 0,01,039.50 |
| 12) | 1-8-23 | Supplying and erecting modular type electronic step regulator | 10 Nos. | 372.75 | 0,03,727.50 |
| 13) | 1-8-35 | Supplying and erecting unbreakable concealed type 1 modular switch box. | 10 nos. | 185.85 | 0,01,858.50 |
| 14) | 1-8-37 | Supplying and erecting unbreakable concealed type 3 modular switch box. | 10 Nos. | 194.25 | 0,01,942.50 |
| 15) | 1-8-39 | Supplying and erecting unbreakable concealed type 6 modular switch box. | 05 Nos. | 307.65 | 0,01,538.25 |
| 16) | 1-8-41 | Supplying and erecting unbreakable concealed type 12 modular switch box. | 10 Nos. | 414.75 | 0,04,147.50 |
| 17) | Non C.S.R. | Point wiring for Light / Fan in PVC Casing caping / pvc pipe with 3 x 1.5 Sq.mm. FR Grade copper. | 20 Nos. | 700.00 | 0,14,000.00 |
| 18) | Non C.S.R. | Point wiring for Bell in PVC Casing caping/pvc pipe with 3 x 1.5 Sq.mm. FR Grade copper wire. | 05 Nos. | 700.00 | 0,03,500.00 |
| 9) | 1-9-14 | Point wiring for plug on light-fan switchboard. | 05 Nos. | 386.40 | 0,01,932.00 |
| 20) | 1-10-2 | Supplying & erecting telephone cable 2 pair with 0.5 mm. | 200 mtr | 17.85 | 0,03,570.00 |
| 21) | 1-10-12 | Supplying & erecting Jelly filled armoured 50 pair telephone cable. | 100 mtr | 236.25 | 0,23,625.00 |
| 22) | 1-10-13 | Supplying & erecting Jelly filled armoured 100 pair telephone cable. | 50 mtr. | 417.90 | 0,20,895.00 |
| 23) | 1-11-16 | Supplying, erecting & commissioning Junction box suitable for 50 pairs. | 01 nos. | 1,009. 05 | 0,01,009.05 |
| 24) | 1-11-3 | Supplying, erecting & commissioning MDF box 100 x 100 pairs. | 01 nos. | 2,685. 90 | 0,02,685.90 |
| 25) | 2-6-3 | Supplying and erecting (Crompton Make, High speed) Ceiling fan of 1200mm. sweep. | 10 Nos. | 1,643. 25 | 0,16,432.50 |
| 26) | 5-3-3 | Supplying, Erecting and marking SPMCB 6A to 32A . | 24 Nos. | 172.20 | 0,04,132.80 |
| 27) | 5-4-7 | Supplying and erecting triple and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mounted SPMCB of 4 ways (12Poles). | 02 Nos. | 2,663. 85 | 0,05,327.70 |
| 28) | 5-6-6 | Providing, erecting & commissioning 4 pole 63A. | 02 Nos. | 4,179. 00 | 0,08,358.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 29) | NON C.S.R. | Supplying and erecting approved make 1 x 28W T-L5 Tube fitting with 28W T-L5 Tube bar | 10 Nos. | 1,100. 00 | 0,11,000.00 |
| 30) | Non CSR | Supplying and erecting Bettle Make (I-II), ISI mark Telephone Instrument. | 10 Nos. | 500.00 | 0,05,000.00 |
| | | | | **Total :-** | **2,32,392.70** |
| | | | | **Round up :-** | **2,32,393.00** |

उपरोक्तप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान ( ५०० रुम ) कडील चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काउंटर वायरिंगचे नुतनीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये २,३२,३९३/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवासस्थान (५०० रुम ) कडील चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काऊंटर वायरिंगचे नुतनीकरणाचे काम बाहेरील विद्युत ठेकेदारांकडून करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेस व संस्थानच्या वेबसाईटवर पुर्ण कोटेशन फॉर्म प्रसिध्द करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये २,३२,३९३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५५ श्री साई प्रसादालय जनरेटर कक्षमधील ३०० KVAR बॅलॅसन्ड डीआरपीसी कॅपॅसिटर पॅनेल दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय जनरेटर कक्षामध्ये ३०० KVAR चा बॅलॅन्सड डीआरपीसी कॅपॅसिटर पॅनेल मे.कमिन्स इंडिया लि., पुणे यांनी बसवून कार्यान्वित केलेला आहे. सततच्या वापरामुळे तसेच सध्या कडक उन्हाळा असल्याने पॅनेलमधील मशिनरी गरम होऊन पॉवर केबल जळणे, कपॅसिटर बँक बंद पडणे यासारख्या तक्रारी नेहमी येतात. त्यामुळे कपॅसिटर पॅनेल बंद पडल्यास महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून घेतलेल्या सप्लायवर लोड येऊन विज आकार वाढून संस्थानवर पॅनल्टी पडू शकते. मध्यंतरी पॅनेल बंद पडल्याने यासाठी कमिन्स इंडिया लि.,पुणे यांना वरील ३०० KVAR चा बॅलॅन्सड डीआरपीसी कॅपॅसिटर पॅनेल दुरुस्तीबाबत कळविले होते. दि.२७ एप्रिल, २०१३ रोजी कमिन्स इंडिया लि.,पुणे यांचे इंजिनिअर प्रविण अडोन यांनी पॅनेलचे इन्स्पेक्शन केले असता पॅनेलमधील १५ KVAR, ३० KVAR, ६० KVAR कपॅसिटर बँक तसेच DRPC कंट्रोलर खराब झाल्याने व काही कॅपॅसिटरची क्षमता कमी झाल्याने सर्व नविन बसवावे लागणार असल्याचे कळविले आहे. तसे त्यांनी त्याबाबतचे कोटेशन दिलेले आहे.

३०० KVAR चा बॅलॅन्सड डीआरपीसी कॅपॅसिटर पॅनेल कार्यान्वित ठेवणेसाठी खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करावे लागणार असून त्याचे इन्स्टॉलेशन करुन घ्यावे लागणार आहे. खरेदी करावे लागणा-या मटेरीअलचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 15 KVAR balanced capacitor banks | 02 Nos. | Rs. 7,210/- | Rs. 0,14,420.00 |
| 2 | 30 KVAR balanced capacitor banks | 01 Nos. | Rs. 14,420/- | Rs. 0,14,420.00 |
| 3 | 60 KVAR balanced capacitor banks | 04 Nos. | Rs. 28,840/- | Rs. 1,15,360.00 |
| 4 | DRPC controller | 01 Nos. | Rs. 74,160/- | Rs. 0,74,160.00 |
| | | | Total | Rs. 2,18,360.00 |
| | | | + Vat 12.5% | Rs. 0,27,295.00 |
| | | | Total | Rs. 2,45,655.00 |
| | | | + Excise | Rs. 0,30,363.00 |
| | | | Total Amount | Rs. 2,76,018.00 |

उपरोक्तप्रमाणे मटेरीअल खरेदी करणेकामी रक्कम रु.२,७६,०१८/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. तसेच सदरचे मटेरीअल खरेदी केल्यानंतर या कंपनीकडून त्याचे इन्स्टॉलेशन व कमिशनिंग करावे लागणार आहे. त्याचा खर्च त्यांनी रक्कम रु.२५,०००/- + सर्व्हिस टॅक्स १२.३६% रु.३,०९०/- = रु. २८,०९०/- मात्र अतिरिक्त कळविला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे मटेरीअल खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये २,७६,०१८/- + इन्स्टॉलेशन व कमिशनिंग चार्जेस रुपये २८,०९०/- मिळून रक्कम रु.३,०४,१०८/- इतका खर्च कळविला आहे. तरी मे.कमिन्स इंडिया लि., पुणे यांचेकडून काम करुन घेण्यास व येणा-या रुपये ३,०४,१०८/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय जनरेटर कक्षामधील ३०० KVAR बॅलॅसन्ड डीआरपीसी कॅपॅसिटर पॅनेलची दुरुस्तीचे काम मे.कमिन्स इंडिया लि., पुणे यांचेकडून करुन घेणेस व यासाठीचे मटेरिअल खरेदी आणि इन्स्टॉलेशन, कमिशनिंग चार्जेस यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. ३,०४,१०८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५६ श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी भक्तांना तसेच रुग्णांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी म्हणून बसविण्यात आलेल्या सोलर वॉटर हिटींग सिस्टीम यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षीक कॉम्प्रेसिव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी भक्तांना तसेच रुग्णांना पहाटेच्या वेळेस स्नानाची सोय व्हावी म्हणून सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविण्यात आलेली आहे. या यंत्रणेमध्ये काचेचे रिफ्लेक्टर, पाण्याच्या स्टोअरेज टाक्या व पाण्याच्या जी.आय.पाईपलाईन यांचा समावेश असतो. या यंत्रणेमध्ये काही बिघाड झाल्यास तो त्वरीत दुरुस्त करुन घ्यावा लागतो. सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणा सतत कार्यान्वित राहण्यासाठी सर्व ठिकाणच्या सोलर वॉटर हिटींग सिस्टिमचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे गरजेचे आहे. कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये कलेक्टरची काच फुटली ती बदलणे, टाकी खराब झाली, टाकी लिक झाली तर ती बदलून नविन बसविणे, इतर लिकेज काढणे, व्हाल्व्ह मेन्टेनन्स करणे, दैनंदिन साफसफाई ठेवणे इत्यादि कामांचा समावेश राहील.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४-०७-२०१२ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.४७२ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी भक्तांना तसेच रुग्णांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी म्हणून बसविण्यात आलेल्या सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणेचे सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) साठी (दि.०१-०८-२०१२ ते दि.३१-०७-२०१३) करीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यामध्ये निम्नतम दर दिलेले मे.जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., जळगांव यांना संस्थान जा.क्र.एसएसएस / विद्युत / १८४९ / २०१२ दि.२५-०७-२०१२ अन्वये रक्कम रुपये १९,२१,०००/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व सोलर यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि. ३१-०७-२०१३ रोजी संपत आहे.

आता, श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी भक्तांना तसेच रुग्णांना स्नानाकरीता गरम पाण्याची सोय व्हावी म्हणून बसविण्यात आलेल्या सोलर वॉटर हिटींग सिस्टिम यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) दि.०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी यंत्रणेच्या वार्षिक सर्व्हिसिंगच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | प्लॅन्ट कपॅसिटी | युनिट | एकुण क्षमता | वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची एकत्रित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | भक्तनिवासस्थान (५००रुम) | ४५०० | ०३ | १३५०० | **रु. १०,००,०००/-** |
| २ | धर्मशाळा (२०० रुम ) + श्री साईनाथ हॉस्पीटल | १५०० | १२ | १८००० | |
| ३ | धर्मशाळा (२०० रुम ) + श्री साईनाथ हॉस्पीटल | १००० | ०२ | ०२००० | |
| ४ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ४००० | ०२ | ०८००० | |
| ५ | श्री साईबाबा हॉस्पीटल | २५०० | ०२ | ०५००० | |
| ६ | श्री साईबाबा हॉस्पीटल | २००० | ०२ | ०४००० | |
| ७ | श्री साईबाबा हॉस्पीटल | १००० | ०१ | ०१००० | |
| ८ | साईनिवास अतिथीगृह | १५०० | ०२ | ०३००० | |
| ९ | साईनिवास अतिथीगृह | १००० | ०२ | ०२००० | |
| १० | व्दारावती इमारत | १००० | ३२ | ३२००० | |
| | | **एकुण क्षमता :-** | | **८८५००** | |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी बसविण्यात आलेल्या संपूर्ण सोलर प्लांट यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. दहा लाख ) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा संस्थानचे भक्तनिवासस्थान, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पीटल, साईनिवास अतिथीगृह व व्दारावती इमारत याठिकाणी बसविण्यात आलेल्या संपूर्ण सोलर प्लांट यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) (दि.०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-

२०१४) या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५७ श्री साई प्रसादालय व साईआश्रम भाग- ०१ येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी. प्लांट यंत्रणेचे २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (ACMC) देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग संगणकीकृत करुन साईटेक प्रोजेक्ट तयार करण्यात येऊन या प्रोजेक्टचे डाटा सेंटर हे श्री साई प्रसादालय पहिला माळा या ठिकाणी तयार करण्यात आलेले आहे. याठिकाणी अत्याधुनिक व संवेदनशील मशिनरी (Main sever, Data Storeage, Racks, Tape Library, Power Edge Server व आणखी) बसविण्यात आलेले असल्याने येथील या मशिनरी विशिष्ट व स्थिर तापमानाला थंड ठेवाव्या लागतात. या मशिनरी विशिष्ट व स्थिर तापमानाला थंड ठेवण्याकरीता स्पेशल टाईपचे प्रेसिजन टाईप डाटा सेंटरकरीता व युपीएस साठी एकुण ०४ नग डक्टेबल सेंट्रल ए.सी.प्लँट यंत्रणा मे.ब्लू स्टार कंपनीकडून उभारण्यात आलेले आहे.

सदर यंत्रणा उभारणीचे काम दिनांक १०-१२-२०१० रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यानंतर कंपनीचा एक वर्षाचा रिस्क प्रोटेक्शन कालावधी (गॅरंटी + फ्री सर्व्हीस) दिनांक १९-१२-२०११ रोजी संपुष्टात आलेला आहे. त्यामुळे त्यापुढील कालावधीसाठी या संपूर्ण यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ACMC) कंपनीला देणे गरजेचे होते. तसेच सदर यंत्रणा ब्लू स्टार कंपनीची असल्याने कंपनीने ACMC बाबत सोबत जोडलेल्या पत्रान्वये मे.ब्लू स्टार कंपनीचे अहमदनगर व नाशिक जिल्हयाचे अधिकृत डिलर मे.विघ्नेश्वर एअर कंडिशनिंग प्रा.लि., नाशिक यांना देण्यात यावे असे निर्देशित केल्यानुसार तसेच संस्थानचे कन्सल्टंट, मे.डिझाईन इंजिनिअर्स, मुंबई यांनी सदर यंत्रणेचे पेपर्स तपासून दिलेल्या अहवालानुसार मे.विघ्नेश्वर एअर कंडिशनिंग प्रा.लि., नाशिक यांना ACMC चे काम देण्यात आलेले होते. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत /५५४/२०१२ दि.०९-०५-२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी संपलेला आहे.

आता, श्री साई प्रसादालय व साईआश्रम भाग-०१ येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी.प्लांट यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ACMC) दि. ०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी सदर यंत्रणेच्या वार्षिक सर्व्हिसिंगच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr. No. | Description | Qty. | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Annual Compressive Maintenance Contract for Air Conditioning / other equipments as per attached list. Shri Sai Prasadalya | 1 Job. | Rs. 7,25,000/- | Rs. 7,25,000/- |
| 02) | Annual Compressive Maintenance Contract for Air Conditioning / other equipments as per attached list. Sai Ashram-01, Presison Unit 8.5 Ton. | 1 Job. | Rs. 2,50,000/- | Rs. 2,50,000/- |
| | | | **Total Amount :-** | **Rs.9,75,000/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय व साईआश्रम भाग-०१ येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी.प्लांट यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ACMC) दि.०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ९,७५,०००/- (अक्षरी रक्कम रु.नऊ लाख पंच्याहत्तर हजार) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी श्री साई प्रसादालय व साईआश्रम भाग-०१ येथे असणा-या साईटेक प्रोजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या संपूर्ण ए.सी.प्लांट यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (ACMC) दि.०१-०८-२०१३ ते दि. ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४९० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५८ श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षीक कॉम्प्रेसिव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन थिएटर्स व आय.सी.सी.यु.मध्ये सेंट्रल ए.सी.प्लांटच्या एकुण १४ यंत्रणा तसेच स्प्लिट टाईप ए.सी.एकुण ९५ नग, मॉरच्युरी ०२ नग, मेडिसिन कोल्ड स्टोअर ०१ नग, आणि डोमेस्टिक फ्रिज एकुण २७ नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्प्लिट टाईप ए.सी.एकुण ४५ नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकुण १७ नग कार्यान्वित आहे. ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन करतेवेळी व नंतर आय.सी.यु. वॉर्डमध्ये ठेवण्यात येणा-या रुग्णाला कोणतेही बाहेरच्या हवेचे इन्फेक्शन होऊ नये, याकरीता सदरची ए.सी.यंत्रणा सदैव कार्यान्वित ठेवण्यात येते. काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअर्सपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअर्सपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने ए.सी.यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी.यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखादया वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते.

मा.व्यवस्थापन समितीच्या समितीच्या दिनांक १४-०७-२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत विषय क्र.१८ निर्णय क्र.४६४ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता कॉप्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे यांना जा.नं.एसएसएस / विद्युत / १९५३ / २०१२ दि.३१-०७-२०१२ अन्वये रू. १४,६६,४७५/- इतक्या रक्कमेचा दि.०१-०८-२०१२ ते ३१-०७-२०१३ या कालावधीकरिता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३१-०७-२०१३ रोजी संपत आहे.

आता, श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी सदर यंत्रणेच्या वार्षिक सर्व्हिसिंगच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणेः-

| Sr.No. | Description | Qty. | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Annual Compressive Maintenance Contract Of Central AHU with Condensing units & Other Air Conditioning Units installed at shri sai baba Hospital & Sainath Hospital / other equipments as per attached list. | 1Job | Rs. 16,00,000/- | Rs. 16,00,000/- |
| | | | **Sub Total :-** | **Rs. 16,00,000/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १६,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.सोळा लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५९ श्री साईप्रसादालय कोल्ड स्टोअरेज, रेफ्रीजरेटर व स्प्लिट टाईप ए.सी. यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षीक कॉम्प्रेसिव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामध्ये भक्तांना प्रसादभोजन तयार करणेकामी भाजीपाला साठविण्यासाठी शीतगृहे उभारण्यात आलेली आहे. सदर शीतगृहांचे ०४ नग ए.सी.प्लांट यंत्रणा तसेच स्प्लिट टाईप ए.सी.एकुण २५ नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकुण ०५ नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे मोठया क्षमतेचे फ्रिज १० नग बसवून भक्तांच्या सोईकरीता कार्यरत आहेत.

काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या

स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने ए.सी.यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी.यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखादया वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. तसेच सदर यंत्रणा बंद राहिल्यास भक्तांना देण्यात येणा-या सेवासुविधांमध्ये व्यत्यय निर्माण होऊन भाजीपाला व इतर अन्न पदार्थ खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मा.व्यवस्थापन समितीच्या समितीच्या दिनांक १४-०७-२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत विषय क्र.१९ निर्णय क्र.४६५ अन्वये श्री साई प्रसादालयातील शीतगृहे व संपूर्ण ए.सी.यंत्रणेचे सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे यांना जा.नं.एसएसएस/ विद्युत /१६६५ / २०१२ दि.२७-०७-२०१२ अन्वये रू. २,००,०००/- इतक्या रक्कमेचा दि.०१-०८-२०१२ ते ३१-०७-२०१३ या कालावधीकरिता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१-०७-२०१३ रोजी संपत आहे.

आता, श्री साई प्रसादालय कोल्ड स्टोअरेज, रेफ्रीजरेटर व स्प्लिट टाईप ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी सदर यंत्रणेच्या वार्षिक सर्व्हिसिंगच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Description | Qty. | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Annual Compressive Maintenance Contract Of Cold storage with refrigerator & Air Conditioning System installed in shri sai prasadalaya | 1Job | Rs. 3,00,000/- | Rs. 3,00,000/- |
| | | | **Sub Total :-** | **Rs. 3,00,000/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय कोल्ड स्टोअरेज, रेफ्रीजरेटर व स्प्लिट टाईप ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी श्री साई प्रसादालय कोल्ड स्टोअरेज, रेफ्रीजरेटर व स्प्लिट टाईप ए.सी.यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.६० श्री साई प्रसादालय वायुवीजन यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षीक कॉम्प्रेसिव्ह वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय येथील मुख्य किचन,बुंदी किचन,लाडू किचन,पूरी किचन तसेच चपाती किचन येथील कर्मचा-यांना उन्हाळयात त्याठिकाणी काम करणे सुसह्य व्हावे म्हणून तापमान सुस्थितीत ठेवणेसाठी बाहेरुन गार हवेचा झोत सोडून तापमान नियंत्रणात ठेवणे, तसेच हवेतील आर्द्रता नियंत्रणात ठेवणे जेणेकरुन त्या त्या किचनमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना श्वास घेण्यास त्रास होऊ नये. शिवाय किचनमधील जळालेले तेलाचे बाष्प आणि इतर घाण एक्झॉस्टव्दारे बाहेर जावी याकरीता मे.केलव्होल्ट (इंडीया ) प्रा. लि., मुंबई यांचेकडून वरील किचनमध्ये वायुविजन यंत्रणा व एक्झॉस्ट यंत्रणा डिसेंबर २००८ अखेरपर्यंत बसवून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सदरील वायूविजन यंत्रणा सतत कार्यान्वित असते. सततच्या वापरामुळे वायूविजन यंत्रणेत बिघाड झाल्यास तेथील किचनमध्ये तापमान वाढून आर्द्रता कमी होऊन काम करणा-या कर्मचा-यांना श्वसनाचा त्रास होवू शकतो प्रसंगी सदरचा कर्मचारी बेशुध्द सुध्दा पडू शकतो. त्याकरिता वायुविजन यंत्रणा तातडीने दुरुस्त करुन चालू करुन घेणे गरजेचे असते. अशा वेळेस वायूविजन यंत्रणा दुरुस्तीकरीता लागणारे स्पेअर पार्ट त्वरीत उपलब्ध असणे गरजेचे असते. जर स्पेअर्स उपलब्ध नसतील तर वायुविजन यंत्रणेचे दुरुस्ती कामामध्ये अडचण निर्माण होते. व कर्मचा-यांच्या प्रकृतीला त्रास होऊन कामकाजात खंड पडू शकतो.

मा.व्यवस्थापन समितीच्या समितीच्या दिनांक १४-०७-२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत विषय क्र.१७ निर्णय क्र.४६३ अन्वये श्री साई प्रसादालयातील वायूविजन यंत्रणेचे सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता कॉंप्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि., पुणे यांना जा.नं.एसएसएस/ विद्युत/ १६६६/ २०१२ दि.२७-०७-२०१२ अन्वये रू. ०४,७३,५१४.०० इतक्या रक्कमेचा दि.०१-०८-२०१२ ते ३१-०७-२०१३ या कालावधीकरिता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३१-०७-२०१३ रोजी संपत आहे.

आता, श्री साई प्रसादालय वायुवीजन यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी सदर यंत्रणेच्या वार्षिक सर्व्हिसिंगच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr. no. | Description | Qty. | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | AMC charges as per scope of Activity mentioned in offer For the year-2013-2014 | 1 Job | Rs. 5,50,000/- | Rs. 5,50,000/- |
| | | | **Sub Total :-** | **Rs. 5,50,000/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय वायुवीजन यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख पन्नास हजार) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी श्री साई प्रसादालय वायुवीजन यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक ०१-०८-२०१३ ते दिनांक ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, श्री साईप्रसादालयामधील किचन येथील वायुवीजन यंत्रणा चालु असल्यास जास्त आवाज येतो व आतील हवा ओढून घेतल्यामुळे चपात्या बनविण्याच्या मशिनला ताव रहात नाही. धुरामुळे पुर्ण यंत्रणा काळी पडलेली आहे व या यंत्रणेची साफसफाई करता येत नसल्याने एफ.डी.ए. प्रमाणे स्वच्छता राखता येत नाही. या सर्व कारणांमुळे सदरहू यंत्रणा जास्त काळ बंद ठेवावी लागते. यासाठी या यंत्रणेचे दोन वर्षाचे ऑडीट करणेत येऊन, त्याचा अहवाल समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.६१ श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटरकुलर यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (ACMC) देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या सर्व परिसरात व इमारतींमध्ये भक्तांना पिण्याचे थंड पाण्यासाठी ठिकठिकाणी वॉटरकुलर बसविण्यात आलेले आहे. हे वॉटरकुलर विविध ठिकाणी एकुण ८५ नग भक्तांच्या सोईकरीता कार्यरत आहेत. काही वेळा वॉटरकुलरमध्ये काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत पर्यायाने वॉटरकुलर काही वेळा बंद ठेवावे लागतात. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून कुलर यंत्रणा कार्यान्वित केली जाते किंवा एखादया वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते. तसेच सदर यंत्रणा बंद राहिल्यास भक्तांना देण्यात येणा-या सेवासुविधांमध्ये व्यत्यय येतो.

विद्युत विभागात ए.सी.मेन्टेनन्सकरीता संस्थानचे ०२ कायम कर्मचारी आहे. त्यांचेकडून दैनंदिन कामाचे नियोजन, स्टॉक नोंदी, नविन कामे तसेच CAMC दिलेल्या मशिनरींचे दुरुस्ती देखभालीचे कामे करुन घेणे इ. कामे करण्यात येतात. तसेच सदर कामी ०६ कंत्राटी कर्मचारी आहेत. त्यापैकी श्री साईबाबा हॉस्पीटल सेंट्रल ए.सी.प्लांटचे ऑपरेटींग कामी तीन शिफ्टसाठी तीन कर्मचारी व एक कर्मचारी सुट्टया सोडविणेकामी लावण्यात येतात. उर्वरीत दोन कर्मचा-यांकडून दर्शनरांगेतील एअर कुलरला पाणी भरणे व सदर कुलरचे मेन्टेनन्स तसेच अनुषंगिक कामे करुन घेण्यात येतात.

संस्थानमधील सर्व ठिकाणचे ए.सी.व अनुषंगिक मशिनरींचे मेन्टेनन्ससाठी संबंधीत तांत्रिक कर्मचा-यांची संख्या पुरेसी नसल्याने कामात अडचणी येतात. मशिनरींची देखभाल वेळेवर न झाल्याने परिणामी अतिरिक्त मेन्टेनन्स खर्च होत आहे. म्हणून या सर्व मशिनरींची वाढती व्याप्ती लक्षात घेता सर्वच मशिनरींचे देखभालीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटरकुलर यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दि.०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी यंत्रणेच्या वार्षिक सर्व्हिसिंगच्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Description | Qty. | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Annual Compressive Maintenance Contract of All Water Cooler in Sansthan Campus. (as per attached the list.) | 1 Job. | Rs.4,75,000/- | **Rs.4,75,000/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटरकुलर यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दि.०१-०८-२०१३ ते दि.३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,७५,०००/- (अक्षरी रक्कम रु.चार लाख पंच्याहत्तर हजार) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटरकुलर यंत्रणेचे सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दि.०१-०८-२०१३ ते दि. ३१-०७-२०१४ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.६२ अल्ट्रासोनिक वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे मार्च २०१३ मध्ये संस्थान साठवण तलावातील पाणी साठा संपल्याने पाणी टंचाई निर्माण झाली. त्यामुळे सदर कालावधीत पाणी काटकसरीने वापराबाबत मा.कार्यकारी अधिकारी साहेब व उपकार्यकारी अधिकारी साहेब व पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे समवेत संस्थानचे विविध इमारतींची पाहणी करण्यात आलेली होती. त्यावेळी विविध इमारतींच्या एकुण पाणी वापराबाबत माहिती घेतली असता पुर्वीचा पाणी वापर तसेच टंचाई कालावधीत पाणी नियोजन केलेनंतरचा पाणी वापर वॉटर फ्लो मिटर बसविलेले नसल्याने सदरच्या इमारतीमधील पाण्याच्या वापराबाबतची ढोबळ माहिती देण्यात आली. सदर ठिकाणी वॉटर फ्लो मिटर बसविलेले नसल्याने अधिकृत तंतोतंत पाणी वापराची आकडेवारी सांगता आली नाही.

याबाबत सदरची दैनंदिन पाणी वापर माहिती आपणास उपलब्ध होणेसाठी संस्थानचे विविध इमारतींसाठी वॉटर फ्लो मिटर बसविणेबाबतच्या सुचना मा.कार्यकारी अधिकारी साहेब व उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी वेळोवेळी दिलेल्या होत्या. संस्थानचे विविध इमारतींकरीता बसविणेसाठी वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी विविध सप्लायर्सकडे दुरध्वनीवरुन संपर्क साधून माहीती घेतली असता त्यांनी १०० mm व्यासाचे अल्ट्रासोनिक वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी व प्रमाणित करुन देणेबाबतचा अंदाजे रु. १,००,०००/- मात्र खर्च कळविलेला आहे.

संस्थानचे साईआश्रम प्रकल्प भाग १ व श्रीसाईप्रसादालय इमारत या दोन इमारतीसाठी सुरुवातीस प्रायोगिक तत्वावर ०२ वॉटर फ्लो मिटर खरेदी करुन सदरचे मिटर बसविलेनंतर आपणास योग्य वाटल्यास इतर इमारतींसाठी वॉटर फ्लो मिटर खरेदी करता येतील.

साईआश्रम प्रकल्प भाग १ व श्रीसाईप्रसादालय इ. करींता वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी प्रत्येकी रु. १,००,०००/- याप्रमाणे ०२ नग अल्ट्रासोनिक वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी व प्रमाणित करणेसाठी एकुण अंदाजे रु. २,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी ०२ नग वॉटर फ्लो मिटर कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. २,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.४९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ०२ नग वॉटर फ्लो मिटर कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. २,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.६३ ५८ व्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेकरीता राजेंद्र कोहोकडे यांची तांत्रिक अधिकार पदी निवड झाल्याबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे क्रीडा प्रशिक्षक राजेंद्र कोहोकडे यांची छत्रपती स्टेडीयम ( बालेवाडी पुणे ) येथे दि.२ ते ६ मे २०१३ दरम्यान संपन्न होत असलेल्या ५३ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेकरिता महाराष्ट्र शासन युवक व क्रीडा संचलनामार्फत तांत्रिक अधिकारपदी नियुक्ती झालेली आहे. सदर स्पर्धेत देशातील ६०० खेळांडु सहभागी होत असुन, राजेंद्र कोहोकडे यांचा माध्यमातुन साई संस्थानला क्रीडाक्षेत्रात मानाची संधी प्राप्त झालेली आहे.

तसेच आपल्या श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचा विद्यार्थी प्रितम किसनसिंग डुमाले ( इयत्ता १० वी ) यांची गांधीनगर ( गुजरात ) येथे दि.२० ते २६ एप्रिल २०१३ दरम्यान संपन्न होत असलेल्या अखिल भारतीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र संघाच्या

कर्णधारपदी अभिनंदनीय निवड झालेली आहे. या अगोदर त्याने सलग दोन वर्षे महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केलेले असुन, आता तो महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करत आहे. अहमदनगर जिल्हयातुन महाराष्ट्र संघात निवड होणारा व नेतृत्व करणार तो एकमेव खेळांडु आहे.

तरी क्रीडा प्रशिक्षक श्री राजेंद्र कोहकडे व प्रितम डुमाले यांचे या कामगिरीमुळे संस्थानचे नावलौकीकात भर पडलेली आहे.आपले माहितीसाठी सादर,

**निर्णय क्र.४९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.६४ महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधारपदी राष्ट्रीय स्पर्धेकरीता प्रितम डुमाले यांची निवड झाल्याबाबत.**

**प्रस्ताव-** आपल्या श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचा विद्यार्थी प्रितम किसनसिंग डुमाले ( इयत्ता १० वी ) यांची गांधीनगर ( गुजरात ) येथे दि.२० ते २६ एप्रिल २०१३ दरम्यान संपन्न होत असलेल्या अखिल भारतीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी अभिनंदनीय निवड झालेली आहे. या अगोदर त्याने सलग दोन वर्षे महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केलेले असुन, आता तो महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करत आहे. अहमदनगर जिल्हयातुन महाराष्ट्र संघात निवड होणारा व नेतृत्व करणार तो एकमेव खेळांडु आहे. त्याने बजावलेल्या या दैदिप्यमान कामगिरीबाबत महाराष्ट्र शासनाची रु.३०००/- मात्र क्रीडाशिष्यवृत्ती त्याला प्राप्त होणार असुन, त्याच्या कामगिरीमुळे निश्चितच श्री साईबाबा संस्थानच्या नावलौकिकात भर पडलेली आहे. अशा गुणवंत व यशवंत खेळांडुचा सत्कार दि.१ मे रोजी ( महाराष्ट्र दिन ) कार्यक्रमांत सकाळी मैदानावर रु.५०००/- मात्र रोख पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते संस्थान मार्फत देऊन करण्यात यावा असे मत आहे. तरी निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.४९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.६५ शाळा दोन सत्रात भरविणे येत असल्याने प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल सन १९९० साली सुरु करण्यात आले आहे. आजमितीस सन २०१२-१३ मध्ये एकुण ज्यु.केजी ते इयत्ता १० वी पर्यत ४० वर्ग / तुकडया कार्यरत असून शाळेकडे एकूण ३४ वर्गखोल्या उपलब्ध आहेत. वर्ग खोल्यांच्या अडचणीमुळे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये शालेय कामकाज दोन सत्रात करण्यात यावे याबाबत मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ प्रस्ताव ठेवण्यात आला होता त्यास दि.०७/०२/२०१३ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

शिक्षण संस्थेतील प्रत्येक प्राथमिक शाळेसाठी मुख्याध्यापकाचे एक पद अनुज्ञेय असते. प्राथमिक शाळा नियमानुसार शाळेच्या पटावर २०० पेक्षा अधिक विद्यार्थीसंख्या असणाऱ्या किंवा इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी असणा-या प्राथमिक शाळेवर एक मुख्याध्यापक पदाची नेमणूक करता येते. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये इ. १ ली ते ५ वी एकूण २२ तुकडया व एकूण ११४४ विद्यार्थी संख्या आहे. शाळा संहितानुसार प्राथमिक विभागासाठी १ मुख्याध्यापक नेमणे गरजेचे आहे. इ. १ ली ते ५ वी या वर्गांना शिकवत असलेल्या शिक्षक/ शिक्षिकां पैकी सेवा जेष्ठते नुसार १ मुख्याध्यापकाची नेमणूक करता येते. शैक्षणिक शाळा संहितानुसार सहाय्यक मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असलेली पात्रता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | तपशिल | शैक्षणिक शाळा संहितानुसार मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असलेली पात्रता | श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य, सहा. शिक्षिका याचे पात्रताबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| १ | शैक्षणिक अर्हता | डी.एड. किंवा दोन वर्ष कालावधीची पूर्व प्राथमिक पदविका परिक्षा किंवा शासनाने त्या समतूल्य पदविका परिक्षा म्हणून मान्यता दिलेली परिक्षा उत्तीर्ण व्यक्ती. | एस.एस.सी., डी. एड. (इंग्रजी माध्यम) एम. ए. बी. एड. (य.च.मु.विद्यापीठ शि.शास्त्र ) |
| २ | विद्यार्थी संख्या | प्राथमिक विभाग पटावर २०० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असावी | प्राथमिक विभाग इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत एकूण विद्यार्थी पटसंख्या एकूण ११४४ इतकी आहे. |
| ३ | अनुभव | शिक्षक म्हणून कमीत कमी ५ वर्षाची सेवा झालेली असावी. | एकूण सेवा कालावधी १७ वर्ष ०८ महिने |
| ४ | समाधानकारक काम | काम समाधानकारक असणे आवश्यक आहे. या प्रयोजनासाठी मागील पाचवर्षाचे गोपनिय अहवाल विचारात घ्यावेत. | काम समाधानकारक आहे. मागील पाच वर्षाचे गोपनिय अहवाल सोबत परिशिष्ठात तपशिलवार नमूद कलेले आहेत. |

उपरोक्त आवश्यक पात्रतेनुसार प्राथमिक विभागाकडे शिक्षक/शिक्षिकां पैकी सेवाजेष्ठते नुसार मुख्याध्यापिका पदासाठी खालीलप्रमाणे उमेदवार पात्र आहे.

प्राथमिक विभागः- सहा.शिक्षिका

नांवः- श्रीमती वैद्य शिल्पा सुरेश (सहा.शिक्षिका) जन्म दिनांकः- १०/६/१९७६ ,

नेमणूक ता. १४/६/१९९६ एकूण सेवा कालावधी १७ वर्ष ०८ महिने

शैक्षणिक पात्रताः- एस.एस.सी. डी. एड. (इंग्रजी माध्यम )

एम. ए. बी. एड. (य.च.मु.विद्यापीठ शि.शास्त्र )

सध्याची वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० ग्रेड पे २८००

सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना वेतन निश्चिती नुसार वेतनश्रेणी :- ९३००-३४८०० ग्रेड पे ४२००

प्राथमिक विभागाकडे शिकवत असलेल्या शिक्षक/ शिक्षिकां पैकी सेवाजेष्ठते नुसार संबधित शिक्षकाची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक करता येते. परंतू सदर मुख्याध्यापकाला आपला वर्ग सांभाळण्याची जबाबदारी ही राहील. त्यांचेकडे दिलेला वर्ग सांभाळून त्यांनी ही जबाबदारी पार पाडावयाची आहे. एखाद्या शिक्षकाला त्यांच्या स्वतःच्या पदाव्यतिरिक्त मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला तर अशा दुसऱ्या पदाकरिता त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या १०% दराने परंतु रु.५०० एवढया मर्यादेपर्यंत विशेष वेतन अनुज्ञेय राहील.

उपरोक्त शैक्षणिक शाळा संहितानुसार मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असलेली पात्रते नुसार श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य, सहा.शिक्षक या उमेदवारांचे काम समाधानकारक असून ते प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका पदासाठी पात्र आहेत. श्रीमती शिल्पा वैद्य यांना त्यांचेकडे असलेल्या वर्गाची जबाबदारी सांभाळून प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापिका पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविता येईल. त्यांना सदरचे अतिरिक्त कार्यभारा बद्दल नियमानुसार अतिरिक्त कार्यभार भत्ता देता येईल.

प्राथमिक शाळा नियमानुसार शाळेच्या पटावर २०० पेक्षा अधिक विद्यार्थीसंख्या असेल तर मुख्याध्यापक नेमता येतो. आजमितीस आपल्या शाळेत इयत्ता १ ली ते ५ वी एकूण २२ तुकडया व एकूण ११४४ विद्यार्थी संख्या आहे. शासनाचे नियमानुसार प्राथमिक विभाग व माध्यमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक असावा असे पंचायत समिती शिक्षण अधिकारी यांनी सूचीत केले आहे.

**संदर्भ क्र.१** नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कर्मचारी आकृतीबंधास शासन शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९) / का.१६,मंत्रालय, मुंबई. दिनांक ७ ऑगस्ट,२००९ अन्वये मान्यता मिळालेली आहे त्यात श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल या विभागाकडे प्राचार्या या एका पदास मान्यता मिळालेली आहे. सदर आकृतीबंधामध्ये इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतचे प्राथमिक विभागासाठी शैक्षणिक शाळा संहिता नुसार विद्यार्थी संक्ष्या लक्षात घेता एका मुख्याध्यापकाची आवश्यकता आहे, तथापि त्यास आकृतीबंधा मध्ये मान्यता घेण्यात आलेली नाही.

**संदर्भ क्र.२** नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांचेकडून राबविण्यात येणारे विविध उपक्रम, योजना,प्रकल्प,स्थावरव जंगम मालमत्ता खरेदी व विक्री करणे, आर्थिक सवलत देणे इत्यादी प्रकरणी शासनाची पूर्व मान्यता घेणेबाबत शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०११/५३८/ प्र.क.६९/ पुर्नबांधणी -१२/ का-१६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. दिनांक २३ जानेवारी ,२०१३ अन्वये पत्र देण्यात आलेले असून त्यात अ.नं.५ श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधाबाहेर जावून कोणत्याही पदावर भरती करण्यात येऊ नये. तसेच शासनाच्या प्रचलित नियमानुसार सेवेत मुदतवाढ, पुर्ननियुक्ती, सेवानिवृतीनंतर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येऊ नये असा आहे.

**संदर्भ क्र.३** नुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनिय-२००९ अन्वये शासन परिपत्रक क्र. पीआरई -२०१० / प्र.क.२२५/ प्राशि-१ / मंत्रालय विस्तार भवन , मुंबई. दिनांक १८ जून, २०१० प्राथमिक शाळेसाठी मुख्याध्यापकाचे स्वतंत्र पद मंजूर करण्यात आले असून सक्तीचे केलेले आहे.

**सदर्भ क्र.४** नुसार शासन निर्णय क्रमांकःप्राशातु-१११२/(२५८/२०१२)/प्रशि-३ मंत्रालय, मुबई दि. १३ फेब्रुवारी, २०१३ अन्वये राज्यामध्ये येथून पुढे इयत्ता १ ली ते इ.८वी पर्यंत शिक्षण खालीलप्रमाणे संबोधण्यात येणार असून हा शैक्षणिक स्तर सर्व व्यवस्थापनाच्या व माध्यमांच्या शाळांना लागू आहे.

१. इ. १ ली ते ५ वी पर्यंत शिक्षण - कनिष्ठ प्राथमिक शिक्षण

२. इ. ६ वी ते ८ वीचे पर्यंत शिक्षण - वरिष्ठ प्राथमिक शिक्षण

३. इ. ९ वी ते १० पर्यंत शिक्षण - माध्यमिक शिक्षण

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये सध्या कार्यरत असलेल्या प्राचार्या यांची सन १९९० पासून प्राथमिक विभाग इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे विभागाकडे प्रचार्या म्हणून नेमणूक झाली होती. सन १९९९ पासून इयत्ता ८ वी चे पुढील वर्ग चालू करण्यात आल्याने सन १९९९ पासून प्राचार्या यांची माध्यमिक विभागासाठी प्राचार्या म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्याचवेळी प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणे गरजेचे होते परंतू प्राचार्या यांनी त्यावेळेपासून आजपर्यंत स्वखुशीने

शाळेकडील पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक अशा तीनही विभागाचा कार्यभारावर नियंत्रण ठेवले. परंतू आर. टी. ई. २००९ शासन नियमानुसार व शाळा संहितांनुसार प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक असावा असे शासन नियमात नमूद केलेले असल्याने प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणूक करावी लागणार आहे. सध्या असलेल्या प्राचार्या यांचेकडे सकाळचे सत्रातील केजी वर्गाच्या १२ तुकडया एकूण ५०४ विद्यार्थी तसेच इयत्ता ६ वी ते १० वी एकूण १० वर्ग तुकडया व एकूण ४७५ विद्यार्थी असे एकूण **९७९** विद्यार्थी सांभाळण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

शाळेच्या आकृतीबंधामध्ये सध्या प्राचार्य याचे एकल पद मंजूर असून वर्ग खोल्या अपु-या पडत असल्याने शाळा दोन सत्रात करण्यात आली आहे. शाळा दोन सत्रात सुरु होत असल्याने शाळेकडे दुपारचे शिप्टमध्ये नियंत्रण ठेवणेकामी मुख्याध्यापक नेमणे गरजेचे आहे. त्याकरीता शाळेत प्राथमिक विभागासाठी सहाय्यक मुख्याध्यापक नेमला तर चालेल का ? अशी विचारणा मा. शिक्षण अधिकारी , पंचायत समिती यांना केली असता त्यांनी सांगीतले की, यापुर्वी तुमच्या शाळेत प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक नेमायला हवा होता परंतू आजतागयत मुख्याध्यापक नेमलेला नाही , जो पर्यंत प्राथमिक विभागाकडे मुख्याध्यापक नेमला जात नाही तो पर्यंत शाळेकडे सहाय्यक मुख्याध्यापक नेमता येत नाही. यापुर्वी विद्यार्थी संख्या मर्यादीत असल्याने शाळेकरीता आकृतीबंधात फक्त माध्यमिक विभागासाठी प्राचार्या यांचे पद मंजूर करण्यात आले आहे. आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक पदाची मंजूरी घेण्यात आलेली नाही. आजतागायत शालेय कामकाज एकाच सत्रात चालविण्यात येत असल्याने प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापकाची नेमणूक करण्यात आलेली नव्हती, परंतू शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मध्ये शालेय कामकाज दोन सत्रात चालविण्यात येणार असल्याने प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक नेमणे गरजेचे आहे. तसेच शाळेसाठी नविन मान्यता क्रमांक मिळणार असून दर तीन वर्षांनी त्यांचे नुतनीकरण करावे लागणार आहे. शाळा मान्यता साठी सर्व अटी व शर्तीची पूर्तता करावी लागणार आहे. यामध्ये प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक नेमणे बाबतचीही अट आहे.

शैक्षणिक शाळा संहिता तरतूद, संस्थानचा मंजूर आकृतीबंध तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०११/५३८/ प्र.क.६९/पुर्नबांधणी -१२/का-१६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. दिनांक २३ जानेवारी ,२०१३ अन्वये रोजीचे पत्रातील अ.नं.५ नुसार मुख्याध्यापक ( प्राथमिक विभाग ) या पदास राज्य शासनाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करावा लागेल व शासनाची मान्यता मिळाले नंतर सदर पद भरणेबाबतची कार्यवाही करावी लागेल तरी प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणूक करणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.४९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, शाळा दोन सत्रात भरविणे येत असल्याने प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणेसाठी अगोदर मुख्याध्यापक (प्राथमिक विभाग) या पदास राज्य शासनाची मान्यता घेणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली व शासनाची मान्यता मिळालेनंतर सदर पद भरणेबाबतची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.६६ श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकरीता साईआश्रम -०२ मधील डी इमारत वापराबाबत.**

**प्रस्ताव-** मा. मुख्याध्यापक, जि.प. शाळा, शिर्डी यांनी दि.०९/०६/२०१२ चे पत्राने तसेच मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.), राहाता यांनी दि.२३/१०/२०१२ चे पत्राव्दारे संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाचे ताब्यातील ९ हॉल, ११ वर्गखोल्या व मुख्याध्यापक निवासस्थान जि.प.शाळा, शिर्डी यांचे ताब्यात देणेची विनंती केली आहे. त्याबाबत प्र.प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी सादर केलेल्या दि.१३/१२/२०१२ रोजीचे कार्यालयीन टिपणीवर मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी बांधकाम विभागाचा सविस्तर अभिप्राय समाविष्ट करणेविषयी आदेश दिला आहे. त्यानुसार प्र.प्राचार्य, श्री साईबाबा कनिष्ठ महा. शिर्डी यांचे उपरोक्त प्रस्तावाबाबत बांधकाम विभागाचा अभिप्राय खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**अ)** शिर्डी येथील सर्व्हे नं. ६ पैकी मधिल ५९.१५ आर क्षेत्रावर संस्थानतर्फे नवीन जिल्हा परिषद शाळा, शिर्डी करीता तळमजला अधिक दोन मजल्यांचे आर.सी.सी. बांधकामातील इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. या इमारतीत ४८ वर्ग खोल्या, ९ हॉल्स तसेच स्वतंत्र संडास बाथरुम, मुख्याध्यापक निवासस्थान, मुतारी व संरक्षक भिंत, स्टेज, पिण्याचे पाण्याची टाकी अशा अद्ययावत सोयी सुविधा करण्यात आलेल्या आहेत. सदर मिळकतीचा कब्जा दि.२८/०८/२००६ रोजी संस्थानने जिल्हा परिषद यांना दिलेला आहे.

ब) दि.२४ सप्टेंबर, २००९ रोजी झालेल्या अदलाबदलीच्या लेखान्वये वरीलप्रमाणे संपूर्ण इमारत जागेसह जि.प., अहमदनगर यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली असून त्यानुसार सदर जागा व इमारतीची मालकी जि.प., अहमदनगर यांची झाली आहे. तत्पुर्वी संस्थानचे शैक्षणिक संकलात जागेच्या कमतरतेमुळे कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग भरविण्यास अडचण निर्माण झाल्याने जून २००८ पासून उपरोक्त जि.प. शाळेच्या नवीन इमारतीत कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग भरविण्यात येत आहेत. सदर

इमारतीतील ९ हॉल व ११ वर्गखोल्या तसेच मुख्याध्यापक निवासस्थान संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयासाठी सध्या वापरात आहेत. सदर हॉल, खोल्या व मुख्याध्यापक निवासस्थान रिकामे करुन जि.प.शाळा, शिर्डी यांचे ताब्यात द्यावयाचे झाल्यास संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालय भरविणेसाठी इतरत्र व्यवस्था करावी लागेल.

त्यासाठी खालिल पर्यायांचा विचार करता येईल.

**०१)** संस्थानतर्फे शिर्डी सर्व्हे नं. २०७/२ मधील खरेदी करण्यात आलेली ८० आर जागा बिरेगाव भागाचे प्रस्तावित विकास योजनेत वाहनतळासाठी आरक्षित दर्शविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर ठिकाणी शाळा बांधकाम करावयाचे झाल्यास विकास योजनेत फेरबदलाचा प्रस्ताव सादर करुन त्यास शासनाची मंजुरी मिळालेनंतर शाळा बांधकामाबाबत पुढील कार्यवाही करता येईल.

**०२)** मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता. राहाता गट नं.२४५ पै. मधिल संस्थान जमिनीचे क्षेत्र ०३ हेक्टर ३० आर इतके आहे. तथापी प्रादेशिक विकास योजनेत सदरहू जमिन हरीत पट्ट्यात दर्शविलेली आहे. त्यामुळे याठिकाणीही सध्या शाळा बांधकाम अनुज्ञेय नाही. तसेच सदरहू जमिन शिर्डीपासून लांबचे अंतरावर (मंदिर परिसरापासूनचे अंतर सुमारे ४ कि.मी. इतके आहे.) असल्याने विद्यार्थ्यांना येण्याजाण्यास गैरसोयीचे ठरु शकते.

**०३)** मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १७२ मधिल साई आश्रम भाग-२ प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेतर्फे देणगीदाखल करण्यात आलेले आहे. याबाबत दि.०४/०२/२००६ रोजी संस्थान व त्यांचेमध्ये झालेल्या समझोता करारानुसार सदर इमारतींचा वापर हा साईभक्तांचे निवासासाठी करावयाचा आहे. सदर प्रकल्पातील एक इमारत कनिष्ठ महाविद्यालयाकरीता तात्पुरते वापरासाठी द्यावयाची झाल्यास तत्पुर्वी मा.श्री.के.व्ही.रमणी, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांची अनुमती घेणे आवश्यक राहील.

साईआश्रम भाग-२ येथिल इमारती अद्याप भक्तांच्या वापरासाठी खुल्या केलेल्या नाहीत. तसेच त्यांचा साईभक्तांचे निवासासाठी वापर सुरु केल्यानंतर त्या लगेचच पूर्ण क्षमतेने वापरात येण्याची शक्यता नाही. किमान सुरुवातीचे वर्षभरात सर्व इमारती पूर्ण भरण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे त्यातील एक संपूर्ण इमारत कनिष्ठ महाविद्यालयाकरीता दोन वर्षांचे कालावधीकरीता तात्पुरते वापरासाठी उपलब्ध करणेस हरकत नसावी. तसेच दरम्यानचे कालावधीत वरील क्र.१ मध्ये नमूद केलेप्रमाणे शिर्डी येथिल सर्व्हे क्र. २०७/२ मधिल ८० आर जागेत कनिष्ठ महाविद्यालयाकरीता कायमस्वरुपी इमारतींचे बांधकाम करणेकामी फेरबदल प्रस्ताव सादर करुन इतर आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाची सदयाची इमारत जिल्हा परीषदेने हस्तातरीत करण्याची मागणी केली असल्याने नवीन इमारतीचे बांधकाम होईपर्यत कनिष्ठ महाविद्यालयासाठी साईआश्रम नं.२ मधील 'सी ' इमारत तात्पुरती उपलब्ध करुन देता येईल.

उपरोक्त प्रस्तावावर दि. ०७/०२/२०१३ चे सभेत सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावास मान्यता मिळाली आहे. तसेच याकामी साईआश्रम भाग -२ प्रकल्पातील एक इमारत कनिष्ठ महाविद्यालया करीता तात्पुरते वापराकरीता घेण्यासाठी मा. श्री के. व्ही. रमणी कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचा अभिप्राय घेण्यात यावा असे ठरले होते.

मा.त्रीसदस्य समिती दि.०७/०२/२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ११६ मध्ये साईआश्रम भाग -२ प्रकल्पातील एक इमारत कनिष्ठ महाविद्यालया करीता तात्पुरते वापराकरीता घेण्यासाठी मा. श्री के. व्ही. रमणी कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचा अभिप्राय घेण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार जा.नं.एसएसएस-वशी/बांधकाम /५८६८/२०१३ दि.२२/०३/२०१३ अन्वये बांधकाम विभागा मार्फत मा. श्री के.व्ही.रमणी कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांना पत्र देण्यात आले होते. सदर पत्रावर मा. रमणी यांनी दि. १६/०४/२०१३ चे पत्रामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय कळविला आहे.

1. We would like to highlight that SaiAshram Package 1 and 2 building were built by Shirdi Sai Turst for the exclusive stay and use of Sai devotees only, as specifically provided in Clause 10 of our MoU dated 4th February 2006.
2. We Reproduce Clause 10 of our MoU dated 4th February 2006 below:
3. We are very concerned and disturbed that the 'C' building in SaiAshram Package 2 is being proposed to be used for Shri Saibaba junior College at Shirdi for a period of 3-4 years even before the SaiAshram Package 2 buildings have been opened for the use of devotees.
4. Therefore, we are not in favor of using these SaiAshram building for any other purpose other than stay of Sai devotes visiting Shirdi.
5. The main Purpose of contributing funds, time and efforts to construct the SaiAshram buildings by us is to provide the facilities fo Sai devotees only. We request to kindly utilize these SaiAshram package 1 and 2 building only for the stay of Sai devotees. As other vise the propose of Project will not be achieve.

6. We understand the need for accommodating the student of Shri Saibaba junior college.We Suggest that you may consider continuing them in the existing buildings at least at for another year utilizing the present school buildings of Sansthan on a two-shift basis. Shri Saibaba Sansthan can construct the new classroom for the junior college within one year. If required, we will be glad to make some donation towards partial cost for the construction of the junior college buildings proposed to the constructed by sansthan.
7. We request you to arrange to open SaiAshram Package 2, for providing low cost accommodation for the stay of devotees at the earliest.

मा.त्रीसदस्य समिती दि.०७/०२/२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ११६ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय साईआश्रम- २ मधील 'सी' इमारतीत स्थंलातरीत करण्यात यावे असे ठरले. तसेच मा.के.व्ही.रमणी यांचा अभिप्राय घ्यावा असेही ठरले. सदर निर्णयानुसार दिनांक २२ मार्च २०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी तसेच प्रशासकीय अधिकारी व वरीष्ठ मुख्य अभियंतासह पाहणी करुन महाविद्यालयाच्या कामाकाजाच्या दृष्टीने साईआश्रम -२ प्रकल्पातील 'डी 'इमारत कनिष्ठ महाविद्यालयाकरीता वापरण्यात यावी असे सुचविले, त्यानुसार महाविद्यालय 'डी ' इमारतीत सुरु करण्यात आलेले आहे .

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे वापरात असलेल्या जि.प.प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्या व हॉल तातडीने हस्तांतर करणेबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती,राहाता यांनी कळविले.सदरचे ठिकाणी जिल्हा परीषदेची मराठी प्राथमिक शाळा व उर्दु प्राथमिक शाळा सुरु आहे. तसेच दोन्ही मराठी व उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण झाल्याने त्या ठिकाणी फारच गर्दी, मुलांचा आवाज तसेच येणारे जाणारे स्थानिक रहिवाशी यांचा सतत वावर असल्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वर्गामध्ये शिकविणे अडचणीचे होत होते. त्यामुळे संस्थान व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०७/०२/२०१३ च्या निर्णयानुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय हे साईआश्रम- २ मधील इमारतीत स्थंलातरीत करणे आवश्यक असल्याने ठरावानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. सद्य परिस्थितीत संस्थानकडे दुसरी इमारत उपलब्ध नसल्याने तसेच दुसरा कोणताही पर्याय नसल्याने झालेली कार्यवाही योग्य आहे असे नम्र मत आहे. तरी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या जिल्हा परिषद शाळेकडे किती वर्ग उपलब्ध होऊ शकतात व इतर कोणत्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करता येऊ शकेल याबाबतची माहिती घेण्यात येऊन त्याचा अहवाल सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.६७ कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त असलेल्या शिक्षकांच्या सन २०१३-१४ मधील नेमणुकांकरीता मा.मंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव-** ऑगस्ट २००८ मध्ये मा. व्यवस्थापन समितीने मुलाखती घेऊन प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन, त्यानुसार यामुलाखतीमध्ये निवड झालेल्या खालील संबंधीत कर्मचाऱ्यांना सन २००८- ०९ या शैक्षणिक वर्षापासून संन २००८-०९, सन २००९-१०, सन २०१०-११, सन २०११-१२ व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाकरीता त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदनाम व मानधनानुसार नेमणूका देण्यात आलेल्या आहेत. सन २०१२-१३ शैक्षणिक वर्षामधील या नेमणूकांचा कालावधी दि.३० एप्रिल२०१३ अखेर पुर्ण झाला आहे.

| अ. नं. | नांव | शैक्षणिक पात्रता | विषय | नेमणूका तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
| १ | संगीता रंगनाथ बनसोडे | एम. एस्सी. बी.एड. | जीव शास्त्र | तासिक तत्वावर शिक्षण सेवक (मानधन रु.७२ प्रति घ.तास) | तासिक तत्वावर शिक्षण सेवक (मानधन रु.७२ प्रति घ.तास) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ सहा.शिक्षक (परीवीक्षाधीन) (मासिक मानधन रु.४५००) |
| २ | उषा कोंडाजी गायके | एम.सी. एम. | माहिती तंत्रज्ञान | तासिक तत्वावर शिक्षण सेवक (मानधन रु.७२ प्रति घ.तास) | तासिक तत्वावर शिक्षण सेवक (मानधन रु.७२ प्रति घ.तास) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ सहा.शिक्षक (परीवीक्षाधीन) (मासिक मानधन रु.४५००) |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | रंगनाथ चांगदेव रहाणे | एम.ए बी.एड. | भूगोल | ------- | तासिक तत्वावर शिक्षण सेवक (मानधन रु.७२ प्रति घ.तास) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ सहा.शिक्षक (परीवीक्षाधीन) (मासिक मानधन रु.४५००) |
| ४ | प्रमोद भिवसेन चौधरी | एम. एस्सी. बी.एड. | भौतिक शास्त्र | -------- | तासिक तत्वावर शिक्षण सेवक (मानधन रु.७२ प्रति घ.तास) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ शिक्षण सेवक (मासिक मानधन रु.२५००) | अर्धवेळ सहा.शिक्षक (परीवीक्षाधीन) (मासिक मानधन रु.४५००) |
| शासन निर्णयानुसार व व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.०१ जानेवारी २०१२ पासून दि. ३० एप्रिल २०१३ अखेर पर्यंत वरील सर्वाना मानधन रु.२५००/- प्रति माह ऐवजी रु.४५००/- प्रति माह प्रमाणे व पदनाम अर्धवेळ सहाय्यक शिक्षक (परिवीक्षाधिन ) (अर्धवेळ -उच्च माध्यमिक ) असे करण्यात आले आहे. | | | | | | | | |

**१)** वरील अ.नं. १ व २ यांनी सलग पाच वर्षे काम केले असून यापैकी २ वर्षे तासिका तत्वावर शिक्षण सेवक अणि ३ वर्षे अर्धवेळ शिक्षण सेवक म्हणून काम केलेले आहे. तसेच अ.नं. ३ व ४ यांनी सलग चार वर्षे काम केलेले असून यापैकी १ वर्षे तासिका तत्वावर शिक्षण सेवक आणि ३ वर्षे अर्धवेळ शिक्षण सेवक म्हणून काम केलेले आहे. नेमणूक काळात या सर्वांचे काम समाधानकारक आहे

**२)** नेमणूक काळात वरील १ ते ४ यांचे काम समाधानकारक आहे. शाळा संहिता व शासन पुरक पत्र क्रमांक एसएसएन/१०९९ (३४०/९९)/ माशि-२/दि.१० जून २००५ नुसार त्यांना उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी लागू असलेल्या (वेतनबँड ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबँड ४१५०-१७४०० + ग्रेड वेतन २३०० ) मध्ये सुरुवातीचे मुळ वेतन ६२७० + ग्रेड वेतन २३०० ) वेतन देय होत आहे. अर्धवेळ कर्मचा-यासाठी घरभाडे भत्ता लागू नसल्याने, सदरचे वेतन देतांना फक्त मुळ वेतन व महागाई भत्ता देय होईल. त्यानुसार दि.१ मे २०१३ पासून पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरती नेमणूक देता येईल.

सदरचा विषय मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेसाठी ठेवता येईल.

प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.५०० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त चार शिक्षण सेवकांची यापूर्वी वृत्तपत्रात जाहिरात देऊन, लेखी परीक्षा तसेच तोंडी मुलाखती घेऊन नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या नेमणूका हया नव्याने करण्यात येत नसल्यामुळे सदरहू प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक नाही.**

**त्यामुळे प्रस्तावात नमुद केलेल्या चार शिक्षण सेवकांना दि.१ मे २०१३ पासून उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी लागू असलेल्या (वेतनबँड ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबँड ४१५०-१७४०० + ग्रेड वेतन २३००) मध्ये सुरुवातीचे मुळ वेतन ६२७० + ग्रेड वेतन २३०० या वेतश्रेणीवर नेमणूका देण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.६८ श्रीमती प्राजक्ता दत्तात्रय वैद्य, निदेशक आय.टी. ॲण्ड ई.एस.एम यांनी विहीत अर्हता प्रगत प्रशिक्षण पुर्ण केल्यामुळे त्यांना एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीचा इ.मा.व. या प्रवर्गामधील पदावर शैक्षणिक व प्रवर्ग अर्हतेनुसार नेमणूक आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद-**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. १)** दि.१७.०५.२००९ ची सभा, निर्णय क्र.४७५

**२)** दि.१३.०२.२०११ ची सभा, निर्णय क्र.२ (३)

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये श्रीनिवासुलु हे आय.टी.ई.एस.एम. निदेशक पदावरुन दि.३१/०१/२०१० रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे हे पद रिक्त झाले. त्यानंतर हे पद आरक्षणानुसार 'इतर मागासवर्ग' या प्रवर्गामध्ये वर्ग झाले. सदर पदाला वेतनश्रेणी ही सध्याचा सहाव्या वेतन आयोगानुसार ९३००-३४८०० मध्ये ग्रेड पे ४३०० आहे. सदरचे पद भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देवून अर्ज मागवून भरण्याचे माननीय व्यवस्थापन समितीच्या दि.१७/०५/२००९ च्या सभेतील निर्णय क्र.४७५ नुसार भरण्याचे ठरले. त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भ क्र.०१ च्या जाहीरातीने प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन दि.२९/१०/२०१० रोजी उमेदवारांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आल्या तसेच दि.१३/२/२०११ रोजी निवड समीतीव्दारे उमेदवारांच्या मुलाखती घेवून व्यवस्थापन समिती निर्णय क्र.०२

(०३) नुसार सदरचे पदावर इतर मागासवर्ग संवर्गातील उमेदवार प्राजक्ता दत्तात्रय वैद्य, यांची निवड निश्चित झाली.

आपल्या २००९ मधिल जाहिराती नुसार इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेंन्टेनन्स (आय टी ॲण्ड ई एस एम) निदेशक या पदासाठी शैक्षणिक अर्हता ही संबंधीत शाखेची पदविका म्हणजे (संगणक व /किवा इलेक्ट्रॉनिक्स इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेली कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी) आवष्यक होती. पैकी संगणक अभियांत्रीकी शाखेची बोर्ड ऑफ टेक्नीकल एज्युकेशन,महाराष्ट्र राज्य यांची पदविका ही अर्हता श्रीमती वैद्य यांचे कडे होती. तसेचओ.बी.सी.प्रवर्ग पात्रता ही होती. मात्र जाहिरातीमध्ये नमूद केलेली केंद्र शासनाच्या ए.टी.आय. संस्थेमधील निदेशक प्रशिक्षणाची किमान दोन मोडयुल पुर्ण असावे, ही अर्हता मुलाखतीच्या वेळी नव्हती. त्यामुळे श्रीमती वैद्य यांना त्यांनतर दि.०८/०४/२०११ पासून दि.३१/०७/२०१३ पर्यंत तीन वेळा स्वतंत्र एका/एका प्रशिक्षण वर्षासाठी त्यांना दरमहा रु.१२०००/- एकत्रित वेतनावर नियुक्ती देण्यात आलेल्या आहेत.

या दरम्यान श्रीमती वैद्य यांनी लेखी अर्ज करुन व लेखी पुर्व परवानगीने केंद्र शासनाच्या हैद्राबाद येथील ए.टी.आय/ ई.पी.आय या संस्थेमध्ये त्यांच्या पदाच्या इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेंन्टेनन्स (आयटी ॲण्ड ई एस एम) निदेशक पदासाठी आवश्यक असलेले ट्रेड टेक्नॉलॉजी (टीटी) भाग १ व २ व प्रिन्सीपल ऑफ टिचींग (पीओटी) हे निदेशक प्रशिक्षण मोडयुल यशस्वीरित्या पुर्ण केले आहेत.

आता २०१२ मध्ये केंद्र शासनांनी सुधारणा केलेल्या या ट्रेडच्या अभ्यासक्रम पुस्तीकेमध्ये या पदाची शैक्षणिक अर्हता इलेक्ट्रॉनिक्स /इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेली कम्युनिकेशन या अभियांत्रीक शाखेची पदवी, दोन वर्षे अनुभव किंवा पदविका व तीन वर्षे अनुभव किंवा आय टी आय/ शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र व पाच वर्षे अनुभव तसेच निदेशक प्रशिक्षण प्रमाणपत्र असणे इष्ट अशी दाखवली आहे.

**मागणी**:- वरील संदर्भ क्र.०४ नुसार श्रीमती वैद्य यांनी त्यांची प्रशिक्षण अर्हता पुर्ण झाल्यामुळे सदर पदावर त्यांना नियमित वेतनश्रेणीमध्ये समाविष्ट करुन घ्यावे अशी विनंती केली आहे. श्रीमती वैद्य यांचेकडे आता संगणकाची अभियांत्रिकी पदविका तसेच संगणक व इलेक्ट्रॉनिक सिस्टीम मेंन्टेनन्स ट्रेड टेक्नॉलॉजीचे एकत्रित निदेशक प्रशिक्षण दोन मोडयुल पुर्ण आहेत.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-**

व्यवस्थापन समितीचा ठराव, सदर पदासाठी वर्तमानपत्रात दिलेली जाहीरात,आलेल्या अर्जांची छाननी, उमेदवांराच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा,तसेच मुलाखत व निवड, जातीचा दाखला व वैधता प्रमाणपत्र, तसेच शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र या सर्व कागदपत्र पडताळणी केली. मुळ नियुक्तीचे वेळी असलेली अर्हता व आताची अर्हता यामध्ये काहीसा बदल झालेला आहे.दोन अभियांत्रिकी शाखेचा एकत्रीत अभ्यासक्रम आयटी ॲण्ड ई एस एम या ट्रेडला असुनशैक्षणिक अर्हता संगणक शाखेतील व निदेशक प्रशिक्षण संगणक व इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम मेंन्टेनन्स एकत्रित या दोघांचा झालेला आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** १) श्रीमती वैद्य यांचे कडील नियुक्तीच्या वेळी अपुर्ण असलेली निदेशक प्रशिक्षणाची अर्हता पुर्ण स्पष्ट मत झालेली आहे, त्या स्वतः या पदासाठी आवश्यक असलेल्या इतर मागासवर्गीय (माळी) या प्रवर्गातील आहेत, त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्यामुळे त्यांना 'इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स सिटीम मेंन्टेनन्स (आयटी ॲण्ड ई एस एम) निदेशक' या पदावर रुपये ९३००-३४८०० यावेतनश्रेणीत ग्रेड-पे-४३०० नुसार नियुक्ती आदेश देता येईल. त्यांचा प्रशिक्षण कालावधी त्यांनी पुर्ण केल्याची माहीती दि.१९-०९-२०१२ रोजी सादर केली आहे.

२) सदर दि.१९-०९-२०१२ तारखे पासुन त्यांना विहीत वेतनश्रेणीत एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीचा आदेश देणेबाबत विचार व्हावा.तसा निर्णय झाल्यास त्यांना या कालावधीची वेतनातील फरक रक्कम अदा करावी लागेल.

३) संदर्भ क्र.०४ वरिल त्याचा ३१.७.२०१२ पर्यंतचा उर्वरीत कालावधीचा यापुर्वीचा आदेश संपुष्ठात आणता येईल.

४) नियुक्ती आदेश देणेबाबत उचित निर्णय होणेसाठी प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीच्या सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५०१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, श्री साईबाबा औद्योगिक केंद्र)

---

**विषय नं.६९ संस्थानव्दारा प्रिटींग प्रेसची उभारणी करणेकामी प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ज्ञाची (Expert) नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.८३८ नुसार,संस्थानची प्रकाशने छपाई करणेसाठी प्रतिवर्षी सुमारे दहा कोटी एवढा खर्च संस्थानला करावा लागतो. तसेच ब-याच वेळा छपाई केलेली संस्थान प्रकाशने वेळेवर उपलब्ध होऊ शकत नाहीत. हे विचारात घेता, संस्थानची प्रकाशने छपाई

करणेसाठी संस्थानची स्वतःची अद्ययावत प्रेस उभारणी करणे आवश्यक झालेले आहे. त्यादृष्टीने सर्व बाबींचा विचार करुन संस्थानची अद्यावत प्रेस उभारणी करणेसाठी स्वतंत्र प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत यावा असा निर्णय पारीत झाला आहे.

तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टात पी.आय.एल नं.१८/२०११ मध्ये श्री संदिप विजय कुलकर्णी व इतर यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.४४७७/२०१३ अन्वये जनहित याचीका दाखल केलेली आहे. त्यात याचिका कर्त्याने संस्थानने स्वतःची प्रिंटींग प्रेस उभारावी अशी विनंती केली आहे.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष साहेब यांचेकडील दि.२०.०४.२०१३ चे पत्रानुसार संस्थानद्वारा प्रिंटींग प्रेस सुरु करणेबाबत प्रकल्प अहवाल तयार करणेकामी (Expert) तज्ज्ञ नेमण्याचा प्रस्ताव सादर करावा असे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार तांत्रिक सल्लागार (Technical adviser/Expert) तज्ञ म्हणून श्री चंद्रशेखर गजानन सातपुते, सरव्यवस्थापक, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे यांची नेमणूक करणेबाबत प्रस्ताव सादर केला असता. मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रिंटींग क्षेत्रातील तांत्रिक सल्लागार (Expert Technical consultant) नेमणूकीसाठी जाहिरात देणे उचित होईल असे सुचित केले आहे. जाहिरातीसाठी अंदाजे रु.१०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

तरी याकामी खालील बाबींवर निर्णय होणेस सादर.

१) संस्थानद्वारा प्रिंटींग प्रेसची उभारणी करणेकामी प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ज्ञाची नेमणूक करणेस मान्यता असावी.

२) याकामी वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिद्ध करणेस मान्यता असावी.

३) जाहिरातीचे मसुद्यास मान्यता असावी.

४) जाहिराती कामी येणा-या अंदाजे रु.१०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानद्वारा प्रिंटींग प्रेसची उभारणी करणेकामी प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी तज्ज्ञाची नेमणूक करणेसाठी वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करणेस व याकामी येणाऱ्या रु.१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.७० साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित पुस्तके पुर्नमुद्रण करणेकामी वृत्तपत्रात जाहिरात देणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन ,त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील

उपरोक्त तरतूदीनुसार प.पू.श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी मार्फत संस्थान प्रकाशित साईचरीत्रे,पुस्तके,फोटो व ऑडीओ / व्हीडीओ सीडी चे पुनरमुद्रण करुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

सर्व साधारण एक वर्ष पुरेल एवढया प्रतींची छपाई केली जाते. जाहिरात प्रसिद्ध करणे, निविदांची विक्री करणे, प्राप्त सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणे, वाटाघाटी करणे, अशा कामासाठी बराच कालावधी लागतो त्यामुळे ८ ते ९ महिने पुरेल एवढा साठा शिल्लक राहिल्यानंतर छपाईची कार्यवाही चालू करण्यात येते.

पुर्नमुद्रण करावयाची पुस्तके, शिल्लक साठा,अंदाजे किती महिने साठा पुरेल व प्रस्तावित छपाई याबाबतचे परिशिष्ट खालील प्रमाणे.

| अ. नं. | पुस्तकाचे नाव | भाषा | वार्षिक खप | आज अखेर साठा | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे दराने येणारा एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अर्वाचिनभक्त व संत लिलामृत यातील ४ अध्याय आवृत्ती क्र.२ | गुजराथी | १००० | २८१ | ४ | १५०० | ३.०० | ४.०० | ६०००.०० |
| २ | शिलधी - आवृत्ती क्र.४ | मराठी | २३५३ | १६८७ | ९ | ३००० | ५.९५ | ८.०० | २४०००.०० |
| ३ | श्री साईलीलामृत- आवृत्ती क्र.११ | हिंदी | १११८८ | ७६४४ | ९ | १५००० | १६.९० | २०.०० | ३०००००.०० |
| ४ | श्री साईलीलामृत- आवृत्ती क्र. २ | गुजराथी | ९६८ | ३९२ | ५ | १५०० | १२.७५ | २०.०० | ३००००.०० |
| ५ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती -आवृत्ती क्र.४ | तामीळ | ७००० | ४९३१ | ९ | १०००० | १३.१५ | १५.०० | १५००००.०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | श्री साईनाथ स्तवन मंजरी - आवृत्ती क्र.३४ | मराठी | ८९६५० | ६०४७४ | ८ | १००००० | ०१.३४ | ३.०० | ३०००००.०० |
| ७ | श्री साईलीलामृत- आवृत्ती क्र.१९ | मराठी | ५०५९ | २०० | १ | ६००० | १२.१० | २०.०० | १२००००.०० |
| | | | | | | | | **एकूण रु.** | **९३००००.००** |

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या हुकूमनाम्यानुसार वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसारीत करुन निविदा प्रपत्रे विक्री करावी लागेल. उपरोक्त परिशिष्टात दर्शविलेनुसार पुस्तके छपाई करणेकामी अंदाजे एकूण रू.९,३०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा पुस्तके/फोटो छपाईसाठी सन २०१३-२०१४ मंजूर बजेट रुपये ११,८७,५०,०००/- मधून करता येईल.

जाहिरातीनुसार नियत मुदतीत प्राप्त निविदा मा.व्य.समितीचे सभेपुढे उघडणेत येऊन, पात्र निविदा धारकांना चर्चा/वाटाघाटीस मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निमंत्रित करणेत येईल. चर्चा वाटाघाटी अंती देऊ केलेल्या निम्नतम दराने छपाईकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेऊन छपाई कार्यादेश देणेत येतील.

सबब जनसंपर्क कार्यालयाद्वारा वृत्तपत्रात जाहिरात देणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास व मंजूरी मिळणेसाठी सादर

**निर्णय क्र.५०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.७१ गुलाब प्लॉट ऐवजी सोनचाफा प्लॉट करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** नवीन भक्त निवासचे पाठीमागील भागात बगीचा विभागा मार्फत गुलाब बाग तयार करण्यात आलेली आहे. या बागेत विविध रंगाची गुलाब फुले लावण्यात आलेली आहे.सदरची बाग ही निवासस्थान इमारती पासून जवळ असल्याने भक्त निवास इमारतीत राहणारे साईभक्त फिरण्यासाठी या बागेत येतात, बागेत फोटो काढतात. सन २००० मध्ये या गुलाब बागेची लागवड केलेली आहे. या पूर्वी दोन वेगवेगळया ठिकाणी खड्डे घेउुन रोपे बदलेली आहे. कायम स्वरुपी एका जागेवर गुलाबाचे झाडे असल्यामुळे या ठिकाणी नवीन गुलाबाचे झाडे लावले असता ते रोगाला लवकर बळी पडतात त्यामुळे त्याजागी दुसरी फुलांची झाडे लावल्यास त्यांचा फायदा होईल.

सदरचे क्षेत्र साधारणत: एक एकर क्षेत्र असून त्या मध्ये १४ प्लॉट करुन त्यात ब्लॉकचे रस्ते तयार केलेले आहे. या बागेमध्ये विविध प्रकारचे चाफे उदा. सोनचाफा, हिरवा चाफा, पिवळा चाफा, पांढरा चाफा व काही कमी उंचीचे हायब्रीड चाफे वेगवेगळया प्लॉट मध्ये केल्यास ते अकर्षक दिसेल.

चाफ्याची फुले ही सुगंधी असल्यामुळे ती 'श्रींचे' समाधीवर वाहण्यासाठी उपयोगी ठरतील. तरी या ठिकाणी गुलाब बागे ऐवजी चाफा प्लॉट तयार करता येईल.

चाफ्याची उंची साधरणता ६ ते ७ फुटापर्यत ठेवता येईल. एका प्लॉट मध्ये १६ रोपे या प्रमाणे १४ प्लॉटसाठी त्यांचे नियोजन करता येईल. या प्लॉट मध्ये साधारणता २२४ झाडे लागतील.

| अ.क्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | खड्डे खोदाई रु.२५/- प्रमाणे २२४ नग | रु. ५६००/- |
| ०२. | रोपे खरेदी रु.५००/- प्रमाणे २२४ नग | रु. ११२०००/- |
| ०३. | पोयटा रु.१८०० प्रमाण ६.५ ब्रास | रु. ११७००/- |
| ०४. | शेणखत | रु. १००००/- |
| | एकुण | रु. १३९३००/- |

याकामी अंदाजे रु.१,४०,०००/- (रु. एक लाख चाळीस हजार ) मात्र खर्च अपेक्षित आहे तरी गुलाब बागेचे जागेवर विविध प्रकारची सुगंधी चाफयाची झाडे लावण्यास येतील.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन भक्तनिवासस्थानचे पाठीमागील भागात बगीचा विभागामार्फत गुलाब बाग ऐवजी विविध प्रकारची सुगंधी सोनचाफ्याची बाग तयार करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.७२ शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील चिक्कू बागेची खोती देण्यात आलेली खोती रद्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचा चिक्कू बाग हा पानमळा रोडला सर्व्हे नं.१२४ मध्ये असून त्यात २०२ नग झाडे आहेत. दि.८/१२/२०१२ रोजी मा.त्रिसदस्यीय समिती समोर श्री.बब्बु रफिक पठाण यांना १ लाख रुपय रक्कमेला दोन वर्षासाठी खोती दिलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र १००४ अन्वये शिर्डी येथील सर्व्हे नं १२४ मधील चिक्कु बागेची बब्बु रफिक पठाण, शिर्डी यांना रु.१,००,०००/- मात्र उच्चतम दराने नोव्हेंबर २०१२ ते जून २०१४ या कालावधीसाठी खोती देयात यावी. तसेच बब्बु रफिक पठाण शिर्डी

यांचे कडून रु.२०,०००/- मात्र अनामत रक्कम जमा करुन घेण्यात यावी व दोन वर्षा मध्ये तीन टप्प्याने रकमेचा भरणा करुन घ्यावा असे ठरले आहे.

श्री पठाण यांना जा. क्र एसएसएसटी/ वशी-बगीचा/ ४७०३/२०१३.दि.१४/०१/२०१३ रोजी खोती बाबत आदेश देण्यात आलेला आहे. या आदेशानुसार त्यांना आपण रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बाबत व अनामत रक्कम रु. २०,०००/- भरणे बाबत कळविण्यात आलेले आहे.श्री पठाण यांनी अनामत रक्कम रु.२०,०००/- या पैकी रु.१०,०००/- मात्र अनामत रक्कम लेखाशाखा पावती नं १७१० दिनांक १५/०१/२०१३ ने संस्थानकडे जमा केलेले आहेत.

श्री पठाण यांचे संदर्भीय पत्र ०२ ने श्री.बब्बु रफिक पठाण रा.शिर्डी यांनी संस्थानला दिनांक ०३/०५/२०१३ रोजीचे पत्राने कळविलेले आहे की, मी चिक्कू बागेची खोती सन २०१३ व २०१४ या दोन वर्षाच्या कालावधीसाठी एक लाख रुपये रक्कमेला घेतलेली आहे. परंतू बागेतील पाण्याचे बोर व इरिगेशन केनॉलला जानेवारी २०१३ पासून पाणी न आल्यामुळे चिक्कू बाग पुर्णपणे वाळून गेलेली असून फळांची गळती झालेली आहे. त्यामुळे मला एकाही फळाची तोडणी करता आली नाही. त्यामुळे मला ५० टक्के रक्कम माफ करावी. अशी पत्रातून त्यांनी विनंती केलेली आहे.

हया वर्षी पाण्याचा तुटवडा असल्या कारणामुळे सदरच्या चिक्कू बागेला पाणी न मिळाल्याने पाने गळून गेलेली आहेत व फळ पक्व न होताच गळून पडत आहेत. बागेमध्ये पाणी देण्यासाठी १ बोअरवेल ची सोय केलेली आहे. परंतु केनॉल व परिसरात पाणी न आल्यामुळे सदरचा बोअरवेल बंद आहे. चिक्कू बागेच्या फळाचा सिजन हा मार्च ते मे असा आहे. परंतु या काळात पाणी न मिळाल्याने त्यांना फळाची तोडणी करता आलेली नाही. यापुर्वी श्री.बब्बु रफिक पठाण यांनी २ वेळेस चिक्कू बाग खोती घेतलेला आहे. व त्यांनी पुर्ण रक्कम भरलेली आहे.

श्री बब्बु रफिक पठाण, शिर्डी यांना रु.१,००,०००/- मात्र रक्कमेला नोव्हेंबर २०१२ ते जून २०१४ या कालावधीसाठी खोती देण्यात आलेली त्यांनी संस्थानकडे अनामत रक्कम रु. १०,०००/- ( रु. दहा हजार) मात्र भरलेली आहे. श्री बब्बु रफिक पठाण, शिर्डी यांनी भरलेली रु.१०,०००/- मात्र संस्थानेकडे जमा करुन त्यांची नोव्हेंबर २०१२ ते जून २०१४ या कालावधीतील खोती रद्द करता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.७३ लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलरकरीता वार्षीक इंधन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद-** २१ (१) (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्ताविक-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, मंदिर, वाहन इ. विभागाकडील चादर,बेडशीट,रग,गादीकव्हर, उशीकव्हर, बसेसचे शीटकव्हर, आदी कपडे धुवून इस्त्री करुन देण्यात येतात.याकामी लॉण्ड्रीचे कामकाज गरजेनुसार दोन पाळयांमध्ये करण्यात येते. सदरचे कपडे धुण्याचे कामी २ युनिट (दोन मशिनरी) कार्यान्वित करण्यात आलेले आहे.त्याद्वारे प्रतिदिवशी (दोन शिफ्ट असल्यास)साधारणपणे १५०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात.

व्ही.आय.पी.खोल्यांचे धुतलेले टॉवेल सुकविण्यासाठी तसेच पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी स्टीम बॉयलरव्दारे स्टीम देवून कपडे सुकविले जातात.धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडर मशिनचा दैनंदिन वापर केला जातो.याकरीता कॅलेन्डरींग मशिनला स्टीम सोडावी लागते, मशीनमध्ये धुवून पिळलेले बेडशीट,उशीकव्हर घातल्यावर सुकून इस्त्री होवून बाहेर पडतात.यासर्व मशिनसाठी स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे.त्याकरीता डिझेल, आईल, ग्रीस श्री साई सर्व्हिस सेन्टर, सावळीविहीर यांचे पेट्रोल पंपावरुन आवश्यकतेनुसार खरेदीकेले जाते.माहे एप्रिल-२०१२ ते माहे मार्च-२०१३ अखेर ५,९०० लिटर डिझेल खरेदी करुन वापरण्यात आलेले आहे.

स्टिम बॉयलर करीता दररोज सरासरी १८ लिटर डिझेल (दरमहा ५४० लि.डिझेल) लागते,एका वर्षाकरीता स्टिम बॉयलर व कॅलेंडर मशिनकरीता १० लिटर ऑईल व सर्व मशिनरीसाठी ३ किलो ग्रीस लागते.

**मागणी -** माहे जुलै-२०१३ ते माहे जुन-२०१४ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७००० लिटर डिझेल स्टीम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी १० लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ३ किलो ग्रीसची आवश्यकता असुन त्याकामी अंदाजे रु.४,५०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख पन्नास हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.सदरचे डिझेल,आईल,ग्रीस श्री साई सर्व्हिस सेंटर,सावळीविहीर यांचे पेट्रोल पंपावरुन खरेदी करता येईल.

**संस्थान अधिनियम यानुसार छाननीकरुन अनुमान-**

नमूद आधिनियमातील तरतुदी नुसार संस्थानकडे असणा-या मशिनरी करीता इंधनाची आवश्यकता असल्याने ते खरेदी करावे लागेल.

**विभागाचा अभिप्राय-**

माहे जुलै-२०१३ ते माहे जुन-२०१४ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७००० लिटर डिझेल स्टीम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी १० लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ३ किलो ग्रीसची आवश्यकता असुन त्याकामी अंदाजे रु.४,५०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख पन्नास हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.सदरचे डिझेल,आईल,ग्रीस श्री साई सर्व्हिस सेंटर,सावळिविहीर यांचे पेट्रोल पंपावरुन खरेदी करता येईल.

वरीलप्रमाणे इंधन खरेदीस अंदाजे रुपये ४,५०,०००/- (अक्षरी रु.चार लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

सन २०१३/२०१४ चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये धुलाई व गणवेश खर्च याबाबीकरीता रुपये १०,००,०००/- मात्रची तरतुद आहे.

तरी माहे जुलै-२०१३ ते माहे जुन-२०१४ या एका वर्षाचे कालावधीकरीता उपरोक्तचे खर्चास मान्यता मिळणेस व शिरस्त्याप्रमाणे श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर यांचे पेट्रोल पंपावरुन आवश्यकतेनुसार खरेदी करण्यास मान्यता देणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील विविध विभागांना लागणारे इंधन खरेदीबाबत दि.२७.०४.२०१३ चे सभेमध्ये निर्णय क्र.४०६ अन्वये शिर्डी परिसरातील तीन पेट्रोल पंप जे संस्थानला प्रती लिटर ३० पैसे सवलत आणि एक महिन्यापर्यंत क्रेडीट देणेस तयार असतील अशा पंपावरुन इंधन खरेदी करणेत यावे, त्याप्रमाणे कार्यवाही करणेस व लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलरकरीता वार्षीक इंधन, ऑईल, ग्रीस खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रुपये ४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

विषय नं.७४ **संस्थानचे निवासस्थानमध्ये रहाणाऱ्या आजारी असलेल्या भक्तांची औषधे फ्रीजमध्ये ठेवणेकामी फ्रीज खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे दर्शनासाठी वेगवेगळया राज्यातुन हजारो भक्त शिर्डी येथे येत असतात भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी संस्थानचे द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा ही निवासस्थाने असुन निवासीय खोल्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | इमारतीचे नाव | एकूण रुम | निवासक्षमता (भक्तांची संख्या) |
|---|---|---|---|
| १ | द्वारावती भक्तनिवास | ३१६ | १५८० |
| २ | साईबाबा भक्तनिवास | ५०२ | ३००० |
| ३ | साईआश्रम भक्तनिवास | १५३६ | ७६८० |
| ४ | साई धर्मशाळा | १९२ हॉल | ४८०० |

उपरोक्त भक्तनिवासमध्ये काही भक्त दोन ते तीन दिवस रुम घेऊन राहतात. पैकी काही भक्तांना मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनी, दमा, असे आजार असतात. काही आजारांची औषधे फ्रीजमध्ये ठेवणे आवश्यक असते. अशावेळेस निवासस्थानामध्ये फ्रीजची सुविधा नाही. त्यामुळे उदा.मधुमेहासाठी असणारे इन्सुलिन (इंजेक्शन) बाहेर जास्त दिवस ठेवता येत नाही, त्यामुळे भक्तांनी अशी इंजेक्शन घेतल्यास त्यांचे आरोग्यास अपाय होण्याची शक्यता असते. अशाआजारी असलेल्या भक्तांचे आरोग्य चांगले रहावे. त्यांना औषधे वेळेत घेण्यात यावीत. त्यांची औषधे फ्रीजमध्ये सुरक्षित ठेवणेकामी चारही निवासस्थानासाठी चार फ्रीज खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यासाठी नामांकीत सॅमसंग कंपनी १९० लिटर या एका फ्रीजची किंमत अंदाजे रु.१६,०००/- असुन चार निवासीय विभागासाठी १ याप्रमाणे ४ फ्रीज खरेदीकामी अंदाजे रु. ६४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

१) सदरचे ४ फ्रीज खरेदी करणे व त्याकामी अंदाजे रु. ६४,०००/- च्या खर्चास,

२) मा. त्रीसदस्य समितीचे मान्यतेनंतर सदरचे फ्रीज खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदीची प्रक्रिया चालु असतांना, एखादा साईभक्त देणगी दाखल १ किंवा आपणास आवश्यक असलेले ४ फ्रीज देणगी म्हणुन देत असेल तर त्याप्रमाणे देणगी स्विकारण्याच्या प्रस्तावास व खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयासाठी सादर.

निर्णय क्र.५०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे निवासस्थानमध्ये रहाणाऱ्या आजारी असलेल्या भक्तांची औषधे ठेवणेकामी आवश्यक असलेले ४ नग फ्रीज देणगी मिळाल्यास स्विकारणेत यावे अथवा संस्थानमार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेत यावे, याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, साईआश्रम भाग १ व २)

---

**विषय नं.७५ पाद्यपुजा व भारताचे संविधानाबाबत. (श्री.संजय काळे, कोपरगांव यांचे पत्र.)**

**प्रस्ताव-** श्रींचे महत्वाचे उत्सव पाडवा, दिवाळी, दिवाळी पाडवा व इतर संस्थानचे महत्वाचे उत्सव अशावेळी तसेच श्रींचे दर्शनासाठी येणारे महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्तींच्या हस्ते श्रींचे समाधी मंदिरातील पादुकांना पाद्यपूजा करण्याची पूर्वापार पद्धत आहे. श्रींचे दर्शनासाठी येणारे केंद्राचे व राज्याचे मा.मंत्री महोदय, स्थानिक मा.खासदार, मा.आमदार, मा.खासदार,मा.महापौर, आय.ए.एस.अधिकारी, आय.पी.एस. अधिकारी, शासकीय वर्ग १चे अधिकारी, मा.सरन्यायाधिश, सुप्रिम कोर्ट मा.न्यायाधिश, हायकोर्ट मा.न्यायाधीश, देणगीदार साईभक्त व इतर अति महत्वाचे व्यक्तींमार्फत संस्थानतर्फे श्रींची पाद्यपूजा रुढी व परंपरेनुसार करण्यात येतात. या व्यतिरीक्त पाडवा, दिवाळी पाडवा व इतर संस्थानचे उत्सवाचे वेळी श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीपुण्यतिथी उत्सवाचे कालावधीमध्ये मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय, मा.विश्वस्त महोदय अथवा समिती सदस्य यांचे हस्ते पाद्यपूजा करण्याची पूर्वपार व रुढीप्रमाणे पद्धत चालत आलेली आहे. श्री.संजय भास्करराव काळे यांनी दि.२१.१२.२०१२ रोजी पत्र दिलेले आहे. सदर पत्रामध्ये खालीलप्रमाणे सूचना केलेल्या आहेत सदर सूचनेनुसार खालीलप्रमाणे व्यवस्था करणेबाबत विचार व्हावा असे नम्र मत आहे-

| अ.क्र | श्री.काळे यांच्या सूचना | त्याबाबतचे नियोजन, खुलासा |
|---|---|---|
| ०१ | पाद्यपूजा रोज अर्धा तास व्हावी. त्याची वेळ निश्चित व्हावी. | महिन्यातून २ ते ३ व्यक्तींच्या हस्ते पाद्यपूजा करण्यात येतात त्यासाठी २ ते ३ मिनीटे एका पाद्यपूजेकरीता वेळ लागतो. त्यांचे सूचनेनुसार दररोज पाद्यपूजेकरीता अर्धा तास दिल्यास दर्शनरांग दररोज अर्धा तास बंद राहील, गर्दीमुळे हे शक्य होणार नाही, असे वाटते. पूर्वपार पद्धत चालत आलेली असल्यामुळे त्यात बदल करणे म्हणजे भक्तांच्या भावनेशी खेळल्यासारखे होईल व कायदयाला धरुन होणार नाही करीता नवीन पद्धत चालू करु नये असे नम्र मत आहे. |
| ०२ | पाद्यपूजा सशुल्क देखील करावी. त्याचा शुल्क ठरवण्यात यावा. | पाद्यपूजा ही परंपरेनुसार व रुढीनुसार असल्यामुळे त्याकामी शुल्क लावू नये असे नम्र मत आहे. शिवाय संस्थानचे उत्सव व इतर उत्सवात पाद्यपूजा करण्याची पद्धती पूर्वापार व रुढीप्रमाणे चालत आलेली आहे. |
| ०३ | पाद्यपूजासाठी सामान्य भक्ताला लॉटरी द्वारे मान मिळावा. त्यासाठी रोज लॉटरी द्वारे दोन ते पाच भक्तांना संधी प्राप्त व्हावी. | पुर्वीपासुन लॉटरीद्वारे पाद्यपूजेची पारंपारिक पद्धत नसल्याने पाद्यपूजा लॉटरीद्वारे केल्यास पाद्यपूजेला बाजारु असे स्वरुप प्राप्त होईल.श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. साधारणपणे दररोजच गर्दी असते. अपेक्षितांची संख्या मोठ्या प्रमाणात राहील. त्याप्रमाणात दररोज भक्तांना पाद्यपूजेची संधी देणे शक्य होणार नाही. पूर्वी ००/५०पैशात समाधी चौथ-यावर बसून अभिषेक पूजा करीत असत. भक्तांच्या गर्दीचे प्रमाणात वाढ होत गेल्यामुळे समाधीवर अभिषेक पूजा बंद करणेसाठी प्रशासनास पोलीस यंत्रणेची मदत घ्यावी लागली. सदर अभिषेक पूजा बंद केल्यानंतर काही दिवस भक्तांचा रोष ओढवला होता. पाद्यपूजेमुळे सुद्धा अशाच प्रकारे प्रसंग येऊ शकेल. तरी पूर्वपार व रुढीप्रथेप्रमाणे पूर्वीप्रमाणेच प्रासंगिक पाद्यपूजा चालू ठेवावी असे नम्र मत आहे. |
| ०४ | पाद्यपूजेचा वेळ सोडुन इतर वेळेस काच काढुन दर्शन अथवा पाद्यपूजेवर निर्बंध यावे. | पाद्यपूजेव्यतिरीक्त श्रींचे समाधी चौथऱ्याभोवती गर्दीचा अंदाज घेऊन काच काढणे किंवा लावण्याचे काम संरक्षण विभागामार्फत करण्यात येते. जास्त गर्दी असल्यास काच लावुन दर्शन देण्यात येते. साधारण व कमी गर्दीचे काळात काच काढुन सर्व भक्तांना दर्शन देण्यात येते. प्रसंगानुरुप गर्दीचा अंदाजाप्रमाणे काचा लावण्याचा निर्णय प्रशासनाकडून घेतात. यांत भक्तांच्या गर्दीचा विचार करण्यात येतो.त्यामुळेच लाखो भक्तांना दर्शनाचा लाभ देता येणे शक्य होते. संस्थानचे देणगीदार, व्ही.आय.पी., व्ही.व्ही.आय.पी यांच्या दर्शनाची अथवा पाद्यपूजेची व्यवस्था संस्थान पूर्वपार प्रथेप्रमाणे रुढीप्रमाणे व प्रसंगानुरुप करण्यात येते. |
| ०५ | पाद्यपूजा कुणा एका घराण्याचीच मक्तेदारी नसावी. | स्थानिक मा.खासदार, मा.खासदार. मा.नामदार, मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त मा.सदस्य, मा.अधिकारी, पदाधिकारी व इतर यांच्यामार्फत पाद्यपूजा या संस्थानच्या रुढीप्रमाणे व प्रथेप्रमाणे करण्यात येतात. |

| | | |
|---|---|---|
| ०६ | पाद्यपूजा केवळ राज्यकर्त्यांचीच मक्तेदारी नसावी. | श्रींची पाद्यपूजा करणेकामी संस्थान रुढीप्रमाणे व प्रथेप्रमाणे करण्याची पद्धती आहे. यामध्ये देणगीदार, व्ही.आय.पी., व्ही.व्ही.आय.पी, राज्याचे मा.मंत्री, मा.केंद्रीय मंत्री, स्थानिक मा.खासदार, मा.खासदार, मा.नामदार, मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त, इतर यांचा समावेश असतो. |

तरी उपरोक्तप्रमाणे वस्तुनिष्ठ अहवाल सादर केलेला आहे. तरी पाद्यपूजेच्या पुर्वीच्या रुढी परंपरेप्रमाणे अथवा इतर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी मंदिरातील पादुकांची पाद्यपूजा करण्याची पूर्वापार पद्धत असल्यामुळे पाद्यपूजेच्या पुर्वीच्या रुढी परंपरेमध्ये बदल करणेत येऊ नये. तसेच श्री.संजय काळे, कोपरगाव यांचे याबाबतीतील पत्र दप्तरी दाखल करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.७६ मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, प्रमुख उत्सव, स्थानिक उत्सव यांच्या पध्दती व नियम याबाबतच्या माहिती पुस्तिकेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत प्रति दिन श्रीसाईबाबांचे काकड आरती, मंगलस्नान, समाधी अभिषेक, शिर्डी माझे पंढरपुर आरती, माध्यान्ह आरती, धूपारती, शेजारती, तसेच प्रमुख उत्सव श्रीरामनवमी, श्रीगुरुपौर्णिमा व श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात येतात. त्याचप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम, पूजा-अर्चा, प्रथा व परंपरेनुसार होणारे स्थानिक उत्सव, तसेच मंदिरातील इतर पूजा-अर्चा, प्रथेप्रमाणे पूजन, रथ, मिरवणूक, पालखी मिरवणूक, गुरुवारची नित्याची पालखी, ग्रहणकालावधी पूजन, कीर्तन कार्यक्रम तसेच समाधी मंदिर, गुरुस्थान, द्वारकामाई, चावडी, नंदादीप समकालीन भक्त समाधी, गणपती मंदिर, शनि मंदिर, महादेव मंदिर, हनुमान मंदिर यांचे दैनंदिन पूजा-अर्चा व कार्यक्रम इत्यादीबाबत माहितीचे पुस्तक मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अध्यक्षेतेखाली तयार करण्यात आलेले आहे.

याबाबतची माहिती संस्थानकडे लिखीत स्वरुपात एकत्रितरित्या उपलब्ध नव्हती. त्याकरीता अशाप्रकारची माहिती श्रीसाईसच्चरित, पुजाऱ्यांचे अनुभव, अधिकारी वर्गाकडील माहिती इत्यादीचे आधारे कार्यप्रणाली तयार करण्यात आली असून संबंधीत माहिती संकलीत करुन ठेवणे आवश्यक आहे.

भावी काळात सर्वांसाठी संस्थानचे दैनंदिन कार्यक्रम, उत्सव व इतर माहिती संस्थानसाठी व भक्तांसाठी एकत्रीतरित्या उपलब्ध होईल. तसेच संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे कार्यक्रम यामध्ये एकसुत्रता व नियमावली तयार होईल, असे वाटते. त्याचप्रमाणे सदर माहिती पुस्तक विविध भाषांमध्ये तयार करता येईल.

तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.५०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.७७ साईबाबा पालखीचा मुक्काम लेंडीबागेत मिळणेबाबत श्री.मंदार राहाणे, पुणे यांचे पत्र.**

**प्रस्ताव-** श्री मंदार शहाणे, अध्यक्ष, श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांनी दि.०६/०५/२०१३ चे पत्रान्वये कळविले आहे की, शुक्रवार दि.१२ जुलै २०१३ रोजी कसबा गणपती, पुणे येथून श्री क्षेत्र शिर्डीकडे श्री साई पालखीचे प्रस्थान होणार असून श्रींच्या पालखीचे आपल्या शिर्डी येथे शनिवार दि.२०/०७/२०१३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ३००० ते ५००० साईभक्तांसह आगमन होत आहे. करिता त्यांनी साईबाबा पालखीचा मुक्काम लेंडी बाग येथे मिळावा अशी मागणी केलेली आहे.

सध्या आपण श्री साईंचे दर्शनासाठी पायी येणारे सर्व पालख्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मंदीर परिसराचे बाहेरच ठेवत आहोत. फक्त श्री रामनवमी उत्सवाचे वेळी मा.जिल्हाधिकारी सो., अहमदनगर यांचे आदेशान्वये साईसेवक मंडळ, मुंबई व साईलिला मंडळ, मुंबई या दोन पालख्या लेंडीबागेत नंदादीपच्या मागील बाजूस ठेवण्यात येत आहेत व पालखीमधील प्रत्येकी २५-२५ सेवक पालखी सोबत थांबण्यास परवानगी देण्यात येत आहे. इतर कोणत्याही मंडळाची पालखी लेंडीबागेत ठेवण्यात येत नाही.

श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांना लेंडीबागेत पालखी ठेवणेस परवानगी दिल्यास इतर पालखी/ पदयात्री मंडळे लेंडीबागेत पालख्या ठेवण्याची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही व पुन्हा मागील वर्षी परवानगी मिळाली होती म्हणून हक्क तयार होईल.

तरी श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे यांना लेंडीबागेत पालखी ठेवणेस परवानगी द्यावी किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, पुणे या पालखीचे २५ वे वर्ष असल्याने त्यांच्या साईबाबा पालखीचा मुक्काम लेंडीबागेत करणेस परवानगी मिळावी, अशी त्यांनी मागणी प्रदर्शीत केलेली आहे. याबाबत त्यावेळची परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.७८ ई-टेंडरसाठी Ultrabook खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे सभा दिनांक ०७/०२/२०१३ निर्णय क्र.२२. ठरावानुसार पाच लाख व त्या पुढील रक्कमेचे सर्व टेडंर हे महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटव्दारे करण्याचे नियोजीत आहे. ई-टेंडर कार्यप्रणाली सुरु करणेसाठी एक स्वतंत्र Tender Cell (निविदा कक्ष) ची स्थापना करणेस मान्यता मिळालेली आहे. ई-टेडंर अंतर्गत टेडंर तयार करणे, टेडंर अपलोड करणे, निवीदाधारकांनी भरलेल्या टेडंरची पडताळनी करणे, तुलनात्मक तक्ता तयार करणे या कामासाठी पाच Ultrabook ची आवश्यक्ता आहे. सदरचे Ultrabook माहिती तंत्रज्ञान विभागाकडे उपलब्ध नसाल्याने ते विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करावे लागणार आहे. Ultrabook चा तपशिल खालीलप्रमाणे-

Ultrabook Specification:-

| Sr.No | Ultrabook Specification | | Qty. | Aprox Rate ( in Rs) | Total ( in Rs) |
|---|---|---|---|---|---|
| **01.** | CPU<br>Operating System<br>Memory<br>Graphics<br>Display<br>Weight<br>I/O Ports<br><br><br>Storage (HDD)<br><br>Wireless Connectivity<br><br>Keyboard<br><br>Battery Life<br><br>Durability Features.<br>Warrenty<br><br>Model | -3rd Generation Intel® Core™ i7-3517U or higher<br>-Windows 8 Profesional (32/64 bit)<br>-8 GB<br>- NVIDIA® GeForce® 610M<br>-14.0" HD LED anti-glare display<br>-Aprox-1.85 kgs<br>-2 Usb 2.0 Ports,<br>2 Usb 3.0 Ports<br>2-in-1 card reader (SD/MMC)<br>-500GB (7,200 RPM)<br>-10/100 LAN<br>•-802.11 b/g/n WiFi<br>Bluetooth® 4.0.<br>-AccuType keyboard<br>- Up to 8 hours<br>-Full aluminum exterior shell<br>-3 Years on-Site with Accidental Damage Protection<br>-LENOVO IDEAPAD U410 ULTRABOOK | **05** | 67000/- | **335000/-** |
| 02 | Mouse | -Wireless laser Mouse N70A | 05 | 2000/- | 10,000/- |
| 03 | Microsoft Office-2013 Business-For Ultrabook | | 05 | 15000/- | 75000/- |
| | **Grand Total (in Rs.)** | | | | **4,20,000/- +Tax** |

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे Ultrabook साठी अंदाजे ४,२०,०००/- + टॅक्स इतक्या खर्चास मान्यता असावी, असे मत आहे.

तरी, ई-टेंडर सुविधेसाठी Ultrabook व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,२०,०००/- + टॅक्सचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५११ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ई-टेंडरसाठी ५ नग Ultrabook खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,२०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.७९ मा.उच्च न्यायालय मुंबई येथील रिट पिटीशन नं.४६८५/२०१३ व औरंगाबाद येथील रिट पिटीशन नं.४१४३/२०१३ व ४१४९/२०१३ बाबत.**

**प्रस्ताव-** मा. उच्च न्यायालय मुंबई येथे श्री बाळा नांदगांवकर यांनी रिट पिटीशन नं. ४६८५/२०१३ महाराष्ट्र शासन व संस्थानचे विरुध्द दाखल केलेले आहे. प्रस्तुतचे रिट पिटीशन मध्ये अर्जदाराने Shree Sai baba Sansthan Trust (Shirdi) Appointment of Members of Management Committee and Forms of Declarations Rules 2013 रद्द करणेत यावे संस्थानचे अधिनियम २००४ चे सेक्शन २५ प्रमाणे रुल्स तयार करण्यात यावेत, अशी सामनेवाला नं. १ शासनास आदेश व्हावेत तो पर्यंत २०१३ चे रुल प्रकरणी सुनावणी होई पर्यंत लागू करु नये अशा आशयाची याचीका दाखल केलेली आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संदिप विजय कुलकर्णी यांनी रिट पिटीशन नं. ४१४३/२०१३ महाराष्ट्र शासन व संस्थानचे विरुध्द दाखल केलेले आहे. तसेच श्री प्रविण

रामचंद्र पोटे यांनी रिट पिटीशन नं. ४१४९/२०१३ महाराष्ट्र शासन व संस्थानचे विरुध्द दाखल केलेले आहे. प्रस्तुतचे दोन्ही रिट पिटीशन मध्ये अर्जदाराने Shree Sai baba Sansthan Trust (Shirdi) Appointment of Members of Management Committee and Forms of Declarations Rules. २०१३. रद्द करणेत यावे, दि. २४/०१/२०१३ रोजी शासनाने तयार केलेल्या नोटीफीकेशन नुसार नविन विश्वस्तांची नेमणूकीस स्थगीती आदेश द्यावा, शासनाने त्यांचे नौकर, एजंट, सहकारी यांची संस्थानचे विश्वस्त पदी नेमणूकीस बंधन घालावे, सदरचे रिट पिटीशनची अंतीम सुनावणी होई पावेतो शासनाने तयार केलेले सन २०१३ चे रुल नुसार नविन विश्वस्तांचे नेमणूकीस स्थगीती द्यावी. अशा आशयाची याचीका दाखल केलेली आहे.

उपरोक्त तीनही रिट पिटीशन शासन कायदेशीर रित्या रुल फ्रेम करत नाही. तो पर्यंत नविन विश्वस्त मंडळाची नेमणूक करु नये. रिट पिटीशनचा अंतीम निकाल होत नाही. तो पर्यंत स्थगीती आदेश मिळणेबाबत अर्जदारांनी विनंती केलेली आहे.

संस्थानचे अधिनियम २००४ मधील कलम १७ समितीचे कर्तव्य व अधिकार यांचे तरतुदीबाबत असून कलम १७ (२) च ".. विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील..." असा आहे.

तसेच कलम २३ " विश्वस्तव्यवस्था किंवा समिती यांचे तर्फे किंवा त्यांचे विरुध्द दावे व इतर कार्यवाही" संदर्भात आहे. संस्थान विश्वस्तव्यवस्था किंवा समिती यांनी दाखल केलेले किंवा त्यांच्याविरुध्द दाखल केलेले सर्व दावे व इतर कायदेशीर कार्यवाही यांमध्ये, युक्तीवादाच्या कागदपत्रावर कार्यकारी अधिकारी सही करील व ते सत्यपित करील आणि अशा दाव्यांमधील व कार्यवाहीतील सर्व आदेशीका कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नावे काढण्यात किंवा त्यांच्यावर बजावण्यात येतील. अशी तरतुद प्रस्तुत कलमात आहे.

उपरोक्त तिनही रिट पिटीशन मध्ये संस्थानचे विरुध्द कोणतीही मागणी केल्याचे अढळ होत नाही. तथापी संस्थानला Formal Party केले असल्याचे दिसुन येते. तेव्हां औरंगाबाद येथे श्री संजय आर. चौकीदार, ॲडव्होकेट यांना दोन्ही रिट पिटीशन मध्ये संस्थानचे वतीने Formal हजर रहावे असे जा.क्र. विधी /११७१/२०१३ दि. ०७/०६/२०१३ ने कळविले आहे. मा.उच्च न्यायालय मुंबई येथील केसमध्ये मा.अध्यक्ष सो. यांचेशी विचार विनिमय करुन वकिलांची नेमणुक करणे/ न करणे बाबत तसेच प्रस्तुतचे रिट पिटीशन मध्ये नेमणूक केलेल्या वकीलांची वकील फी अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल असलेल्या रिट पिटीशन नं.४६८५/२०१३ व औरंगाबाद येथील रिट पिटीशन नं.४१४३/२०१३ व ४१४९/२०१३ या तिनही रिट पिटीशन मध्ये आवश्यकता असल्यास वकीलाची नेमणूक करणेस व त्यांची फी आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.८०** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ साजरा करणेस व त्यास येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील." त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव रविवार दि.२१/०७/२०१३ ते मंगळवार दि.२३/०७/२०१३ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस सोमवार दिनांक २२/०७/२०१३ आहे.

या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,६४,५०० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था- | **अ) कलाकार कार्यक्रम :-** |
| | रविवार,<br>दिनांक- २१/०७/२०१३<br>(प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर |
| | सोमवार<br>दिनांक २२/०७/२०१३<br>(मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (२२/०७/२०१३) इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम होईल. यादिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | मंगळवार<br>दिनांक २३/०७/२०१३<br>(सांगता दिवस) | सायंकाळी ०७.३० ते १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (समाधी मंदीराचे उत्तरेकडील स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत.<br>**इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल.** |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम-** |
| | रविवार २१/०७/२०१३<br>सोमवार २२/०७/२०१३<br>मंगळवार २३/०७/२०१३ | श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. **किर्तनकार निश्चीती करावयाची आहे.** |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात दि. २१/०७/२०१३ ते दि. २३/०७/२०१३ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा **बंद** राहतील. |
| ४ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना दि.९/०५/२०१३ रोजी पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ५ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक २१/०७/२०१३ रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>दि. २२/०७/२०१३ रोजी सकाळी ०५.०० वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.त्रिसस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक २१/०७/२०१३ रोजी समाधी मंदिरासमोरील स्टेजवर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य राहातील. तसेच श्री रामनवमी उत्सव सन २०१३ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सदस्याचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. |
| ६ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी रविवार दिनांक २१/०७/२०१३ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, मंगळवार दिनांक २२/०७/२०१३ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते.मा.त्रिसदस्य समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व - नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन |

| | | |
|---|---|---|
| | | व्यवस्था नेहमीप्रमाणे करण्यात येईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅन्टींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल.<br>तसेच श्री रामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे. श्री रामनवमी उत्सवात सन २०१३ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते. ०१) प्रथम दिवस - बुंदी (०२) मुख्य दिवस - बुंदी (०३) सांगता दिन - बुंदी या उत्सवात देखील यानूसार तीन दिवस तीन मिष्टांन्न देण्यात येतील. |
| ९ | लिलाव | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. |
| १० | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| ११ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १२ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १३ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १४ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम नं. १ व २, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारती मधून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व मंडपही टाकावयाचे आहेत. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था साईआश्रम ( धर्मशाळा ) परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था जुन्या प्रसादालयचे, न.भ.निवासाचे मोकळ्या जागेत मंडप/ शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. यावर्षी कडक उन्हाळा असल्याने पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टॅंकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| १६ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १७ | खर्चाचे अंदाज पत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव - २०१२ मध्ये प्रत्यक्ष खर्च रुपये ३३,१०,३९३/- (अक्षरी रु. तेहतीस लाख दहा हजार तीनशे त्र्याणव ) इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०१३ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रुपये ३६,८३,६८१/- (अक्षरी रु.छत्तीस लाख त्र्यांशी हजार सहाशे एक्यांशी मात्र) खर्च अपेक्षीत आहे. |

तरी उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ३६,८३,६८१/- (अक्षरी रक्कम रुपये छत्तीस लाख त्र्यांशी हजार सहाशे एक्यांशी ) मात्र चे खर्चास मान्यता असावी.

अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**विषय नं.८१ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सौजन्याने व नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे सहकार्याने १९ वा श्री साईसच्चरीत्र पारायण सोहळा साजरा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

समितीची कर्तव्ये व अधिकार- १७(१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**१७. (२) ठ** - श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

नाटय रसिक संच शिर्डी यांनी दिनांक ११/०६/२०१३ चे पत्राने या वर्षी श्रावण शुध्द प्रतिपदा ते श्रावण शुध्द नवमी शके १९३५, म्हणजे बुधवार दि.७/०८/२०१३ ते गुरुवार दि.१५/०८/२०१३ अखेर साजरा करणे करीता परवानगीची मागणी केलेली असून यापत्रात संस्थानमार्फत खालील बाबीवर खर्च करणेस विनंती केलेली आहे.

१) मंडप व स्टेज व फुले डेकोरेशन
२) नियोजीत कीर्तनकार, कलाकार बिदागी जाणे-येण्याचे प्रवास खर्चासह.
३) मिरवणूक खर्च,बँड,वाद्य इत्यादी.
४) पत्रिका,हॅन्डबील,बॅनर,इत्यादी छपाई.
५) चहा व नाश्ता,श्रींचे पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा.

नाटय रसिक संच फक्त वाचकांचे नोंदणी व बॅचेचा खर्च करणार आहेत. त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी नाटय रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या १८ वर्षापासून दरवर्षी सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित केला जातो. यात सुमारे ४००० साईभक्त सहभाग घेत असतात. दरवर्षी पारायण सोहळयाची रुपरेषा खालीलप्रमाणे असते.

१) दररोज सकाळी ७.०० ते ११.०० - साई सच्चरिताचे पारायण
२) दररोज दुपारी ४.०० ते ५.०० - प्रवचन
३) दररोज रात्रौ ७.३० ते ९.३० - निमंत्रीतांचे कीर्तन/ व्याख्यान/ इतर करमणुकीचे कार्यक्रम.
४) आठव्या दिवशी साईचरित्र ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा.
५) नवव्या दिवशी कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा.

मागीलवर्षी श्रावण मासानिमित्त आयोजित पारायण सोहळयास संस्थान मार्फत आलेला खर्च व यावर्षी पारायण आयोजित करावयाचे असल्यास या कामी संस्थानला येणारा अंदाजे खर्च याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | तपशील | २०१२ चा प्रत्यक्ष खर्च | चालू वर्षाचे कार्यक्रमा साठी अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १ | मंडप व्यवस्था कमानी , स्टेज सजावट व अनुशंगीक खर्च | ६,२७,९९८-०० | ७,००,०००-०० |
| २ | निमंत्रण पत्रिका हॅन्डबील छपाई खर्च, रांगोळी, पल्यावूड व फलेक्स बोर्ड | १५,५३०-०० | ५०,०००-०० |
| ३ | कलाकार बिदागी (रंग व वेशभुषा मानधन ड्रेस भाडेसह | १,०६,६५३-०० | २,५०,०००-०० |
| ४ | प्रसाद खर्च (आचारी मंजुरीसह ) | ४,६४,२०२-०० | ५,००,०००-०० |
| | **एकुण खर्च** | **१२,१४,३८३-००** | **१५,००,०००-००** |

मागील वर्षी श्रावण मासातील पारायण ग्रामस्थांचे आग्रहास्तव १६ गुंठे जागेत घेण्यात आले होते. ४००० वाचक बसले असता तेथे जागेची अडचण निर्माण झाली होती. यावर्षी पारायणार्थीचे संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

१) सन ११९५ साली दिक्षीत वाडयाच्या सभागृहात झाले. १९६६ पासून ते सन २००६ पर्यत ४ नंबरचे परीसरात आयोजीत करण्यात येत असे.

२) साईभक्ताच्या संख्येत वाढ झालेने त्यांच्या जाणेयेणेस जागा अपुरी पडत असलेने सन २००७ पासून १६ गुंठे जागेत आयोजित करणेत येत होते.

३) भक्तांच्या संख्येत दिवसेदिवस लक्षणीय स्वरुपात वाढ होत असलेने तसेच २०१० मध्ये मंडप कोसळल्याने साईप्रसादालयाचे हॉलमध्ये आयोजीत केले होते.

खालील बाबीवर निर्णय होणेस विनंती.

१) उपरोक्त श्रावण मासातील पारायण आयोजीत करणे निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चित झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रुपये १५,००,०००/- चे खर्चास मान्यता तसेच पारायणाची जागा निश्चित होणे आवश्यक आहे.

२) मागील वर्षाप्रमाणे पारायणासाठी १६ गुंठेची जागा निश्चित करणे असल्यास त्या जागेत पारायणार्थी बसू शकतील तसेच भक्तांचे जाणे येणेसाठी पुरेसी जागी राहील याबाबी विचारात घेता पारायणार्थीची कमाल संख्या निश्चित करणे.

३) इच्छुक पारायणर्थींना पारायणासाठी बसण्याची व्यवस्था करणे असल्यास साईनगर अगर दुसऱ्या मोठया जागेवर मंडप टाकणे.

४) जागा निश्चितीबाबत तसेच पारायणार्थींची कमाल संख्या निश्चित करणेबाबत नाटयरसिक संचाचे पदाधिकाऱ्यांची सभा आयोजीत करावी किंवा कसे ?

५) अंदाजे रक्कम रुपये खर्च १५,००,००० /- ( रुपये पंधरा लाखमात्र ) चे खर्चास मंजूरी मिळणे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्रावण मासातील पारायण आयोजित करणे बाबत निर्णयास्तव तसेच पारायण घेणे निश्चित झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रु.१५,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर,

**निर्णय क्र.५१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**विषय नं.८२ झेरॉक्स मशिन मॉडेल ७५५६ चे Full Service Maintenance Agreement (FSMA कॉन्ट्रॅक्ट) पुढे चालू ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** सामान्य प्रशासन विभागात झेरॉक्स कामासाठी झेरॉक्स कंपनीचे मशीन मॉडेल ७५५६ हे दि.२१.०२.२०१२ रोजी देणगी घेतलेले आहे. सदरच्या मशीनसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०९.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.७४१ अन्वये, झेरॉक्स कंपनीकडुन एक वर्षासाठी FSMA कॉन्ट्रॅक्ट करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरुन दि.२८.०९.२०१२ ते दि.२७.०९.२०१३ अखेर एक वर्षासाठी ॲग्रीमेंट केलेले आहे.

ॲग्रीमेंट कालावधीत दि.२८.०९.२०१२ ते दि.०१.०६.२०१३ अखेर मशीनच्या झालेल्या झेरॉक्स प्रती, अदा केलेले बील व मशीनसाठी कंपनीचा झालेला खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | झेरॉक्स प्रती (साध्या+ कलर) | बील रुपये | कंपनीकडुन आलेले मटेरीयल व त्याची किंमत रुपये | |
|---|---|---|---|---|
| दि.२८.०९.२०१२ ते ते दि.०१.१२.२०१२ | १९५५ | ८६३ | टोनर कार्ट्रेज -८ नग | ९९७४८/- |
| दि.०१.१२.२०१२ ते ते दि.०१.०१.२०१३ | ६९०८ | ४१०२ | ड्रम कार्ट्रेज - ४ नग | १८९०६६/- |
| दि.०१.०१.२०१३ ते ते दि.०१.०२.२०१३ | ४६७ | १८११ | रोल - ३ बॉक्स | ४२४८/- |
| दि.०१.०२.२०१३ ते ते दि.०१.०३.२०१३ | १४७० | २२६१ | फ्युजर - १ नग | १३९८०९/- |
| दि.०१.०३.२०१३ ते ते दि.०१.०५.२०१३ | २७२२६ | १२४४६ | | |
| दि.०१.०५.२०१३ ते ते दि.०१.०६.२०१३ | १०१५५ | २१६४१ | | |
| एकूण | ४८,१८१ (झेरॉक्स प्रती ) | रु.४३,१२४/- (एकुण अदी बील) | | ४,३२,८७१/- (मटेरीयल किंमत) |

(सुरवातीला FSMA कॉन्ट्रॅक्ट करते वेळी मशीनला लागणारे सर्व मटेरीयल संपत आलेले होते. त्यामुळे FSMA कॉन्ट्रॅक्ट केल्यानंतर कंपनीकडुन सर्व मटेरीयल मागवावे लागले ते कंपनीने दिलेले आहे. त्यामुळे कंपनीकडुन आलेल्या मालाची किंमत जास्त झालेली आहे व संस्थानकडुन अदा केलेल्या बीलाची रक्कम कमी झालेली आहे.)

दि.२८.०९.२०१२ ते दि.२७.०९.२०१३ अखेर एक वर्ष कालावधीसाठी प्रायोगिक तत्वावर FSMA कॉन्ट्रॅक्ट केले होते. सदर कॉन्ट्रॅक्ट मुळे मशीनला लागणारे मटेरियल व मॅकेनिक वेळेवर उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे झेरॉक्स कामात अडचण आलेली नाही. तसेच सदर मशीनचा आर्थिक खर्चही कमी झालेला आहे.

तरी झेरॉक्स लि. कंपनी जोपर्यंत चांगल्याप्रकारे सर्व्हिस देईल तोपर्यंत कॉन्ट्रॅक्ट नियमीत पुढे चालु ठेवता येईल व ज्यावेळी कंपनीकडून चांगली सर्व्हिस मिळणार नाही, त्यावेळी एक महीना अगोदर नोटीस देऊन कॉन्ट्रॅक्ट बंद करता येईल.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-१२)

---

**विषय नं.८३** **आयटी मॅनेजर पदनाम व वेतनश्रेणी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.राहुल वामन गलांडे, आय.टी.सुपरवायझर यांनी दि.१५/१२/२०१२ रोजीचे अर्जान्वये मी दिनांक २७/१२/२००१ रोजी अनुकंपा तत्वानुसार संस्थानचे तत्कालीन संगणक विभागात पर्यवेक्षक या पदावर रुजू झालो. संगणक क्षेत्रातील बदल व संस्थानची गरज लक्षात घेता वेळोवेळी दिलेली कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सध्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागात प्रभारी विभाग प्रमुख तथा प्रभारी सिस्टिम ॲडमिनिस्ट्रेटर तथा प्रभारी डेटा ॲडमिनिस्ट्रेटर अशा एकत्रित जबाबदाऱ्या माझेवर सोपविण्यात आलेल्या आहे. सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान विभागाकडे तीन तांत्रिक कायम कर्मचारी उपलब्ध आहे व ते सध्याच्या कामाच्या आवाक्यानुसार फारच कमी आहे. तसेच मा.श्री.के.व्ही.रमणी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्पाची कार्यवाही माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत हाती घेण्यात आलेली आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाकडे दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी वरिष्ठ लिपीक नसल्याने (वेळोवेळी त्याबाबत मागणी केलेली आहे.) पर्यायाने एकाच लिपीकाच्या साहाय्याने कामे पार पाडत आहे.

मा.श्री.के.व्ही.रमणी साो. यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्पाची कार्यवाही माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत हाती घेण्यात आलेली आहे. सदर महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत ३६ सिस्टीम सुरू करण्यात येणार आहे. जागतीक दर्जाच्या कंपनीशी हा करार करण्यात करण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्पाच्या पहिला टप्पा नुकताच सुरू करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाचे पूर्ण काम तत्परतेने व काळजीपूर्वक करीत आहे. सन २००७ पासून श्रींचे लाईव्ह दर्शनाची संकल्पना सुचविलेली असून मा.व्यवस्थापन मंडळाचे व आपले मदतीने ती चालू करण्यात आलेली असून दरवर्षी त्यातुन करोडो रुपयांचे आर्थिक उत्पन्न त्यातून मिळत आहे. संस्थानचे उत्पन्नात भर पडणेसाठी अजून काही प्रकल्प/संकल्पना विचाराधीन असून ते आपले मान्यतेस सादर करण्याचा मानस आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात साधारणतः तांत्रिक पदावर काम करणाऱ्यास तीन वर्षात पदोन्नती दिली जाते. सध्या साईटेक प्रकल्पाची कार्यवाही चालू असून ग्रामीण भागात राहून सदर प्रकल्प राबविणे ही फार मोठी जबाबदारीचे काम आहे. तसेच सन २००६ पासून विभाग प्रमुख, सिस्टिम ॲडमिनिस्ट्रेटर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, नेटवर्क इंजिनिअर या पदांचा कार्यभार मी सांभाळत असून माझ्याकडे प्रभारी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख म्हणून पद देण्यात आलेले आहे. एकंदरीत सर्व गोष्टींचा सकारात्मक विचार करता माझी कायमस्वरुपी आयटी मॅनेजर म्हणून नेमणूक करुन सदर पदाची वेतणश्रेणी मिळणेस विनंती केलेली आहे.

मंजुर आकृतीबंधानुसार आयटी विभागाचे आस्थापनेवर खालीलप्रमाणे पदे मंजुर आहेत.

| Designation<br>पदनाम | Pay Scale<br>वेतनश्रेणी | Vacant Post<br>रिक्त पदसंख्या | Qualification<br>पात्रता |
|---|---|---|---|
| I.T.Manager | Pay Band 15600-39100 Grade Pay 5400 | 1 | By Nomination / By Promotion :-<br>1)B.E. Computer / Electronics / IT;<br>2)Microsoft certified professional (MCP);<br>3)Experience of minimum 5 years in Sansthan. |
| System Administrator | Pay Band 9300-34800 Grade Pay 4600 | 1 | By Nomination / By Promotion :-<br>1) B.E. Computer / Electronics / IT and Microsoft certified professional;<br>2) Experience minimum 5 years. |
| Database Administrator | Pay Band 9300-34800 Grade Pay 4600 | 1 | By Nomination / By Promotion :-<br>1) B.E.Computer / Electronics / IT and Oracle certified professional;<br>2) Experience minimum 5 years. |
| Network Engineer | Pay Band 9300-34800 Grade Pay 4400 | 1 | By Nomination :-<br>1) Age not more than 28 years;<br>2) B.E. Computer / Electronics / IT and Nand Certification;<br>3) Experience minimum 3 years. |

श्री.गलांडे यांनी D.E.C., B.E.(Electronics), M.C.P.Brain Banch Certified शैक्षणिक पात्रता धारण केलेली आहे. मंजुर आकृतीबंधानुसार आय.टी.मॅनेजर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता श्री.गलांडे यांनी धारण केलेली आहे.

सुरूवातीस मा.व्यवस्थापन समिती दि.८-९/१२/२००१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८८ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४२२८/२००१ दि.२७/१२/२००१ चे आदेशान्वये श्री.राहुल गलांडे यांची अनुकंपा तत्वावर प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत श्री.गलांडे यांना वेतनबँड ९३००-३४८०० अधिक ग्रेड वेतन रु.४३०० वेतन अदा करण्यात

येत आहे. परंतु मंजुर आकृतीबंधात माहिती तंत्रज्ञान विभागाचे आस्थापनेवर प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर हे पद समाविष्ट नाही.

सबब, श्री.राहुल वामन गलांडे, प्रभारी आयटी विभाग प्रमुख यांचे दि.१५/१२/२०१२ रोजीचे विनंती अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांना शासनमान्य कर्मचारी आकृतीबंधातील आय.टी. मॅनेजर या रिक्त पदावर पदोन्नती व त्या पदाचा वेतनबँड अधिक ग्रेड वेतन देता येईल.

तथापि, मे.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ IN PIL NO.१८/२०११ मध्ये दि.१६ ऑक्टोबर २०१२ च्या आदेशात पॅरा (६) (d) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

(d) Shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies. असे आदेश आहेत.

वरीलप्रमाणे श्री.राहुल वामन गलांडे, प्रभारी आयटी विभाग प्रमुख यांना मंजुर आकृतीबंधानुसार आय.टी.मॅनेजर या पदावर पदोन्नती व त्या पदाचा वेतनबँड अधिक ग्रेड वेतन देणेबाबतच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८४ शासनाकडे मान्यता मिळणेकामी प्रस्तावीत केलेले कर्मचारी सर्व्हिस रेग्युलेशन शासनाची मान्यता मिळणेचे अधिन राहून लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील तरतुदीस अनुसरून जा.नं. एसएसएस/ वशी-०१/२१२/२००९ दि.१५/०१/२००९, जा.नं.एसएसएस / वशी-०१/ ६०२८/ २००९ दि.१९/०५/२००९ व जा.नं.एसएसएस/वशी-०१/९२७९/२०१० दि.०९/०९/२०१० अन्वये अधिनियम दुरूस्ती, नियम दुरूस्ती तसेच विनियमाचे मसुदे मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे यापुर्वी सादर करण्यात आलेले आहे.

त्यानंतर सदर मसुदे अंतिम करणेकामी शासन निर्णय दिनांक ०३/१२/२००८ अन्वये सह सचिव, कार्यासन-सोळा, विधी व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. तद्नंतर दि.१४/०२/२०११ च्या शासन निर्णयान्वये सदर समितीची पुनर्रचना करण्यात आली.

सदर समितीने दिनांक २८/०२/२०११, ०१/०३/२०११, १२ व १३/०५/२०११, १८/०५/२०११, ०७ व ०८/०७/२०११ आणि ०६ व ०७/०१/२०१२ रोजी बैठका घेऊन संस्थानचे नियम तसेच विनियमाचे मसुद्यास अंतिम स्वरुप देण्यात आलेले असून सदर अंतिम मसुदे मान्यता मिळणेकामी शासन स्तरावर प्रलंबीत आहेत.

महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय मुंबई-३२. दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे एकूण ४८२६ पदांचे आकृतींधास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आकृतींबधात शासनाने खालील अटी शर्ती नमूद केलेल्या आहेत.

१) समितीने पदनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवा प्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

२) सेवा प्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवा प्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४, (२००४ चा महा.१४) च्या कलम ५(०१) (०२) अन्वये संस्थानच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समिती नियुक्त करण्यात आली असून, तीचे अधिपत्याखाली संस्थानचे कामकाज चालु आहे.

सदर अधिनियमाची माहे सप्टेंबर २००४ मध्ये अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर त्यांतील विविध तरतुदींची प्रत्यक्षात अंमलबजावणी करतांना कायदेशीर अडचणी येत आहेत. तसेच भक्तांना सेवा सुविधा पुरविणेकामी कर्मचारी वर्गाची नेमणूक करणे, कर्मचारी योग्य रितीन कामे करतात किंवा नाही, मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे, एखाद्या कर्मचाऱ्याने गैरवर्तन केल्यास त्याचेवर कार्यवाही करणे याबाबतची कार्यवाही करतांना प्रशासकीय क्लिष्टता वाढत चालली आहे.

सह सचिव, कार्यासन-सोळा, विधी व न्याय विभाग यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिनांक २८/०२/२०११, ०१/०३/२०११, १२ व १३/०५/२०११, १८/०५/२०११, ०७ व ०८/०७/२०११ आणि ०६ व ०७/०१/२०१२ रोजी बैठका घेऊन खालील सर्व्हिस रेग्युलेशनास अंतीम स्वरुप दिलेले आहे.

**Service Regulations :-**

1. General Conditions of Service Regulations
2. Conduct Regulations
3. Discipline and Appeal Regulations
4. Leave Regulations
5. Joining Time & Payments Regulations

6. Pay and Allowances Regulations
7. Recruitment Regulations
    1) Shedule - I
    2) Shedule - II

वरीलप्रमाणे अंतिम सर्व्हिस रेग्युलेशनचे मसुद्यास शासनाची मान्यता मिळणेचे अधीन राहून वरील रेग्युलेशन संस्थान कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबतच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा व सध्या प्रचलीत असलेले सेवानियमच चालू ठेवणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८५ मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्रीमती मंगल कानिफनाथ पवार, शिर्डी यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्रीमती मंगल कानिफनाथ पवार, रा.शिर्डी यांनी त्यांचे पती कै.कानिफनाथ काशिनाथ पवार यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.३०/०४/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) दिवंगत कानिफनाथ काशिनाथ पवार यांचे मृत्यू प्रमाणपत्र.

२) श्रीमती मंगल कानिफनाथ पवार यांचा शाळा सोडल्याचा दाखला सदर दाखल्यानुसार जन्मतारीख १५/०७/१९८५अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय २७ वर्ष १० म.आहे.

३) श्रीमती मंगल पवार यांचे इ.०१ ली चा शाळा सोडल्याचा दाखला सादर केलेला आहे.

४) मंगल प्रकाश खरात व मंगल कानिफनाथ पवार या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असलेबाबत मा.तहसिलदार यांचेकडील प्रतिज्ञापत्र-

कानिफनाथ काशिनाथ पवार हे संस्थानचे आरोग्य विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.२४/०३/२०१३ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे-

| | |
|---|---|
| ०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव | :- कानिफनाथ काशिनाथ पवार |
| ०२) मृत्युचे वेळी हुद्दा व विभाग | :- वर्ग ४ कर्मचारी, आरोग्य |
| ०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी | :- दि. ०४/१२/२००६ ते दि.२३/०३/२०१३ एकूण सेवा ०६ वर्षे |
| ०४) मृत्यु दिनांक | :- २४/०३/२०१३ |

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याचे पत्नीचे वय ४५ वर्ष असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (1) of Rule 6 - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

दिवंगत पवार हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि. ०५/१२/२००७ नॉमीनेशन पत्रात श्रीमती मंगल कानिफनाथ पवार (दिवंगत पवार यांनी पत्नी) यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांची पत्नी नामे श्रीमती मंगल कानिफनाथ पवार हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३३५ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे ९४ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत पवार यांची पत्नी नामे श्रीमती मंगल कानिफनाथ पवार यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत पवार यांचे जागेवर त्यांची पत्नी नामे श्रीमती मंगल कानिफनाथ पवार यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतन देणेत येवून संस्थानमध्ये कामास घेणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत कानिफनाथ काशिनाथ पवार यांची पत्नी नामे श्रीमती मंगल कानिफनाथ पवार यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत पवार यांचे जागेवर त्यांची पत्नी नामे श्रीमती मंगल कानिफनाथ पवार यांना सध्या संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने, किमान वेतन देणेत येवून कामावर घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८६** **मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्रीमती शिला बबन कहांडळ, शिर्डी यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्रीमती शिला बबन कहांडळ, शिर्डी यांनी दि.०८/०५/२०१३ चे अर्जात खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"माझे पती दिवंगत बबन सबाजी कहांडळ हे साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात मदतनीस या पदावर सेवेत होते सेवेत असतांना त्यांचे दि.२३/०१/२०१२ रोजी निधन झाले. त्यांचे निधनानंतर त्यांचे जागेवर माझा मुलगा नामे नितीन बबन कहांडळ यांस संस्थानचे प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने अकुशल कामगार म्हणून दि.१४/०९/२०१२ पासून कामावर हजर झाला होता. तद्नंतर त्याने एक दिड महिना काम केले त्यात त्याला पोटाचा त्रास होत असल्याने व कामात त्रास होत असलेने तो आजपावेतो कामावर येत नसून आमचे कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे. त्याने मा.तहसिलदार, राहाता यांचेसमोर मला पोटाचा त्रास होत असलेने मला काम करणे अशक्य आहे तरी माझे जागेवर माझी आई शिला बबन कहांडळ यांना संस्थानमध्ये कामावर घेण्यात यावे असे प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले आहे. तरी माझे मुलाचे जागेवर मला कामावर घेण्यात यावे. "

दिवंगत बबन सबाजी कहांडळ हे संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान येथे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे दि.२३/०१/२०१२ रोजी निधन झालेने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२०१२ चे निर्णयानुसार त्यांचा मुलगा नामे श्री नितीन बबन कहांडळ यांस वडीलांचे जागेवर अनुकंपा कारणास्तव प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने अकुशल कामगार म्हणून कामावर घेण्यात आले आहे त्यानुसार ते दि.१४/०९/२०१२ रोजी कामावर हजर झालेले आहे.

श्री नितीन कहांडळ यांनी दि.०५/०६/२०१३ च्या अर्जात "मला पोटाचा त्रास होत असल्याने मला काम करण्यामध्ये त्रास होत असल्याने मला काम करणे अशक्य आहे तरी माझे ऐवजी माझेजागेवर माझी आई नामे श्रीमती शिला बबन कहांडळ हिस संस्थानमध्ये कामावर घेण्यात यावे" असे नमूद केलेले आहे. सोबत आईस कामावर घेणेबाबत त्यांची हरकत नसलेबाबतचे मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील दि.२५/०३/२०१३ चे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

श्रीमती शिला बबन कहांडळ रा.शिर्डी यांनी त्यांचा मुलगा नामे नितीन बबन कहांडळ यांचेऐवजी अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.०८/०५/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) श्रीमती शिला बबन कहांडळ यांचा शाळा सोडल्याचा दाखला सदर दाखल्यानुसार जन्मतारीख २०/०१/१९७० अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय ४३ वर्ष आहे.

२) कु.शिलाबाई रावसाहेब बेंद्रे व शिला बबन कहांडळ या दोन्ही नांवाच्या व्यक्ती एकच असलेबाबत मा.तहसिलदार राहाता यांचेकडील प्रतिज्ञापत्र

३) श्री नितीन कहांडळ यांचा दि.०५/०६/२०१३ चा अर्ज

४) श्री नितीन कहांडळ यांनी दि.२५/०३/२०१३ रोजी मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील प्रतिज्ञापत्र

५) दिवंगत कहांडळ यांच्या शिधापत्रिकेवरील श्रीमती शिला कहांडळ यांचे नांवाची नोंद असलेबाबत.

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याची पत्नीचे वय ४५ वर्षाचे आत असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (1) of Rule 6 - "Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

कै.बबन कहांडळ हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि.२२/०७/१९९१ नॉमीनेशन पत्रात सौ.शिला बबन कहांडळ, वय वर्ष - २१ यांची (Nominees)

वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे. श्रीमती शिला कहांडळ यांचे शाळा सोडल्याचे दाखल्यानुसार त्यांची जन्मतारीख २०/०१/१९७० आहे. त्यानुसार त्यांचे वय आज रोजी ४३ वर्ष आहे. सबब त्यांचे वय वर्ष ४५ च्या आत असल्याने श्रीमती शिला कहांडळ असल्याने त्या नोकरीस पात्र होत आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्रीमती कहांडळ हया उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १३९४ इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे १५५ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र.अकंपा-१०९३/प्र.क्र.९०/९३/आठ दि.२६/१०/१९९४ अन्वये अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत नोकरी देण्याबाबतची सुधारित नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापी तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती अधिकाऱ्याने अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही."

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूद राज्यशासन सेवेतील अनुकंपा नियुक्तीची योजना प्रचलित कार्यपद्धती व योजनेच्या तरतुदीत सुधारणा करण्याबाबतच्या शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/ २००४/ आठ, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/०८/२००५ मध्ये कायम केलेल्या आहेत.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत कहांडळ यांचा मुलगा नामे श्री नितीन बबन कहांडळ यांनी त्यांचे ऐवजी त्यांची आई नामे श्रीमती शिला बबन कहांडळ यांना संस्थानमध्ये कामावर घेणेबाबत केलेला लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत बबन सबाजी कहांडळ यांचे जागेवर त्यांची पत्नी नामे श्रीमती शिला कहांडळ यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत बबन सबाजी कहांडळ यांचा मुलगा नामे श्री नितीन बबन कहांडळ यांनी त्यांचे ऐवजी त्यांची आई नामे श्रीमती शिला बबन कहांडळ यांना संस्थानमध्ये कामावर घेणेबाबत केलेला लेखी अर्ज विचारात घेता दिवंगत बबन सबाजी कहांडळ यांचे जागेवर त्यांची पत्नी नामे श्रीमती शिला कहांडळ यांना सध्या संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने, किमान वेतन देणेत येवून कामावर घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८७** **श्रीरामपुर येथील भूसंपादन कक्ष व सदर कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-१६ व १७ जुलै २००० रोजीच्या सभेतील निर्णय क्र. २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीकरीता भूसंपादनाची कामे करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर (महसूल) यांचे पर्यवेक्षणाखाली श्रीरामपूर येथे कक्ष स्थापन करणेत आलेला आहे. त्यानुसार सदर कक्षाकडे कामे करणेकामी खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद मंजूर करण्यात आलेला असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन ठरविण्यात आले आहे.

| अ.नं. | तपशील | मागणी संख्या | सुरुवातीस देण्यात येत असलेले मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | तहसिलदार संवर्गातील | ०१ | ७०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील कर्मचारी | ०२ | ५०००/- |
| ०३ | लिपीक संवर्गातील कर्मचारी (कुशल ) | ०२ | ४०००/- |
| ०४ | शिपाई | ०१ | २५००/- |
| ०५ | वाहन-चालक | ०१ | ४०००/- |

त्यानुसार सध्या सदर कक्षाकडे खालीलप्रमाणे कर्मचारी वृंद कामे पहात असून त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन/मानधन देण्यात येत आहे.

| **अ.नं.** | **कर्मचा-यांचे नांव** | **संख्या** | **सध्या प्रतिमाह देण्यात येत असलेले मानधन** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. बी.आर. वाव्हळ, सेवानिवृत्त नायब तहसीलदार | ०१ | १०,००० /- |
| ०२ | श्री.रामचंद्र भा. नागरे अव्वल कारकून | ०१ | ७००० /- |
| ०३ | कंत्राटदारामार्फत लिपीक-टंकलेखक (संवर्ग) | ०४ | कुशल किमान वेतनाप्रमाणे |
| ०४ | कंत्राटदारामार्फत शिपाई | ० १ | अकुशल किमान वेतनाप्रमाणे |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/११/२०१२ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार सदर कक्ष व कक्षाकडील कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्यात आलेले कर्मचारी यांना उपरोक्त संदर्भ क्र.०४ ते ०६ अन्वये देण्यात आलेली सहा महिन्यांची मुदतवाढ दि.३०/०४/२०१३ अखेर संपुष्ठात येत आहे.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी दि.०१/०४/२०१३ चे प्रस्तावान्वये भूसंपादनाची एकूण १६ प्रकरणे चालू असल्याने सदर प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करणेकामी भूसंपादन कक्षाची व सदर कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच श्री बी.आर.वाव्हळ, नायब तहसिलदार यांनी त्यांना मिळत असलेले दरमहा रु.१०,००० /- ऐवजी रु.२०,००० /- व श्री आर.बी. नागरे, अव्वल कारकून यांनी रु.७०००/- ऐवजी रु.१५,००० /- मानधन मिळणेस विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग यांनी " मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे कार्यालयातील भूसंपादन कक्षास व कक्षाकडील ०७ कर्मचाऱ्यांना त्यांनी सुचित केलेप्रमाणे ०१ वर्षासाठी मुदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे तथापि विषयांकित भूसंपादन कक्षास व या कक्षाकडे कार्यरत असणाऱ्या एकंदर ०७ कर्मचाऱ्यांना कोणत्या अटी-शर्तीनुसार मुदतवाढ देणेत यावी याबाबत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपूढे प्रस्ताव सादर करुन उचित निर्णय घेणेत यावा.ही विनंती. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे पत्रातील विनंती व वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन सदर कक्षास मुदतवाढ व मानधनात वाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपुर येथील भूसंपादन कक्ष व सदर कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना आहे त्याच मानधन व अटी/ शर्तीवर त्यांची मुदत संपुष्टात आलेच्या तारखेपासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८८** **मागासवर्ग कक्ष स्थापन करुन बिंदु नामावली (आरक्षण विषयक) रेकॉर्ड ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.८ नुसार मागास व इतर मागास वर्गातील कर्मचा-यांना संस्थान सेवेत आरक्षण देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/१२/२००४ चे सभेत “ महाराष्ट्र शासनाचे सन २००४ चे महाराष्ट्र अधिनियम क्र.८ चे अनुपालन करुन यापुढे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ,शिर्डी चे आस्थापनेवरील रिक्त पदे भरतांना पदोन्नती देतांना सदर अधिनियमातील मागासवर्गीयांचा अनुशेष विचारात घेऊन पदे भरावे लागतील. तरी महाराष्ट्र अधिनियम क्र.८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करणेस मा.व्यवस्थापन समितीची सभा निर्णय क्र.१७० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. ”
त्यानुसार श्री साईबाबा संस्थानमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करणे, बिंदू नामावली नोंदवही तपासणेकामी तसेच आवश्यक ती माहिती घेणेकामी दि.२०/०८/२००८ रोजी मा.श्री बी डी साबळे तत्कालीन अधिक्षक, व श्री व्ही डी थोरात,लिपीक टंकलेखक आस्थापना विभाग यांनी मा.विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, नाशिक या कार्यालयास भेट देऊन मागास वर्गीय कक्षाचे लिपीक श्री चांदसरकर यांना पदनिहाय व जेष्ठतेनूसार तयार केलेले रजिस्टर १ ते ४ व याद्या दाखविल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे सुचना वजा मार्गदर्शन केले होते.
१. बिंदू नामावली नोंदवहीमध्ये पदनिहाय नोंद संपल्यानंतर शेरा मारुन तेथे संबधित अधिका-याची स्वाक्षरी घ्यावी.

२. मा.व्यवस्थापन मंडळ / विश्वस्त मंडळ यांनी पद व त्यांचे भरतीस मान्यता दिलेबाबतचे ठराव, इतिवृत्त व पारित केलेल्या आदेशाच्या प्रती.
३. शैक्षणिक संकुलाबाबत प्रत्येक शाळेस शिक्षण खात्याची मान्यता असलेची प्रमाणीत प्रत. वर्ग तसेच शिक्षक मंजुरीचे आदेशाच्या प्रती व भरती बाबतचे जाहीरातीची प्रत व नेमणुक आदेश प्रत.
४. विविध पद भरतीचे वेळी १०० बिंदू नामावलीनूसार दिलेली जाहिरात व त्याप्रमाणे केलेल्या नेमणुकांच्या आदेशाच्या प्रती.
५. कर्मचारी मंजूर आकृतीबंध.

याबाबतचा अहवाल दि.२१/०८/२००८ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर केला असता मागील प्र.अ.श्री आर एस साबळे यांनी " १०३९ कायम कर्मचारी नेमणुका २००४ च्या विश्वस्तव्यवस्था व आरक्षण अधिनियमापुर्वीच्या आहे. त्यामध्ये आरक्षणातील १०० बिंदूनुसार आधिक - उणे पदे असणे शक्य आहे. तसेच १०५२ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतही होणार आहे. त्यानंतर एकुणात आरक्षण काढावे लागेल. तथापी अंतिम आकृतीबंध मान्य झाल्यानंतरच आरक्षण निश्चीत करता येईल. तसे त्यांना लेखी कळवावे असे मत आहे. " असा शेरा दिलेला होता.

मा.विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई - ३२ यांनी शासन निर्णय क्र. सासंवि- २००९/ ४३३/ (३७/०९) का.सोळा, दि.०७ ऑगष्ट २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे २९०८ स्थायी पदे व १९१८ कंत्राटी पदे असे एकुण ४८२६ पदांचे आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे

तथापी दि.२१/०८/२००८ पासुन दि.१२/०२/२०१३ या कालावधीत मा.विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक मागास वर्ग कक्ष यांनी दि.२०/०८/२००८ रोजी दिलेल्या सुचनांची अमंलबजावणी व बिंदू नामावली तयार करणेबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. व पुर्वीच्या संगणक याद्याही आढळुन येत नाही. तसेच दि.१२/०२/२०१३ या तारखेपर्यंत कोणत्याही कर्मचा-यांच्या यादया संगणकावर तयार केलेल्या आढळुन येत नसल्याने त्या पुन्हा नव्याने तयार कराव्या लागणार असुन तत्सबंधी इतरही कामे पुर्ण करावी लागणार आहे.

तसेच दि.१३/०२/२०१३ रोजी मागासवर्ग कक्ष स्थापन करणे, १०० बिंदू नामावली तयार करणे इ. माहिती घेणेकामी आस्थापना विभागातील श्री दत्तात्रय शिंदे, श्री उमेश रोकडे व श्री विष्णु थोरात यांनी विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक या कार्यालयातील श्री चांदसरकर यांची भेट घेतली असता दि.२३/०२/२०१३ रोजी शिर्डी येथे समक्ष येऊन माहिती देऊ असे त्यांनी सांगीतले आहे.

त्यानुसार दि.२३/०२/२०१३ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथील मागासवर्ग कक्षातील श्री चांदसरकर इतर कर्मचारी यांनी शिर्डी भेटीत खालीलप्रमाणे सुचना वजा मार्गदर्शन केले आहे.

| अ.नं. | सुचना वजा मार्गदर्शन | आवश्यक पुर्तता |
|---|---|---|
| ०१. | शासन नियमानुसार मागासवर्ग कक्ष स्थापन करावा. | शासन नियमानुसार लवकरच मागासवर्ग कक्ष स्थापन करीत आहोत. |
| ०२. | जे कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र होत आहे अशा कर्मचा-याना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत परिपत्रक काढावे. | याबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-१/५६ / २०१३, दि.०८/०४/२०१३ अन्वये परिपत्रक पारित करणेत आलेले आहे. |
| ०३. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीसाठी आरक्षण रेशो (Ratio) निश्चित करावा. | अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार विनियम तयार करणे बाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-१/१२४९९/ २०११ दि.०७/०३/२०११ ने शासनाकडे प्रस्ताव पठविला आहे. त्यानंतर शासन स्तरावर ६ सभा झालेल्या आहेत. त्यात रेशोबाबत उल्लेख आहे. मात्र शासन मान्यता येणे बाकी आहे. |
| ०४ | संस्थान आस्थापनेवरील एकाकी पदासाठी आरक्षण लागु आहे काय याबाबत मा.सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडुन मार्गदर्शन घ्यावे. | याबाबत माहिती घेतली असता एकाकी पदासाठी आरक्षण लागु नाही. |

याबाबतचा अहवाल दि.२७/०२/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांचे अवलोकनार्थ सादर केला असता मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी " मागासवर्ग कक्ष श्री बी डी साबळे, प्रशासकीय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्थापन करता येईल व Do it fast now other points " असे आदेश दिलेले आहेत.

सदरचे आदेशानुसार दि.११/०३/२०१३ रोजी खालील अधिका-यांशी दुरध्वनीव्दारे चर्चा केली.

**अ)** मा.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अहमदनगर कार्यालयातील श्री घाडगे अधीक्षक, समाज कल्याण विभाग अहमदनगर यांचेशी मागासवर्ग आरक्षण कक्ष स्थापन करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे सुचना वजा मार्गदर्शन केले आहे.

मागासवर्ग कक्ष स्थापन करताना त्यामध्ये खालील पदावर संस्थानकडे उपलब्ध असलेले पदाधिकारी / अधिकारी यांचा समावेश करु शकता.

अध्यक्ष :- कार्यकारी अधिकारी

सदस्य सचिव :- प्रशासकीय अधिकारी

सदस्य:- अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग

सदस्य:- मागास वर्गीय कर्मचारी

सदस्य:- मा.सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, अहमदनगर.

सदस्य:- मा.जिल्हा सेवायोजन रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन अधिकारी अहमदनगर.

सदस्य:- मा.प्रकल्प अधिकारी अदिवासी विकास प्रकल्प राजुर,ता.अकोला,जि.अहमदनगर.

तसेच कक्षाकडे कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी असावेत.

१) अधीक्षक - ०१.

२) वरिष्ठ लिपीक - ०१.

३) लिपीक टंकलेखक - ०१.

४) शिपाई - ०१.

**ब)** मा. श्री भोसले, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेशी मागासवर्ग आरक्षण कक्ष स्थापन करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे संस्थान पातळीवर मागासवर्ग कक्ष स्थापन करु शकता असे सांगीतले.

अध्यक्ष :- कार्यकारी अधिकारी

सदस्य सचिव :- प्रशासकीय अधिकारी

सदस्य:- अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग

सदस्य:- एच आर मॅनेजर,साईबाबा हॉस्पिटल

सदस्य:- प्राचार्य,औ.प्र.संस्था/ प्राचार्या सा.ज्यु.कॉलेज/ प्राचार्या इं.मि.स्कुल/ मुख्याध्यापिका सा.क.मंदिर

सदस्य:- मागासवर्गीय कर्मचारी (अधिकारी / कर्मचारी )

कक्षाकडे कामे करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी असावेत.

१) अधीक्षक - ०१.

२) वरिष्ठ लिपीक - ०१.

३) लिपीक टंकलेखक - ०१.

४) शिपाई - ०१.

**क)** मा.श्री खोसे सहाय्यक आयुक्त, (महानगरपालीका /नगरपालीका ) जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांचेशी मागासवर्ग कक्ष स्थापन करणेबाबत चौकशी केली असता त्यांनी संस्थान पातळीवर खालीलप्रमाणे मागासवर्ग कक्ष स्थापन करु शकता असे सांगीतले.

अध्यक्ष :- कार्यकारी अधिकारी

सदस्य सचिव :- प्रशासकीय अधिकारी

सदस्य:- अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग

सदस्य:- एच आर मॅनेजर,साईबाबा हॉस्पिटल

सदस्य:- प्राचार्य,औ.प्र.संस्था/ प्राचार्या सा.ज्यु.कॉलेज/प्राचार्या इं.मि.स्कुल/मुख्याध्यापिका सा.क.मंदिर

सदस्य:- मागासवर्गीय कर्मचारी (अधिकारी / कर्मचारी )

ज्यावेळी संस्थानमध्ये जाहिरात देऊन आरक्षणानुसार कर्मचारी भरती करावयाचे वेळी वरील प्रमाणे मा.सेवायोजन अधिकारी अहमदनगर, मा.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर तसेच मा.अदिवासी प्रकल्प विकास अधिकारी यांचेकडे संस्थानकडे आरक्षणानुसार भरावयांचे पदांची यादी अधिसुचित करुन त्यांचेकडुन मागासवर्गीय पात्र उमेदवारांच्या याद्या मागविण्यात येऊन त्यांच्या मार्फत आलेल्या यादीतील पात्र उमेदवांराना मुलाखतीस बोलविण्यास यावे. व मुलाखतीचे वेळी उपरोक्त संबंधीत अधिका-यांना मुलाखतीसाठी निमंत्रीत सदस्य बोलविण्यात यावे, असे सांगीतले आहे.

शासनामध्ये जुन १९७४ मध्ये शासन स्तरावर कक्षाची स्थापना करण्यात आली. हा कक्ष मागासवर्गीया संबंधीचे धोरण आणि आदेशाचे कार्यान्वयन ही कामे पार पाडीत आहे.त्यात मागासवर्ग कक्षाची कामे खालील प्रमाणे दर्शविलेली आहे.

१) विभाग प्रमुखांच्या कार्यालयात व इतर कार्यालयात इतर बाबीबरोबरच शासन आदेशाची अंमलबजावणी होते आहे याबाबत पाहणी करणे.

२) थेट सेवाप्रवेश व पदोन्नतीसाठी रोष्टरची तपासणी करणे.

३) न भरलेली राखीव पदांची व संख्येची योग्य प्रकारे गणना करणे.

४) विभागीय पातळीवर समितीवर मागासवर्गातील व्यक्तीचा शक्य होईल तेव्हा समावेश करता येतो की काय हे पहाणे.

५) निवड सूच्यांची योग्य प्रकारे गणना करणे.

६) मागासवर्गातील ज्या कर्मचा-यांचे अधिक्रमण झाले असेल त्यांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करणे.
७) सेवे संबधिच्या बाबींच्या संबंधात मागासवर्गातील कर्मचा-यांच्या गा-हाण्यांच्या अभिवेदनामध्ये लक्ष घालणे.
८) सेवेमध्ये असणा-या मागास कर्मचा-यांनी केलेल्या अभिवेदनासंबंधीचे संदर्भावर कार्यवाही करणे.

शासन निर्णय व मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार अमंलबजावणी करणे कामी खालील प्रमाणे मागासवर्ग कक्ष स्थापन करुन त्यांचेकडुन आरक्षण विषयक कामे करुन घेता येतील.

१. टिपणी पान नं.३ वर (क) मध्ये दर्शविल्याप्रमाणे मागासवर्ग कक्ष स्थापन करता येईल. (यात पान नं.०२ चे 'अ' मधील पदावरील शासकीय अधिकारी निमंत्रीत म्हणुन घेता येतील.)
२. मागासवर्ग कक्ष तयार करुन त्यात आवश्यक कर्मचा-यांच्या नेमणुका करुन पुढील कामे सुरू करणे.
३. उपरोक्त कक्षाची निर्मीती झालेवर आवश्यक असणारे रजिस्टर, यादया ,शासन आदेश प्रत व तदनुषंगीक माहिती (बिंदू नामावली तपासणी करणेसाठी लागणारी कागदपत्रे) आस्थापना, अधिक्षक व संबधित हे मागासवर्ग कक्ष कार्यालयास वेळचेवेळी देतील.

तरी उपरोक्त १,२ व ३ नुसार कार्यवाही करणेस मान्यतेसाठी मा. त्रिसदस्यीय समिती पुढे सादर.

**निर्णय क्र.५२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८९ एसआयबी, शाखा शिर्डी यांचे कार्यालयासाठी दोन रुम देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि डेप्युटी सेंट्रल इंन्टेलिजेस ऑफिसर, एसआयबी, नाशिक, शाखा, शिर्डी यांनी दि.२२/०२/२०१३ चे पत्राने कार्यालयीन कामासाठी दोन रुम मिळणेस विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०७/२००८ चे सभेतील निर्णयानुसार पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी, मुख्याधिकारी, नगरपंचायत, शिर्डी, तहसिलदार, राहाता, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता तसेच नियमाप्रमाणे होणारा विद्युत आकार संस्थानकडे जमा करुन घेण्याच्या अटीवर निवासस्थाने देण्यात आलेली आहेत. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार बॉम्ब शोधक व नाशक पथक, शिर्डी, राज्य गुप्तवार्ता विभाग, शिर्डी व ट्रॅफिक पोलीस, शिर्डी यांचे कार्यालयासाठी निवासस्थाने देण्यात आलेली आहेत.

उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरानुसार होणारी भाडयाची रक्कम सेवाआकार म्हणून तसेच मिटर रिडींगप्रमाणे होणारी विद्युत आकाराची रक्कम दरमहा संस्थानचे लेखाशाखेत भरणेचे अटीवर दि डेप्युटी सेंट्रल इंटेलिजेस ऑफिसर, एसआयबी, नाशिक, शाखा शिर्डी यांना कार्यालयीन कामासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान या इमारतीतील रुम नं.१५ व १६ या दोन रुम देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, एसआयबी, शाखा शिर्डी यांचे कार्यालयासाठी दोन रुम देणेसाठी विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१ माहे जुलै- २०१३ गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे जुलै, २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणेः -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | किसान विकास पत्र,श्रीरामपूर | १/७/२०१३ | ३,००,००,०००/- |
| २) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १४/७/२०१३ | ९,१८,१५,४१४/- |
| ३) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १६/७/२०१३ | १०,६५,०५,८८०/- |
| ४) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २७/७/२०१३ | ४,३९,३७,५३१/- |
| ५) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २७/७/२०१३ | ४,३९,३७,५३१/- |
| ६) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २७/७/२०१३ | २,१९,६८,७६६/- |
| ७) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ३१/७/२०१३ | ३,८४,४५,३४०/- |
| ८) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ३१/७/२०१३ | ३,८४,४५,३४०/- |
| ९) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुलै-२०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम- | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम** | ५१,५०,५५,८०२/- |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ५१.५० कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) इंडीयन बँक, शिर्डी
१३) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१४) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १४ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.५१.५० कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.५२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १४ या स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ५१.५० मात्र कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२ घनकचरा डेपोबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान इमारती व परिसरामध्ये दैनंदिन साफसफाई करवून निघणारा घनकचरा हा श्री साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपंचायत शिर्डी व राहाता नगरपरिषद यांच्या संयुक्तपणे राहाता नगरपरिषदच्या हद्दीत तयार करणेत आलेल्या डेपोवर दि. २९/०७/२०१० पासून नियमितपणे टाकले जात होता. याठिकाणी साईटेक सायंटिफिक सिस्टीम पुणे यांचे मार्फत घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन खत तयार केले जात होते सदर प्रोजेक्टवर बगीचा विभागाचे नियंत्रण आहे. तथापी पिंपळवाडी येथील ग्रामस्थांचा घनकचरा टाकण्यास विरोध झाल्याने तेथे दि. २८/०६/२०११पासून घनकचरा टाकणे बंद करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्प माहे मे २०१२ पासून बंद अवस्थेत आहे.

वरील अडचणीमुळे व दैनंदिन निघणाऱ्या घनकचऱ्याचा त्रास साईभक्तांना होवू नये म्हणून कचरा तातडीने तात्पुरत्या स्वरुपात श्री साईबाबा संस्थानचे मालकीचे असलेल्या निमगाव (कोऱ्हाळे) हद्दीतील गट नं. १८३ चारी नं. ११ जवळ १०० फुट x ४० फुट असलेल्या खड्ड्यामध्ये टाकला जात होता. परंतू त्यावेळी महामहिम राष्ट्रपती यांचे शिर्डी दौऱ्याचे नियोजन असल्याने सदर ठिकाणी संस्थानचा दैनंदिन साफसफाई करवून निघणारा घनकचरा टाकण्याचे बंद करण्यात आले. त्यानंतर संस्थानचे मालकीचे असलेल्या निमगाव शिवारातील स. नं. २५० मधील जागेत असलेल्या १२ X३० खड्यात कचरा टाकण्यात येत होता.

दि. २०/०४/२०१३ रोजी सकाळी ११-३० वाजता सदर कचराडेपोतील कचऱ्याने पेट घेतला. सदर घटनेची माहिती मिळताच तातडीने संस्थानचे दूरध्वनीवरुन शिर्डी नगर पंचायत, शिर्डी, संजीवनी साखर कारखाना, कोपरगांव व राहाता नगर परिषद या ठिकाणचे अग्नीशामक दल यांना डेपोवर पाचारण करण्यात आले. त्यांनी शिताफीने प्रयत्न करुन दुपारी ०४-०० वाजेपर्यंतचे दरम्यान आग आटोक्यात आणली. त्यानंतर रात्री ०८-०० वाजेपर्यंत पुर्णपणे विझविण्यात यश आले. त्यानंतर दुसरे दिवशी म्हणजे रविवार दि. २१/०४/२०१३ रोजी बांधकाम विभागामार्फत दोन जे.सी.बी. लावून जळालेली राख जवळच्या खड्यात ढकलून त्यावर माती टाकण्यात आली. वरील परिस्थितीमुळे दि. २१/०४/२०१३ पासून पर्यायी व्यवस्था होईपर्यंत घनकचरा साईआश्रम नं. ०२ चे हद्दीत साठवला जात आहे. तथापी गुरुवार दि.

०२/०५/२०१३ रोजी सायं. ५ वा. निमगावचे सरपंच श्री कातोरे यांनी कचरागाडी अडवून साईआश्रम नं. ०२ चे हद्दीत कचरा साठवण्यास विरोध केला आहे. सध्या शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांचा घनकचरा सावळीविहिर हद्दीत टाकला जात आहे दि. ०३/०५/२०१३ रोजी त्याठिकाणी संस्थानचा कचरा टाकण्यास सुरुवात केली असता नगर पंचायतचे कर्मचारी यांनी त्यास विरोध केला व नगर पंचायतची परवानगी घेण्याचे सांगितले आहे.

दि. ०२/०५/२०१३ रोजी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपंचायत शिर्डी व राहाता नगरपरिषद यांनी संयुक्तपणे राहाता नगरपरिषदच्या हद्दीत तयार करणेत आलेल्या डेपोवर प्रत्यक्ष जावून भेट दिली असता कचरा डेपोचे गेट उघडे होते, खतप्रकल्पाला कुलूप लावलेले होते, खतप्रकल्पाचे कर्मचारी तेथे हजर नव्हते, तसेच कचरा डेपोला आग लागली असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्या ठिकाणी सध्या कचरा टाकता येत नाही. त्यामुळे सध्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेची समस्या निर्माण झाली आहे. सध्या पिंपळवाडी हद्दीतील प्रोजेक्ट बंद आहे.

याकामी संस्थानचे मालकिचे असलेल्या निमगाव शिवारातील स. नं. २४९ मधील जागेत १०० फुट x १०० फुट खड्डा तयार करुन त्यास १० फुट उंचीचे वाल कपाऊंड (गेटसह) करुन त्यास बंदिस्त जाळी बसविण्यात यावी ज्यामुळे केरकचरा हवेने इतरत्र उडुन जाणार नाही व आजुबाजूचे शेतकऱ्यांच्या तक्रारी येणार नाहीत. म्हणजे त्याठिकाणी घनकचरा टाकता येईल. असा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०१/२०१३ रोजीचे सभेपुढे ठेवण्यात आला आहे त्यावर निर्णय क्र. ११ ने स. नं. २४९ मधील जागेत १०० फुट x १०० फुट खड्डा तयार करुन त्यास १० फुट उंचीचे वाल कपाऊंड (गेटसह) करुन त्यास बंदिस्त जाळी बसविण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळालेली आहे तसेच आवश्यक असल्यास महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणेत यावी असे ठरले आहे.

त्यास अनूसरुन शुक्रवार दि.१०/०५/२०१३ रोजी घनकचरा डेपोबबात माहिती घेणेकरिता उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांचे कार्यालयात फिल्ड ऑफीसर, श्री. पी. एस. हाडबे तसेच श्री. मिसाळ साहेब यांची भेट घेवून त्यांना श्री साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपंचायत शिर्डी व राहाता नगरपरिषद यांनी संयुक्तपणे राहाता नगरपरिषदच्या हद्दीत तयार करणेत आलेल्या घनकचरा डेपोबाबत तसेच प्रकल्प बंद असलेबाबत माहिती दिली. तसेच संस्थान इमारती व परिसरामध्ये दैनंदिन साफसफाई करवून निघणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याकामी संस्थानने स्वतःच्या जागेत नियोजन करुन घनकचरा डेपो तयार करणे किंवा नविन घनकचरा प्रकल्पाची उभारणी करणे गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्या बाबींची पुर्तता करावी लागेल अशी माहिती विचारली असता त्यांनी खालील कागदपत्रांची पुर्तता करावी लागणार असल्याचे सांगितले.

१) प्रस्ताव
२) दैनंदिन निघणाऱ्या घनकचऱ्याचे वजन
३) जागेचा नकाशा (चतु:सीमेसह)
४) ७-१२ तसेच ८-अ चा उतारा
५) ग्रामपंचायत कार्यालय, निमगाव-कोऱ्हाळे यांचे नाहारकत प्रमाणपत्र
६) फॉर्म नं. १ (MPCB.gov.in या वेबसाईटवर मिळेल )
७) टाऊन प्लॅनिंग नाहारकत प्रमाणपत्र
८) भूजल सर्वेक्षण यंत्रणा, अहमदनगर यांचे नाहारकत प्रमाणपत्र

उपरोक्त कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी बांधकाम विभागाकडून अ.क्र. ३ व ४ चे कागदपत्र प्राप्त झालेले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय, निमगाव-कोऱ्हाळे, मा. वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, अहमदनगर. मा. सहाय्यक संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, अहमदनगर. यांचेकडील नाहारकत प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. मान्यता येणे बाकी आहे.

श्री साईबाबा संस्थान हे शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांचे कार्यक्षेत्रात असल्याने नगर पंचायतीस संस्थान कडून विविध करापोटी वार्षिक अंदाजे रुपये १,७५,०००,००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंचाहत्तर लाख) इतकी रक्कम अदा केली जात आहे. तेव्हा संस्थानचे घनकचऱ्याची विल्हेवाट लावणे ही जबाबदारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची असल्याने याकामी मा. मुख्याधिकारी शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांना पत्र देवून कळविणेची कार्यवाही विधी विभागामार्फत करण्यात आलेली आहे.

**अ)** सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने कचऱ्याचे ढीग साचत गेल्यास दुर्गंधी सुटेल. तसे होवू नये म्हणून मा. व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार संस्थानचे मालकिच्या मौजे निमगाव हद्दीतील स. नं. २४९ मधील जागेत १०० फुट x १०० फुट खड्डा तयार करणे व १० फुट उंचीचे वाल कपाऊंड करुन तेथे घनकचरा टाकता येईल. सदरची कामे उपरोक्त ठिकाणाहून मान्यता आलेवर लगेचच करता येईल.

**ब)** तसेच भविष्यात दैनंदिन घनकचऱ्याची समस्या निर्माण होवू नये म्हणून शिर्डी पासून ठराविक अंतरावर १० ते १५ एकर जागेत कचरा डेपो व खत प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. याकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास बांधकाम, बगीचा विभागामार्फत सविस्तर प्रस्ताव (जागा, मशिनरी, बांधकाम इत्यादि खर्चासह) सादर करता येईल

तरी या प्रस्तावावर मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अ प्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- आरोग्य विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ श्रींना अर्पण केलेले नारळ विक्री करणेकामी फेरनिविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागा मार्फत व्दारकामाई, समाधीमंदिर बाहेरील काऊंटर, गुरुस्थान या ठिकाणी साईभक्त श्रीफळ अर्पण करतात. सदर नारळ आपण गोळा करुन नारळ स्टॉल या ठिकाणी साठवण करण्यात येते. व गरजे प्रमाणे वापरतो. संस्थानच्या दैनंदिन वापरा व्यतरिक्त शिल्लक राहिलेले नारळ फळे विक्री करणेचा प्रस्ताव दिनांक २८/०२/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता. मा. व्वस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र २०२ अन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देवुन निवीदा मागणी करणे मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक १८/०३/२०१३ रोजीचे पुढारी वर्तमान पत्रात सदरची जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. २६/०३/२०१३ पर्यत होती. यामध्ये ०८ दरपत्रक प्राप्त झाले.

श्री शरद मगन देवेरे, कोपरगांव यांनी आवक विभागाकडे आवक नं.१९८८७ दि. २६/०३/२०१३ रोजी आपले दरपत्रक संस्थानकडे सादर केले होते. त्यांना दिनांक २७/०४/२०१३. रोजीचे सभेत वाटीघाटी साठी बोलविण्यात आलेले आहे. श्री देवरे हे दिनांक २७/०४/२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वाटाघाटीसाठी हजर राहून सर्वात उच्चत्तम दर रु. ६.२५ प्रती नग दर श्री शरद मगन देवरे यांनी दिलेला दर मान्य करण्यात आला.

श्री देवरे यांना जा.क्र एसएसएस/वशी/बगीचा/८३०/१३ दि.२०-५-२०१३ रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे व त्यांना रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे व संस्थानकडे अनामत रुक्कम रु.३०,०००/- भरण्याचे कळविलेले आहे.

जा.क्र.एसएसएस/वशी/बगीचा/९८७/१३ दि.३१-५-२०१३ रोजीचे पत्रान्वये कळविले की, आपणास जा.न. एसएसएस /वशी-बगीचा /८३०/२०१३. दि. १७/०५/२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. या कार्यादेशात नमुद केले प्रमाणे आपण रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दिला नाही. तसेच आपण संस्थानकडे अनामत रुक्कम रु.३०,०००/- भरलेली नाही. ती तातडीने भरावी व करारनामा करुन दयावा असे कळविण्यात आलेले आह.

श्री शरद मगन देवरे, कोपरगांव यांना नारळ फळे उचलणे बाबत वेळो-वेळी दुरध्वनी वरुन कळविण्यात आले आहे. समक्ष सांगण्यात आलेले आहे. तरीही श्री देवरे हे नारळ फळे उचलण्यास टाळाटाळ करतात. नकार दिलेला आहे व त्यांनी अनामत रक्कम रु.३०,०००/- संस्थानकडे जमा केलेले नाही. त्यांनी दिनांक २०/०५/२०१३ रोजी संस्थानकडे करारनामा करण्यासाठी रु.१००/- चा स्टॅम्प पेपर आणून दिला करारनामा टाईप केले नंतर करारनाम्यावर सहया केलेल्या नाहीत. नारळ फळे न उचल्यामुळे संस्थानचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे नुकसान भरपाई वसुल करणेसाठी त्यांचे वर कायदेशिर कार्यवाही करण्याचे ठरले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०४/२०१३. रोजीचे सभेत उपस्थित व्यापारी यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.न. | पार्टीचे नाव | चर्चेअंती देवू केलेले प्रति शेकडा दर रुपये शेकडा दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | श्री दिपक राजाभाऊ चांडवले,श्रीरामपुर | रु.३१५/- |
| ०२ | श्री रखमाजी मुरलीधर गाढे, बेलापूर | रु.५१०/- |
| ०३ | श्री सुनिल एकनाथ ढोकचौळे, खंडाळा | रु.४६०/- |
| ०४ | श्री शरद मगन देवरे, कोपरगांव | रु.६२५/- |
| ०५ | श्री पठाण इम्तीयाज रफिक, कोपरगांव | रु. ५६०/- |
| ०६ | श्री अदिनाथ पंढरीनाथ बानकर, शनि शिंगणापूर | रु.६२०/- |
| ०७ | श्री अशोक गंगाराम डुकरे, कोपरगांव | -- |
| ०८ | श्री सुलतान सुभान मन्सुरी, येवला | रु.५३०/- |

श्री शरद मगन देवरे, कोपरगांव यांनी नारळ फळे न उचलल्याने त्यांचेवर कायदेशिर कार्यवाही करता येईल व या पुढिल प्रत्येक व्यापाऱ्याचे उच्चतम दरानुसार विचारणा करुन उच्चतम दराने नारळ फळे विक्री करता येईल. तसेच व्यापाऱ्यांनी नारळ फळे उचलण्यास नकार दिल्यांस नारळ फळांची फेरनिवीदा काढून त्यांची विक्री करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२७.०४.२०१३ पासुन श्रींना अर्पण केलेले नारळ संस्थानकडे पडून आहेत व सध्याही नारळ जमा होत आहेत. नारळ हि नाशवंत वस्तू असून सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने ते साठवणेसाठी जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.०१ ते ०८ इच्छूक निविदाधारकांपैकी अ.नं.०४ चे श्री.शरद मगन देवरे हे वगळता बाकी ०७ निविदाधारकांना पुनश्च एकदा संधी देऊन त्यांचेकडून सिलबंद पाकिटात नारळ विक्रीसाठीचे दर मागविण्यात यावेत. सदर प्राप्त होणाऱ्या दरांच्या निविदा मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडून उच्चतम दरधारकास नारळ उचलण्याचा कार्यादेश देण्यात यावा. तसेच, श्री शरद मगन देवरे, कोपरगांव यांनी नारळ फळे न उचलल्यामुळे त्यांची अनामत रक्कम जप्त करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१३ किर्तनकार व कलाकार निश्चिती करणे, बिदागी निश्चीत करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ हा दि.२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम:-**

उत्सवात ३ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन कार्यक्रम होत असतात. मागील रामनवमी उत्सवात ३ दिवसाचे किर्तनासाठी रु. ९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. खालील ४ कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१३ मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेले आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | किर्तनकार नांव | अ.नं. | किर्तनकार नांव |
|---|---|---|---|
| १ | ह.भ.प.श्री.मंदार गंगाधर व्यास<br>१ मजला, श्रीपाद दर्शन नं.१<br>लक्ष्मण रेषा बिल्डींग समोर, आयरे रोड,<br>डोंबिवली ( पूर्व ) जि.ठाणे<br>मो.९५९४२५६५७०, ८६५५८००३५६ | ३ | ह.भ.प.श्री.गंगाधर नरहर व्यासबुवा<br>१ला मजला, श्रीपाददर्शन बिल्डींग नं.१<br>लक्ष्मण रेषा बिल्डींग समोर, आयरे रोड,<br>मु.पो.डोंबिवली (पूर्व ) जि.ठाणे.पिन-४२१ २०१<br>मो.९७०२८५२२९० |
| २ | ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर<br>श्री केशव कृपा, कौस्तुभ मंगल कार्यालय,<br>श्री संत दासगणु नगर ,कारेगांव रोडश<br>परभणी-४३१४०१<br>दूरभाष: (०२४५२) २२२९८४,<br>मो.९४२१९८३०५१ | ४ | ह.भ.प.श्री.वैभव प्रदीप ओक<br>६०,वृंदावन सुदामा, भारत गॅससमोर ,<br>तुकारामनगर डोंबिवली (पूर्व ) जि.ठाणे<br>मो.९३९४२५६५६२ |

मागील उत्सवाप्रमाणे किर्तनकारास रु.९००१/- (नऊ हजार एक मात्र) मानधन देणेबाबत व उपरोक्त पैकी किर्तन कार्यक्रम कोणास द्यावा या बाबतचा निर्णय त्रिसदस्यीय समितीचे सभेत घ्यावा लागेल.

**ब) कलाकार कार्यक्रम :**

प्रत्येक उत्सवात तिन दिवस संगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन संस्थान मार्फत करण्यात येत असते. गुरुपौर्णिमा-२०१३ चे उत्सवात खालील प्रमाणे १४ कलाकारांनी कार्यक्रम मिळणे बाबत अर्ज केलेले आहेत. त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| १ | साई सारथ सतसंगम<br>कोलकत्ता-७००११९<br>मो.नं.९८७४२५०१७२, ८९६१७५८०४५,<br>९७४८०४८४४ | साईलिला नृत्यांचा कार्यक्रम | ३८ | विनामुल्य |
| २ | चंचल जामदार<br>गायक एवं संगीतकार<br>१२८४/५, नंदानगर,इंदौर ( म.प्र )<br>मो- ०९८९३११३७०३, ०७८९८७८८००६ | साईगीत सत्चरित्र भजनरुपात | - | विनामुल्य |
| ३ | श्री.विश्वनाथ रमेश ओझा<br>डिलर्स भारत पेट्रोलियम कॉ.लि.<br>बेलापूर रोड,श्रीरामपूर | साई मिलन की आस<br>साई भजन संध्या | ८ | विनामुल्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | जि.अहमदनगर -४१३७०९<br>मो-९४२२२२६२११<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१२ मध्ये कार्यक्रम झालेला आहे. | | | |
| ४ | विष्णू तिवारी ( टी सिरिज गायक )<br>साई परिवार, लखनऊ .<br>मो-९४१५०७६२५५५, ९४१५०२६०८३ | साई भजनसंध्या कार्यक्रम | १० | विनामुल्य |
| ५ | श्री.विनोद नाखवा,<br>बी-५/२३, २ रा माळा,रुनवाल नगर प्रताप सिनेमाजवळ,ठाणे (पश्चिम )४०० ६०१<br>मो-९८२०७८४८४२ | मी मुंबईचा हाय कोळी | - | मानधन दयाल ते मान्य |
| ६ | वनिता बजाज<br>जी एच/८/१३९, पश्चिम विहार, नागलोई , दिल्ली, | साईभजन संध्या | - | संस्थान देईल ते मानधन |
| ७ | जयराज कलशी | भक्तीसंगीत कार्यक्रम | - | मानधनाचा उल्लेख नाही |
| ८ | विदुशी सुमित्रा गुहा ,<br>पद्मश्री ॲवार्ड, ई-२२, दुसरा मजला,<br>संकेत नवी दिल्ली- ११००१७<br>फोन नं-९१-११-४१८१२०२३<br>मो- ९१-९८१८६०१४३५ | क्लासिकल गायनाचा कार्यक्रम | - | मानधनाचा उल्लेख नाही |
| ९ | श्री.मोहन श्रीपाद घाटपांडे<br>रा.बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे.<br>C/o- वृषाली जनरल स्टोअर्स.<br>मो.८६०५४२५९४२ | शिवचरित्र व मी जिजाऊ बोलतीय एक पात्री कार्यक्रम | - | मानधनाचा उल्लेख नाही |
| १० | श्री.अशिष विजय रानडे<br>१३ रेड रोज,संकलेजा गार्डन इस्टेट, नाशिक रोड, के. जे मेहता हायस्कूलजवळ<br>नाशिक -४२२१०१ मो-९७६७४७०३१५ | क्लासिकल गायनाचा कार्यक्रम | - | मानधनाचा उल्लेख नाही |
| ११ | मधुमती मिश्रा,<br>बी-२, शेण ब्राइन्ड अपार्टमेंन्ट शिंदेनगर वावधन पुणे, -४११०२१<br>मो.९५७९२२१०५०, ९५७९४३३७४४ | ओडीसी डान्सर | - | माधनाचा उल्लेख नाही |
| १२ | श्री.विजय साखरकर<br>दत्तनिवास चाळ नं.२/१०, देवीपाडा, मच्छिमार्केट समोर, बोरिवली (पूर्व ) मुंबई,६६.<br>मो नं.९८२१३९३३२३, दुरध्वनी-२८८५२१०२ | साई-स्वर नृत्योत्सव | १५ | ८०००/-<br>प्रवास भाडे |
| १३ | अमेय गुप्ते<br>१५,जगन निवास,एल.जे.रोड,शिवाजी पार्क, दादर, मुंबई -४०० ०२८<br>मो.९३२३३९७८०६ | स्वरतरंग<br>भक्तीगीतांचा कार्यक्रम | - | मानधन अपेक्षा नाही फक्त प्रवास खर्च |
| १४ | पुनम खन्ना<br>ई.३५१, दुसरा मजला, ग्रेटर कैलासपार्क, नवी दिल्ली.११० ०४८.<br>मो-९८१००३४८७२ | साईभजन | ७ | ३ रेल्वे तिकीट, २१,०००/- मानधन |

उत्सवाचे प्रत्येक दिवशी किमान एक कार्यक्रम या प्रमाणे तीन दिवशी किमान तीन कार्यक्रम आयोजित करणे अपेक्षित आहे. कार्यक्रमाची वेळ ७.३० ते १०.०० अशी राहील. त्यामध्ये कलाकारांचा सत्कारपण आहे. त्यासाठी आर्धा तास लागतो. प्रती दिवशी एक कार्यक्रम दोन तासाचा राहील.

गुरुपौर्णिमा- २०१३ चे उत्सवाचे तीन दिवसाचे कालावधीसाठी उपरोक्तपैकी कलाकार व त्यांचे मानधन निश्चिती बाबत निर्णयार्थ व अवलोनार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१३ निमित्ताने आयोजित कार्यक्रमासाठी विनामुल्य सेवा करणाऱ्या कलाकरांना प्राधान्य देण्यात यावे व विनामुल्य सेवा करणारे कलाकार निश्चित करण्याचे अधिकार प्रशासकीय अधिकारी श्री.बी.डी. साबळे, श्री.एस.व्ही. गमे व अधिक्षक, मंदिर विभाग यांना प्रदान करणेत आले**

**तसेच, श्री गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये ३ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन करणेसाठी वरील उत्सव समितीने किर्तनकाराची निवड करावी व मागील उत्सवाप्रमाणे किर्तनकारांना रु.९,००१/- मात्र बिदागी आदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१३ तसेच पावसाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडून त्यावर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतदू आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शसाठी व मंदिरात प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

- **प्रस्तावना :-**

संस्थानतर्फे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी रविवार दि. २१ जूलै, २०१३ ते दि. २३ जूलै, २०१३ अखेर "श्री " चा गुरुपौर्णीमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्याचे दिवसांत साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरामध्ये मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

**अ) श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१३ निमीत्त करावयाची व्यवस्था : (कालावधी दि. २१.०७.२०१३ ते दि. २३.०७.२०१३ अखेर ०३दिवस)**

**I. ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले )**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | श्रीं चे चावडी समोरील जागेत १८' उंचीचा | ६०'X३०' | १८००.०० |
| ०२ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरा समोर | ६०'X४०' | २४००.०० |
| ०३ | व्दारकामाई ते रथ पालखी गेट पर्यन्त. | १६०'X१७' | २७२०.०० |
| ०४ | समाधि मंदिर गेट नं. ३ ते मारुती मंदिरापर्यन्त १५' उंचीचा | ७५'X२०' | १५००.०० |
| ०५ | श्री मारुती मंदिर ते शामसुंदर हॉलपर्यन्त दक्षिणोत्तर १५' उंचीचा | ६०'X२५'<br>३०'X२०' | १५००.००<br>६००.०० |
| ०६ | गेट नं. ४ करीता बाहेरील बाजूस | ४०'X२०' | ८००.०० |
| ०७ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह | १५'X१५' | २२५.०० |
| ०८ | पालखी स्वागता करीता स्वागत कक्ष येथे माहिती केंद्रासाठी कनात व बिछायतीसह | १५'X१५' | २२५.०० |
| ०९ | जुने प्रसादालय प्रवेशव्दार (नगर-मनमाड फुटपाथ व आतिल बाजूने मोबाईल लॉकर पर्यन्त) | ३०'X१०'<br>४५'X२५' | ३००.००<br>११२५.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **१३४२०.००** |
| | **अंदाजे रु.३.५० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च - अ (I)** | | **१,४०,९१०.००** |

**II ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप. (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले )**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरव्दार गेटपर्यन्त १८' उंचीचा | २८४'X१९'.५" | ५५१५.२८ |
| ०२ | गेट नं. ३ समोरील मोकळ्या जागेत (१६ आर जागेत) | २१०'X८०' | १६८००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **२२३१५/-** |
| | **अंदाजे रु.६.२५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च - अ (II)** | | **४,१८,४०६/-** |

**III. मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था :**

**कालावधी :- २१.०७.२०१३ ते दि.२३.०७.२०१२ अखेर - ३ दिवस**

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण/ एकक | अंदाज दर रु. प्रति चौ.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | **मंदीर परिसरामध्ये कलाकारांचे स्टेज व्यवस्था :-** मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था :- ३' उंचीचे स्टेज, स्टेजवर सिंथेटीक मॅटींग, स्टेजचे मागील बाजूस आकर्षक रंगाचा पडदा, व कलाकारांचे मेकअपसाठी १६'x१०' साईजच्या ०२ नग ग्रीन रुम तयार करणे तसेच सदरहू कार्यक्रमासाठी फायबर खुर्च्या ३०० नग इ. सह स्टेज व्यवस्था | १६'x२४' = ३८४ चौ.फुट | २०.०० | २३,०४०.०० |
| | **एकूण अ (III)** | | | **२३,०४०.००** |

## IV. बॅरीकेडींग कालावधी दि. २१.०७.२०१३ ते २३.०७.२०१३ अखेर ०३ दिवस-

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण रनिंग फुट | अंदाज दर रु. प्रति र.फुट प्रति दिवस | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेकेटींग करणे | ९०० रनिंग फुट | ६.०० | १६२००.०० |
| | **एकूण - अ(IV)** | | | १६२००.०० |

## अ (२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कनात व बिछायतीसह लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | साईज | चौ.फुट | कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | पुणे ते शिर्डी मार्गावर पालखीसाठी जि.प. प्राथ.शाळा, नांदगाव शिंगवे नाईक येथे कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणे | ६०'x४०' | २४०० | दि.१६/०७/२०१३ ते दि.१८/०७/२०१३ |
| ०२ | पुणे ते शिर्डी मार्गावर पालखीसाठी जि.प.प्राथ. गुहा येथे कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणे | ६०'x४०' | २४०० | दि.१७/०७/२०१३ ते दि.१९/०७/२०१३ |
| ०३ | पुणे ते शिर्डी मार्गावर पालखीसाठी जि.प.प्राथ.निर्मळ पिंप्री येथे कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणे | ६०'x४०' | २४०० | दि.१८/०७/२०१३ ते दि.२०/०७/२०१३ |
| | अंदाजे रु.३५० प्रती चौ.फुट प्रमाणे येणारा खर्च एकूण अ-२ | | | ७५,६००.०० |

| | |
|---|---|
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ साठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ१ व अ२)** | ६,७४,१५६.०० |

## ब) पावसाळयाकरीता ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप व्यवस्था दि.०१/०७/२०१३ ते दि.३०/०९/२०१३ अखेर एकूण ९२ दिवस :-

## ब (१) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडपाची साईज | चौरसफुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिर बाहेर पडण्याचा मार्ग ते श्री गुरुस्थान मंदिराचे समोरील बेसमेंटचे पश्चिम बाजू पर्यन्त (पूर्व-पश्चिम) | १५०'x१०' | १५००.०० |
| ०२ | बेसमेंटचे पश्चिम बाजूस (दक्षिण -उत्तर) | ५०'x१०' | ५००.०० |
| ०३ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या ) पश्चिम बाजुस, दक्षिणोत्तर असा | ४५'x५०' | २२५०.०० |
| ०४ | व्हि. आय. पी. दर्शन रांगेसाठी (शनि गेट) | ११५'x१०' | ११५०.०० |
| ०५ | गेट नं. ०३ समोर | १५'x१०'<br>४०'x१०' | १५०.००<br>४००.०० |
| ०६ | जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम प्रवेशव्दारा समोर | ३०'x४५'<br>२०'x१५' | १३५०.००<br>३००.०० |
| ०७ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ नंदादिप समोर | ११५'x३५' | ४०२५.०० |
| ०८ | साईप्रसाद नं.०२ / चौकशी कार्यालयासमोरील मोकळया जागेत | १५'x६०'<br>१५'x२०' | ९००.००<br>३००.०० |
| ०९ | लाडू विक्री काउंटर समोर | ६०'x३०' | १८००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **१४६२५.००** |
| | **अंदाजे रु.०.२५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च ब (१)** | | **३,३६,३७५.००** |

**ब (०२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले)**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण** | **मंडपाची साईज** | चौरसफुट |
|---|---|---|---|
| ०१ | समाधी मंदिरा समोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह) | ६०'x६५' | ३९००.०० |
| | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | | **३९००.००** |
| | **अंदाजे रु.०.३० प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च ब (१)** | | **रु. १,०७,६४०/-** |

| | |
|---|---|
| **सन २०१२ पावसाळयाचे कालावधीत करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (ब)** | **४,४४,०१५/-** |
| **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१३ व पावसाळयासाठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ + ब )** | **११,१८,१७१/-** |

वरिल तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ व पावसाळ्या करीता रु.११.१८ लक्ष मात्र अंदाजे खर्च अपेक्षित आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगी दाखल बांधकाम करण्यात आलेल्या साई आश्रम १ व २ मधील इमारती दि.११/०४/२०१३ रोजी साईभक्तांकरीता निवासव्यवस्थेसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे जुने प्रसादालय परिसर, साईनगर परिसर व भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) येथील तात्पुरते निवासव्यवस्थेसाठी दरवर्षी टाकण्यात येणाऱ्या मंडपाची आवश्यकता भासणार नसल्याने सदर ठिकाणचे मंडपाचा समावेश केलेला नाही.

**प्रस्ताव :-**

उपरोक्तप्रमाणे 'अ' नुसार श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०१३ निमित्ताने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.६,७४,१५६/- मात्र व 'ब' नुसार पावसाळ्याचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.४,४४,०१५/- मात्र असे एकूण रुपये ११.१८ लक्ष मात्रचे खर्चास इकडील दि.१४/०५/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमान पत्रात व संस्थाने अधिकृत संकेतस्थाळावर निविदा सूचनेची जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मान्यता घेणेत आलेली आहे. निविदा सूचनेनुसार कोरे निविदा फॉर्म विकत घेणेची मूदत दि.३०/०५/२०१३ ते दि.१०/०६/२०१३ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करणेची मूदत दि.१२/०६/२०१३ अखेर सांय ६ वाजेपर्यंत होती.

**अ) विहीत मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहे.**

| अ.नं. | मंडप ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर |
| ०२ | बालाजी मंडप, मनमाड |
| ०३ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर |
| ०४ | कुऱ्हे टेन्ट हाऊस ॲण्ड डेकोरेटर्स, श्रीरामपूर |
| ०५ | झुरळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी |
| ०६ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०७ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी |
| ०८ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर |
| ०९ | नाना उजवणे मंडप कॉन्ट्रॅक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला |

**ब) विहीत मूदतीत खालीलप्रमाणे ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.**

| अ.नं. | मंडप ठेकेदाराचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ३९७१ | १०/०६/२०१३ |
| ०२ | बालाजी मंडप, मनमाड | ४०८६ | ११/०६/२०१३ |
| ०३ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | ४०८७ | ११/०६/२०१३ |
| ०४ | कुऱ्हे टेन्ट हाऊस ॲण्ड डेकोरेटर्स, श्रीरामपूर | ४०८८ | ११/०६/२०१३ |
| ०५ | झुरळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ४०८९ | १२/०६/२०१३ |
| ०६ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | ४०९० | १२/०६/२०१३ |
| ०७ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी | ४०९१ | १२/०६/२०१३ |
| ०८ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | ४१७८ | १२/०६/२०१३ |

**विभागाचा अभिप्राय / मतः-** गुरुणौर्णिमा उत्सव २०१३ निमित्त साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होणे अपेक्षीत आहे. तसेच पावसाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे पावसापासून संरक्षण होणेकामी मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे.

सदरची व्यवस्था तातडीने करणे गरजेचे असल्यामुळे उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

## अ (१) गुरुपौर्णीमा उत्सव व्यवस्था.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | व्यवस्थेचा तपशिल<br>**अ (१) गुरुपौर्णीमा उत्सव व्यवस्था. दि. २१/०७/२०१३ ते दि. २३/०७/२०१३ अखेर ०३ दिवस** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **मंदिर परिसर, पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलीस स्टेशनजवळ ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) १३४२० चौ. फुट** | | **समाधी मंदिर उत्तर बाजु , चावडी गेट ते नगरद्वार गेट, गेट नं. ०३ समोरील १६ आर जागेत ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम एस पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) २२३१५ चौ.फुट** | | **मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी स्टेज ३८४ चौ. फुट इतर व्यवस्था** | | **दर्शन व भोजन व्यवस्था बॅरेकेटींग ९०० र. फुट** | | **पुणे ते शिर्डी मार्गावर शिंगवे नाईक, गुहा व निर्मळ प्रिंप्री येथे ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे. एकुण ७२०० चौ. फुट** | |
| | | निविदा दर | चर्चा दर | निविदा दर | चर्चा दर | निविदा दर | चर्चा दर | निविदा दर | चर्चा दर | निविदा दर | चर्चा दर |
| ०१ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ४.५० | २.९० | ६.५० | ४.०० | ३०.३८ | **१६.००** | १०.०० | **५.५०** | ५.०० | ३.२० |
| ०२ | बालाजी मंडप, मनमाड | ५.०० | **२.८५** | १०.०० | ७.०० | २५.०० | २०.०० | १०.०० | ७.०० | ५.०० | ३.०० |
| ०३ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | ५.०० | ३.७५ | ५.०० | ४.०० | २०.०० | १९.५० | १५.०० | १२.०० | ५.०० | ३.७५ |
| ०४ | कुऱ्हे टेन्ट हाऊस ॲण्ड डेकोरेटर्स, श्रीरामपूर | १०.०० | ६.०० | -- | -- | २४.०० | २०.०० | -- | -- | ७.०० | ५.०० |
| ०५ | झुरळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ४.९५ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ५.५० | -- |
| ०६ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | ५.०० | ४.०० | ७.०० | ३.०० | ४०.०० | ३०.०० | ९.०० | ८.०० | ६.०० | ५.०० |
| ०७ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी | ८.०० | ३.५० | ८.०० | **२.९०** | ६०.०० | २५.०० | ३०.०० | १०.०० | ४.०० | **२.५०** |
| ०८ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, नगर | ७.०० | ५.५० | ८.०० | ६.५० | ६०.७६ | ५५.०० | १०.०० | ८.०० | ७.०० | ६.०० |

## ब) पावसाळी मंडप व्यवस्था-

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | व्यवस्थेचा तपशिल<br>**ब) पावसाळी मंडप व्यवस्था दि. ०१/०७/२०१३ ते दि.३०/०९/२०१३ अखेर ९२ दिवस** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप ( लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) १४६२५ चौ.फुट** | | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले) ३९०० चौ.फुट** | |
| | | निविदा दर | चर्चा दर | निविदा दर | चर्चा दर |
| ०१ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ०.५० | ०.२५ | ०.६५ | ०.३० |
| ०२ | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेडर्स, मनमाड | ०.५० | **०.१९** | ०.५० | **०.१९** |
| ०३ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | ०.४० | ०.२२ | ०.४० | ०.२२ |
| ०४ | कुऱ्हे टेन्ट हाऊस ॲण्ड डेकोरेटर्स, श्रीरामपूर | १.२५ | ०.२१ | १.२५ | ०.२१ |
| ०५ | झुरळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ०.७९ | -- | -- | -- |
| ०६ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | ०.४० | ०.३५ | ०.४५ | ०.४० |
| ०७ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहुरी | १.२५ | ०.३० | १.२५ | ०.२५ |
| ०८ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | ०.५५ | ०.४५ | ०.५५ | ०.५० |

**निर्णय क्र.५२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले दरामध्ये सदरचे व्यवस्थेसाठी खालील ठेकेदार यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत.**

**०१. बालाजी मंडप, ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड**

**अ) समाधी मंदिर परिसरात करावयाचे मंडप, इ. व्यवस्था.**

(कालावधी दि.२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३) एकूण -०३ दिवस

**निविदेतील परिशिष्ट अ प्रमाणे**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण/ एकक | दर (रु) | एकूण रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१. | समाधी मंदिर परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) मंडप उभारणे (सोबत जोडलेले निविदेमधील परिशिष्ट अ (१) मधिल नं. १ नुसार ) | १३४२० चौ. फुट | २.८५ प्रति दिवस प्रति चौ.फुट | १,१४,७४१.०० |
| | एकूण पूर्णांकीत रुपये | | | १,१४,७४१.०० |

**ब) पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांच्या सुविधेकरीता मंदिर परिसरात करावयाची मंडप व्यवस्था.**

(कालावधी दि.०१/०७/२०१३ ते ३०/०९/२०१३) एकूण - ९२ दिवस

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण/ एकक | दर (रु) | एकूण रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१. | मंदिर परिसरामध्ये ताडपत्रीचे छत असलेले कापडी (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) मंडप उभारणे (सोबत जोडलेले निविदेमधील परिशिष्ट ब मधिल नं. १ नुसार ) | १४६२५ चौ. फुट | ०.१९ प्रति दिवस प्रति चौ.फुट | २,५५,६४५.०० |
| ०२. | मंदिर परिसरामध्ये ताडपत्रीचे छत असलेले कापडी (एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले) मंडप उभारणे (सोबत जोडलेले निविदेमधील परिशिष्ट ब मधिल नं. २ नुसार ) | ३९०० चौ. फुट | ०.१९ प्रति दिवस प्रति चौ.फुट | ६८,१७२.०० |
| | एकूण पूर्णांकीत रुपये | | | ३,२३,८१७.०० |
| | एकूण (अ + ब ) = रु. | | | ४,३८,५५८.०० |

**०२. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर**

**अ) श्री गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त किर्तनासाठी मंदिर परिसरात करावयची स्टेज व्यवस्था.**

(कालावधी दि.२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३) एकूण - ०३ दिवस

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मंदिर परिसरामध्ये सभाकुंड येथे किर्तनासाठी १६x२४ साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. निविदेतील परिशिष्ठ अ (१) मधील '३' नुसार | ३८४ चौ. फुट | दि.२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३ अखेर ०३ दिवस | रु.१६/- प्रति दिवस प्रति चौरस फुट | १८,४३२/- |
| | **एकुण रुपये** | | | | **१८,४३२/-** |

**ब) दर्शन व भोजन लाईनकरीता बॅरेकेटींग व्यवस्था करणे-**

(२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३) अखेर ०३ दिवस.

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | दर्शन रांगेकरीता व श्री साईपसादालय येथे साई भक्तांच्या रेलींग व्यवस्थे कामी ०४ फुट उंचीचे बॅरेकेडींग करणे (सोबत जोडलेले निविदेतील परिशिष्ट अ (१) मधील नं.०४ नुसार) | ९०० र. फुट | दि.२१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३ अखेर ०३ दिवस | रु. ५.५० प्रति दिवस प्रती र. फुट | १४,८५०/- |
| | एकुण रुपये | | | | १४,८५०/- |
| | **एकुण रुपये (अ+ब)..** | | | | **३३,२८२/-** |

**०३. लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर**

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१३ निमित्ताने साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात करावयाची मंडप व्यवस्था.**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण / एकक | कालावधी | दर | रक्कम एकुण ०३ दिवसाची |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मंदिर परिसरामध्ये समाधी मंदिर समोरील सभाकुंडामध्ये ताडपत्रीचे छत व एम.एस. पाईप कैच्याचे स्ट्रक्चर असलेली कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणी करणे | २२३१५ चौरस फुट | दि. २१/०७/२०१३ ते दि.२३/०७/२०१३ अखेर ०३ दिवस | २.९० प्रति दिवस प्रति चौरस फुट | १,९४,१४०.०० |
| ०२. | पुणे ते शिर्डी मार्गावर पालखीसाठी जि.प. प्राथ.शाळा , नांदगाव येथे कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणे | २४०० चौरस फुट | दि.१६/०७/२०१३ ते दि.१८/०७/२०१३ अखेर ०३ दिवस | २.५० प्रति दिवस प्रति चौरस फुट | १८,०००.०० |
| ०३. | पुणे ते शिर्डी मार्गावर पालखीसाठी जि.प.प्राथ. शाळा गुहा येथे कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणे | २४०० चौरस फुट | दि.१७/०७/२०१३ ते दि.१९/०७/२०१३ अखेर ०३ दिवस | | १८,०००.०० |
| ०४ | पुणे ते शिर्डी मार्गावर पालखीसाठी न्यु इंग्लि. स्कूल..निर्मळ पिंप्री येथे कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणे | २४०० चौरस फुट | दि.१८/०७/२०१३ ते दि.२०/०७/२०१३ अखेर ०३ दिवस | | १८,०००.०० |
| | | | | **एकुण रुपये** | **२,४८,१४०.००** |

**मंडप ठेकेदार यांनी वरिल प्रमाणे चर्चा/ वाटाघाटीनंतर देऊ केलेल्या निम्नतम दराने सदरचे काम करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.७,१९,९८०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

**तसेच, उत्सवाचे व पावसाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास, ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** दरवर्षी श्री साईबाबा संस्थानच्या दोन्ही रुग्णालयाच्या इमारती, फर्निचर, मशिनरी, इंक्युपमेंन्ट-इन्सटयुमेंन्ट इ. चल-अचल मालमत्ता, कॅश इन ड्रॉवर, कॅश इन सेफ, कॅश इन ट्रॅन्झीट व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार रुग्णालये कर्मचाऱ्यांचा समुह विमा राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडे तुलनात्मक प्रिमियम दर कार्यपध्दतीने उतरविण्यात येतो. मागील वर्षी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा-कोपरगाव यांचेकडे रु.४,३७,५६६/- इतक्या प्रिमियम रकमेस दि.१० जुलै २०१२ ते दि.०९ जुलै २०१३ या कालावधीसाठी विमा उतरविण्यात आला होता, ही मुदत दि.०९ जुलै २०१३ रोजी पुर्ण झालेली आहे

**(ब)** उपरोक्त अ मध्ये नमूद केल्यानुसार विमा उतरविणेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे :

| Sr. no. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 45.00 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 00.60 |
| 3 | Burglary & Housebreaking policy | 65.00 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 00.60 |
| 5 | Comprehensive Fire policy (Including STFI, Terrorism & Earthquake cover) | 80.00 |
| 6 | Group Insurance under provisions of Workmen Compensation Act, 1923 | Approx 600 personnel |
| | Total | 191.20 Crores |

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडे आवश्यक माहिती दिली जाते. व तुलनात्मक प्रिमियम दरानुसार विमा पॉलिसी नुतनीकरण केली जाते. त्यास अनुसरुन खालील राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना आवश्यक माहिती देऊन मा. कार्यकारी

अधिकारी यांचे समक्ष चर्चा वाटाघाटीस बोलावुन करुन विमा पॉलिसी नुतनीकरण करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिदस्यीय समितीचे सभेमध्ये सादर करण्यास मान्यता असावी.

१. दि न्यु इंडीया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपुर (राष्ट्रीयकृत)
२. ओरीएन्टल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर (राष्ट्रीयकृत)
३. नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगाव (राष्ट्रीयकृत)
४. युनायटेड इंडीया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी (राष्ट्रीयकृत)

एकुण खर्चः- एकुण १९१.२० कोटी एकत्रित रकमेसाठी अंदाजे प्रिमियम खर्च साधारणतः रु.८,००,०००/- इतका खर्च येईल.

**निर्णय क्र.५२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील मालमत्ता विमा पॉलिसी नुतनीकरण करणेसाठीचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत आले.**

**याकामी विविध राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागविण्यात येऊन प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे समोर उघडणेत याव्यात व निम्नतम दरधारक विमा कंपनीस कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच, यासाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.५२९** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** संस्थान रुग्णालयात उपलब्ध नाहीत अशी औषधे वैद्यकीय अधिकारी बाहेरुन विकत घेण्यासाठी Prescription लिहून देतात. अशा प्रकारे औषधे लिहुन देताना ती प्राधान्याने जनरीक औषधे लिहून द्यावीत व संस्थानने देखील जनरीक औषधे खरेदी करावी अशी सुचना यापुर्वी केलेली आहे. तसेच कन्सल्टंट डॉक्टरांशी चर्चा करुन अपोलो फार्मसीमध्ये नामांकित कंपनीची जनरीक औषधे विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. अपोलो फार्मसीमध्ये विकली जाणारी औषधे ही MRP दराने विकली जातात ती औषधे MRP दरापेक्षा कमी दरात विकली तर सर्व घटकातील रुग्णांना त्याचा फायदा होईल, याबाबींचा विचार करुन अपोलो फार्मसी यांना MRP पेक्षा कमी किंमतीने औषधे विक्री करणेस परवानगी देण्यात आली. त्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांना तसेच अपोलो फार्मसी यांना तातडीने लेखी कळविणेत यावे. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**(२)** दिल्लीचे साईभक्त श्री.प्रवेश जैन यांनी दि.०१.०४.२०१३ रोजीच्या ई-मेल पत्राद्वारे संस्थानच्या ध्वनिक्षेपण विभागामार्फत ऐकविले जाणारे मंदिरातील सर्व कार्यक्रम व इतर मंत्रोच्चार, भक्तीगीते यांचे संगणकाद्वारे डिजीटल सॉफ्टवेअर तयार करुन संपुर्ण संगणकीय सेट, साऊंड सिस्टीमसह संस्थानला देणगी स्वरुपात देणार असलेबाबत कळविले होते. त्यांची ही देणगी मिळाल्यावर सध्या ध्वनिक्षेपण विभागामध्ये वापरल्या जाणाऱ्या सी.डी./ डी.व्ही.डी. बंद होऊन साऊंड सिस्टीम यंत्रणा संगणकाद्वारे अद्ययावत होणार असल्याने संस्थानने त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-साऊंड/ ९३८/ २०१३, दि.२५.०५.२०१३ च्या ई-मेल अन्वये सदरचे काम करण्यास परवानगी दिलेली होती. श्री.जैन हे सदरचे काम करत असताना त्यांची ध्वनिक्षेपण विभागातील कर्मचाऱ्याबरोबर वादावादी झाली व कर्मचाऱ्याकडून अपमानास्पद वागणूक मिळालेबाबत त्यांनी मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य यांचेकडे दुरध्वनीवरुन तक्रार केली होती. त्यामुळे मा.जिल्हाधिकारी यांनी श्री.जैन यांना सभेसमोर बोलावून त्यांचेबरोबर चर्चा केली असता, श्री.जैन यांना ध्वनिक्षेपण विभागातील कर्मचारी श्री.दिलीप चांगदेव कोते, मदतनीस यांनी अपमानास्पद वागणूक दिल्याचे समजले व अशा प्रकारची वर्तणूक देणगीदार साईभक्तास होऊ नये याबाबत समितीसमोर सांगितले.

यास्तव श्री.दिलीप चांगदेव कोते, मदतनीस, ध्वनिक्षेपण विभाग यांची इतर विभागात समकक्ष पदावर तातडीने बदली करणेत यावी. (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

**(३)** श्री साईबाबा संस्थानकडून विविध भक्तोपयोगी सुविधा पुरविणेत येतात, त्या सुविधा भक्तांना कशाप्रकारे उपयोगी ठरत आहेत किंवा त्यामध्ये कोणत्या प्रकारची उणीव आहे, तसेच संस्थान कर्मचारी भक्तांना कशा प्रकारे वागणूक देतात इ.बाबत ई-मेल, एसएमएस अथवा इतर आधुनिक सुविधेद्वारे भक्तांच्या प्रतिक्रिया नोंदवुन घेण्यात याव्यात. यामध्ये निवासस्थाने, प्रसादालय, मंदिर, संरक्षण या विभागांच्या सुविधेबाबत माहिती देण्यात यावी. या प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात निवासस्थाने विभागांचा समावेश करावा. साईभक्तांनी ई-मेल, एसएमएस करुन कळविलेल्या माहितीचा (फिडबॅक) चा आढावा घेण्यात येऊन, त्या माहितीनुसार भक्तांच्या सुचना, तक्रार, कर्मचारी वर्तणुक इत्यादींची वर्गवारी करुन त्या वरीष्ठांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

**(४)** शिर्डी येथे  विविध क्षेत्रातील मान्यवर श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. त्यावेळी संस्थानच्या लेंडीबागेतील सभागृहामध्ये पत्रकार परिषद घेत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. संस्थानशी संबंधीत नसलेल्या विषयाबाबत कोणतीही पत्रकार परिषद संस्थान आवारात घेता येणार नाही, असे सर्व पत्रकारांना कळविण्यात यावे.

सभागृहाचे वापरासाठी जनसंपर्क अधिकारी यांनी प्रथम वरिष्ठ अधिकाऱ्यांची पुर्व परवानगी घ्यावी. जनसंपर्क अधिकारी यांचे सुचने शिवाय सभागृह उघडून न देणेबाबत तेथील कर्मचाऱ्यांना सक्त सुचना द्याव्यात. (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

वरील निर्णय क्र. ४३४ ते ५२९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित-

| | | |
|---|---|---|
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.५२९** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** संस्थान रुग्णालयांतील डॉक्टरांनी रुग्णांना औषधे लिहुन देताना, पुर्वी ठरलेप्रमाणे प्रामुख्यांने जनरीक औषधेच लिहुन देणे व अपोलो फार्मसी कंपनीने रुग्णांना जनरीक औषधे उपलब्ध करुन देणेबाबत तातडीने लेखी कळविणेत यावे. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**(२)** दिल्लीचे साईभक्त श्री.प्रवेश जैन यांनी दि.०१.०४.२०१३ रोजीच्या ई-मेल पत्राद्वारे संस्थानच्या ध्वनिक्षेपण विभागामार्फत ऐकविले जाणारे मंदिरातील सर्व कार्यक्रम व इतर मंत्रोच्चार, भक्तीगीते यांचे संगणकाद्वारे डिजीटल सॉफ्टवेअर तयार करुन संपुर्ण संगणकीय सेट, साऊंड सिस्टीमसह संस्थानला देणगी स्वरुपात देणार असलेबाबत कळविले होते. त्यांची ही देणगी मिळाल्यावर सध्या ध्वनिक्षेपण विभागामध्ये वापरल्या जाणाऱ्या सी.डी./ डी.व्ही.डी. बंद होऊन साऊंड सिस्टीम यंत्रणा संगणकाद्वारे अद्ययावत होणार असल्याने संस्थानने त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-साऊंड/ ९३८/ २०१३, दि.२५.०५.२०१३ च्या ई-मेल अन्वये सदरचे काम करण्यास परवानगी दिलेली होती. श्री.जैन हे सदरचे काम करत असताना त्यांची ध्वनिक्षेपण विभागातील कर्मचाऱ्याबरोबर वादावादी झाली व अशा प्रकारे अपमानास्पद वागणुक मिळालेबाबत त्यांनी मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य यांचेकडे दुरध्वनीवरुन तक्रार केली होती. त्यामुळे मा.जिल्हाधिकारी यांनी श्री.जैन यांना सभेसमोर बोलावून त्यांचेबरोबर चर्चा केली असता, श्री.जैन यांना ध्वनिक्षेपण विभागातील कर्मचारी श्री.दिलीप चांगदेव कोते, मदतनीस यांनी अपमानास्पद वागणूक दिल्याचे समजले व अशा प्रकारची वर्तणूक देणगीदार साईभक्तास होऊ नये याबाबत समितीसमोर सांगितले.

यास्तव श्री.दिलीप चांगदेव कोते, मदतनीस, ध्वनिक्षेपण विभाग यांची इतर विभागात समकक्ष पदावर तातडीने बदली करणेत यावी. (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

**(३)** श्री साईबाबा संस्थानकडून विविध भक्तोपयोगी सुविधा पुरविणेत येतात, त्या सुविधा भक्तांना कशाप्रकारे उपयोगी ठरत आहेत किंवा त्यामध्ये कोणत्या प्रकारची उणीव आहे, तसेच संस्थान कर्मचारी भक्तांना कशा प्रकारे वागणूक देतात इ.बाबत ई-मेल, एसएमएस अथवा इतर आधुनिक सुविधेद्वारे भक्तांच्या प्रतिक्रिया नोंदवुन घेण्यात याव्यात. यामध्ये निवासस्थाने, प्रसादालय, मंदिर, संरक्षण या विभागांच्या सुविधेबाबत माहिती देण्यात यावी. या प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात निवासस्थाने विभागांचा समावेश करावा. साईभक्तांनी ई-मेल, एसएमएस करुन कळविलेल्या माहितीचा (फिडबॅक) चा आढावा घेण्यात येऊन, त्या माहितीनुसार भक्तांच्या सुचना, तक्रार, कर्मचारी वर्तणुक इत्यादींची वर्गवारी करुन त्या वरीष्ठांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. ४३४ ते ५२९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी